शाहूनगरवासी नाटक मंडळीकरितां लिहिलेलें. ]

# माझी बहीण.

## पांच अंकी

## शोकपर्यवसायी नाटक.

सर्वं शीलवता जितम् ॥

×× ×× ××

शीलं प्रधानं पुरुषे तद्यस्येह प्रणश्यति ॥
न तस्य जीवितेनार्थो न धनेन न बंधुभिः ॥

महाभारत—उद्योगपर्व.

लेखक–' **किरात.** '

[ प्रथमावृत्ति. ]

[ सर्व हक्क लेखकानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत. ]

मत ०-१२-० ] [ सप्टेंबर १९१५

# 'किरात' कृत नाटकें व इतर पुस्तकें.

| | | | किंमत. |
|---|---|---|---|
| १ | पानिपतचा दुर्दैवी मोहरा. ... | ( ऐतिहासिक ) | १—०-० |
| २ | राजाराम आणि ताराऊ. ... | ( ” ) | ०-१२-० |
| ३ | विजयानगरचा डळमळित राजमुगुट. | ( ” ) | ०-१०-० |
| ४ | वुइल्यम टेल् अथवा बांका तिरंदाज. | ( ” ) | ०—८-० |
| ५ | पन्हाळगडचा किल्लेदार. | (ऐतिहासिक) आवृत्ति ४थी. | ०—४-० |
| ६ | द्रोणसंकोप. ... ... | ( पौराणिक ) | ०—६-० |
| ७ | संशयी जिजाबाई... ... | ( प्रहसन ) | ०—२-० |
| ८ | डोकेफिरू. ... ... | ( प्रहसन ) | ०—२-० |
| ९ | सुंदरमाधव. ... | ( संगीत—सामाजिक ) | ०-१०-० |
| १० | यक्ष-प्रमाद अथवा मुक्तवेणीदाम-बंधन. | (संगीत) | १—०-० |
| ११ | राणा जगदेव. ... | ( संगीत—ऐतिहासिक ) | ०-१२-० |
| १२ | शिवराज्याभिषेक. | ( राष्ट्रीय कीर्तन ) | ०—२-० |
| १३ | माझी बहीण ... ... | ( गद्य नाटक ) | ०-१२-० |

यांतील नं. ५, ६, ७, ८, ९, १० चीं **मुंबई येथें मनोरंजन छापखान्यांत,** नं. १ चें **पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत,** नं. २, ३, ४ चीं **पुणें येथें जगद्धितेच्छु छापखान्यांत,** नं. १२ चें **पुणें येथें चित्रशाळा छापखान्यांत,** व नं. १३ चें शाहूनगरवासी नाटक मंडळीकडे किंवा प्रकाशकाकडे विकत मिळतील.

## 'किरात' कृत खालील पुस्तकें लवकरच प्रसिद्ध होतील.

१ तंजावरचा तंटा. ( ऐतिहासिक गद्य नाटक. )
२ कुरुभंग. ( पौराणिक गद्य नाटक. )
३ घोषयात्रा. ( " " )
४ सिंहध्वज. ( गद्य नाटक. )
५ वेणिपूरचा बचाव. ( " " )
६ वीरसिंह जयसिंह. ( " " )
७ लिसिस्ट्रेटा. ( गद्य नाटक. )
८ दोन रजपूत कन्या अथवा सत्वपरीक्षण. ( ऐतिहासिक नाट्यप्रसंग ) आवृत्ति २ री.
९ मर्द ठाणेदारीण. ( ऐतिहासिक गद्य नाटक— विद्याविनोद मासिकांत छापलेलें. )
१० दोन फटिंग. ( प्रहसन. )
११ द्रौपदीसौभाग्य. ( गद्यपद्यात्मक नाटक. )
१२ द्रौपदीवस्त्रहरण. ( " " " )
१३ नारद-विनोद अथवा चित्ररथ-प्रमाद. ( " " " )
१४ विद्धशालभंजिका अथवा कोरींव पुतळी. ( गद्यपद्यात्मक नाटक—विविधज्ञान-विस्तारांत अंशतः छापलेलें. )
१५ कुसुमाञ्जलि. (सं० नाट्यप्रसंग—स्वतंत्र छापलेलें.) आवृत्ति २ री.
१६ लायकर्गसचें चरित्र ('भाषांतर' मासिकांत छा० प्रसिद्ध झालेलें.)
१७ संभाजीच्या पश्चात् मराठ्यांची स्थिति. ( ऐतिहासिक चर्चात्मक निबंध. भारतवर्ष मासिकपुस्तकांत प्रसिद्ध झालेला.)

---

## Brother's Love.

*Tresham:—*
What love should you esteem—best love?
*Mildred;—*
True love.
*Tresham:—*
I mean, and should have said, whose love is best
Of all that love or that profess to love?
*Mildred:-*
The list is so long—there's father's, mother's, husband's
*Tresham:-*
Mildred, I do believe a brother's love
For a sole sister must exceed them all!
For see now, only see! tnere's no alloy
Of earth that creeps into the perfect'st gold
Of other loves—no gratitude to claim;
You never gave her life–not even aught
That keeps life–never tended her, instructed,
Enriched her–so your love can claim no right
Over her's save pure love's claim–that's what I Call
Freedom from earthliness. ×× ××.
I think, I am sure, *a brother's love exceeds*
*All the world's loves in its unworldliness!*

" A Blot in the 'Scutcheon,-Act 2-Scene i "

*Robert Browning.*

विश्वांतील वनिता-वृंदास

आदर्शरूप

अशा-

अखिल भारतीय

आर्यभगिनींस

सप्रेम समर्पण.

'किरात.'

॥ स्त्रियः साध्व्यो महाभागाः
संमता लोकमातरः ॥

॥ धारयंति महीं राजन्
इमां सवन काननाम् ॥

महाभारत -अनुशासन पर्व.

# प्रस्तावना.

जवळ जवळ दोन तपें झालीं. आंग्ल नाट्य-वाङ्मयाच्या रम्य उद्यानांत विहार करित असतां कांहीं सुंदर नाट्यपुष्पें आढळलीं. त्यापैकींच प्रस्तुतचें नाटक हें एक सुंदर पुष्प आहे. आंग्ल नाटककार जेम्स शर्ले यांच्या The Traitor या नाटकावरून प्रथमतः हें लिहिलें. नंतर त्यांत रिचर्ड शेल यानीं सदर्हू नाटकावरून लिहिलेल्या Evadne or the Statue या नांवाच्या रंगावृत्तीवरून कांहीं फिरवाफिरव केली. इतकेंहि करून महाराष्ट्र रंगभूमीकरितां प्रस्तुत लेखकास मुळांत नसलेले कांहीं प्रसंग नवेच घालावे लागले. मूळ नाटकांतील कथाभाग अत्यंत मनोहर, उदात्त, आणि पवित्र असल्यामुळें व त्यांतील नायिकेच्या पात्राचें स्वभावदर्शन आमच्या सद्गुणी व शीलसंपन्न अशा भारतीय आर्यभागिनींच्या आदर्शभूत स्वभावाशीं सदृश असल्यामुळें ह्या नाटकाची निवड केली. याच्या वाचनानें अथवा प्रेक्षणानें एक घटकाभर जरी उच्च मनोवृत्ती जागृत झाल्या तरी देखील लेखकाच्या श्रमाचें चीज होईल.

ता० ३० सप्टेंबर १९१५ } किरात.

# ह्या नाटकांतील पात्रें व त्यांचीं कामें.

| पात्रें. | अंक १ प्रवेश ४ | अंक २ प्र. ४ | अंक ३ प्र. ३ | अंक ४ प्र. ३ | अंक ५ प्र. ४ |
|---|---|---|---|---|---|
| चित्रवीर्य-पद्मपुरीचा राजा. | ४ | | ३ | २ | ४ |
| ललितराज-त्याचा आप्त. | ३-४ | २ | ३ | २-३ | ३-४ |
| प्रियाळ-चित्रवीर्याचा आप्त | | ४ | | ३ | १ |
| कोपनशील- } सत्यपाळ | | २-३-४ | २-३ | २-३ | २-४ |
| पद्मनाभ- } दिवाणांचे पुत्र. | १ | ३-४ | २-३ | | २-३-४ |
| दयाळजी-एक सरदार. | २-४ | १ | १-३ | | १-४ |
| कांतिवर्म } पद्मपुरींतील सरदार. | ४ | | ३ | ३ | ४ |
| आनंदघन } | ४ | ४ | ३ | ३ | ४ |
| प्रेमसागर } | | ४ | | | ४ |
| राणोजी } गड्याचे वेषांतील रणवीर० | २ | १-३ | १ | १ | १-३-४ |
| पिराजी-ललित० हस्तक. | १-२-३ | १-४ | १ | २ | १-३-४ |
| मोहन-प्रियाळचा गडी. | | ४ | | | |
| हैबती-नोकर. | | ४ | | | |
| इतर नोकर वगैरे. | | | | २-३ | |
| आनंदवल्लरी } कोपनशीलाची ब० | १ | ३-४ | २-३ | ३ | २-४ |
| गिरिजा-दयाळजीची ब० | | १-३ | | १ | १-४ |
| मंजुळा-आनंदवल्लरीची दासी. | १ | ४ | | | १-४ |

**सूचना:**—प्रत्येक पात्रापुढें प्रवेशवार जे आंकडे दिले आहेत त्याप्रमाणें त्या त्या अंकांतील त्या त्या प्रवेशांतच फक्त त्यांची कामें आहेत, इतर प्रवेशांत नाहींत, असें समजावें.

# माझी बहीण.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थळ—कोपनशीलाचा वाडा.**

[ आनंदवल्लरी व मंजुळा बोलत आहेत. ]

**आनंदवल्लरी**—मंजुळे, मंजुळे! 'आनंदवल्लरी आनंदवल्लरी' ह्मणून, मला कोणीं हांक मारल्याचं तुला नाहीं आलं ऐकूं?

**मंजुळा**—नाहीं, मला मुळींच नाहीं ऐकूं आलं कांहीं.

**आनंद॰**—(साश्चर्य) मुळींच नाहीं ऐकूं आलं कांहीं? तर मग मला हा नुसता भासच झाला कीं काय?

**मं॰**—असेल, भासहि असेल. पण ताईसाहेब, तुह्मीं ह्मणता ती हांक तुह्मांला कोणच्या बाजूनं ऐकूं आली?

**आनंद॰**—अशी ह्या बाजूनं. 'आनंदवल्लरी' हे शब्द दोनदां उच्चारल्याचं मला स्पष्ट ऐकूं आलं.

**मं॰**—ह्या बाजूनं? मग बरोब्बर! ताईसाहेब, आपण मणिपूर कधीं पाहिलं आहेत कां?

**आनंद॰**—हो, कित्तीकदां. पण त्याचा अन् ह्याचा काय संबंध?

**मं०**—काय संबंध! संबंध काय तो सांगतें मी,—पण ह्या आपल्या पद्मनगरच्या कोणत्या बाजूला आहे बरं तें?

**आनंद०**—तेंऽऽऽ—असं ह्या बाजूला आहे.

**मं०**—ह्याच बाजूला ना? मग सगळा संबंध बरोब्बर जुळला!

**आनंद०**—मंजुळे, हें काय ह्मणते आहेस तूं? संबंध कसला जुळला?

**मं०**—पण ताईसाहेब, तुह्मीं जर तें पाहिलं आहेत तर मी तुह्मांला असं एक अगोदर विचारितें कीं पद्मनगर चांगलं कां मणिपूर चांगलं?

**आनंद०**—हें ग काय तुझं विचारणं? चावनट नाहीं तर—

**मं०**—तसं नव्हे ताईसाहेब, तिथलं हवापाणी कसं काय आहे तें मला ठाऊक नाहीं, ह्मणून विचारलं आपलं.

**आनंद०**—तिथलं हवापाणी ग काय विचारतेस! थोरले महाराज, बाबांना आणि युवराज चित्रवीर्यांना घेऊन, तिथं वर्षांतून दोन दोन चार चार महिने जाऊन रहात. आणि बाबांच्याबरोबर आई आणि आह्मी सगळेजणहि तिथंच जाऊन रहात असूं. मला आणि कोपनशील दादाला, अन् तसंच आमच्या पद्मनाभालाहि पण तिथं राहणंच जास्त आवडे.

**मं०**—होय ना? मग बरोबर संबंध जुळला कीं.

**आनंद०**—तो ग कसा?

**मं०**—कसा! कसा ह्मणजे? मणिपुरास तुमच्या नांवाचा जर कोणी जप चालविला असेल तर त्याचा हा पडसाद, आणि दुसरं काय?

**आनंद०**—मंजुळे! तूं इतकी अंसशीलशी मला कल्पना नव्हती! एकून तूं हा असा संबंध जुळिवलास का?—

**मं०**—यांत मी कोण संबंध जुळवणार? तो संबंध आपले बाबा—सत्यपाल दिवाणजी—जिवंत असतां त्यांनींच ठरवून टाकला होता. आणि तो, ज्या दिवशीं प्रियाळरावांच्या आणि आपल्या लग्नाच्या वाङ्निश्चयाचा समारंभ झाला त्याच दिवशीं होऊन दिखील चुकला.

**आनंद०**—( सुस्कारा टाकून ) हो! आणि तो बाबांच्या पश्चात्! आणि त्याच दिवशीं तिकडं पद्मनगर सोडून एकदम मणिपुराला जावं लागलं. मंजुळे, यावरून तुला असं नाहीं वाटत कीं ही आनंदवल्लरी अभागी आहे ह्मणून?

**मं०**—अभागी? ताईसाहेब, ज्या मुहूर्तावर हा वाङ्निश्चयाचा समारंभ, त्याच मुहूर्तावर प्रियाळरावांची मणिपूरच्या सरसुभ्यावर नेमणूक झाल्याचा—त्यांच्या हातीं चित्रवीर्य महाराजांचा हुकूम! हें काय अभागीपणाचं लक्षण?

**आनंद०**—तसं नव्हे ग. पण बाबा जिवंत असेतोंपर्यंत हा लग्नाच्या सुपारीचा योग येऊं नये, आणि तो आला त्या दिवशीं—अगदीं त्या दिवशींच—पुनः एकदम

अशी ताटातूट! तेव्हां यावरून मी काय समजावं बरं आपल्याला? भाग्यवान् कीं अभागी?

**मं०**–पण मी विचारतें, गियाळरावांची त्याच मुहूर्तावर सरसुभ्याच्या जागेवर नेमणूक झाली, हें भाग्य कीं अभाग्य? तुह्मींच सांगा बरं.

**आनंद०**–मंजुळे, तूं कांहीं ह्मण. पण तूंच सांगस्वारींचं मणिपुराला जाणं झाल्यापासून पहिले दोन तीन महिने जीं काय पत्रं आलीं तीं आलीं. त्यानंतर तिकडून आजपर्यंत एक बोटभर चिठी, कां मेला कोणाबरोबर कांहीं निरोप, कां—

**मं०**–पण ताईसाहेब, मी ह्मणतें आतां चिठीचं अन् निरोपाचं कारण काय उरलं आहे?

**आनंद०**–कारण काय उरलं आहे! ह्मणजे?

**मं०**–ह्मणजे काय?–मणिपुरास त्यांनीं तुमच्या नांवाचा उच्चार केलेला जर तुह्मांला इथून ऐकूं येतो, तर यापुढं त्यांचं सगळं बोलणं दिखील तुह्मांला इथूनच ऐकूं येईल! मग निरोपाचं आणि चिठीचं काय कारण?

**आनंद०**–अस्सं कां मंजुळे? पण मंजुळे, तसं होतं तर मी आपल्याला केवढी भाग्याची समजलें असतें! पण तसं होणं कधीं तरी शक्य आहे कां? अग–माझ्या नांवानं हांक मारल्याचा मला तो नुसता भास झाला. पण मंजुळे, खरं सांग–तुला नाहीं कधीं असा भास होत?

**मं०**–भासच का? मला खऱ्या खुऱ्या हांकाच ऐकूं येतात.

**आनंद०**–काय, खऱ्या खुऱ्या हांका ऐकूं येतात? मंजुळे, मंजुळे! आणि त्या केव्हां ग?

**मं०**–केव्हां म्हणजे? 'मंजुळे मंजुळे!' म्हणून तुम्हीं हांका मारल्याबरोब्बर!

**आनंद०**–मंजुळे! एकून तूं मोठी छट आणि गुलाम आहेस! मला वाटलं कीं तुला त्यांच्या पदरीं असलेल्या त्या मोहनच्या हांका इथं ऐकूं येत असल्याचं तूं सांगतें आहेस कीं काय? पण तूं कसली वस्ताद.

**मं०**–ताईसाहेब, मनुष्य आपल्या मनावरून दुसऱ्याच्या मनाची परीक्षा करीत असतं म्हणतात तें कांहीं खोटं नव्हे. तुह्मांला ध्यानीं मनीं स्वप्नीं आतांशा प्रियाळरावांशिवाय दुसरं तिसरं कांहीं दिसत नाहीं, त्यामुळं तुह्मांला त्यांच्या हांका ऐकूं येतात, आणि तुह्मांला वाटतं कीं, दुसऱ्यांनाहि असंच होत असेल.

**आनंद०**–पण मंजुळे, मलाच हा भास कां व्हावा ग? आणि तुला कां होऊं नये तो?

**मं०**–मी कांहीं ताईसाहेबांसारखं अष्टौप्रहर तेंच चिंतन करीत नाहीं बसत.

**आनंद०**–पण दादानं–माझ्या लग्नाच्या वेळींच तुझंहि त्या मोहनशीं लग्न करावयाचं ठरविलं नाहीं का? मग तूं त्याचं चिंतन कां करूं नयेस?

**मं०**–ताईसाहेब, मी आपल्या पदरीं पडल्यामुळं, मला सदान् कदा आपलं चिंतन असतं; केव्हां हांक माराल काय की.—

**आनंद**०–अग पण आतां तूं मोहनच्या पदरीं पडायची आहेस ना? मग आतां तुला त्याचं चिंतन नको का करायला?

**मं**०–नुसतं चिंतन करून काय होणार? ठरल्याप्रमाणं सगळं घडून येणारच आहे की.

**आनंद**०–तर मग मंजुळे, एकून माझ्यापेक्षां तूं मोठ्या धीराची, मला गडे कसा तो धीरच निवत नाहीं. आणि तिकडून पत्र अथवा निरोप कांहींच न आल्यामुळं तर—

[ इतक्यांत पद्मनाभ व पिराजी येतात. ]

**मं**०–ताईसाहेब, हे पहा पद्मनाभ. आणि ह्यांच्याबरोबर पिराजीबुवा.

**पद्मनाभ**०–ताई, हे पहा मणिपुराहून पिराजीबुवा आले आहेत.

**पिराजी**०--ताईसायबास्नी दंडवत करतों.

**आनंद**०–तुह्मी केव्हां आलांत? कांहीं पत्र वित्र अथवा निरोप? मणिपुराकडची काय बातमी आहे?

**पि**०–धनीसाब अक्शी खुशाल हैती. हत माजी भैन पडली लई हैरान होऊनशनी. त्येच्या पाईं मी अक्शी घाई घाईनं आलों, त्या पाई चिटी चपाटी द्याया योळूच न्हें गावला धन्यासनी; अन् त्येंतून त्येसनी जायचं व्हतं फिरतीला सुब्यावर.

**आनंद**०–अरे, तर तिकडं असं फार का फिरावं लागतं?

पि०—त्ये काई पुसू नका ताइसाब.

आनंद०—आणि कामाबिमाचा त्रास फार असतो की काय?

पि०—तरुनपना, ताजा हुरूप, अन् नवा दम; अन् त्येंच्यामंदी मानूसबी काम करनार असलं, ह्मंजे मग काय इचारता! त्येंच्या बोकांडीं काम अन् कामाच्या बोकांडीं त्ये! असंच व्हायचं अक्शी रातदीस. करील त्याला काम, न्है त्याला आराम! [हातांत असलेल्या गुलाबाच्या फुलाच्या एकेक पाकळ्या काढून टाकतो.] दादासाब कुट हैती? दोन रोजांत मी परत जानार ह्मंगतों. काई चिटीचपाटी न्हैतर निरोप असल तर घ्येऊनशनीं जाईन ह्मंगतों.

प०—अरे, पण हातानं काय चालिवलं आहेस तूं हें? त्या गुलाबाच्या फुलाच्या पाकळ्या कां टाकतो आहेस असा काढकाढून?

पि०—(शरमून) काई न्है धनीसाब. डोकं ठिकानावरतं नसलं, अन् मनाला काईबी घोर वाटत असला, ह्मंजे हात चुकूनशनी असंच येड वांकडं चाळं करीत ऱ्हात्याती अन् दुसरं काय?

आनंद०—पद्मनाभ, ह्यांना तूं दादाकडे घेऊन जा.

पद्म०—ठीक आहे. चला पिराजीबुवा.

[दोघेहि जाऊं लागतात.]

आनंद०—मंजुळे! ह्या पिराजींची मुद्राच नाहीं तुला कशी चमत्कारिक दिसत? अन इथं आला तें दिखील

कसा अगदीं हात हालवीत. मेला गुलाबाच्या फुलाच्या एकेक पाकळ्या काढून टाकीत होता, तें पाहून तर मला कसंसंच झालं, आणि वाटलं कीं हा कांहीं चांगला शकून नाहीं!

**मं०**—ताईसाहेब,—( इतक्यांत '**आ**नंदवल्लरी' ह्मणून हांक ऐकूं येते. )

**आनंद०**—थांब, **मंजुळे** थांब. ही दादांची हांक दिसते. ( पुन्हा हांक )

**मं०**—हो, त्यांचीच हांक ही.

**आनंद०**—तर चल आपण तिकडंच जाऊं. ह्या पिराजीबरोबर एखादं पत्र लिहून द्यावं ह्मणतें. ( पुन्हा हांक ) चल बाई लौकर जाऊं. नाहीं तर एखादवेळ रागावायचे सुद्धां दादा. चल, चल लौकर.

[ दोघीहि जातात. ]

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**—ललितराजाचे वाड्यांतील पुढचें दालन.

[ **द**याळजी व **रा**णू बोलत आहेत. ]

**दयाळजी**—हें बघ राण्या, मी कोणाच्या बापालाहि भीत नाहीं. पण तूं इथें असा दरवाजांत उभा रहा. आणि तूं कोण आहेस, ह्मणून जर कोणी तुला विचारलं तर "सरदार दयाळजींचा मी नोकर आहे" ह्मणून सांग त्यांना. आणि मी ललितराजांची

मुलाखत घेऊन बाहेर येईपर्यंत आंत एक चिटपांखरूं देखील फिरकू देऊं नकोस.

**राणूजी**–चिटपाकरूंबी?

**दया०**–हो हो, चिटपांखरूदेखील.

**रा०**–पन् धनीसाब, मला तर दोनच हात हैतीकीं. अन् त्येनी चिटपाकरं गवसनार कशीं माज्या हातामंदीं? सहस्त्रार्जुनावानी जर का मला हजार हात असत, तर लई ब्येस होत. मग धर पाकरूं, कीं पकड, धर पाकरूं कीं पकड, असा योकूच दिला असता सपाटा चालवूनशनी धनीसाब.

**दया०**–तुझे कान जसे लांब आहेत, तशी तुझी ही जीभ देखील लांब होत चालली.

**रा०**–अन् माज ह्ये हात बी जर कां अक्शी तसच लांब असत, तर हतल्याहतं उब ऱ्हाउनशनी समदीं चिट पाकरं पार अडवूनशनी टाकलीं असतीं धनीसाब. योकबी नसत दिल फिरकूं. मी काई कमती गडी ऱ्है.

**दया०**–राण्या, तुझा नेहमीं आपला फाजीलपणाच. तुला आपलं घर आणि दुसऱ्याचं घर कांहीं एक समजत नाहीं.

**रा०**–त्ये समजत धनीसाब, तर हा रान्या आपलं घर, आपली शेतवाडी, आपलीं गुरं ढोरं, ह्ये समदं सोडूनशनी सरदार दयाळजींच्या दारीं कशापाईं येता? बरं, मग काय करूं सांगता धनीसाब?

**दया०**–मी परत येईपर्यंत, इकडं कोणालाहि फिरकूं देऊं नकोस.

**रा०**-अगदीं चीटपाकरूंबी न्हवका?

**दया०**–हो हो, अगदीं चिटपांखरूंदेखील.

**रा०**–तर मग वाइचं हतच थांबा; मी कोळ्याकडं जाऊनशनी योक जाळं आनतों पैदा करूनशनी, अन् घेतो पसरूनशनी अदुगर ह्या वाड्याच्या थोरल्या कवाडावरतं. हंजे मग आतमंदीं न्है येनार कुनी चिटपाकरूंबी. (विचार करून) पन् धनीसाब, पाकरासनी न्है तर न्है पन् मानसाशी फिरकूं देन्यापाईं न्हैना काईबी दक्कल?

**दया०**–गद्ध्या! पुन्हा आपला पाहिलाच फाजीलपणा?

**रा०**–न्है धनीसाब, हा न्यारा–दुसरा है. (हंसतो)

**दया०**–गाढवा! दुसरा आहे का हा? अन् वर दांत काढून हंसतोस आणखी ?

**रा०**–(हंसून) हंसूं नग तर कां रडूं धनीसाब? दुसऱ्याच्या घरामंदीं अन् चिटपाकरं फिरकूं न्है देनारा मी कोन? धनीसाब! आपलं चाकुर झालं म्हून काय झालं? सोबल त्येंच काम सांगावं धन्यानं. धनीसाब गेल आंतमंदीं अन् या ललितराज म्हाराजांची मानसंच त्येंच्या वाड्यामंदीं हकडून तकडं, अन् तकडून हकडं जर कां फिरकूं लागली, तर त्येना हटकनार, हा रानूजी कोन? त्ये माज कान पकडूनशनी चांगल उपटुनशनी घेत्याल कीं माज्या हातामंदीं, मग धन्यानी आरूळी दिलेली बी न्है येनार कीं ह्या रान्याला ऐकाया!

**दया०**-मूर्खा ! हा तुझा फाजीलपणा पुरे कर. अन् यापुढं तोंडांतून एक अवाक्षर देखील काढूं नको. आणि ललितराजांनां भेटायला जर कोणी आंत येऊं लागले तर त्यांनां सांग कीं, मी आंत गेलों आहें; असं सांगून, त्यांनां इथच थोपवून धर, आंत सोडूं नकोस मी परत येईपर्यंत. समजलास?

**रा०**–जी धनीसाब. ( दयाळजी जाऊं लागतो, त्यास ऐकूं येईलसें. ) या ह्मेर तोंडामदून योक अवाक्षरबी काढूं नगस, अन् कुनी आमंदीं येऊं लागलं, तर म्हन त्येना सांग कीं, भितुर धनीसाब गेलं हायती म्हून; हकड सांगायचं तोंडाला अक्शी खीळ घाल म्हूनशनी अन् तकड सांगायच बोल म्हूनशनी. योकाच वक्ती ह्ये दोनींबी कसं करायचं धनीसाब? [ दयाळजी त्याचेवर डोळे वटारून, मान हालवीत आंत जातो. ] हः हः हः हः ( स्वगत ) जसं सोंग तशी बतावणी ! रणधीररावाला राणोजी व्हावं लागलं, तेव्हां राणोजी-सारख वागणं भागच आहे. सेनापती कार्तिकशंभूनीं आपली बहीण चित्रवीर्य महाराजांच्या इष्काला बळी द्यायचं नाकारल्याबरोब्बर, त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप येऊन, त्यांनां एका घटकेच्या आंत हद्दपार व्हावं लागलं; आणि मीं त्यांच्या बायकामुलानां आणि वहिणी-ला, रात्रीच्या रात्रीं पद्मनगरींतून बाहेर काढून दिल्या-मुळं मीहि त्यांना सामील आहें असं समजून, मला धरून देण्याबद्दल बक्षीस, आणि माझ्या दारावर सरकारी

पाहरा ! तेव्हां सरदार मानाजीरावाच्या सल्ल्यावरून मला रणधीररावाचा राणोजी बनून ह्या सरदार दयाळजी च्या तैनातीला त्याचा ( हंसून ) मिंढीजाद नोकर म्हणून रहावं लागलं! तेव्हां आतां चित्रवीर्य महाराजांच्या गळ्यांतले ताईत-कारस्थानी ललितराज, ललितराजांच्या गळ्यांतले खुळखुळे ताईत--दयाळजी, आणि दयाळजी-च्या गळ्यांतले ताईत-आह्मी राणोजीराव! ही ताईतांची त्रयी मोठी छान जुळली आहे आपला कार्यभाग उरकायला ! हा ललितराज वरून जसा दिसतो तसा खास नाहीं. महाराजांना इष्काच्या नादीं लावून, त्यांच्या विरुद्ध कार्तिकशंभूशीं बंडाचीं कारस्थानं करायलाहि हा तयार, इकडे त्याच्या हद्दपारीला अन् मला धरून देण्याबद्दल जाहिरनामे काढायलाहि कारण तोच, असा सगळ्या सरदारांनां पक्का संशय येऊन चुकला आहे. आणि त्यांत तथ्यहि पण बरंच आहे.

[ इतक्यांत पिराजी येतो व तडक आंत जाऊं लागतो ]

बरं हा कोण आला ? कोणी कां असेना ( उघड त्यास ) अव, शिंदशाई पगडीवाल! चाललांत कुठं पुढं ! ऱ्हा, थतंच ऱ्हा उभं.

**पिराजी**–( स्वतःशीं ) इचेभन, काय येडगळ मानूस हाये ह्यो. ( त्यास ) कारं बुवा, हतच का उबा ऱ्हाऊं?

**रा०**–कां म्हंजे ? हत कुना चीटपाकरालाबी फिरकूं दिऊं नगस, म्हून धनीसायबांचा हुकूम हाय हुकूम.

**पिरा०**—मग मी चौटवी न्हे अन् पाकरूवी न्हे. मग तुजा मला कशापाई अटकाव ? अन् त्योबी आमच्याच वाड्यामंदी ?

**रा०**—तुमचा वाडा ?

**पिरा०**—व्हय व्हय, आमचा. आमचा हंजे आमच्या धनीसायवांचा. पन् तूं कोन हैस ?

**रा०**—मी व्हय ?

**पिरा०**—व्हय व्हय, तूंच.

**रा०**—मी चाकुर हाय धनीसायबांचा.

**पिरा०**—धनीसावांचा ? अन् तुला हत कवापासूनशनी नेमलया ? आजवर न्हें कुटं तुला पगितला त्यो ? अक्शी कसा निसटलास माज्या डोळयांच्या टप्प्यामदूनशनी ?

**रा०**—व्हय व्हय, निसाटलों खरा. तसाच हाये ह्यो पट्टया ! अव, मी तर पिडीजात नोकर हाये धनीसावांचा.

**पिरा०**—( साश्चर्य ) पिडीजात नोकर ! कुनाचा ? कोन ? धनीसाव कोन तुजं ! ( स्वगत ) हत काईबी घोटाळा हे खास !

**रा०**—( गोंधळून ) त्ये आमचं धनीसाव.

**पिरा०**—आमचं धनीसाव ? ह्ये—आमचं धनीसाव कोन ?

**रा०**—कोन हंजे ? त्ये सरदार—सरदार दयाळजी ठाव हैती का न्हेत तुमास्नी ? म्हाराज ललितराजांच्या नाकामदलं अक्शी वाल हैती वाल.

पिरा०—नाकामदलं बालं असूं येत न्हैतर त्येंच्या गोत्यामदल बईल असू येत. धातली ग्वाष्ट, तुज धनी-साब हंजे काई माज धनीसाब न्हवत. योकून तुज धनीसाब हंजे त्योऽऽ—सरदार दयाळजीच न्हव का?

रा०—आधून कस अक्शी बरोब्बर हेरलत? आप-नास्नी काय म्हगत्याती? आपुन लई गमती गडी दिसता.

पिरा०—मला काय हंगत्याती? हंजे माजं नांवच व्होव किं न्हे तुला? पन् माझ्या नावासंगं काय है तुज काम?

रा०—वा: मनुक्शाच्या नावानंदींबी कवा कवा लई गंमत असतीया.

पिरा०—अस्सं? तर माजं नाव पिराजी.

रा०—पिराजी! वा: पिराजी. अन् त्येला संमदबी राजी! ह: ह: ह: ह:

पिरा०—वा: र वा: पयल्या पयल्यानं तू मला जरा येडगळावानी दिसलास. पन् आतां मला लई गमतीदार गडी दिसतुयास! बर पन्, तुजं काय नांव? तुला कसं हाटकत्याती?

रा०—मला व्हय?

पिरा०—व्हय, तुमास्नीच.

रा०—हटकायच्या वक्ती माजी म्हातारी मला म्हंती 'रानू', माजा म्हातारा म्हंतो 'रान्या', माजं धनीसाब तर योक टप्पा म्होरच जाऊनशनी म्हंगत्यात, 'गद्ध्या रान्या', अन् संमद लोक म्हंगत्याती 'रानूजी;' तवा तुमास्नी कसं हटकत्याती म्हून सांगूजी?

**पिरा०**—( हंसतो ) ह्येच सांग ह्येच. काय, लोक काय म्हंगत्याती म्हंगालास? रानूजीच न्हव का? वार वा: रानूजी, अन् तुमची अक्कल काय वानूंजी! ठीक हाये रानूजी, अन् असंच भेटत जा कंवा कवा तरी जी. अन् ह्ये पवा सद्यां मी बी हाये जरा घाईमंदी, पन् काय व तुमी. त्या गोमाशी सरदाराकडं कदीपासून-शनी न्हायलात?

**राणू०**—गोमाशी सरदार! म्हंजे?

**पिरा०**—गोमाशी सरदार म्हंजे! तुमास्नी ताज्या घोड्यावरल्या गोमाशा हैत का न्हैत ठाव्या?

**रा०**—व्हय व्हय, नवा घोडा मस्तीला आला म्हंजे त्येच्या अंगावर गोमाशा लई झडप घालत्याती न्हवं का?

**पिरा०**—व्हय व्हय त्याच. अन् तसंच-राजांच्या अक्शी मर्जीतल मानकरी—न्है तर अदिकारी—पगूनशनीं त्येंची जे म्हून खुशामत करूनशनी लाळ घोटत्याती त्ये समदं गोमाशी सरदार! आलं का ध्येनामंदी?

**रा०**—अस्सं! आलं, समद आलं ध्येनामंदी.

**पिरा०**—पन् तुमी त्येच्याकड कदीपुन न्हायलात त्ये न्हाई सांगितलत?

**रा०**—त्ये समद्र गुपित हाये गुपित. अव माजं अन् तुमचं दोगांचबी धनीसाव योकूच. ललितराजांनींच दिलया मला त्येंच्या दिमतीला ठिऊनशनी.

**पिरा०**—हं हं हं हं. तर मग ह्यो धनीसायबांचा काई बी न्याराच कावा है कावा. आतां समद बरोबर

जुगलं. पन् कायरे, तुज ह्ये नव धनी जरा भित्र हैतीं न्हव का?

रा०-ह्ये बगा पिराजीबुवा, तुमी जरा झोर जा; अन् त्ये भाईर आलं झंजे यवडच झना कीं, “ तुमचं समद कारस्तान मी ऐकलं ऽऽऽ ”! झंजे पगा मग कसं आंग काइूनशनी एकदम दचकत्याल त्ये! मंग तुमास्नी आपसूकच कळल कीं त्ये सूर हैर्त, का वेसूर-भित्र-हैती त्ये. बाकी त्ये कुनाच्या बालाबी भिनार न्हैती!

[ राणूजी पिराजीच्या कानाशीं कांहीं कुजबुजतो ]

पिरा०—रानूजीबुवा, तुमी जसं गंमती हैसा, तसं वस्तादबी हैसा.

रा०—पिराजीबुवा, माज्यापुन तुमीच लई वस्ताद हैसा. कारन माज गुपित मी तुमास्नी सांगितलं, पन् तुमचं गुपित न्है तुमी मला सांगितलत.

पिरा०—ह्ये पगा—आपुन जन्ना कां पुना भेटूं तवा बोलूं त्येच्यासंबंदानं.

रा०—ठीक, तर मग तुमी आतां गुपचिप—मुकाट्यानं आमंदी जा. अन् अक्शी मी सांगितल्यापरमान—दम भरा जरा आमच्या धनींसायबास्नी. अन् मग पगा त्येंची तरधा अन् तिरपीड.

पिरा०--बर हाये रानबा, येतों तर मी. ( आंत जातो. )

[ दयाळजी बाहेर येऊं लागतो व त्याचे मागून पिराजी येतो व त्यास गांठून ]

**पिरा०**—सरदारसाव, ललितराजांच्या संग चाल- ल्येलं तुमचं योकून योक संमद कारस्तान अक्शी खडान् खडा मी ऐकलं, ह्येची समदी वर्दी मीं चित्रवीर्य ह्मारा- जास्नी जाऊनशनी दिली, तर मग कसं ?

**दया०**—( पिराजीस ) काय ह्मटलंस ! तूं आमचं सगळं बोलणं ऐकलंस ? तूं कोण ?

**पिरा०**—मी कोन ? मी कोन त्ये तुमास्नी सांगि- तलं तर भीतीनं तुमास्नी अक्शी धडकी भरूनशनी जाईल.

**दया०**—ह्मणजे ! असा कोण आहेस तूं ? मी कोणाच्या बापालाहि भिणार नाहीं.

**पिरा०**—काय? कुनाच्या बापालाबी भिनार न्हे? सरदार, ह्ये आपलं उसनं अवसान मी कोन हाये त्ये समजलं ह्मंजे पार जागच्याजागीं जिरूनशनी जाईल. चित्रवीर्य ह्माराजांचा मी बारीक बातमी काडनार ह्येर हाये ह्येर !

**दया०**—( घाबरून ) काय ? बारीक बातमी काढ- णारा हेर आहेस ? आणि चित्रवीर्य महाराजांचा ? (गोंधळून) तर आमचं तेंSSS—ह्या संबधाचं बोलणं तू ऐकलंस कीं काय ?

**पिरा०**—त्ये ह्माराजाकडून तुमास्नी धरनं ग्येलं ह्मंजे मग आपसूकच समजल संमद. (जाऊं लागतो)

**दया०**—अहो तुह्मी–तुह्मी जरा थांबाल तर खरं ? (सलकडें काढूं लागतो) हें पहा, तुह्मीं इथं काय विसर- लांत तें तर पहा अगोदर. (सलकडें त्यास देऊं लागतो.)

पिरा०—( मागें परतून ) मी हत काई इसरलों ह्मगालात ?

दयां०—( सलकडें त्याचे हातीं देऊन ) हें तुह्मी इथं विसरलां होतात. एवढ्यानं तुमच्या कानानं एखाद दुसरा वेडावांकडा कांहीं शब्द ऐकला असला तर तो तुमच्या पोटांत सांठवा, अन् तोंडाला खीळ बसवा. आणि एवढ्यानं नाहींच काम भागलं तर उद्यां बिद्या मला माझ्या वाड्यांत येऊन भेटा, समजलात ?

पिरा०—( मुजरा करून ) लई दिल्दार सरदार हैसा आपुन; यवड्यानं न्हाई भागलं, तर पुना येईन कवा बी सरदारास्नी मुजरा कराया. येतों सरदारसाब. (आंत जातो.)

पिरा०—ठीक आहे जा. (तो गेल्यावर ) आतां मी कोणाच्या बापालाहि भिणार नाहीं. ( पुढें येऊन, राण्यास पाहून ) राण्या, काय करीत होतास इथं !

रा०—(डोकें खाजवीत) काई न्हाई धनीसाब.

दया०—कांहीं नाहीं धनीसाब ! इथून चीटपाखरूं-देखील फिरकूं देऊं नकोस, ह्मणून तुला सांगितलं होतं कीं नाहीं ?

रा०—जी धनीसाब, चीट न्येसलेलं पाखरूं हत योऊबी न्है फिराकलं.

दया०—गाढवा, तुझा फाजीलपणा जात नाहीं; तुझ्या ह्या गेवी गाढवपणामुळं मला फुकट एक सलकडं मात्र गमवावं लागलं.

रा०—( साश्चर्य ) सलकडं गमवावं लागलं? त्ये कशा-पाई धनीसाव? कुटं पडलं तरी कुटं त्ये? मी पघुनशनी येतो व्हाेव तर धनीसाव. पन् इचीभन, हत कुनी पाकरूवी न्है आलं इक्त्यामंदी. मग आंतमदी तर न्है गवासलं धनीसाबास्नी योकादं ?

दया०—राण्या! पुन्हा आपला तुझा फाजीलपणाच?

रा०—न्है धनीसाव.

दया०—ठीक आहे, ‘ न्है धनीसाव का हो धनी-साव ’ ते तुला घरीं गेल्यावर सांगेन. चल, अगोदर विजयभुवनाकडे चल. तिकडे आज दरबार आहे. दरबारला जायचं आहे मला.

रा०—दरबारला जायचं हाये? हः हः हः हः अन् म्हूनशनी धन्यांनीं सलकड्याचा ह्यो करबार त्येच्या बरोबर म्होर धाडूनशनी दिला व्हय ?

दया०—चोरा! चल, आज घरीं गेल्यावर करभार धाडून दिला कीं काय तें तुला सांगतों.

रा०—दरबारचा करबार ह्या रान्याला त्येकाला काय उमगनार धनीसाव ?

[ दोघेहि जातात. ]

## प्रवेश ३ रा.

स्थळ—ललितराज यांचा वाडा.

[ ललितराज व पिराजी बोलत उभे आहेत. ]

ललि०—काय म्हटलंस ? आपली हिकमत अगदीं सोळा आणे लागू पडली ?

पिरा०—जी सरकार, अक्शी सोळा आणं. संमद कसं अक्शी सरकारच्या सांगन्यापरमानं सुरळीत व्हत गेल्या. पिरयाळरावांनीं त्या कोपनशीलाच्या भइनीचं—त्या आनंदवल्लरीचं अक्शी नांव घेन्याचं टाकल्या; या पिराजीनं धनीसायबांच्या सांगन्याबरहुकुम अक्शी ठासून दिला हाये बार भरूनशनी. अन् त्येनं-गंमत काय झालीया म्हून न्हे इचारलंत धनीसाब ?

ललि०—काय ? काय झाली आहे गंमत ?

पिरा०—गंमत ? त्या सरदार कांतिवरमजीचं त्ये गुलजार पाकरूं—त्या म्हावक्राबाईची ती मदनिका न्हे का—तिच्या नादीं ह्ये पिरयाळराव इत्तं लागलं हैती, कीं तिच्या पायीं त्ये येडं हूनशनी गेल्याती; जित तिचा पैंजण थत त्येंच रिंगण. अक्शी नादावलं हैती पगा.

ललि०—यं ! शाबासरे गबरू ! ठक असावा तर असा तुझ्यासारखा ! ( त्याचे कानांत कांहीं सांगून ) समजलेंना ? तर मग हे पहा पिराजीबोवा, तुम्हीं आतां जा, आणि मी सांगितल्याप्रमाणें प्रियाळाच्या अगदीं

रात्रंदिवस तैनातींत असा. जा, जा पाहूं तर मग, इथें आतां एक पळभर देखील राहूं नका कसें तें. ( तो जाऊं लागतो त्यास थांबवून ) पण हें पहा, मोठ्या सावधगिरीन आणि दक्षतेन हां.

पिरा०—जी सरकार. पन् मी दिलेलं त्ये पत्तुर ठिवलया ना नीट जपूनशनी?

ललित०—नीट जपून ठेवलं आहे. त्याची नको तुला काळजी. तूं खुशाल जा. तिकडचं संभाळ ह्मणजे झालं.

पि०—येतो तर धनीसाब.

ललित०—ये. [ पिराजी जातो. ]

ललि०—( इकडे तिकडे फिरत ) हं: खरंच. मनुष्याला डोकं असलं म्हणजे तो काय वाटेल तें करूं शकेल. अक्कल म्हणजे एक चीज आहे चीज. आणि ती जर नसती, तर मनुष्यामध्यें आणि जनावरामध्यें मग अंतर काय उरतें ? ( विचार करून ) खरंच, ही अक्कल जर सर्व लोकांमध्यें सारखी वाटली गेली असती, तर खरोखर आज जगावर मोठा कठीण प्रसंग गुदरता! अन् मग आमच्या सारख्यांच्या मसलती, आणि कारस्थानं, इतक्या शिताफीनं कधींच पार पडतींना! चित्रवीर्य महाराजांसारखे दुधखुळे राजे, अन् या प्रियाळासारखी हलक्या कानाची कानभरू आणि संशयखोर मंडळी जगांत आहेत, म्हणूनच या अकलेला आज कांहीं किंमत आहे. नाहीं तर ती कधींच कवडीमोल होऊन जाती. एवढा हा बंडाचा बार कां एकदां

दणकून उडाला, म्हणजे झालं. याच गर्दीत त्या राजेसाहेबानांहि पण देतों गर्दीस मिळवून; अन् या चित्रवीर्याची एकदां अशी वाट लागली, म्हणजे मग या पद्मनगरीच स्वामित्व कोणाकडे जाणार? ( विचार करून ) नाहीं--पण हा प्रियाळ राजवंशातला असल्या-मुळें, हा माझ्या वाटेंत एक मोठा कांटा आहे. हा एवढा उपटून टाकला ह्मणजे मग मला निश्चित होतां येईल; त्याशिवाय नाहीं. ( किंचित् विचार करून ) आणि हा उपटून टाकण्याची सुद्धां आतां फारशी पंचाईत नाहीं; कारण, आनंदवल्लरीशीं ठरलेल लग्न मोडून, या प्रियाळान त्या मदनिकेशीं संबंध केला कीं झालं;मग त्या आनंदवल्लरीच्या भावाचा—त्या कोपनशीलाचा—क्रोधाग्नि हां हां ह्मणतां भडकून जाणार; आणि याच भडक्यांत प्रियाळाची जळून राखरांगोळी होणार ! या दोघांच्याहि अशा एकदां आहुती पडल्या, कीं मग आपण अगदीं निर्धास्त. मग आनंदवल्लरी आहे आणि मी आहे. ती जाते कुठं मग माझ्या तावडींतून ? या दोघांचा निकाल लागला ह्मणजे येऊन जाऊन मग काय ती कोपनशीलाची भीती. त्यालाहि अशाच कांहीं कचाटांत धरून दिला उडवून ह्मणजे झालं; आयतीच स्वारी येते आहे पेंचांत. ( विचारयुक्त ) पण ही बंडाची बातमी दरबारांत कोणाला कळली तर नसेल ! नाहींच कळायची, पण यदाकदाचित् कळलीच, तर आपला दयाळजी आहेच आपल्याला वर्दी द्यायला. बरं

पणं, श्रीनगराहून खबर घेऊन कोणींच कसं अजून येत नाहीं ? खरंच, ही छान तोड सुचली. प्रसंग पडल्यास या श्रीनगरच्या बंडांत त्याचं अंग आहे असं उठवून दिलं, म्हणजे झालं. हो, पण दरबारांत जायला आपल्याला बराच वखत झाला. तर आतां जास्त उशीर करून नाहीं उपयोगी. यावेळीं मी तिथं पोंचायला पाहिजे होतें. जावंच तर. [ जातो. ]

---

## प्रवेश ४ था.

स्थळ-( चित्रवीर्याचा विजयभूवन दरबार. )

[ चित्रवीर्य, कांतिवर्मा, दयाळजी, आनंदघन वगैरे सरदार बसले आहेत. ].

**चित्रवीर्य**०—काय? माझ्या नांवचीं पत्रं आहेत म्हणतां? आणि तीं कोणाकडून?

**आनंदघन**०—त्या कार्तिकशंभूकडून महाराज.

**चि**०—म्हणजे? तो हद्दपार केलेलाच कीं नाहीं? बरं, पण तीं पत्रं कुठल्या मुक्कामचीं आहेत.?

**आ**०—मुक्काम आहे श्रीनगरचा. तेथून मला जें एक पत्र आलं त्या पत्रांत हें पत्र घातलं होतं. हें मी पाहिलं, तों माझ्यानं मग एक क्षणभरसुद्धां राहवेना. तें तावडतोब महाराजांनां पोंचवावं, हें माझं कर्तव्य असं समजून मी हा इतक्या जलदीनं आलों. ( तो पत्र देतो व चित्रवीर्य तें वाचूं लागतो.)

**कांतिवर्म०**–( आपल्याशीं ) पण महाराज असे एकाएकी फिके का बरं पडले?

**चि०**–ललितराज तर माझा अगदीं जवळचा आप्त, आणि तो माझ्या प्राणाच्या आणि राज्याच्या विरुद्ध! हा माझा जिवलग आप्त आँ? हं: पण मोठ्यानें नको हें, नाहींतर चुकून फसगतीनें हें सर्व त्याच्या कानावर जाऊन तो विश्वासघातकी तो ठग-सावध होऊन अजीबात निसटून जायचा.

**द०**–(आपल्याशीं) अरे बापरे! असं जर आहे, तर पाहिल्यानं इथून मलाच निसटलं पाहिजे.

**चि०**–पण कायहो आनंदघन, त्या कार्तिकशंभूचा आणि तुमचा जो पत्रव्यवहार होत असतो, तो कशा-संबंधानं?

**आ०**–छे: त्याचा आणि माझा पत्रव्यवहार ह्मणाल तर मुळींच होत नाहीं. त्याचं मला हें पहिलंच पत्र. पण त्यांतल्या त्यांत मला समाधान ह्मणून इतकंच वाटतं कीं, आपल्या संबंधान अशा प्रकारचीं कृष्ण--कारस्थानं इथं चाललीं आहेत,अशाबद्दल प्रथमतः बातमी देणारा हाच.

**चि०**—ललित! अरे, किती--किती तरी तूं कृतघ्न! चोरा, एकून तूं अशी बंडाळी माजिवली आहेस आं! अरे, आजपर्यंत तुला मी आपल्या गळ्यांतला ताईत समजत होतो!

**आ०**—हा खोकला काढून टाकायला हीच वेळ बरी आहे. ह्मणजे मग त्रिदोष होण्याची तरी भीती नाहीं.

**चि०**—( विचारांत निमग्न असलेला ) तेंच, तेंच मला आज पहिल्यांदा करायचं आहे. कोण आहेरे पहाऱ्यावर ? तो जर अह्मांला चिकटून राहता, तर खचित आज मोठ्या पदाला चढता. कारण तो आणि मी किती झालें तरी एकाच रक्ताचें आणि एकाच हाडामासाचें आहोंत. पण ह्मणावं मांगा, या एकच--पण अत्यंत नीच आणि हिडिस--अशा दुष्कृत्यानं तूं आपला आपणच घात करून घ्यायला उद्युक्त झालास. मी जर स्वर्गलोकीं असतों, आणि तिथं जर मला एखादं ध्रुवपद असतं, तर तें देखील मी तुला द्यायला प्रवृत्त झालें असतों. असं असतां तूं माझ्या विरुद्ध कट करायला उद्युक्त व्हावंस ? राजकुलांत जन्म घेणाऱ्यांचं काय हें दुर्दैव ! ( आनंदघनास ) काय हो, पण या पत्रांत त्यानं सविस्तर हकीगत ह्मणून कांहींच लिहिली नाहीं, हें कसं काय ? त्यांनीं काय बेत केला आहे, आणि त्यांचा कसकसा आणि काय काय कट झाला आहे, याचा कांहीं तरी त्यांत उल्लेख असायचा होता !

**दया०**—( स्वगत ) त्यांत अशा प्रकारचा कांहींएक उल्लेख नाहीं, हें एक प्रकारानं बरंच झालं ह्मणायचं. आतां मी कोणाच्या बापाला भीत नाहीं.

**आ०**—तसा जरी त्यांत उल्लेख केला नसला, तरी महाराजानां यापुढं ज्यास्त खबरदारी ठेवणं जरूर आहे.

**चि०**—बरोबर आहे **आ**नंदघन, रास्त आहे तुमचं ह्मणणं. तुह्मीं इमानी सरदार आहां, आणि माझ्यावर

तुमचं खरं प्रेम आहे. तर सांगा, तुह्मींच सांगा, पुढं काय, आणि कसं करायचं तें.

आ॰—प्रथमतः अगदीं पहिली गोष्ट करायची ह्मटली ह्मणजे ही कीं, अगोदर त्याला पकडून एकदम कैद करायचा. ह्मणजे मग त्याच्या कटांत आणखी कोण कोण सामील झाले आहेत, हें काढायला फारसा उशीर लागणार नाहीं.

दया॰—( भीतीनें स्वगत ) तर मग ही मोठीच पंचाईत आली ह्मणायची इथं. भला आतां या राजवाड्याच्या बाहेर पडायला तरी मिळतं कीं नाहीं ?

चि॰—आणि त्याला कोणती शिक्षा द्यायची तें मग ठरवूं. मात्र ती देहांतशासनापेक्षां कडक असली पाहिजे. कारण, साधारण खून करणाराला मरणाची शिक्षा बस्स असते. पण राजद्रोह करणाराला ती याहि पेक्षां कडक पाहिजे. पहिल्यांदा त्यानं सर्व कबूल करावं ह्मणून त्याला राखेचे तोबरे द्या, त्याच्या कानाला चाप लावा, तापल्या तव्यावर त्याला उभं करा, उलटा टांगून घालून, मिरच्यांची धुरी देऊन, सांडसानं त्याच्या अंगाचे पैशा पैशा एवढे तुकडे काढा, काय हवं तें करा, पण त्याचे कोण साथीदार आहेत, आणि त्या सर्वांनीं माझा कशा तऱ्हेनं खून करण्याचा बेत केला होता, त्या बद्दलची सर्व वित्तं बातमी अगोदर काढून घ्या; आणि मग राजहत्या करूं पाहणाऱ्या त्या मांगाचा कोणत्या तऱ्हेनं प्राण घ्यावा, या बद्दल अशी कांहीं

अज्जब युक्ती काढा कीं त्या योगानं त्यानं पांच सात महिने असह्य यातना भोगून भोगून मग मरावं. (ललितराज येतो.)

**आ०**–हं आला, आलाच हा. धरूं, धरूं आह्मी त्याला?

**चि०**–( उपरोधिक ) यावं, यावं ललितराज, ( आपल्याशीं ) काय ? माझ्या पुढं उभ्या असणाऱ्या ह्या मूर्तींत इतका राजद्रोह भरला असेल ? नाहीं, हें समजायला हाच मार्ग उत्तम. (ललितराजास पत्र देऊन त्यास) हें वाचून पहा.

**ललि०**–( साश्चर्य ) काय पत्र ? ( पाहून ) हें तर महाराजांच्या नांवचं आहे, माझ्या नांवचं नव्हे.

**चि०**–होय. तें जरी माझ्या नांवचं आहे, तरी त्यांत तुमचा पुष्कळ संबंध आहे. वाचून पहा तें. ( आनंदघनास हलकेंच ) आनंदघन, आतां त्याच्याकडं नीट लक्ष लावा आणि त्याच्यांत काय काय फेरबदल होतात ते पहा. दयाळजी या, इकडे या तुह्मी असे. ललितराजाच्या मुद्रेवरून तो राजद्रोही असावा असा तुह्मांला कांहीं संशय येतो का?

**दया०**–काय ? ललितराज, आणि राजद्रोही ?

**चि०**–हो हो. ललितराजच.

**दया०**–छेः मला तर नाहीं वाटत सरकार अशांतला कांहीं प्रकार असेलसा. असं जर कोणी ह्मणत असेल तर येऊं दे त्याला माझ्यापुढं. ( आपल्याशीं ) ही तर अगदीं गळठण्याचीच वेळ आली आहे ह्मणायची !

ललि०-वाचलं, वाचलं मीं हें.

चि०-( एकीकडे ) छे: हें वाचून हा काळा टिकरहि पडला नाहीं, अथवा भेदरून जाऊन डगमगला देखील नाहीं. हें कसं काय ? ( त्यास ) वाचा, आणखी एकदां वाचा.

ललि०-नको, आणखी नको तें वाचायला. त्यांतला सगळा मजकूर माझ्या ध्यानांत येऊन चुकला. माझ्या संबंधानं महाराजांनीं फार सावध असावं. महाराजानां ठार मारून, मी हें पद्मनगरींचं राज्य बळकावण्याचं कारस्थान करीत आहे, अशाच प्रकारचा सगळा मजकूर आहे कीं नाहीं ह्यांत ?

चि०-(एकीकडे)छे: हें कांहीं बरं चिन्ह नाहीं दिसत!

दया०-( आपल्याशीं ) छे: फुटलं सारं ! ह्या राजद्रोह्याला मरीआई कां येत नाहीं ? यानं आपल्या बरोबर मला उगीच गुंतवून सोडलं आहे. नाहीं, आपण अगोदरच सारं कबूल करून टाकावं, हेंच उत्तम.

चि०-( ललितास ) होय. मग यावर काय आहे आपलं उत्तर ?

ललित०-( दीर्घ निश्वास सोडून ) हें असलं भयंकर किटाळ, अन् असं एकाएकीं माझ्यावर येऊन गुदरतं आहे ! महाराज, मला तर खास असं वाटतं कीं, माझ्यावर हा राजद्रोहाचा सर्व आरोप येण्याला आपला माझ्यावरील हा लोभ, आपण माझा केलेला बहुमान, आणखी आपण मला वरचेवर सर्फराज करून ज्या

देणग्या देत असता त्या कारण झाल्या. ह्या किटाळाच्या मुळाशीं मत्सर आणि वैर, हींच जळत असलीं पाहिजेत. मला शंका येते, महाराजांचा मी कलिजा झालों, हेंच तर नसेल याचं कारण? खरंच, मोठं होणं हें कित्येकांच्या बाबतींत तरी निव्वळ पाप ठरतं! हें जग इतकं नीच असेल, असं नव्हतं वाटलं मला आजपर्यंत. नको, नको, असल्या जगाशीं यापुढं संबंध मुद्धां नको. हा पहा मी चाललों. आपण दिलेलीं हीं वस्त्रं, आणि त्या बरोबरच येणारं हें सारं वैभव आपलं आपण परत घ्या. ह्मणजे मग मला जगांत अशा कांहीं स्थितींत राहतां येईल कीं मग, या मोठमोठ्या धेंडांच्या मत्सराला आणि द्वेषाला, ध्यायचं कारण ह्मणून उरणार नाहीं. आणि इतकं झाल्यावर देखील जर आपल्या मनांत माझ्याविषयीं संशय राहिलाच तर मग माझं नशीब ह्मणायचं, अन् दुसरं काय?

चि०–( साश्चर्य ) हँः

आ०–याच्या बोलण्यानं महाराजांची वृत्ति किंचित् पालटल्या सारखी दिसते, नाहीं कांतिवर्म?

चि०–आनंदवन, ललितराजांच्या संबंधानं, तुह्मीं जें ह्मणतां तें खरं असल्याबद्दल आमची याहून ज्यास्त खातरजमा करून दिली पाहिजे.

आ०–महाराज, या संबंधानं माझ्याकडून झाला तेवढा शहानिशा मी या पूर्वींच केला आहे.

ललित०—महाराज, एक दोन शब्द बोलण्याची मला परवानगी असावी; या पत्रानं माझ्यावर राजद्रोहाचा आरोप आलेला आहे. पण महाराजांनीं आपल्या मनालाच असा प्रश्न करावा कीं, या राजद्रोहापासून मला असा लभ्यांश तरी काय आहे? घटकाभर समजा, मी महाराजांचा खून करण्याइतका अधम बनलों, अन् केला--महाराजांचा खून केला--वास्तविक पाहतां मी महाराजांचा अगदीं जवळचा आप्त; असं असतां हें असलं दुष्ट आणि राक्षसी कृत्य करून, मी सगळ्या जगभर आपल्या नांवाचा असा दुर्लौकिक करून घेऊन, आपल्या मागें या गादीवर असणाऱ्या माझ्या नैसर्गिक हक्कावर आजच पाणी ओतून घेईन, असं खुद्द महाराजांनां तरी वाटतं का? हे आत्तां पासूनच माझा द्वेष करताहेत, असं असून असं घोर आणि दुष्ट कृत्य करून मी जर राज्यावर आलों, तर माझ्या प्राणासंबंधानं मला बेफिकीर राहतां येईल काय? महाराज, आपण हयात आहांत ह्मणूनच मी अशा चैनींत आणि आनंदांत आहे; आपल्या कृपाछत्राखालीं असून मी जें वैभव भोगतों आहे, अन् त्यापासून जें कांहीं मला सुख होत आहे, त्यापेक्षां महाराजांच्या पश्चात् मी जगल्यास मला कांहीं ज्यास्त होणार आहे, असा जर कांहीं भाग असता तर गोष्ट निराळी. पण तशांतलाहि कांहीं प्रकार इथं दिसत नाहीं. राजहत्येसारखें घनघोर पातक करणं ह्मणजे आपली एक क्षुल्लक गोष्ट, असं मानण्या इतका हा ललित कसाब

आणि मांग आहे, असं कां दरबारला वाटतं? आणि महाराजांचा खून करणाऱ्या अधमाला हे लोक जिवंत ठेऊन—घोर मृत्यूशिवाय त्याला दुसरं कां कांहीं शासन देणार आहेत? हं: प्रत्यक्ष पित्यासारखं माझं पालन पोषण करून, ज्यांनीं मला ह्या योग्यतेला चढिवलं त्यांचा आपल्या हातानं खून करून ह्या घोर पितृहत्त्येनं मी आपले हात दूषित करून घेईन?

**आ॰**—( आपल्याशीं ) छेः हे आमचे महाराज, आतां मात्र याच्या घटोत्कची मायेंत पूर्णपणें सांपडल्यासारखे दिसतात!

**दया॰**—( हर्षानें आपल्याशीं ) हंः शाबास! आतां मात्र नको आपल्याला कांहीं भ्यायला. मघाशीं जर मी सगळं कबूल करतों तर मात्र सगळाच घोटाळा होऊन जाता. आतां मी कोणाच्या बापालाहि भिणार नाहीं!

**ललि॰**—पण माझ्यावर हा राजद्रोहाचा आरोप करणारं आणि माझ्या निर्मळ आणि शुद्ध राजनिष्ठेंत विष कालवून सोडणारं, असं हें येवढं पत्रच कीं नाहीं? आणि तें तरी कोणाकडून? एका यःकश्चित् हद्दपार केलेल्या कुत्सित आणि द्वेषी अशा मनुष्याकडून! अशा प्रकारचा नीच आणि घाणेरडा दोषारोप माझ्यावर करण्याची जर कोणाची छाती असेल, तर त्यानं तें तसं माझ्या तोंडावर अगदीं बेधडक समोर येऊन करावं. मात्र असं करणारा मनुष्य चांगला कुलीन आणि खान, दानीचा तरी असावा; ह्मणजे एवढं तरी होईल कीं-

माझ्यावर खोटा आरोप केल्यानं आपळा दुर्लौकिक होईल ही त्याला भीती तरी राहील. आणि अशा मनुष्या-कडून दोषारोप होऊन, मग माझी चौकशी करून, महाराजांनीं जरी मला पक्का राजद्रोही ठरविलं, तरी मग मला तें मान्य करणं भाग आहे. मात्र तो अशा प्रकारचा एक वेळ सजा खाल्लेला, आणि हद्दपार केल्या-मुळं अगदीं निराश आणि नादान होऊन गेलेला असा मनुष्य नसावा. खरंच, महाराजांच्या विरुद्ध राजद्रोह करण्याचे व्यूह या पद्मनगरांत रचले जावेत, आणि त्याबद्दल एक अक्षाक्षर देखील इथं राहणाऱ्या लोकांनां ठाऊक असूं नये, आणि त्याची सगळीं वित्तं बातमी श्रीनगरच्या एका मनुष्याला अगदीं खडान् खडा माहित असावी, यावरून असं दिसतं कीं, त्या मनुष्याचे अंत-र्चक्षू फार तीव्र असावेत.

दया०—हो हो! फारच तीव्र असले पाहीजेत! ( स्वगत ) वेळ मोठी चमत्कारिक आली होती! पण आतां कोणाच्या बापालाही भिण्याचं कारण उरलं नाहीं!

ललि०—महाराज, प्रकृत दोषापासून मला आपला बचाव करण्याकरितां जरा धीट आणि स्पष्ट व्हावं लागत आहे, याबद्दल मला माफी असावी. आजपर्यंत मिळवि-लेल्या नांवलौकिकाला आणि कीर्तीला अजिबात खग्रास करूं पाहणाऱ्या या भयंकर दोषारोपापासून मला स्वतःला मुक्त करून घेण्याकरितां शिष्ट मार्गाचं आणि मर्यादेचं थोडंसं उल्लंघन करून, महाराजानां

गत गोष्टींचं मला एकवार स्मरण दिलं पाहिजे. महाराज, आपण मला ह्या पदाला जें आणून पोंचविलं आहे तें कां ? हें जरा लक्षांत आणा. महाराजांच्या महत्वाकांक्षी भावानं—त्या दुष्ट हर्यसेनानं--आपल्या गुप्त मसलतीनं आणि कृष्ण कारस्थानानं हें पद्मनगर जेव्हां अगदीं रसातळाला नेऊन पोंचवण्याचा घाट घातला होता, तेंव्हां त्याच्या सगळ्या गुप्त मसलती आणि कृष्ण कारस्थानं फोडून त्याला पालथा घालण्याकरितां जीं उलट कारस्थानं आणि खटपटी कराव्या लागल्या त्या कोणाला ?

चि०—कोणाला ह्मणजे ? ललितराज, तुह्मांलाच.

ललि०—आणि तसंच हेंहि पण सांगा कीं, त्या रामपूरच्या शिलादित्यानं महाराज बसले आहेत ह्याच विजयभुवनाखालीं जय्यत सुरुंग भरून ठेवून या विजयभुवनाबरोबरच महाराजानां पार उडवून देण्याची मसलत केली असतानां त्याच्या त्या सुरुंगांत फुसकी दारू भरून, त्याचें कृष्णकारस्थान जागच्याजागीं ओंफस्स केलं तें कोणी ?

चि०-ललितराज, ह्याबद्दल मी आपला किती तरी ऋणी आहे !

दया०—( आपल्याशीं ) शाबास, हा राजद्रोह मात्र मोठा आश्चर्य करण्यासारखा खरा !

ललि०—हं: एखाद्यानं दुसऱ्या एखाद्याच्या जिवाकरितां अगदीं आपला जीव तोडून तुटून पडावं, आणि

शेवटीं त्याला बक्षीस देण्याचं तर दूरच राहिलं, पण उलट त्याला अजिबात विसरून जावं !

**दयां॰**–( आपल्याशीं ) ह्याच्या या अशा पोटांत शिरण्यानं मला आतां जास्त जास्त धीर आणि अवसान येत चाललं आहे. आतां मी कोणाच्या बापालाहि भिणार नाहीं !

**चि॰**–ललित ! आजपर्यंत तुह्मीं जीं जीं कामं बजाविलीं आहेत, तीं सारीं आतां आमच्या डोळ्यांपुढं स्पष्टपणें उभीं आहेत. ललित, यापुढं माझे प्रियकर दोस्त आणि जिवाचे कलिजे कायते तुह्मीं. तुमच्या सांगण्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. यांचं ऐकून घेतलं हीच माझी चूक. ( दरबारी मंडळीस ) हें पहा, ललितराजासंबधानं जे कोणी यत्किंचितहि हेवा अगर मत्सर करितील, ते आमच्याशीं राजद्रोह करीत आहेत, असं स्पष्ट समजलं जाईल. या, या तर आतां. आणि हें पहा आनंदघन, तुह्मीं ह्या पत्राच्या चावड्या करून आकाशाच्या पोकळींत फुंकून टाका. आणि यापुढें तरी थोडी अक्कल शिका, समजलांत ? या, या आतां. ( ललितास ) ललित, मला भेटा पाहूं. ( ते जातात व चित्रवीर्य आणि ललितराज दोघे हातांत हात घालून एकीकडे फिरतात. ) बरं पण आज रात्रीं आपली दोघांची गांठ कुठं पडणार ?

**ललि॰**–माफ करा सरकार. मी मोठा घातकी आणि भयंकर मनुष्य आहें ! माझ्यासंबंधानं महाराजांनीं जरा संभाळूनच असावं.

**चित्र०**—बस्स. ललित, ही भाषा आतां पुरे. माझे प्राण देखील मी अगदीं बेफिकीरपणें तुझ्या स्वाधीन करीन. यापेक्षां आणखी काय सांगू? हें पहा ललित, आज रात्रीं त्या आनंदवल्लरीबरोबर मजा मारायला सांपडणार कीं नाहीं आह्मांला?

**दया०**—( आपल्याशीं ) हे महाराज तर ललित राजांच्या चांगलेच भजनीं लागलेले दिसतात. ह्या स्वारीचे एकीकडे महाराजांविरुद्ध कट, आणि दुसरीकडे हीं असलीं कारस्थानं! तेव्हां ह्याला काय बिलंदर छट ह्मणावा का राजद्रोही!

**चित्र०**—राजद्रोही! राजद्रोही ह्मणून अजूनहि माझ्या कानाशीं गुणगुण चालू? आमच्या ललितराजांवर जर कोणी राजद्रोहाचा आरोप केला तर त्यालाच आह्मीं राजद्रोही आणि दगलबाज असं समजूं.

**दया०**—महाराज, मी अगदीं शपथेवर सांगतों कीं, या राजद्रोहापासून मी जितका पवित्र आणि अलिप्त आहें, तितकेच हे ललितराजहि पण आहेत. जास्त काय सांगूं? महाराजांची मी आतां रजा घेतों. ( मुजरा करून, जातां जातां आपल्याशीं ) मी आतां तर कोणाच्या बापालाहि भीत नाहीं. पण ह्याचा अखेर परिणाम काय होणार?

**चि०**—ललितराज, रात्र येईपर्यंतचा सगळा काळ मला आतां युगासारखा जाणार. तिच्या प्रेमालिंगनाला मीं केव्हां प्राप्त होईन असं झालं आहे मला. कोपन-

शील मोठा तामसी आणि कुरैग्राज आहे. तो या गोष्टीला राजी कसा होणार? आणि शिवाय तिचं प्रियाळाशीं लग्न ठरलं आहे त्याची वाट काय?

ललि०—महाराज, ह्या सर्व गोष्टी माझ्या ध्यानांत आहेत. आपल्याला कसलीहि काळजी नको. आपण माझ्यावर सर्व सोंपवून स्वस्थ असा. मी घेतों सगळं पाहून.

चि०—पण तिचं तर सगळं प्रेम त्या प्रियाळावर आहेना?

ललि०—आणि यापुढं तें सगळं महाराजांवर बसणार! महाराजांनीं मात्र तिच्यावर आपल्या प्रेमाचा अलोट वर्षाव केला पाहिजे.

चित्र०—ललितराज, हें चित्र घे. (चित्र देतो.) आणि हें तिला देऊन असं सांग कीं, मी आपल्या प्रेमाची खूण ह्मणून हें तिला देत आहे. खरंच सुखाचा काल येणार, ह्मणून मनुष्य जों त्याची वाट पहात असतो तों येऊन पोंचेपर्यंतचा सर्व काल सरतां सरतां सरत नाहीं. आणि तो एकदां येऊन ठेपला, आणि मनुष्य सुखानंदांत बुचकळ्यांवर बुचकळ्या मारूं लागला ह्मणजे त्याला आपला काल केव्हां आणि कसा जातो हें मग समजत देखील नाहीं. कां मी ह्मणतों हें खरं आहे कीं नाहीं ललितराज?

ललि०—हो हो, अगदीं अक्षरशः खरं आहे हें. सुखाची वेळ केव्हां आणि कशी निघून जाते हें मनु-

ष्याच्या नीटसं लक्षांत सुद्धां येत नाहीं. आणि दुःखाचा काळ इतका कांहीं दीर्घ वाटतो कीं, तो संपता संपता संपत ह्मणून नाहीं. बरं तर मी घेतों आतां रजा.

**चित्र०**—घे. पण त्या आनंदवल्लरीची गांठ आज रात्रीं पडलीच पाहिजे. ह्मणजे हें अर्ध राज्य तुझं.

**ललि०**—त्याची नको काळजी. ती सगळी व्यवस्था माझ्याकडे लागली. ( स्वगत ) अर्ध कां ? सगळंच मी घेणार! ( जातो व पडद्याच्या बाहेर येऊन ) हं, असंच, असंच केलं पाहिजे. पहिल्यांदा त्या मदनिकेच्या आईला जाऊन गांठलं पाहिजे; आणि तिच्याकडून हें चित्र हळूच युक्तीनं आनंदवल्लरीच्या महालांत नेऊन टाकिवलं पाहिजे; ह्मणजे झालं. आपला कार्यभाग आटपला. चित्रवीर्याच्या या चित्रांत सुद्धां त्याच्या अंगीं असणारा रंगेलपणा किती हुबेहूब उतरला आहे! याचे हे डोळे सुद्धां त्याच्या इषकबाजीची पूर्ण साक्ष देत आहेत. पण ह्मणावं या तुझ्या साऱ्या रंगाचा हा ललितराज जर बेरंग न करील, आणि ह्या इष्कीबाज डोळ्यांचीं गुड-गुडीचीं भोंकं करून जर न टाकील तर हा नांवचा ललितराजच नव्हे! काय चमत्कार आहे पहा—ज्या आनंदवल्लरीनं आपल्या सुंदर रूपानं मला अगदीं मोहून टाकलं आहे, आणि जिच्या प्राप्तीसाठीं माझे रात्रंदिवस गुप्त प्रयत्न चालू आहेत, त्या सुंदरीच्या प्राप्तीकरितां हा कामांध मनुष्य माझी योजना करितो ! वाहवारे दुधखुळ्या ! तुझ्या सारखे असे दुधखुळे या जगांत

आहेत ह्मणूनच बरं आहे. नाहींतर या जगांत आमच्या सारख्यांना राहतांच येतं ना! मूर्खा, तुला असं वाटलं तरी कसं? आपला इष्क पुरा करण्याकरितां या ललितराजाकडून तूं आपला बिछाना घालवणार ह्मणतोस? आणि तो त्या आनंदवल्लरीशीं रममाण होण्याच्या हेतूनं? ठीक आहे. हा पहा--हा ललितराज, तुझ्याकरितां असा कांहीं मऊ बिछाना घालून ठेवतो कीं, त्यावर तूं एकदां पडलास ह्मणजे झालं. पडे पडेतों तुला अशी कांहीं गाढ झोंप लागेल कीं तुला या कुशीवरचं त्या कुशीवर होण्याची देखील बिलकूल तसदी पडणार नाहीं! हा पहा, लागलोंच तर मी आतां तुझ्या बिछान्याच्या तयारीला. (जातो.)

[ अंक १ ला समाप्त. ]

---

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळः**–( दयाळजीच्या घरांतील पुढील दालन )

[ **रा**णोजी **पि**राजीस दारूचा पेला देत आहे. ]

**राणोजी**–आनीक ह्यो योकुच प्येला. पुना दुसरा न्है देत! ह्या हंसऱ्या दारूची शपथ तर न्है देत! अंगाबिंगावर यईल म्हून भिता का काय राव? पन् त्येची नग काईबी काळजी.

**पिराजी**–पिरयाळरावाचा शिद्याबी जवातवा असा तुमावानीच ध्या ध्या म्हनतुया अन् पाजतुया. त्योबी अक्शी तुमावानीच लई गमती गडी!

**रा०**–अन तुमचं नव धनी–त्ये पिरयाळराव-ध्येत्याती का न्है?

**पि०**–त्ये काई पुसूं नका. ह्येच्या परीस वरल्या दरज्याच त्ये ध्येत्याती. अन् ह्या भादूरानं त्या आनंद-वल्लरी संबंदानं जवाका येडवांकडं सांगूनशनी त्येचं मन पिसाटून टाकलं, तवापासून तर अक्शी योकसारक ब्येहोष; प्याल्यावर प्यालं, प्याल्यावर प्यालं; दुसरं तिसरं दिसत न्है त्येस्नी काईबी. पन् त्यांचा दुसरा योक नोकर हाये मोहन म्हनूनशनी, तो त्येसनी धरतुया जवातवा लई आवरूनशनी, पन् त्येला त्ये काई केल्याबी दाद म्हून न्है घेत

रा०–पन् कायव, पिरयाळर वांचं अन् कोपनशीलाच्या भइनीचं लगिन ठरलया न्हवका? अन् मग ह्ये असं कसं?

पि०–( पुन्हा तोंडास पेला लावून व हंसून ) व्हय व्हय. अन् त्या पाईच तर आमच्या धनीसायबांचा काईबी कावा हाय. त्येंच मोडलं कीं ह्येंचं जुगलंच. अन् ह्ये बगा–त्या आनंदवल्लरीकड योक हाये मंजुळा दासी; तिचंबी लगीन करून घेनार हायती ह्मन ह्या मोहना संगं. पन् आमच धनी पटकावनार आनंदवल्लरीला, अन् पिराजी बोआ पटकावनार मंजुळीला, पिराजी अन् मंजुळा, मंजुळा अन् पिराजी कसा सोबल जोडा?

रा०–वा जी वाः अक्शी उडत्या कबूतरावानी! बरं पन् पिराजीबुवा, तुमी त्ये पत्तुर आमच्या धनीसायबांच्या हाता मंदी दिलंत तवा त्ये काय ह्मगाले?

पि०–त्ये ह्मगाले 'कुनी दिलया'?–मी ह्मगालों 'ह्याराजांच्या खासगी कडन'. तवा त्ये ह्मगाले 'ठीक हाय, जा तूं'. तवा मी मुजरा ठोकला अन् जो का निसाटलों तो तुमच्या तावडीमंदी गवासलों! ( इतक्यांत 'राण्या,' ह्मणून हांक ऐकूं येते. )

रा०–अरच्या! ही तर धनीसायबांची हाक! पिराजीबुआ, आतां योक, दोन, तीन, अक्शी हांकावर हांका ठोकत्याल. येतू तर मीं,

पि०–आमीबी येतो तर.

रा०–या, पन् आतां पुना कवा गाठ? कदीमदी येत जावा कीं

पि०—का न्हई येनार? जरूर यईन कदीमंदी. राम राम.

रा०—राम राम. (पुन्हा हांक ऐकून, स्वगत) हा दयाळजी वाटेल त्या सरदारासंबंधानं तोंडास येईल तें भकतो. आणि या करितांच याची एकदां चांगली फजीती करावी, म्हणून प्रेमसागरांच्या सल्ल्यानं, मी ही पत्राची युक्ति केली. पांच हजारीच्या आशेनं, ही स्वारी अगदीं भाळून गेली आहे. पहिलं पत्र याच्या हातीं पडल्याबरोबर तर त्या पत्रांत लिहिल्याप्रमाणं आपल्या बहिणीची तसबीर देखील यानं पाठवून दिलीन! आतां पुढं पाहूं स्वारीची मजल कोठपर्यंत पोंचते ती! पण ह्याचा परिणाम कांहीं भलता—वेडा वांकडा—न होवो म्हणजे झालं. (पुन्हा हांका ऐकूं येतात व राणोजी धांवत जातो.)

दया०—राण्या-राण्या, अरे राण्या! (इकडे तिकडे पाहून.) गेला तरी कुठं हा! (मोठ्यानें.) अरे ए—राण्या गद्ध्या!

रा०—(लगबगीनें येऊन) जी सरकार—आपुनच—

दया०—'जी सरकार आपुनच', काय! अरे चोरा! पहिल्या हांकेला ओ द्यायला काय झालं होतं तुला? तोंडांत काय तंबाखूचा बार बीर भरला होतास वाटतं?

रा०—धन्यांनीं सरकार—

दया०—काय, मी बार भरला होता?

रा०—न्है सरकार. धन्यानीं तीन चार आरूळ्या दिल्या, पन् त्येतली माज्या कानावर योकूच आली धनीसाब.

दया०—योकूच आली धनीसाब! तर मग चोरा! मी चार हांका मारल्या हें कसं रे कळलं तुला!

रा०—'पयल्या तीन आरूळ्या भुता समिंद्राच्या असत्याती, तर त्येका राम्या, त्येना कदीबी ओ देऊं नगस,' म्हून माजा बा मरतावक्ती मला सांगूनशनी गेला हाय. त्या दिसापुन् पहिल्या तीन आरूळ्या अश्शी ऐकाच्याच सोडूनशनी दिल्या हैती धनीसाब:

दया०—राण्या! दिवसा ढवळ्या इथं भूतं नाचतात आरडतात होय?

रा०—त्येचा काय न्येम धनीसाब? जिथं शितं थत भुतं!

दया०—बस. राण्या, पुरे कर तुझी ही वाचाळपंचविशी. अगोदर मागल्या दारीं जा आणि गिरिजाताईला ह्मणावं—मी इकडं बोलावलं आहे.

रा०—जीं धनीसाब. (जातो.)

दया०—ही गिरिजा जर माझ्या ह्मणण्याला कबूल झाली तर मला देऊं केलेली पांच हजारी अगदीं अचूक हातोहात आपल्या पदरांत पडेल. आणि मग खुद्द महाराजांकडे आपला वशीला! पण हें जमणार कसं? हिला विचारायचं देखील माझ्या जिवावर येतं. शिवाय ती जरा तापटहि आहे. पण असं भिऊन काय उपयोग? छे: मी भितों कीं काय कुणाला? मी कोणाच्या बापालाहि भिणार नाहीं. (गिरिजा येते.)

रा०—ताईसाब आल्याती धनीसाब.

दया०—राण्या, जा--तूं बाहेर देवडीवर जाऊन बैस. मला हिच्याशीं कांहीं बोलायचं आहे.

गिरिजा०—(राणोजी जाऊं लागतो त्यास.) राणोजी बुवा, परसांत ठेवणीचीं वाळत घातलीं आहेत, मी येई-पर्यंत तिथं तुह्मी जरा उभे रहा.

रा०—जी ताईसाब (जातो, व स्वगत) हिच्या ठेव-णीच्या चिरगुटांना कोण येतो आहे चोर इतक्यांत? आपण इथंच जरा आड उभं राहून यांचं बोलणं ऐकावं मुकाट्यानं. (आड ऐकत उभा राहतो.)

दया०—ताई, अजून हलकीं सलकीं कामं करायचा तुझा स्वभाव जात नाही, हें कसं? आपण आतां मोठे सरदार झालें, तव्हां आपल्याला हें शोभत नाहीं. आपल्या सरदारीला शोभेल, अशा थाटानं वागलं पाहिजे आपल्यालों.

गि०—अरे ही सरदारी अन् फिरदारी काय घेऊन बसला आहेस तूं? ही आज आहे, आणि उद्यां नाहीं. आपलं जें जन्माचं आहे तें खरं. बरं पण तूं मला कशाला बोलावलं होतंस?

दया०—तुला होय? तुला ऽऽ अशाकरितां बोलावली होती कीं ऽऽऽ—हें पहा-हें महाराजांकडून पत्र आलं आहे; खुद्द महाराजांकडून पत्र ह्मणजे काय थट्टा आहे? त्यांत—त्यांच्या मनांतून तुझ्याकडे तुझ्या नवऱ्याची पांच-हजारी चालवावी असं आहे.

गि०—माझ्याकडे?

**दया०**—हो तुझ्याकडे. आणि त्याकरितां महाराजांनीं तुला वाड्यापर्यंत एकदां समक्ष भेटीला बोलावलं आहे.

**गि०**—मला आणि महाराजांनीं भेटीला बोलावलं आहे ह्मणतोस? आग लागो त्या सरदारीला आणि त्यांच्या त्या पांचहजारीला. मला ती घेऊन आतां कुठं स्वारी शिकारीला आणि मिरवायला जायचं आहे?

**दया०**—(पत्र पुढें करून) पण खुद्द महाराज आपण होऊन जर असं लिहीत आहेत, तर एक वेळ आपण त्यांच्या दर्शनाला जायला काय हरकत आहे?

**गि०**—काय हरकत आहे? दादा, हें तूं काय बोलतो आहेस? आणि त्यांचा सगळ्या दुनियेला इतका अनुभव असून! ते कार्तिकशंभू कायसेसे ह्या अशाच पायांत हद्दपार झाले ना?

**दया०**—आणि ह्मणून तर मी तुला ह्मणतों, कीं माझ्या ह्मणण्याला तूं रुकार दे. वावगं काय आहे यांत?

**गि०**—वावगं काय आहे? दादा, आपण गरीब झालों ह्मणून काय झालं? आपल्याला आपल्या परीनं लौकिकाची आणि अब्रूची चाड आहे कीं नाहीं?

**दया०**—कोण नाहीं ह्मणतो? आणि ती वाढविण्याकारितांच तर हें सारं.

**गि०**—वाढविण्याकरितां! अथवा हो—तूं ह्मणतोस तेंहि खरंच; मी फुटक्या नशिबाची, ह्मणून माझं कुंकूं आणि बांगड्या हीं जशीं वाढवलीं, तसाच—हायरे कपाळा!—लौकीक आणि अब्रू हीं देखील वाढवून घ्यायचीं, आणि

तीं दिखील अशा रीतीनं; असंच कीं नाहीं तुझं ह्मणणं?

**दया०**—गिरिजे, तसं नव्हे; उलट ती जास्त संपादन करायची, अग, महाराज आपण होऊन तुझ्या नवऱ्याची पांचहजारी तुझ्या पदरांत टाकताहेत, मग दैव देतं, आणि कर्म नेतं, असं का करतेस? नुसतं त्यांच्या दर्शनाला एकदां जाऊन ये कीं काम फत्ते.

**रा०**—काम फत्ते! अहारे नीचा! काम फत्ते काय?

**गि०**—साऱ्या पद्मनगरभर ते जो धुडगुस घालताहेत तो जर माझ्या कानीं न येता, आणि महाराज असे पापी दृष्टीचे नसते, चांगल्या चालीचे असते, तर एकदां नाहीं शंभरदां त्यांच्या दर्शनाला मी गेलें असतें, त्यांना मी आपल्या बापासारखं आणि देवासारखं समजून त्यांच्या पायां पडलें असतें, त्यांच्यापुढं नाकदुऱ्या काढल्या असत्या, काय वाटेल तें केलं असतं.

**दया०**-अग, राजा ह्मणजे बाप. प्रत्यक्ष विष्णूचा अंश.

**गि०**—असेल, पण असले कसाब बाप जर आपल्याच पोरींचे असे गळे कांपूं लागले, तर त्यांना बाप कोण ह्मणणार? मग मांगच ते. मांगाच्याहि पलीकडचे हवे तर!

**दया०**-गिरिजे, कुणासंबंधानं-काय बोलते आहेस तूं हें? हें कोणी ऐकलं, तर हें कोणत्या थरावर जाईल याची कांहीं तुला कल्पना!

**गि०**-मला वाटतं दादा, महाराजांच्या पत्राप्रमाणं आणि तुझ्या सांगीप्रमाणं मी जर वागलें नाहीं तर तुला

कार्तिकशंभूप्रमाणं हद्दपार व्हावं लागेल ह्मणून भितो आहेस तूं.

दया०-छत्, त्याला कोण भितो? मी कुणाच्या बापाला देखील भिणार नाहीं. पण गिरिजे, हें पहा—मनुष्याला केव्हां केव्हां चार चौघं वागतात तसं वागावं लागतं. त्या कांतिवर्मजींनीं, त्या आनंदवनांनीं, त्या प्रेमसागरांनीं, त्या प्रियाळरावांनीं, त्या कोपनशीळांनीं आणि खुद्द त्या ललितराजांनीं आपल्या सरदाऱ्या ज्या संभाळल्या आहेत, त्या कशाच्या जोरावर-याची तुला कांहीं कल्पना आहे का?

राणो०—हा चोर झाडून साऱ्या सरदारांसंबंधानं हव्या त्या खोट्यानाट्या गोष्टी खुलवून सांगतो आहे.)

दया०—अग इतकंच नव्हे पण तो हद्दपार झालेला कार्तिकशंभू आपल्या हातानं आपल्या बहिणीला, आणि त्याचा साथीदार तो रणधीरराव आपल्या बायकोला, महाराजांच्या जनानखान्यांत पोंचवून आपल्या सरदाऱ्या पुन्हा मिळवायच्या खटपटींत आहेत, ह्मणून साऱ्या पद्मनगरभर दाट वदंता आहे. असले खानदानीचे सरदार देखील जर इतके नरम आले आहेत तर आपल्या सारख्यांची काय कथा!

राणो०—(एकीकडे) हा गद्दा वाटेल तें अद्वातद्वा भकूं लागून दुसऱ्यांच्या अब्रूची आणि लौकिकाची हवी तशी नालस्ती करीत सुटला आहे! आणि तेंहि फक्त ह्या गिरिजेनें ह्याच्या ह्मणण्याला रुकार द्यावा ह्मणून!

**गि०**—आपल्या आयाबहिणींनां, लेकीनां, आणि बायकांना राजांच्या जनानखान्यांत पोंचवून सरदार लोक आपल्या सरदाऱ्या संभाळूं लागले ह्मणूनच महाराज असे बेताल झाले! या सगळ्यांचं कारण तुह्मीं; आपल्या लौकिकाची आणि अब्रूची आपल्या हातानं होळी करून तिला आग घालणारे आगलावे तुमचे तुह्मींच आहांत! मी एकच सांगतें, कीं मला पांच हजारीची जरूरी नाहीं आणि महाराजांच्या दर्शनाची तर त्याहिपेक्षां जरूरी नाहीं. मी त्यांचं तोंड सुद्धां पाहूं इच्छित नाहीं. मात्र तुला जर हद्दपारीची भीती वाटत असेल तर तुझं तूं आपलं कसं काय तें पहा. मला कश्शाची पर्वा नाहीं. मी जीभ हांसडून आपले प्राण देईन, पण आपल्या तोंडाला ही असली काळोखी कधींहि लाऊन घेणार नाहीं!

**दया०**—मला भीती? मी कोणाच्या बापालाहि भिणार नाहीं! पांचहजारीची मला गुमान नाहीं. माझी सरदारी जाऊन मला हद्दपार व्हावं लागलं तरी त्याचीहि मला फिकीर नाहीं. असल्या चिरड येणाऱ्या गोष्टींत हा दयाळजी कोणाच्या बापालाहि भिणार नाहीं! गिरिजे, तुझ्या अब्रूहून मला एकहि गोष्ट प्यार नाहीं. हे बघ गिरिजे, मी आपलं तुझं उगीच मन पाहिलं.

**गि०**—मन पाहिलंस? अगबाई, मन पाहण्याची काय भलतीच तऱ्हा ही? छेः यांत कांहीं तरी काळंबेरं आहे खास. दादा, तूं खोटं बोलत आहेस असं ही

तुझी मुद्राच सांगते आहे. नीच हेतू मुद्दाम छपवून छपले जात नसतात!

**दया०**—महाराजांचं पत्र आलं ही गोष्ट खरी आहे. पण गिरिजे, तुला वाटतं तसा मी बिलकुल डगमगलेलो नाहीं. निदान अशा बाबतींत मी कोणाच्या बापालाहि भिणार नाहीं. मी आपले प्राण वेंचीन पण तुझ्या अब्रूचं रक्षण करीन.

**गि०**—तें कांहीं नाहीं. तुझ्या मुद्रेवरून मला आतां तुझा एक काडीभर दिखील विश्वास वाटेनासा झाला आहे. ढिल्या आणि चंचल बुद्धीच्या मनुष्याला वैभवाची प्रीती आणि प्राणाची भीती हीं स्वतःच्या अब्रूपेक्षां अधिक प्यार वाटतात हेंच खास! आण तें पत्र इकडं. ( पत्र हिसकावून घेऊन मनांतच वाचूं लागते. ) सरदार दयाळजी यांसः—" तुह्मीं तसबीर पाठविलीत ती पोंचली. पसंतीस आली. आतां हुंडी पटविलीत कीं तुमच्या अर्जाचा योग्य विचार होऊन तुमच्याकडे पांचहजारी सुरू होईल ".

**दया०**—( स्वगत ) महाराज, पांचहजारी हिच्याकडे चालूं करणार म्हणून मी हिला थाप दिली. पण आतां मात्र कंबक्ती आली! (उघड तिला) तें पत्र घेऊन काय करतेस—आण तें इकडे. ( ती बाजूला होऊन तें वाचूं लागते. ) ताई—

**गि०**—दादा, ही तसबीर कसली? (एकीकडे.) आतां माझ्या सारं लक्षांत आलं.

दया०—ती तसबी ऽऽऽर—( कचरतो.) ती तसबीर भोलानाथाची.

गि०—म्हणजे ! बाबांची ? ती तर आपल्या पुढच्या दालनांत आहे.

दया०—नव्हे-ती गिरिजापति शंकराची—एका चितार्‍याकडून काढवून—

गि०—अस्सं ! दादा, आज आठ दिवस झाले, माझ्या महालांतून—तिकडून काढवायची झालेली माझी तसबीर नाहींशी झाली, तिचाच कांहीं तरी यांत संबंध दिसतो आहे खास ! ( पत्रांतील शब्द वाचते. ) " पसंतीस आली! आतां हुंडी पटविलीत कीं, "—कीं काय ? नत-द्रष्टा ! पांचहजारी करितां हा तुझा सगळा नीचपणा आणि कावा दिसतो ! आत्तां माझ्या हें पुरं लक्षांत आलं ! मांगा ! तुला दयाळजी, का बगळाजी, का कसाबजी, काय ह्मणूं तरी काय ? मेल्या, कसाबा ! स्वत:ला तुझी बहीण ह्मणवून घेण्याची आणि तुला आपला भाऊ ह्मणविण्याची मला लाज वाटते ! केवळ स्वत:ला पांचहजारी मिळविण्याकरितां तूं आपल्या अब्रूची अशी राखरांगोळी करायला कसा तयार झालास ! अरे, ह्या पापाचे झाडे कुठं देशील ? ( संतापानें ) हुंडी-हुंडी पटविणार का मेल्या !

दया०—गिरिजे—

गि०—काळतोंड्या ! माझ्याा नांवाचा उच्चार दिखील करूं नकोस यापुढं. तो मला ऐकवत नाहीं. यापुढं

मी तुझी बहीण नव्हे आणि तूं माझा भाऊ नव्हेस! मेल्या मांगा, भोलानाथांच्या कुळाला तूं ही काळीकुट्ट काळोखी फांसलीस! आतां हें पत्र घेतें आणि सगळ्या पद्मनगरीभर सांगत फिरतें कीं पांचहजारीच्या भरीं भरून तूं हें असं नीच कृत्य केलंस म्हणून, थांब, तुझ्या आणि महाराजांच्या—दोघांच्याहि नांवांचा सगळ्या गांवभर डंका करून सोडतें!

दया०—गिरिजे! ( कांपूं लागतो. ) मी तुझ्या पायां पडतों, हें पहा, तुझी अब्रू ती माझी अब्रू!

गि०—अब्रू! तुला आतां कसली अब्रू? आपल्या हातानं आपली बेअब्रू करून घेणारा तूं पाषाणहृदयी मांग आहेस! तुला अब्रू अन् बेअब्रू हीं सारखीच आहेत! आतां मला मात्र माझी अब्रू आणि लौकिक हीं बचावण्याचा मार्ग पाहिला पाहिजे. तूं तर पुरा निसवला आहेस. जा, जा, पांचहजारी मिळीव जा! मांगा! असल्या नीच कृत्यानं तुझं तळपट तळपट होईल! आतां माझी पुढची वाट काय तें माझं मी पुरं जाणतें! यापुढं ह्या घरांत मी पाणी दिखील पिणार नाहीं, हीच माझी प्रतिज्ञा! ( रागानें एकदंम निघून जाते. )

रा०—( एकदम पुढें येऊन. ) धनीसाब धनीसाब! ताईसाब तर अक्शी जिवावरत उदार झाल्यावानी दिसत्याती. तवा काय—झालं तरी काय त्येस्नी?

दया०—ह्मणजे! तूं ऐकत होतास कीं काय आमचं बोलणं?

रा०—न्है धनीसाब, आपुन् अन् ताईसाब जव्हाका मोट मोठ्यानं वरडाया लागलात, तवा माज्या कानाचीं तोंडं हकड फिरलीं.

दया०—आणि म्हणून तुझ्या पायांचीं बोटं—नव्हे तोंडं देखील इकडच फिरलीं वाटतं! चोरा, खास तूं आड उभा राहून आमचं बोलणं ऐकत होतास!

रा०—न्है धनीसाब. असली वंगाळ खोड न्है या राम्याला. हा धन्याचा इमानदार चाकुर हाये. मागल्या दरोज्यांत मी उबा व्हतो अन् थत त्या दिशीचा त्यो शिंद-शाई पगडीवाला—ज्याला धनीसायबांनीं आपल्या हाता-मंदलं सलकडं दिलं, तो शिपाई—आला अन् म्हंगाला, ‘आज धनीसायबानां म्हाराजांच्याकडनं हुकूम य्येलाया, त्येच्यापरमानं जर का न्है झालं, तर उद्यां तांबडं फुट-न्याच्या आंतमंदी धनीसायबांच्या वाड्यावर धरनं येनाऽऽर!

दया०—( घाबरून. ) काय धरणं येणार! मग आतां कसं? पांचहजारी परी पांचहजारी हातची जाणार, शिवाय स्वत:ची सरदारी जाऊन हद्दपारी पदरांत पड-णार, आणि बहिणीपरी बहीण गमावून बसावं लाग-णार! सगळचं दैव फिरणार!

रा०—म्हंजे? ह्ये हाये तरी काय इचीभन? अन् मग मलाबी नोकरी गमावूनशनी बसावं लागणार!

दया०—तें कांहीं नाहीं. हें सगळें ललितराजांच्या कानावर घालावं आणि यापुढं आपण कांहीं पद्मनगरींत रहात नाहीं ह्मणून त्यांना साफ सांगून टाकावं. आणि

मग सत्रीच्या रात्रीं इथून सारी चीजवस्त उठवून, बहिणी-सकट पसार व्हावं. बस्स असंच. मग मी कुणाच्या बापाला दिखील भिणार नाहीं.

रा०—अन् मीबी मग कुनाच्या बाला भिनार न्हे धनी-साब! पन धनीसाब इक्त घाबरलेती कशापाई? राऱ्याला सांगा संमदं भिन्याचं कारन, कीं तुमास्नी अक्शी योका घटकमंदी पार करून दिईन त्येच्या मदून. भिन्याचं काईंबी कारन न्है धनीसाब. त्यो शिपाई गडी ह्मगाला—

दया०—काय ह्मणाला?

रा०—त्यो ह्मगाला—तुमची भईन रक्ताचा गुळना यऊनशनी योकदम चचली असं उटवा, न्हैतर योकाद्या बाजारच्या पाकराला गांटूनशनी, रातीच्या वक्ती द्या म्हाराजांकड पाटवून आपली भईन म्हूनशनी—का मिटला समदा तंटा.

दया०—माझी बहीण ह्मणून का लेका?

रा०—तस न्हव धनीसाब. योळ मारूनशनी न्यायला ही आपली योक युगत है युगत. येळला गद्धयालाबी काका ह्मगाव लागतं, धनीसाब!

दया०—आः हाः राण्या! ही युक्ति आपल्याला पसंत आहे. युक्ति पण युक्ति, फारच नामी! आतां मी कुणाच्या बापालाहि भिणार नाहीं. पण गिरिजा आपल्या जिवाला कांहीं वेडं वांकडं करून घेईल कीं काय, आणि बोलल्याप्रमाणं खरंच गांवभर बहकत सुटेल कीं काय, ही मात्र मला फार भीती वाटते! पण छे:

ही युक्ति तिला सांगितली ह्मणजे ती देखील मग आपो-आप शांत होईल. तर तिलाच जाऊन अगोदर गांठतो. ह्मणजे मग आपल्याला कोणाच्या बापालाहि भिण्याचं कारण उरणार नाहीं. ( जातो. )

रा०–( स्वगत. ) या मूर्खाला फक्त एक पांचहजारी दिसते आहे. पांचहजारीच्या खोट्या आशेनं हा आंधळा झाला आहे; तेव्हां ही युक्ति गिरिजेला सांगितली ह्मणजे ती आपोआप शांत होईल असं याला वाटावं, हें सरळच आहे. तिच्या मनाची कशी स्थिती झाली आहे हें या आंधळ्याला काय कळणार! ही याची युक्ति ऐकून ती स्वस्थ होण्याचं तर बाजूलाच राहील, पण उलट तिच्या तळव्याची आग मस्तकाला मात्र जाऊन पोंचेल! कांहीं असो. झालं इथपर्यंत ठीकच झालं ह्मणायचं. ही गिरिजा या पुढं ह्याच्या घरांत राहील असं कांहीं लक्षण दिसत नाहीं. आपण केलेलं आप-ल्यालाच निस्तरलं पाहिजे. तर आतां हळूच युक्तीनं तिला कोपनशीलांच्या वाड्यांत नेऊन, तिची आणि आनंदवल्लरीची गांठ घालून द्यावी ह्मणजे सगळं ठीक जुळेल. सत्यपाळ दिवाणजींच्या वेळेपासून तिचं त्यांच्या इथं जाणं येणंहि आहे. तेव्हां अर्थात् त्या दोघींची मैत्रीहि असली पाहिजे! तर बस्स, हीच युक्ति! आतां ह्या कामाला अगोदर लागलं पाहीजे. ( जातो. )

## प्रवेश २ रा.

**स्थळ:—कोपनशीलाचे वाड्यांतील एक खोली.**

[ कोपनशील व ललितराज बोलत बसले आहेत. ]

ललि०--हें पहा कोपनशील, उगीच इतके खवळून जाऊं नका. जरा शांत व्हा. मनुष्यामध्यें थोडी शांतता आणि सहनशीलता पाहिजे. आतां तुमची बहीण —

कोप०–काय, माझी बहीण! आणि तिच्या संबंधानं हें असं? हा इथला राजाच काय, पण इथल्या राजाचा राजा जरी कोणी असला तरी त्याची देखील असली नीच कृत्यं करायची काय माय व्याली आहे! (निःश्वास टाकून ) हं: शांतता आणि सहनशीलता यांची गणना जर सद्गुणांत केली असेल तर ते माझ्यांत नाहींत हेंच खचित! आणि ते माझ्यांत नाहींत हेंहि एक प्रकारानं बरंच आहे. कारण असले हे सद्गुण असणं ह्मणजे निखालस मूर्तिमंत पाप! अशा प्रकारच्या अपमानाबद्दल सूड—सूडच उगविला पाहिजे! 'माझी बहीण' ही केवळ पांचच अक्षरं आहेत, पण यांनीं माझ्या ह्या मस्तकांत नुसता वणवा पेटवून अगदीं एकच—आग डोंब उसळून दिला आहे! ( डोक्याला हात लावून ) ललितराज, हें पहा. या कवटीच्या आंत हजारोंच्या हजारों क्रोध वणव्यांनीं पेट घेऊन इथं कशी अगदी एकच धुमश्चक्री उसळून दिली आहे! तुह्मीं सांगता असें पापाचरण



**कोपनशील**—' माझी बहीण ' हीं केवळ पांचच अक्षरें आहेत; पण यांनीं माझ्या या मस्तकांत नुसता वणवा पेटवून अगदीं एकच आगडोंब उसळून दिला आहे !

[ पृष्ठ ५४, अंक २ रा, प्रवेश २ रा. ]

*The Manoranjan Press, Bombay.*

करून आपला मुसमुसणारा इष्क पुरा करायला त्याचा सारा जनानखाना अन् दरबार काय ओस पडला आहे? आणि ह्मणून त्या नराधमानं माझ्या कौलाघराखालीं आणि प्रत्यक्ष माझ्या बहिणीशीं—माझ्या सख्या बहिणीशीं-जारकर्म करण्याची पापी आणि दुष्ट वासना धरावी! आमच्या घरीं येऊन, आमच्याकडून पाहुणचार घेऊन, अशा रीतीनं हा आमचा बहुमान करणार!

ललि०—हे पहा कोपनशील—

कोप०—(न ऐकतां) याचा हा मर्दानी आणि आग्या इष्क पुरा पाडायला या पद्मनगरींत एक-एक सुद्धां जागा उरली नाहीं? सगळे छिनालवाडे आणि सारी सत्तरखणी ओस पडली? आणि याची ही इष्कबाजी पुरी करायला ह्याला आह्मीं आपल्या घरीं नेऊन, आमच्या आयाबहिणी अन् बायकापोरी याच्या स्वाधीन कराव्यात? यापेक्षां याच्या या बेताल राजसत्तेला कांहीं तरी भयंकर रोग येऊन ते कां नाहीं इचे तटात्तट तुकडे तोडीत!

ललि०-आमचे महाराज—

कोप०—आमचे महाराज! ललितराज, ते आतां आमचे महाराज नव्हत. अशा नीच कृत्यानं माझी अब्रू आणि लौकिक मळवून टाकायला जेव्हां त्या-नराधमानं आपला रुकार दिला, तेव्हांच—अगदीं त्याच घटकेला—तो आपल्या राजत्वाला मुकला!

ललि०—असं असेल तर मोठी दुःखाची गोष्ट. मी

फार लाचार आहें, कीं असल्या नाजुक गोष्टी संबंधानं महाराजांकडून मी इथं बोलायला आलों.

**कोप०** हं! तुझांला हो दुःख वाटण्याचं आणि लाचार होण्याचं काय कारण? ललितराज, मघाशीं तुह्मींच ह्मटलंत ना कीं माझ्या बहिणीला तो बाजारबसवी करून सोडणार ह्मणून! माझ्या बहिणीला—त्या आनंदवल्लरीला--तो बाजारबसवी करणार असं सांगून तुह्मीं मला मोठी जखम केलीत! या जखमेनं होणाऱ्या वेदना तुह्मांला कोठून ठाऊक असणार! परंतु या हत-भाग्य कोपनशीलाच्या शरीरांत या वेदनांनीं असा कांहीं प्रळय उसळून दिला आहे कीं काय सांगूं तुह्मांला? आनंदवल्लरीच्या संबंधानं असा नालस्तीचा, शर्मेचा आणि लज्जेनं खालीं मान घालायला लावणारा, नीच प्रकार ऐकून, माझे पूर्वज--जरी त्यांची यापूर्वीं कधींच जळून राखरांगोळी होऊन गेली आहे—तरी अंतरिक्षांत संचार करणाऱ्या त्यांच्या दिव्य विभूती--त्यांचे पुण्यात्मे—अशा स्थितींत देखील ही गोष्ट ऐकून त्वेषानें अगदीं खवळून जातील, आणि त्या नराधमावर आपल्या प्रचंड क्रोधाच्या ठिणग्या झाडून त्याला जागच्याजागीं जाळून खाक करून टाकतील!

**ललि०**—पण कोपनशील, तुह्मी ह्मणाला होताना कीं तुमचं सगळं बोलणं मी ऐकून घेईन ह्मणून?

**कोप०**—तर मग याहिपेक्षां आणखी जास्त कांहीं सांगायचं उरलं आहे कीं काय अजून?

**ललि०**--हो. अजून पुष्कळच सांगायचं आहे. पण हें पहा कोपनशील, माझं सगळं सांगून होईपर्यंत तुह्मीं आपलं वीर्य असं उसळूं देऊं नका. तुमच्या थोरपणाला उचित अशा ह्या क्रोधावेशा संबंधानं मला तुह्मांला बिलकूल दोष देणं नाहीं. केवळ अविचाराच्या एखाद्या क्षुल्लक लहरीनं तुमचं डोकं भणाणून जात आहे, अशांतलाहि कांहीं प्रकार नाहीं, हेंहि पण मी पक्कें जाणून आहे. पण तुह्मीं हा आपला कोप जरा शांत करा. (थोडें थांबून) अहो, ही काय एक क्षुल्लक आगळीक आहे.

**कोप०**—काय? क्षुल्लक आगळीक! ललितराज, या आगळीकीला कांहीं सीमा आहे का? या आगळिकीच्या उच्चाराबरोबर माझ्या सगळ्या अंगाचा विलक्षण भडका होऊन जात आहे! ह्या आगळिकीच्या पापी उच्चारानं आपले कान विटाळून घेण्यापेक्षां प्रत्यक्ष प्राण गेलेले काय वाईट!

**ललि०**--कोपनशील, अशा रीतीनं तुमच्या बहिणीच्या कौमार्याचा भंग होणं, याहीपेक्षां देखील त्या दुसऱ्या गोष्टींत--अत्यंत भयंकर पाप अगदीं तुडुंब भरून राहिलं आहे! आणि त्या योगानं तिच्यावर तर कलंक येतोच येतो, पण त्याबरोबरच तुमच्यावरहि मोठा काळिमा येऊं पाहतो! बोला कोपनशील, त्या नराधमाला--त्या चांडाळाला--तुह्मीं कधीं कांहीं वचन दिलं होतं का? (एकीकडे पण त्याला ऐकूं जाईसें.) छेः पण यानां मी हा असा प्रश्न तरी अगोदर काय ह्मणून

करतों आहे? आपल्या कुळाला कलंक लागेल असा कोणत्याहि तऱ्हेचा एखादा अनुदार विचार या कोपनशीलांच्या डोक्यांत येईल असं मानणं ह्मणजेच मुळीं यांचा मोठा अपराध करण्या सारखं आहे. (उघड मोठ्यानें) आपल्या सारख्यांनीं अशा तऱ्हेच्या घोर, निंद्य आणि पापी आचरणाला आपला रुकार द्यावा ह्मणजे मग झालंच, या पृथ्वीवर क्वचित् दिसणाऱ्या स्वर्गीय सद्गुणानं ह्या जगाला कंटाळून त्याला शेवटचा रामरामच ठोकलान् ह्मणायचा!

को०—असं बोलून तुह्मीं माझ्या काळजाला उगीच अशा ह्या डागण्या कां देतां?

ललि०—तुमच्या दुर्लौकिकाला कारण होईल असं तुमच्याकडून कोणतं वर्तन झालं, कीं ज्या योगानं त्या दुष्टाला असं हें उत्तेजन मिळालं, त्याच्या अनावर आशेला अंकुर फुटले, आणि अशा तऱ्हेचं अघोर आणि नीच कृत्य करायला तुमच्यासारखा धर्मशील पुरुष तयार आहे असं ह्मणायला त्याला जागा झाली?

को०-काय, माझ्याकडून?

ललि०-हो तुमच्या कडून. कोपनशील, इथं अलोट उतास येणारीं हीं सारीं वैभवं, आणि पद्मनगरचं हें सारं राज्य, ह्यांची लालूच दाखवून जरी तुमच्या नांवाचा दुर्लौकिक करून त्याला काळिमा लावायला मला कोणी भुरळ घातली असती, तरी देखील, हें असलं ओंगळ आणि नीच कृत्य करायला हा ललित कधींहि

तयार झाला नसता! त्याच्या दुष्ट वासनेची शांती करण्याकारितां तुह्मीं लुब्रेपणानं आपण होऊन कुंटिणगिरी पत्करलीत—ही नुसती कल्पना देखील अत्यंत नीच, हिडिस, भयंकर आणि मनुष्य स्वभावाला भेंवडावून सोडणारी आहे! या कल्पनेनं मी कसा अगदीं लुलाखुडा होऊन जातो!

**कोप०**—हं:

**ललि०**—आणि हें दुष्ट कृत्य करायला त्यांच्या कडून मला हुकूम होतो!

**ललि०**—ललितराज, हा पहा माझा श्वास अगदीं बंद झाला, आवाज कोता पडूं लागला; इतका वेळ जो मी होतों, तोच मी नव्हे आतां. अथवा इतका वेळ ज्याच्याशीं तुह्मीं बोलत होतां, तोच कोपनशील जर मी असेन,—पहा, माझ्या शरीराकडे नीट लक्षपूर्वक पहा, तर तुह्मांला माझ्या शरीरांतल्या मांसल भागांत असणाऱ्या यच्चावत् साऱ्या फटींतून एक प्रकारचा प्रखर अग्नी पेट घेत आहे असं स्पष्ट दिसून येईल! अहो, माझा प्राण ह्मणजे तुह्मीं काय समजतां? तो ह्याच दिव्य अग्नीची एक ज्वाला आहे, आणि ती या नश्वर इमारतींत सर्वत्र संचार करीत आहे! मला वाटतं हिच्या ह्या धगीनंच माझं सर्वांग करपून जाऊन, लवकरच जळून खाक होईल! क्रोधानं हा पहा माझ्या सर्वांगाला कसा कंप सुटला आहे. कायहो, माझ्मा अंगाचा रंग इतक्यांत तुह्मांला पालटल्या सारखा नाहीं दिसत? माझं

हें तोंड कसं अगदीं होरपळून जात आहे! मला वाटतं, माझ्या छातींतून एखाद्या भयंकर ज्वालामुखी पर्वताचा स्फोट होणार!

ललि०—या तुमच्या कल्पनेनंच असं कांहीं तरी व्हायचं एखादं.

कोप०—कल्पना! कल्पना!! अहो, ही कल्पना नव्हे—हा क्रोधाग्नीचा भडका आहे! (आवाज बदलून) हा भडका जरा शांत होऊंदे; आणि मगच या संबंधानं आपल्याला जें कांहीं बोलायचं आहे तें बोलूं आपण!

ललि०—(स्वगत) आतां मात्र ही ज्वाळा अगदीं पार-वरपर्यंत जाऊन भिडली! (प्रकाश) कोपनशील, या गोष्टीची तुह्मालांहि पण प्रचीती आहेच कीं तो माझा धनी आहे, माझा अगदीं जवळचा आप्तसंबंधी आहे, तरी त्याच्या अंगीं असलेल्या दुर्गुणाबद्दल त्याचा मी मनापासून तिटकाराच करतो. आतां लोक खरी वस्तुस्थिती काय आहे हें न पाहतां माझ्या विरुद्ध हव्या तशा आफवा उठवोत; माझ्या नावानं वाटेल तसे खडे फोडोत, आणि माझ्या कृत्यांना वाटेल तसें कृष्णस्वरूप देवोत, जगाच्या तोंडाला कोणी आणि कसा हात लावावा? या सगळ्या राजांची तर हीच खुबी आहे, कीं कुणाला तरी एकाला आपल्या नाकांतला अगदीं बाल करून ठेवायचा आणि मग राज्यांत जितक्या ह्मणून अन्यायाच्या आणि वाईट गोष्टी होतील तितक्या सगळ्यांचं खापर त्याच्या डोक्यावर फोडायचं! आणि

एखाद्या बाबतींत जर कांहीं यश आलं, तर त्याच्यावर मात्र या राजांची मालकी! आहे कीं नाहीं जगाची गंमत!

**को०**—आणि ह्मणूनच आतां आपल्याला बिलकुल मागं पुढं न पाहतां—त्या मृत्युलोकाची रम्य आणि भव्य गोपुरं दाखविण्याकरितां—त्या मत्त आणि जुलमी राजाची इथून लौकरच रवानगी केली पाहिजे! आणि ललित-राज, या कामांत तुमचीच मला मुख्य मदत पाहिजे.

**ललि०**—कसं कसं ह्मटलंत? माझी मदत?

**को०**—हो हो तुमची. मात्र आतां असे घोटाळूं नका. बोला, मग कसं काय? तुमच्या नांवावरून आणि कुळावरून तुह्मीं राजाचे आप्त आहां हें आह्मांला ठाऊक आहे. आणि हेंहि पण आह्मांला माहीत आहे कीं तुह्मीं त्याचे जिवाचे कलिजे आहांत—तुमच्यावर त्याची मेहेरबानी आहे. तसंच आपण वरून जसे दिसतां तसे नसून, आपलं अंतरंग अगदीं निराळं आहे, हेंहि आह्मांला ठाऊक आहे. हा आपला केवळ कपटवेष आहे!

**ललि०**—( आश्चर्य दाखवून ) काय? हें असं कसं ह्मणतां आपण?

**को०**—त्या हद्दपार केलेल्या लोकांशीं आपला अगदीं संगीन पत्रव्यवहार चालू असल्याचं मला केव्हांच कळून चुकलं आहे. आणि ते तुमच्याकडून एखादा इषारा मिळाला कीं पुरे सारे रस्ते अडवून ह्या पद्मनगरीमध्यें एकच धुमाकूळ उसळून द्यायला अगदीं एका पायावर तयार आहेत! का नाहीं ते तयार असणार?

ललि०—मला वाटतं तुमच्या डोक्यानं आणि माझ्या डोक्यानं कांहीं तरी संगनमत केलं आहे. कारण असं पहा कीं जे विचार तुमच्या डोक्यांत येताहेत तेच विचार माझ्या डोक्यांत वारंवार उसळ्या मारीत आहेत. मी आपलं हें नशीबच समजतों कीं जो अग्नी तुमच्यामध्यें धुमसत आहे तोच माझ्यामध्येंहि पेट घेऊं पहात आहे. आणि अशा दोघांचा स्नेह होणं ही गोष्ट देखील मोठ्या आनंदाचीच समजली पाहिजे. कोपनशील, आतां अगदीं उघड करून सांगायला कोणती हरकत आहे? हें पहा कोनपशील, या चित्रवीर्यानं जेव्हां आपल्या नीतीला आणि सदाचरणाला झुगारून दिलं तेव्हांच त्यानं या पद्मनगरीला आणि पद्मनगरीच्या प्रजाजनांनाहि पण झुगारून दिलं आहे. तेव्हां आतां याच्यावर तोड ह्मटली ह्मणजे हीच कीं, ह्या नराधमाला नरक लोकासारख्या एखाद्या अमंगळ लोकांत अचुक झुगारून दिला पाहिजे! हं: कोपनशील, हें मी आपलं ह्रद्गत तुमच्या जवळ जें अगदीं एवढ्या खुल्या दिलानं सांगितलं तें केवळ तुमच्या॰ वर माझा पूर्ण विश्वास आहे ह्मणून. आतां या पुढं माझं सर्वस्व तुमच्या हातीं आहे. या घटकेपासून मी आपले प्राणच तुमच्या हातीं दिले आहेत ह्मणून समजा. असे स्तब्ध कां? तुह्मांला अद्याप माझ्याबद्दल कांहीं शंका वाटते कीं काय? चित्रवीर्याच्या मागं ही गादी आपल्याला बळकावयाला सांपडावी ह्मणून हे सारे माझे डाव-पेंच आहेत, असं तर नाहीं आपल्याला वाटत? असं

वाटत असेल तर माझं दुर्दैवच! दुसरं काय? कोपनशील, अशा साहसाला उद्युक्त होण्यांत माझा हेतु एवढाच कीं त्या विषयांध दुरात्म्याच्या पापी आणि भ्रष्ट करपाशांतून ह्या पद्मनगरांतल्या लोकांच्या बायकांमुलींची आणि आयाबहिणींची सुटका करावी!

को०—बहिणींची! बहिणीची सुटका आँ?

ललि०—होय. आणि ती ह्या दुष्टाच्या दुर्गतीला नेणाऱ्या बलात्कारापासून! हे पुण्यशीले आनंदवल्लरी, तुझ्याविषयीं त्या दुरात्म्यानं अशी पापवासना धरावी काय?

को०—झाला, झाला. आतां माझा ठाम निश्चय झाला. या जगांत जें जें ह्मणून मला प्रिय आणि पवित्र आहे त्या सगळ्याची शपथ घेऊन सांगतों कीं हा नराधम आतां ठार झालाच ह्मणून समजा! त्याला ह्मणावं हा कोपनशील तुझी कुंटणगिरी पत्करायला फार खुषी आहे. आणि माझी बहीण तुझ्या इच्छे प्रमाणं वागायला एका पायावर तयार आहे! ललितराज, ह्या दुष्टाचे नसते खोडसाळ उद्गार देखील आमच्या दुर्लौकिकाला आणि दुष्कीर्तीला कसे कारणीभूत होतील याची त्या नराधामला नुसती कल्पना देखील नाहीं! याबद्दल त्याला आतां प्रायश्चित्त ह्मटलं ह्मणजे त्याच्याच रक्तानं त्याला कंठस्नान! ज्या कौलावराखालीं असं हें दुष्ट आणि अघोर कृत्य करून तो साऱ्या जगभर आमच्या नांवाचा दुर्लौकिक करणार त्याच जागीं त्या दुष्टाचे, त्या अधमाचे, त्या

नरपशूचे–पैशा पैशा एवढे तुकडे करून, तेंच घर मी त्याची स्मशानभूमी करून सोडणार! त्याला ह्मणावं तूं अगदीं खुशाल निर्धास्तपणें ये. अथवा ललितराज, त्याला तुह्मींच इथें घेऊन या. त्याचा खून पाडायला हीच जागा सर्वांत उत्तम आहे.!

ललि०—मलाहि पटतं हें! पण कोपनशील, तुह्मीं मात्र आतां यांत बदलूं नका.

को०—( विचार बदलून. ) मी बदलत नाहीं. पण मला वाटतं हें काम मारेकऱ्याचं होईल! तेव्हां हें असं नाहीं उपयोगी. मी आपली समशेर उपसून राजरोस–भर दिवसा तडक-दरबारांत जातो, आणि तिथं-सर्व सरदारांच्या समक्ष, त्याच्या ओंगळ आणि नीच पापवासनेची त्याला ओळख देऊन, त्याच्या सिंहासनावरून त्याला खालीं ओढून, ह्या दिव्य समशेरीच्या नखाग्रांनीं त्याचा कोथळा फाडून त्याला कंठस्नान घालतो!

ललि०—मला वाटलंच तुह्मीं बदलाल! पण हें असं नाहीं उपयोगी. कारण तिथं जाऊन हें पार पाडणं केवळ दुर्घट! आणि तें का साधलं नाहीं कीं मग सगळाच ग्रंथ आटपेल. त्याचा मृत्यूच त्याला इथं ओढून आणीत आहे; ह्मणून ह्मणतों-हीच त्याची स्मशानभूमी झाली पाहिजे! तुह्मीं आहां तापट, त्याला पाहिल्या बरोबर खवळून जाल, ह्मणून सांगून ठेवतों–तुह्मांला फार सावध राहिलं पाहिजे; नाहींतर आपली सगळीच मसलत एकदम ओंफस्स होऊन जाईल! येतो तर मी.

आपला निश्चय मात्र ठाम असूं द्या. दुसरी गोष्ट—मनुष्य जितकं तापट तितकंच तें कोवळ्या मनाचं असतं, ह्मणून ह्मणतों—तो गयावया येऊन प्राणदान मागूं लागला ह्मणजे तुह्मीं पडाल मोहांत, तर त्यावेळीं मात्र फार सावध रहा. आणि प्रत्येक घाव आनंदवल्लरीच्या नांवाचा उच्चार कर-करून घाला! येऊं तर मी?

**कोप०**—या. त्याची नको तुह्मांला काळजी.

**ललि०**—काळजी नाहीं. पण तुमचं हें उग्र नरसिंह-स्वरूप पाहून मला आपली भीती वाटते!

**कोप०**—तुमची भीति निरर्थक आहे. जा, त्या संबंधानं तुह्मीं अगदीं निर्धास्त असा. (ललितराज जातो.) (स्वगत.) चित्रवीर्याला त्याच्या ह्या अधमपणा-बद्दल या समशेरीला बळी द्यायचा हें तर ठरून चुकलंच. पण आनंदवल्लरीला आणि पद्मनाभाला हें कितपत रुचतं हें आपल्याला मोठ्या खुबीनं आणि शिताफीनं काढून घेतलं पाहिजे. (विचार करून) आणि याला आतां युक्ती ह्मटली ह्मणजे हीच. महाराज ताईवर अनुरक्त आहेत, इतकं तिला आणि पद्मनाभाला--दोघानांहि--मोघमच सांगि-तलं ह्मणजे झालं. दोघंहि बुचकळ्यांत पडतील. आणि तीं अशीं बुचकळ्यांत पडलीं ह्मणजे मग त्यांच्या मनांत काय आहे तें सहज काढून घेतां येईल. त्या इष्कीबाज राजाच्या इच्छेनुसार वागायला हीं दोघं तयार आहेत, असा यत्किंचित् जरी रंग दिसला तरी मग पुढं मागं न बघतां मला काय करायचं तेंच मी करीन. पण माझ्या

मनांत काय अघोर कल्पना येत आहे ही! नको, नकोच ती कल्पना! दुरात्म्या! माझ्या बहिणीशीं आणि जार कर्म! नको, नको–ते विचारच नकोत! ह्या विचारांना मी जर आतां पार हुडडून लावलं नाहीं, तर यापुढं ह्या भडक्यापासून माझ्या डोक्याला एक क्षणभर देखील विश्रांती ह्मणून कशी ती मिळणार नाहीं!

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**--कोपनशीलाच्या वाड्यांतील एक दालन.

[ **आ**नंदवल्लरी **व गि**रिजा बोलताहेत **व रा**णोजी एका बाजूला आहे. ]

**आनं०**–गडे **गि**रिजे, तूं फार दिवसांनीं आलीस, मला मोठा आनंद झाला. तुला पाहून माझं सारं बाळपण मला आठवूं लागलं आहे. तुझ्या भेटीनं तें जसं कांहीं माझ्या डोळ्यापुढं मूर्तिमंत उभं आहे असं वाटतं गडे मला.

**गिरि०**–गडे **आ**नंदवल्लरी, तूं ह्मणतेस तें खरं. पण बाळपण आणि तरुणपण यांत कितीं अंतर आहे ह्मणून सांगू. (**रा**णोजीस) **रा**णोजी, तुह्मीं जा आतां. मी इथं सुखानं राहीन आतां चार दिवस. एकदोन दिवशीं येऊन मला भेटत जा. समजलं?

**राणो०**—जी बाईसाब, येतो तर. (स्वगत) अहाहा! काय यांचं हें प्रेम! (जातो.)

**आनं०**—हा राणोजी कोण? तुमच्या इथं कोणी नवीन गडी ठेवला आहे कीं काय?

**गिरि०**—हो. (इतक्यांत पद्मनाभ येतो.)

**पद्म०**—ताई, दादा कुठं आहेत? आणि ह्या कोण?

**आनं०**—पद्मनाभ, ह्या गिरिजेला तूं ओळखलं नाहींस तर एकून?

**प०**—हं हं हं! आतां आलं लक्षांत. (तिला नमस्कार करतो.)

**गि०**—औक्षवंता हो. भाग्यवंता हो.

**प०**—बरं पण ताई, दादा कुठं आहेत? आणि काय करताहेत ते?

**आनं०**—अग बाई, केवढा तरी वेळ झाला पण—दादा आणि ते ललितराज कायससं बोलताहेत. इतकीं काय त्यांची खलबतं चाललीं आहेत कोण जाणें.

**गि०**—(स्वगत) ललितराजांचीं अन् कोपनशीलांचीं खलबतं? ह्मणजे!

**प०**—ह्मणजे? किती वेळ झाला तर त्यांना इथं येऊन?

**आनं०**—चांगलीऽऽ घटका दीड घटका झाली असेल ह्मणेनास.

**प०**—आणि इतका वेळपर्यंत ते काय बोलताहेत तरी काय असं? पण हा दादाच आला कीं इकडे. त्यालाच

विचारूं ह्मणजे झालं. ( कोपनशील येतो त्यास. ) काय दादा, गेले का एकदां ललितराज? काय अशी बातमी तरी काय आणली आहे त्यांनीं ?

**को०**–( गिरिजा कोपनशीलास नमस्कार करिते, त्याकडे न पाहतां आपल्याशींच. ) ह्या गोष्टीला एवढा का यांचा रुकार मिळाला कीं मग पारावार नाहीं आपल्या सुखाला! मग माझ्यासारखा भाग्यवान् मीच!

**प०**–कां, माझ्या प्रश्नाचं उत्तर कां नाहीं देत?

**को०**–( ऐकिल्यासारखें करून. ) काय? त्यांनीं काय बातमी आणली आहे ह्मणून विचारतोस? बस्स! या पुढं सगळा आनंद, शिफारशी, मान, पदव्या आणि बढत्या! मात्र हें पहा ताई, तुला दरबारांत जावं लागेल.

**गि०**–( स्वगत. ) ह्मणजे! काय ऐकतें आहे तरी काय मी हें! ज्या दत्ताला भिऊन मी इथं आलें तेंच दत्त तर माझ्यापुढं नाहीं इथं उभं?

**आनं०**–काय? मला दरबारांत जावं लागेल ह्मणतोस?

**को०**–हो. अथवा तूं नाहीं गेलीस तर खुद्द दरबार तुझ्याकडे येतील! आनंदवल्लरी, तूं खरोखर आनंदाची मूर्तिमंत वल्लरी आहेस! चित्रवीर्य महाराजांकडून आह्मांला हा पहा आतांच निरोप आला आहे कीं, आह्मीं जाऊन त्यांनां भेटावं म्हणून. तुझ्या जन्मस्थानींच मोठे उच्च ग्रह होते हें मला अजून पक्कं आठवतं आणि ते असे अनुकूल होते म्हणूनच तर आज हा सुखाचा दिवस

पाहिला! ( गिरिजेस पाहून. )पण ही कोण? गिरिजा! गिरिजाच ही! ही कां इथं? अथवा बरोबर आहे.— सरळच आहे!

आनं०-दादा, तूं हें असं म्हणतोस तरी काय?

प०—ताई, याला हें अत्यानंदामुळं झालेलं दिसतं.

आनं०—दादा, तुझी प्रकृति विकृति तर बिघडली नाहींना?

को०—( आनंदवल्लरीस. ) काय? माझी प्रकृती! छेः ती बिघडायला काय झालं! ती तर आतां उलट सुधारत जाणार! ( पद्मनाभास ) हें पहा, पद्मनाभ, ललितराज म्हणत होते कीं महाराजांचं आपल्या ताईवर अतोनात प्रेम बसलं आहे. उठतां, बसतां, फिरतां त्यांनां आपल्या ताई शिवाय दुसरं कांहीं दिसत नाही! बोलतात काय, बरळतात काय? हें पहा--त्यांच्या प्रेमाचा थोडासा मासला दाखवितों तुला. छेः पण नकोच तें. तें साधायचं नाहीं मला. ( आनंदवल्लरीस ) ताई! कल्पना करितां येत नाहीं, महाराजांचं तुझ्यावर कितीतरी प्रेम जडलं आहे म्हणून सांगूं! ( गिरिजेस पाहून एकीकडे ) आणि मला वाटतं ही गिरिजा ज्या अर्थीं याच वेळीं इथं आली आहे त्या अर्थीं हिची योजनाहि या संबंधानंच झाली असली पाहिजे!

आनं०—( साश्चर्य व चकितपणें) काय? माझ्यावर— आणि महाराजांचें प्रेम!

**कोप०**–हो, हो, महाराजांचं प्रेम. आणि तें अगदीं अपरंपार! मी आपला तुझी कांहींतरी थट्टा करतो आहे, असं का तूं समजलीस? छे: छे: तशांतला इथं बिलकुल प्रकार नाहीं. त्या कामावर महाराजांनीं मुद्दाम ललितराजांची योजना केली आहे. आणि ललितराज ह्मणजे कांहीं एखादा हलकट, पाजी आणि नीच मनुष्य आहे असंहि नाहीं. तर ताई, तुला आतां दरबारांत हें गेलंच पाहिजे!

**आनं०**–पण दरबारांत तें कशाला गेलं पाहिजे? काय ह्मणतोस तूं हें?

**कोप०**–कशाला? वेडी नाहीं तर! तूंच सांग बरं? कीं दरबारांत ज्या मोठमोठ्या स्त्रिया जातात त्या कशाकरितां? तिथं जाऊन यथास्थित हंसावं, खिदळावं, नाचावं, आपल्या मधुर आलापांनीं मोठमोठ्या सरदारांना नागासारखं डोलायला लावावं; आणि त्यांच्याशीं हास्यविनोद करून, त्यांना गोड गोड मिठास गोष्टी आणि विलासपर स्वप्नं सांगून, त्यांचं रंजन करावं; साधींभोळीं माणसं पाहून त्यांची हंसत हंसत टर उडवावी; मोठ मोठे जरीकांठीं शेले, दुपेटे, फेटे, पगड्या आणि चक्रीदार पागोटीं घालून जाणाऱ्यांची, याचा डोळाच तिरवा आहे, त्याच्या नाकपुड्या घोड्यासारख्या फेंदारलेल्याच दिसतात, तिसऱ्याच्या कानांत लांब लांब केंसच वाढले आहेत, कोणाच्या तोंडावर टांकीच फिरलेली आहे, कोणी लंगडतच चालतो, अशीं एकना दोन–

कोणाला कांहीं कोणाला कांहीं–अशीं नांवं ठेऊन–त्यांची टर उडवून, सगळया मंडळींत एकच हंशा पिकवून द्यावा; आणि आपल्या बुचड्यावरील फिरकीच्या फुलानं लोकांचीं मनं अगदीं भारून टाकावीं, एवढ्याच करितां! ह्या गमती, हे रंग, आणि ह्या मजा घरकोंबड्या स्त्रियांना कुठल्या मिळणार मारायला? त्यांच्या डोक्यांत ह्या गमतीची आणि रंगाची कल्पना देखील कशी ती यायची नाहीं. इथं दरबारांत ज्या खुपसुरत देवांगना आणि अप्सरा येतात त्या सर्वांना तूं लाळ घोंटायला लावशील अशी कांहीं अजब चीज आहे तुझ्याजवळ. आणि ती चीज ह्मटली ह्मणजे चित्रवीर्य महाराजांचं तुझ्यावरील अतोनात प्रेम! महाराजांनीं तुला एकदां आपली आदिस्वामिनी करून ठेविली, ह्मणजे मग दरबारांतील साऱ्या स्त्रिया तुझा हेवा, मत्सर आणि द्वेष करूं लागतील. आणि असं झालं ह्मणजे मग तुझंहि मन त्यांच्यावर पुरं लुब्ध होऊन, कांहीं वेळानं त्यांची तूं आणि तुझे ते असं होऊन जाईल: मग तुला काय कमी! ह्मणून ह्मणतो. तुला दरबारांत हें गेलंच पाहिजे.

**गि०**–तेंच, तेंच! माझ्या दादाच्या आणि याच्या–दोघांच्याहि–डोक्यांत–मला वाटतं पांचहजारीचंच वेड शिरलं आहे!

**को०**–( स्वगत ) पांचहजारीचं वेड! म्हणजे?

**आनं०**—छे: दादा! काय, तूं बोलतो आहेस तरी काय हें? इतका वेळ जें तूं बोललास त्यांतलं एक अक्षर-दिखील मला कळेनासं झालं आहे.

**को०**—( वरकांतीं हंसून ) कळलंय, तुला सगळं कळून चुकलं आहे! न कळण्यासारखं असं काय आहे त्यांत? तुझ्या मनांतला सारा हेतु मी केव्हांच ओळखून चुकलों! महाराजांचं तुझ्यावर प्रेम आहे हें ऐकून तुला फार आनंद झाला आहे. हीं गरगर फिरणारीं तुझ्या डोळ्यां-तलीं बुबुळं आणि तुझ्या गालावर मधून मधून चमकणारी ही लज्जेची छटा हींच तुझा सगळा कबुलीजबाब देत आहेत. ठीक आहे, तुझ्याच इच्छेप्रमाणें होईल. सम-जलं? पण ह्या आठ्या कां? खुद्द महाराजच हवेतरी तुला शपथ घेऊन सांगतील कीं त्यांचं तुझ्यावर प्रेम जडलं आहे म्हणून!

**आनं०**—(रागानें) माझ्यावर! आणि त्या क्षितवीर्यांचं प्रेम? म्हणजे! याचा अर्थ काय?

**को०**—हं अशी रागावूं नकोस. अगोदर दरबारांत चल. तुला आतां--दरबारांत हें गेलंच पाहिजे! आणि तिथं महाराजानांच विचार तुला काय विचारायचं तें. इथंच जर आपला संताप करून घेऊन तूं आपल्या डोक्यांत राख घालून घेऊं लागलीस तर आपल्याला अनुकूल असं वहात असणारं हें दैवाचं वारं एका क्षणांत पार उलट वाहूं लागेल. तुझ्या भावानं ह्या कोपनशीलानं, तुला त्याच्या प्रेमपाशांत—नव्हे

करपाशांत—नेऊन अडकवण्याचं वचन दिलं आहे. आणि ललितराजा बरोबर त्याला मी असा निरोप देखील सांगून पाठविला आहे कीं, माझी बहीण तुझ्या परंज्योतीला निःसंशय मिळेल! अथवा थोडक्यांत सांगायचं म्हणजे ती तुझ्यावर अनुरक्त होईल!

**गि॰**-( स्वगत ) अरे कर्मा! आतां तर कसली ती शंकाच उरली नाहीं!

**आनं॰**—काय अनुरक्त? आणि चित्रवीर्यावर! आणि ते त्याची—

**को॰**—छेः छेः भलतंच! तसं नव्हे. दरबारांत जाऊन, त्याची स्वामिनी, त्याची मालकीण होऊन, त्याच्यावर आपली हुकमत चालवायला! आणि मग आम्हांला काय—

**आनं॰**—आणि अशा रीतीनं त्या दुरात्म्याच्या त्या नराधमाच्या पेटलेल्या कामाग्नीला मी आपल्या कौमार्य-व्रताची आहुती देऊन त्याचा भंग होऊं देऊं?

**गि॰**—(एकीकडे) शाबास! आनंदवल्लरी शाबास!

**कोप॰**—असं न ह्मणतां, तूं ह्या सगळयाला कांहीं निराळंच नांव दे पाहिजेतर. पण त्यांच्या ह्मणण्याला तुला आपला रुकार हा दिलाच पाहिजे!

**आनं॰**—अगबाई! काय, ऐकतें आहे तरी काय मी हें! अथवा हें सारं स्वप्न तर नव्हे?

**को॰**—स्वप्न? वेडी नाहीं तर. अग, तूं चांगली जागी असतानां हें स्वप्न कसं असेल?

आनं०—हो मी जागीच आहे. मग हें स्वप्न कुठून असणार! अरे, नष्टा! तुझ्या सद्गुणांचा कुठं असा लोप तरी कुठं झाला? कां पद्मनाभ, तूं असा मुखस्तंभासारखा इथं स्तब्ध कां उभा? तुझ्या तोंडांतून एक अक्षाक्षर दिखील निघत नाहीं हें कसं? या कोपनशीलाला इथून—छे: पण हा कोपनशीलच नव्हे! इतका वेळ हा इतकं कांहीं बोलला आहे, आणि तेंहि पण इतकं कांहीं अभद्र कीं, त्याचा कोणी पुनरुच्चार दिखील करूं नये! यावरून हा कांहींतरी एखादं मोठं संकट ओढवून घेऊन आपल्या अब्रूला आणि लौकिकाला काळिमा लावणार, हें मला कसं चक्क दिसतं आहे!

प०—काय, तूं माझा भाऊच का?

को०—वेडगळ आणि निरर्थक प्रश्न विचारून असा अगदीं पढतमूर्ख नको बनून जाऊंस! चल ये. तूं आणि मी असे दोघेजण महाराजांच्या संधानं हिचं मन वळवून, हिला जरा थाऱ्यावर आणूं या. अरे, ह्या जगांत आपणच ह्मणजे कांहीं अगदीं पहिल्यांदांच हांजी हांजी करून, गोंडा घोळून, आपली बढती करून घेत आहों अशांतला कांहीं भाग नाहीं!

गि०—( स्वगत ) हो हो, हें मात्र अगदीं खरं!

को०—आतां लोक बोलेनात पाहिजे तें. ते झक् मारतात ह्मणावं आणि स्वस्थ बसावं. अरे आपल्यापुढं केवढं घबाड आलं आहे तें पहा अगोदर! त्यांत तूं तरुण असून तुझ्या अंगांत कर्तृत्वहि आहे. मग काय? दर-

बारावर तूं आपलं मोहिनी अस्त्र वाटेल तशा शिताफीनं टाकूं शकशील! जात्याच तुझ्या अंगांत थोडं मार्दव आहे. आणि दुसऱ्याला अगदीं हलवून सोडण्यासारखी अजब जादूहि तुझ्यांत आहे! माझ्या हातून ह्या सगळ्याला थोडाबहुत वेडाविद्राच आकार आला आहे ह्मणायचा! तर याच्यावरून तूं चांगलासा एक सफाईचा हात दे, आणि याला थोडं तरी रंगारूपाला आण. आणखी हिच्यावर आपल्या मोहिनी अस्त्राचा असा प्रयोग कर कीं हिनं तुझ्या मोहपाशांत अचूक अडकून जावं!

प०—काय? माझ्या बहिणीनं!

गि०—( एकीकडे ) शाबास, पद्मनाभ शाबास!

कों०—हो हो तिनंच! आणि ह्या कामांत ही गिरिजा तुला चांगली मदत करील!

गि०—काय मी? ह्मणजे! मला अशी कोण समजतो आहे हा?

आनं०—( पद्मनाभास ) आग लागूं दे त्याच्या तोंडाला. तूं बघूं देखील नकोस त्याच्य कडे. हा कोपनशीलच नव्हे. सत्यपाळ दिवाणजींचा कोपनशील-हा नव्हे! माझ्या खऱ्या भावासंबंघानं, एक त्या मुईणीनं—नाहीं तर त्या दाईनं--किंवा त्या दोघींपैकीं कोणी तरी एकीनं, नाहीं तर दोघींनींहि संगनमत करून खचित कांहींतरी घोंटाळा केला असला पाहिजे! त्या सटव्यांनीं कसल्या तरी एखाद्या आमिषाला लालचाऊन, आमच्या खऱ्या भावाला पळवून, त्याच्या ऐवजीं एखाद्या नीच,

हलकट कुळांतलं, पापमार्गानं झालेलं–हें कारटं–घुसडून देऊन, आमच्या आईच्या डोळयांत सर्वस्वी धूळ फेंकली हेंच खास!

गि०–(एकीकडे) हो, माझा दिखील हच तर्क वाहतो!

को०– यापेक्षां त्या कोल्हाटणी सुद्धां फार चांगले शब्द वापरतात! अथवा–तूं स्त्री आहेस हेंच विसरलं ह्मणजे झालं!

प०–अशा उद्धटपणानं तिच्यावर तूं पुन्हां तोंड टाक कीं, त्याचं प्रायश्चित (तरवार काढीत) तुला इथल्या इत्थंच मिळालं ह्मणून समज!

को०–(तरवार सरसाऊन) ओः हो! यंरे तलवार बहाद्दर! पुन्हा बोल पाहूं काय तें?

प०–हंः तुझ्या तरवारीचं मला मुळींच भय वाटत नाहीं. हें शस्त्र, माझ्या शरीरांत वाहणारं हें नवं रक्त, आणि माझा सोज्वळ निरपराधीपणा, यांवर तुझीं सगळीं आयुधं आणि शस्त्रं येऊन पडलीं, तरी यां पुढें त्यांची मात्रा बिलकुल चालणार नाहीं! ही तुझो अशी स्थिती व्हायला, तुझ्या अंगांत अशा कोणच्या आणि कुठल्या समंधानं संचार केला आहे?

को०–तर मग हिचं वन वळवायला तूं मला मदत नाहीं करीत?

प०–साफ नाहीं! उलट या उप्पर माझ्याजवळ जर तूं असली गोष्ट काढशील, तर ही तलवार तुझ्यावर बेशक चालेल! मग ही बिलकुल मागं पुढं पाहणार नाहीं!

The Manoranjan Press, Bombay.



**कोपनशील**—शाबास ! शाबास ताई ! तूं जशी सद्गुणी आणि सच्छील आहेस, तशीच सत्वशीलहि पण आहेस. पद्मनाभ, तूं आतां मला माझ्या प्राणाहूनहि प्यार वाटतोस. [पृष्ठ ७७, अंक २ रा, प्रवेश ३.]

मग तूं माझा भाऊ ऐस, नाहीं तर प्रत्यक्ष बाप ऐस!

**को०**—वा: मग तर फारच नामी गोष्ट होईल ह्मणायची! (आनंदवल्लरीस) पण ह्या संबंधानं तुझा स्वत:चा काय विचार? चल, बोल. अशी तोंड नको फिरवूंस. तो कळलाच पाहिंजे आह्मांला.

**आनं०**—पद्मनाभ, मागं नको घेऊंस आपला हात. चालीव आपलं हत्यार. असल्या पापी शब्दांचा उच्चार करणाऱ्याला हीच-हीच शिक्षा योग्य!

**को**—(तिची पाठ थोपटून) शाबास! शाबास ताई! तूं जशी सद्गुणी आणि सच्छील आहेस, तशीच सत्वशील हि पण आहेस. पद्मनाभ, तूं आतां मला माझ्या प्राणाहूनहि प्यार वाटतोस! इतका वेळपर्यंत मी तुह्मां दोघानां केवळ कसोटीला लावून पाहत होतों. आणि असं केल्याबद्दल, आतां तुह्मीं दोघांनींहि मला क्षमा केली पाहिजे.

**आनं०**—दादा, क्षमेचं एक असो. पण ही कसली भलतीच कसोटी! तरी ह्मटलं, असं कसं? दादा! आतां मात्र माझा खरा कोपनशील दादा तूं.

**प०**—पण दादा! तो ललितराज आत्तां कशाला आला होता—तें नाहीं सांगितलंत?

**को०**—त्या दुष्ट, इष्की चित्रवीर्याचं हिच्यावर प्रेम बसलं आहे ह्मणून सांगायला!

**प०**—ह्मणजे?

**को०**—ह्मणजे काय? सगळं पद्मनगर त्या दुरात्म्याला आतां पुरेनासं झालं आहे! आणि ह्मणूनच

आपल्या दुष्ट कामवासनेला हिच्या कौमार्याचा बळी घेण्याकरितां, आज रात्रीं तो आमच्या इथं—आमच्याकडून पाहुणचार करून घ्यायला म्हणून येणार आहे! ये, ये म्हणावं, चांगला करतों तुझा पाहुणचार! ( गिरिजेस पाहून ) पण ही पांढऱ्या पायांची गिरिजा कशाला आली आहे इथं? आणि तीहि आजच! ललितराजांनीं हिची कुंटिणगिरीच्या कामावर तर योजना केली नाहीं? मला वाटतं, महाराज आज इथं येणार म्हणून त्यांची ही चिन्नी पुढं आली आहे!

गि०—कोण–कोण पांढऱ्या पायांची? मी–मी का? आणि मी कुंटणगिरी करायला आलें आहे! का मेल्या लाळघोट्या, तूंच एखाद्या पांचहजारीच्या–नाहींतर दहाहजारीच्या लालचीनं भरीं भरून, त्या निसवलेल्या चित्रवीर्याच्या कामाग्नीला–आपल्या बहिणीच्या कौमार्याची आहुती द्यायला तयार झाला आहेस? खचित–खचित तूं सत्यपाळ दिवाणजींचा पोरगाच नव्हेस! आनंद-वल्लरी, हा कांहीं तुझा खराखुरा भाऊ नव्हे, हा कुणी तरी दुस्मान् गळेकापू आहे! अन् हा भाऊच असला तर तो गळेकापू भाऊ आहे! खास, हा मागल्या जल्मींचा तुझा कुणी तरी मेला दावेदार आहे! हा बोलेल एक अन् करील दुसरंच! पद्मनगरींतले सगळे सरदार सध्यां माणसांतून उठले आहेत जसे! आणि अब्रू आणि लौकिक हीं सगळीं त्यांनीं गुंडाळून ठेवलीं आहेत अगदीं! आपल्या आया बहिणी, बायका लेकी

ह्यांच्या अब्रूची ह्यांना चाड नाहीं. नाहींतर पांचदहा-हजारी करितां, वाटेल तें कमाबाचं कृत्य करायला ते कसे तयार होतील! आनंदवल्लरी, अशी वेड्यासारखी काय बघतेस? मी सांगतें यांत एक काडीभर दिखील खोटं नाहीं! अगं हा खुद्द माझा स्वतःचा अनुभव आहे!

को०–( एकीकडे साश्चर्य ) स्वतःचा अनुभव! ह्मणजे? याचा अर्थ काय?

गि०–आणि तेवढ्या करितांच तर आज मी घरांतून निघून तुजकडे आलें. पण इथं येतें तों इथंहि तोच प्रकार! आनंदवल्लरी! तूं या काळतोंडया कोपन-शीलाच्या ह्या क्षमा मागण्यावर जाऊं नकोस. हें सगळं वरकरणी आहे. ह्याचे आंतले डाव निराळे आहेत!

को०–( स्वगत. ) ह्मणजे! हें काय ह्मणते ही?

आनं०–गडे गिरिजे! काय बोलते आहेस तूं हें!

गि०–आनंदवल्लरी! तुला तुझी अब्रू बचावायची असेल तर चल, तूं माझ्याबरोबर चल. इथं एक क्षणभर दिखील राहूं नकोस.

को०–( आनंदवल्लरीस ) जा जा, गिरिजे बरोबर जा. ह्मणजे ती तुला अगदीं नेमकी चित्रवीर्य महारा-जांच्या रंगमहालांत नेऊन सोडील!

गि०–मेल्या–तुझ्या सारख्यांचे डाव मी पुरे ओळखते. समजलास? आणि एवढ्या करितांच तर मी आपल्या भावाचं घर सोडून इथं आलें!

को०—हो, एवढ्याच करितां! भावानं आणि बहिर्णीनं एकून चांगलीं कामं आरंभलीं आहेत!

गि०--आग लाव त्या भावाच्या तोंडाला! त्याचं तोंड सुद्धां मी बघूं इच्छित नाहीं!

को०—वा:! ही वर आणखी बतावणी मात्र फारच सुरेख! फारच नामी!! तुझ्या सारखी कुशल कुंटिण मिळाल्यावर आणखी काय पाहिजे?

गि०—मेल्या! मी कुंटिण का?

को०—हो. कुंटिण, कुंटिण, कुंटिणच तूं!

गि०—मेल्या, तळपट तळपट होवो तुझं! असे शब्द उच्चारतांनां तुझी जीभ कां नाहीं झडून पडत? गडे, आनंदवल्लरी! तूं मात्र आतां आपली अब्रू संभाळ. नाहींतर पोरी, भोळेपणानं फुकट फसशील!

आ०—दादा, हिला का बरं असं नाहीं नाहीं तें बोलतो आहेस तूं हें?

को०—चुप्प बैस. तुला हिचं कारस्थान कळत नाहीं! हिचा भाऊ, तो दयाळजी त्या ललितराजाच्या नाकांतला बाल आहे. आणि ललितराजानं हीं सगळी किल्ली फिरवून देऊन, हिला मुद्दामच इथं धाडली असली पाहिजे! नाहींतर आजच इथं महाराज यायचे, आणि कधीं नाहीं ती आजच ही इथं कां यावी? खास, अगदीं उघड उघड—इथं कांहीं तरी काळं बेरं आहे! खास, कुंटिणपणा—कुंटिणपणा करायलाच आली आहे ही!

**आ०**–दादा! काय, काय हे शब्द उच्चारतो आहेस तूं?

**गि०**–( चमत्कारिक हंसून ) कुंटिण–कुंटिण मी! मेल्या, या पापाचे झाडे कुठं देशील? एकून तूं आपल्या बहिणीचा गळा कापणार? काप, काप. आनंदवल्लरी! ये, ये, ये माझ्या बरोबर, नाहींतर फसशील बरं! ये, ये.

**को०**–( आनंदवल्लरीस ) खबरदार, एक पाऊल पुढं टाकशील तर! तिलाच आपलं तोंड इथून काळं करूं दे! ( गिरिजेस ) जा, जा, काळतोंडे! काळं कर आपलं इथून.

**गि०**–( त्वेषानें ) काळतोंड्या! ही बघ चाललें मी. आतां सगळा नरक लोक डोक्यावर घेऊन नाच! पण गडे, आनंदवल्लरी! माझे दोनच शब्द लक्षांत ठेव. बायकांना एक अब्रू कीं लौकीक, त्याशिवाय त्यांना दुसरं भूषण नाहीं. जाते मी. आतां उभं जग माझं आहे. एकून या जगांतले सगळेच भाऊ, असेंच मांग आणि कसाब आहेत काय? (एकदम जाते.)

**आनं०**–दादा, हिच्या संबंधानं खास तुझा कांहीं तरी गैरसमज झाला आहे!

**प०**–हो, मला सुद्धां असंच वाटतं!

**आनं०**–पद्मनाभ! जा, तूं तडक तिच्या मागोमाग जा. आणि तिला समजावून परत घेऊन ये. ती बघ, तो रस्ता दिखील ओलांडून गेली; कशी अगदीं वाऱ्यासारखी पळत सुटली आहे!

को०—( त्याला थांबवून ) थांब. ती कुठं जाते आहे तें पाहूं. माझा तर्क तर असा धांवतो कीं ती बहुशा ललितराजांच्याकडे—इथं झालेल्या सगळ्या गोष्टींची वर्दी द्यायला जाईल! हिचा उपदेश ह्मणजे, गुत्त्यांत उभं राहून ‘ दारू पिऊं नका ’ ह्मणून सांगणाऱ्या दारुड्या सारखा!

आनं०—दादा! मला तरी तुझा हा नसता संशय दिसतो आहे.

को०—काय! नसता संशय? तेंहि तुला लौकरच कळेल! चल, पद्मनाभ तूंहि ये. आताच्या आतां तिच्या मागोमाग मीच कुणाला तरी पाठवून देतों तिच्या पाळतीवर राहायला! ( त्यांच्यासह जातो. )

---

## प्रवेश ४ था.

स्थळ—कोपनशीलाचे वाड्याबाहेर.

[ प्रियाळ, आनंदघन, पिराजी, व मोहन उभे आहेत. ]

आनंद०—प्रियाळराव, मी प्रेमसागराशीं बोलत होतों इतक्यांत कोण भेटलं तुला इथं? कोण गेला तो?

प्रियाळ—ते दयाळजी.

आनं०—(साश्चर्य) कोण दयाळजी! आणि काय—ह्मणत काय होते ते? दांत कां विचकले होते त्यांनीं?

**प्रिया०**–हं: ! दुसरं काय ह्मणणार? जो तो बैठकीला आला होतां कीं काय ह्मणून विचारतो! ह्याशिवाय दुसरा प्रश्नच नाहीं कुणाचा!

**आनं०**–असं! तरीच त्यानं असे दांत विचकलेन! प्रियाळराव, मला शंका येते, इथं कांहीं तरी कपट असावं.

**प्रिया०**–कपट!

**आनं०**–हो हो, कपट! खास कपट!

**प्रि०**–आनंदघन, हा तुमचा नसता संशय आहे. अहो, थोरा मोठ्यांच्या घरींच फार घोंटाळा आणि अंधेर असतो, हेंच खरं! लोक चांगलं कुलशील पाहून शरीरसंबंध करावा ह्मणतात; पण हें ह्मणणं देखील अगदीं झूट!

**आनं०**–प्रियाळराव,—

**प्रि०**–आनंदघन! सत्यपाल दिवाणजींची मुलगी आणि कोपनशीलांची बहीण माझी बायको होणार ह्मणून आजपर्यंत मी किती आनंदांत होतो! पण ती चित्रवीर्य महाराजांची रखेली होणार, हें ऐकल्यापसून त्या माझ्या आनंदांत विष कालवल्या सारखं झालं आहे! (उसासा टाकून) अथवा झालं हें देखील एका प्रकारानं ठीकच झालं ह्मणायचं! कारण लग्न झाल्या नंतर माझ्या तोंडाला आणि कुळाला जी काळोखी लागायची ती तरी यानं चुकली!

**आनं०**–प्रियाळराव! तुमचा हा नसता संशय असला पाहिजे! नाहींतर आनंदवल्लरी संबंधानं—

**प्रिया०**—(त्यास पत्र देऊन) हें तिच्या हातचं पत्र पहा. ह्मणजे तुमची सगळी संशयनिवृत्ती होईल! (विचारांत निमग्न होतो.)

**आनं०**—(पत्र वाचून) वाचलं हें. पण हें तिच्याच हातचं आहे अशी तुमची खात्री आहे कां?

**प्रिया०**—अहो **आनंदघन**, मला झोपेंतून एकदम उठवून हें अक्षर कोणाचं ह्मणून विचारलं तरी देखील मी हें ओळखीन!

**आनं०**—पण हें तुमच्या हातीं कसं आलं? कोणी दिलं तुह्मांला हें?

**प्रिया०**—तें तुह्मांला काय करायचं आहे? पण हें एका भल्या-चांगल्या इभ्रतदार-मनुष्याकडून माझ्या हातीं आलं आहे. आणि तेंहि कांहीं आज काल मी इथं आल्यावर नव्हे. मी **मणिपुराला** असतानांच तें माझ्या हातीं आलेलं आहे!

**आनं०**—अस्सं! तर एकूण तुमची सारी भिस्त या पत्रावरच? कां या शिवाय—

**प्रिया०**—या शिवाय दुसराहि पुष्कळ पुरावा आहे. पण जाऊं दे, त्याचं काय.

**आनं०**—काय! दुसराहि पुष्कळ पुरावा आहे?

**प्रिया०**—हो हो, पुष्कळ! **मणिपुराहून** इथं येईपर्यंत—**आनंदवल्लरी** महाराजांची रखेली झाली ही गोष्ट हजार तोंडांनीं माझ्या कानावर आली! इथं आल्यावर, मी तिची मुद्दाम काढविलेली तसबीर खुद्द महाराजांच्या

रंगमहालांत फुलांच्या माळांनीं भूषित झालेली प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पाहिली! यापेक्षां आणखी दुसरा पुरावा तो कसला पाहिजे? शिवाय कोपनशीलांच्या इथं महाराज आज बैठकीला जाणार असल्याचं तर—

**आनं०**—प्रियाळराव! बैठकीला नव्हे, जाफतीला.

**प्रि०**—( तिरस्कारपणें हंसून ) हो जाफतीलाच! अगोदर जाफत, मग बैठक! आनंदवल्लरीसारखीची घरगुती बैठक होऊं लागली तर कोण जाणार नाहीं! अलबत् जावं त्यांनीं आणि रात्रीची रात्र राहवंहि पाहिजेतर तिथं! आणि तसं महाराजांचं ठरलं असल्याचीहि थोडी कुणकुण आहे!

**आनं०**—मनुष्याला एकदां संशय पिशाच्चानं पछाडलं ह्मणजे प्रत्येक गोष्ट त्याला विपरीतच दिसूं लागते!

**प्रि०**—आनंदघन, तुह्मीं ह्मणतां हें कबूल. पण मला तुह्मीं इतका का बेवकूब माणूस समजतां? याबद्दल मी आपली बालंबाल खात्री करून घेतली आणि मगच ललितराजांच्या सल्ल्याप्रमाणं ठरलेल्या मुहूर्तावर त्या मदनिकेशीं लग्न करायचं ठाम ठरविलं! असं झालं ह्मणजे सगळ्या लोकांच्या तोंडाला आपोआप गुड्या बसतील. मग चित्रवीर्याच्या उष्ट्या पत्रावळीवर हात मारणारा ह्मणून लोक माझ्याकडे बोटं दाखविणार नाहींत. तुह्मांला देखील नाहीं असंच वाटत? ललितराजांचं मत तर असंच पडलं!

**आनं०**—( साश्चर्य ) काय ललितराजांचं मत?

प्रि –हो त्यांचं–त्यांचंच. पण कांतिवर्म आणि प्रेमसागर आंत गेले होते ते कां बरं अजून परत येऊं नयेत? ( ते येताहेतसें पाहून ) आलेच कीं हे. ( त्यांस ) कसं काय? आहेत कां कोपनशील आंत?

प्रेम०–होय, तिघंहि आहेत आंत एकीकडंच. आपण आल्याची त्यांच्या मज्याकडून त्यांना वर्दी देव-विली आणि आह्मी इकडे आलों.

प्रि०–चला तर. ( सर्व जातात. )

[ कोपनशील व पद्मनाभ कांहीं बोलत आहेत इतक्यांत मंजुळा येते. ]

मं०–( आनंदवल्लरीस. ) बाईसाहेब, बाहेर मणि-पुराहून प्रियाळराव आले आहेत.

आ०–कांहीं तरीच! कांहीं तरी थट्टा करते आहेस झालं आपली!

मं०–थट्टा! थट्टा नाहीं ताईसाहेब. खरं खुरं, अगदीं माझ्या गळ्याशपथ तर!

आ०–तर मग त्यांच्याबरोबर नेहमीं त्यांच्या तैना-तींत असणारा तो मोहनहि आला असेल नाहीं? आणि ह्मणून तुझी ही कळी अशी उमललेली दिसते? ( इतक्यांत एक सेवक येतो )

मं०–हा पहा, हैबतीहि पण तीच बातमी सांगायला आला आहे.

है० सरकार, भाईर पिरयाळराव म्हाराज आल हैती.

को०अस्सं! तूं जा, आणि त्यांना इकडं घेऊन ये. ( हैबती जातो. ) त्यांची आणि त्यांच्या वचनाची मला

अगदीं विस्मृतीच पडली होती! हं ताई, तूं आतां नेहमी-प्रमाणं अगदीं हंसतमुख आणि सुप्रसन्न हो. तुझ्या आनंदित मुद्रेवर ताज्या उमललेल्या फुलांचं हास्य चमकूं दे. चंद्रकिरणानं कोणची कुमुदिनी प्रफुल्लित होणार नाहीं? तुझं मन त्यांच्यावर जडलं आहे, आणि आपला वाङ्‌निश्चयहि होऊन चुकला आहे. आतां लग्न होण्या-च्याच काय तो अवकाश! तो जसा मोठ्या कुळांतला आहे, तसाच सद्गुणीहि पण आहे. त्याच्याशीं आपला हा संबंध फार सुखावह होईल, यांत बिलकुल शंका नाहीं. हो, पण आतां महाराज यायचे आहेत नाहीं? (प्रियाळ, आनंदघन, प्रेमसागर वगैरे येतात, त्या सर्वांस उद्देशून.) ओ हो हो हो, या, या! आपण आलांत, आनंद झाला! कसं काय ठीक आहे सगळं? (प्रियाळास) पण त्यांत आपलं मणिपुरास कसं काय चाललं आहे? (इतरांस) अगोदर ह्यांचा समाचार घेतला पाहिजे बुवा. नाहींतर रुसायचे हे आमच्यावर! कारण आतां हे आमचे मेव्हणे व्हायचे आहेत!

प्रिया०—ठीक चाललं आहे.

को०—क्षणभर वसा. मी इतक्यांत आलोंच. पद्म-नाभ आणि ताई इथं आहेतच. (पद्मनाभास व आनंद-वल्लरीस) सगळ्यांना जरा इथं बसवून घ्या, जाऊं देऊं नका कोणाला, हा मी इतक्यांत आलोंच. (हल-केंच) चित्रवीर्य महाराजांची स्वारी आज इथं येणार

आहे, हें मात्र आपल्याला विसरतां कामा नये. (उघड) हा मी आलोंच इतक्यांत. (एकदम जातो.)

**प्रिया०**- आनंदघन! पाहिलंत, आह्मीं आल्याबरोबर कोपनशीलांची कशी तारांबळ उडाली ती! माझा संशय फुकटचा नाहीं!

**आनं०**—अगबाई, मंजुळे! आज इकडची मुद्रा पुर्वीसारखी प्रसन्न का बरं दिसत नाहीं? इतकी उदास आणि खिन्न कां दिसते? काय बरं, झालं तरी काय असावं असं? इथं आल्यापासून आत्तां इतक्यांतल्या इतक्यांत किती फरक पडला पण!

**मं०**- हो दिसतं खरं तसं. मघाची मुद्रा कांहीं आतां नाहीं!

**प्रिया०**—प्रिये, आनंदवल्लरी! (आपल्याशीं.) छेः असं नाहीं उपयोगी! (उघड) अहो ताईसाहेब, आपली तब्येत कशी काय आहे? अन् हो. आतां तबियत ह्मणूनच ह्मटलं पाहिजे.

**आनं०**- माझ्या तब्येतीला काय झालंय? इकडच्या तब्येतीला मात्र कांहीं तरी कमजास्त झाल्याचं दिसतं आहे.

**प्रिया०**—आमची तबियत कसली? आमची प्रकृती! तिला कमजास्त काय होणार? आणि झालंच कांहीं तर त्याची काळजी दुसऱ्यांना काय ह्मणून? मणिपुरास असतानांच ती थोडी बिघडली होती. इथं आल्यावर जरा जास्त झाली. आतां यापुढं ती कोणच्या थरावर जाईल तें माझं मलाच समजत नाहीं!

**आनं०**–देवी अंबाबाई! हें काय मध्येंच विघ्न!

**प्रिया०**–हं, तूं अशी कष्टी होऊं नकोस, यापुढं तुला बिलकुल कष्टी व्हावं लागणार नाहीं!

**पद्म०**–पण आपल्याला काय–होतं तरी काय असं?

**प्रिया०**–काय होतं! काय होतं आणि काय नाहीं तें काय सांगूं ह्मणा? तें तुह्मीं विचारूं नये आणि आह्मीं सांगू नये. पण अलीकडे माझ्या संबंधानं तरी सगळंच मन्वंतर थोडंसं फिरलंय खरं!

**प०**–ह्मणजे! याचा काय अर्थ?

**मं०**–(स्वगत)खचित. यांच्यांत विलक्षण पालट दिसतो आहे. अथवा असंच. **मो**हनला गांठावं आणि त्यालाच सगळं विचारून घ्यावं. (जाते व **मो**हनाशीं दरवाज्या-जवळ बोलत उभी राहते) [**प्रि**याळ **आ**नंदघनाशीं व **आ**नंदवल्लरी **प**द्मनाभाशीं कुजबुजतात.]

**पिराजी**–(त्यांस बोलतांना पाहून) हा **मो**हन इक्त्यामंदीं आपल्या पांकरासंगं कुजबुज कराया लागला!पन् ह्मंगावं ल्येका, तुला मी पचूं न्हैं द्येत तिला! तूं काय समजला हैस?

**प०**–(आपल्याशीं) स्वतंत्र सुभा सुटून यांनां इथं परत यावं लागलं ह्मणून तर ह्यांचे हे असे उद्गार नसतील? निराशा आणि उत्साहभंग कोणाला उद्विग्नता आणणार नाहीं?

**प्रिया०**–(**आ**नंदघनास) मला असं वाटुं लागलं आहे कीं **को**पनशील इतक्यांत परत येते तरी बरं होतं.

आपलंच चुकलं. आपण इथं आल्याबरोबर, आणि ते इथून जाण्याच्या पूर्वी–हें काम उरकून घ्यायला पाहिजे होतं. ह्मणजे आपल्याला मग हें असं खोळंबावं लागलं नसतं. एक दोन शब्दांत सगळं काम झटपट उरकून जातं.

आ०–पद्मनाभ, आज इकडून येणारे हे शब्द कांहीं निराळ्याच प्रकारचे दिसताहेत, माझ्याकडे आज कांहीं पहिल्यासारखं आनंदित मुद्रेनं नाहीं पाहणं होत. याचं काय बरं कारण असावं?

प०–मला देखील हें मोठं कोडंच पडलं आहे!

मित्र०–पद्मनाभ, आह्मीं जर असेंच कोपनशीलाची वाट पाहत बसलों, तर आह्मांला इथं बराच वेळ बसावं लागेल. मी या सगळ्यांना बरोबर घेऊन जो इथं आलों आहे, तो तुमची तिघांची गांठ घेऊन, तुमचा निरोप घ्यावा ह्मणून! कोपनशील तर आह्मीं येतों न येतों तोंच निघून गेले. ठीक आहे, कांहीं हरकत नाहीं ते गेले तर. तुह्मींहि आज जरा आपल्या धांदलींतच दिसता. तेंव्हा मी सुपारी देतों ही घ्या (सुपारी देतो) आणि कोपनशील आले ह्मणजे त्यांच्याजवळ ही एवढी पोंचती करा, विसरूं नका! आज महाराज यायचे आहेत नाहीं का इथं पानसुपारीला? बैठकीचा बेत आहे वाटतं आज घरच्या घरींच! पण तो इतका चोरून का? बरं आहे, आह्मीं येतों आतां; कोपनशील आल्यावर त्यांना तेवढी सुपारी द्यायला मात्र विसरूं नका.

प०–ह्मणजे! सुपारी कसली ही? आणि या बोलण्याचा अर्थ तरी काय?

प्रि०–ती कोपनशीलाकडे द्या, ह्मणजे त्यानां ह्याचा अर्थ कळल!

प०–( आपल्याशीं. ) महाराजांना ठार करण्याचा आमचा बेत तर यांना कळला नसेल? ( उघड ) ह्मणजे! काय ह्मणतां काय तुह्मीं?

प्रिया०–काय, ह्मणायचं काय? महाराजांना चोरून आणून घरच्या घरीं बैठकी होऊं लागल्या, त्या अर्थी तुमच्याशीं आह्मांला यापुढं कोणत्याहि प्रकारें संबंध ठेवतां येत नाहीं.

प०- ह्मणजे?

प्रिया०–ह्मणजे काय? याला थोडक्यांत उत्तर द्यांयचं ह्मणजे–यापुढं मला आपल्याशीं शरीरसंबंध कर्तव्य नाहीं, हेंच!

आनं०–( दुःखावेगानें ) अग बाई! काय ऐकतें आहे मी हें? देवा, अशी कशी कपाळ करंटी मी? ( कपाळावर हात मारून घेते. )

प्रिया०–कपाळ करंटी! छेः छेः अगदींच उलट. मोठ्या नशीबाची आणि भाग्याची तूं!

प०–अहो, पण ही सुपारी कसली?

प्रिया०-कसली? कसली ह्मणजे लग्न मोडल्याची! नीट पारखून घ्या ती आपली. नीट बजावून देतों आहे मी. लग्नाचा वाङ्निश्चय झाला तेंव्हां ही मला

दिली होती. तें मोडल्यामुळं मी ही आतां परत केली आहे! बस्स, यापुढं तुमचा आमचा कांहीं संबंध नाहीं!

प०—(आपल्याशीं) यांचा वेडा वांकडा गैरसमज तर नाहीं केला कुणी?

आनं०—(दुःखावेगानें) तीच—तीच सुपारी ही! मी हें सार स्वप्नांत बघतें आहें, कीं हें सारं खरंच घडत आहे! माझं मलाच कांहीं कळेनासं झालं आहे.

प्रिया०—छेः हें स्वप्न वगैरे कांहीं नव्हे, उगीच भ्रांतींत पडूं नकोस! तूं चांगली जागी आहेस. आणि हें स्वप्न आहे अशी अजून देखील जर तुला शंका असेल तर हे पहा—सुपारी परत देऊन लग्न मोडल्याचं सांगायला—मी हे साक्षीदार आपल्या बरोबर घेऊन आलों आहें. यांना विचारून घे तुला काय पाहिजे तें. हे तुझी सारी खात्री करितील आणि भ्रांती फेडतील! हें असं करण्याचं आमचं केव्हांच ठरून चुकलं आहे. (ती रडूं लागते) हें पहा, तूं आतां अशी रडूं नकोस. असं खोटं नाटं रडून जर तूं उगीच गोंधळ घालूं लागशील, तर हा पहा मी चाललोंच! (स्नेह्यांस) चला बुवा. (तिला) आतां महाराजांचा चांगला परामर्श घ्या! (मित्रांस) चला, आतां इथं बसण्यांत अर्थ नाहीं. (मित्रांसह जाऊं लागतो.) [मंजुळा खिन्न मुख होऊन आनंदवल्लरीकडे येते.]

आनं०—शपथ-शपथ आहे माझ्या गळ्याची! असं एकदम जाऊं नये. माझे एक दोन शब्द तरी ऐकून घ्यायचे.

**प्रिया०**–(जाताजातां) ते आतां वसंत रागांतून महाराजांनां ऐकीव! शपथ! गळ्याची शपथ!! महाराजांच्या रखेलीच्या गळ्याची शपथ!!! [जातो.]

**आनं०**–हाय, हाय! अखेर जायचंच झालं! पण जातां जातां हे असे काय बाई उद्गार काढायचे! खचित, तिकडचा कांहीं तरी गैरसमज झाला आहे!

**प०**–यांच्या या वर्तनानं माझी अक्कल देखील कशी अगदीं गुंग होऊन गेली आहे! ताई, मला देखील तुझ्या सारखंच वाटतं. कोणी तरी यांचे कान भरले आहेत खास!

**आनं०**–**पद्मनाभ**! मी शपथ घातली. पण तीहि मोडून जायचं! आणि उलट काय अभद्र बोलायचं पण! मंजुळे! मंजुळे! माझं डोकं कसं भिरभिरल्या सारखं होतंय बघ हें!

**प०**–(एकीकडे) **आनंदवल्लरीचं** आणि **प्रियाळ**रावांचं लग्न होणार ही गोष्ट आज सगळ्या **पद्मनगराला** ठाऊक झाली असून, लग्नाची तिथी देखील ठरून चुकली. असं असून हे जर आयत्या वेळेला असं करूं लागले तर लोक काय ह्मणतील? अशानं लोकांच्या नसत्या संशयाला मात्र व्यर्थ जागा होणार! काय ह्मणावं ह्या प्रकाराला आणि ह्यांच्या ह्या वर्तनाला!

**आनं०**–**पद्मनाभ**, या **आनंदवल्लरीवर**–या तुझ्या बहिणीवर–जर तुझं यत्किंचित् प्रेम असेल तर इथं जो प्रकार घडला त्यांतली एक दिखील गोष्ट दादाच्या

कानावर जाणार नाहीं एवढी खबरदारी ठेव. हें दादाला कळलं तर त्यापासून फार भयंकर प्रसंग ओढवेल! इतका वेळ दादानं जशी माझी परीक्षा पाहिली, तशीच तिकडूनहि पहाणं होत नसेल ह्मणून तरी कशावरून?

प०—काय परीक्षा! छत् परीक्षा कसली ही? कोणी तरी दुष्टानं त्यांचे कानच भरले असले पाहिजेत! त्यासिवाय त्यांच्याकडून अशा शब्दांचा उच्चार कसा करवेल?

आनं०—( रडत ) तें कांहीं असो. पण दादा आला ह्मणजे त्याच्याजवळ मात्र या संबंधानं तूं आपल्या तोंडांतून एक अवाक्षर दिखील काढूं नकोस.

प०-ताई! मी कांहीं तुझ्या आज्ञेच्या बाहेर नाहीं. पण हं—आटप, आटप झटदिशीं! पूस, आपले डोळे पूस. हा पहा दादाच आला परत. ( कोपनशील येतो )

को०—हें काय? रडते आहेस कां तूं? प्रियाळराव आणि त्यांचे स्नेही कुठं आहेत?

प०—तुमच्या मागोमागच गेले ते निघून.

को०—माझ्या मागोमागच गेले? आणि त्यांना मी बसा ह्मणून सांगून गेलों असतां! आणि तुह्मीं कसं त्यांना जाऊ दिलंत?

आनं०-ते आत्तां जाऊन येतों ह्मणून सांगून गेले; इतक्यांत येतील. ( हुंदके व रडें )

को०—मग हे असे हुंदके आणि हें रडं का? खरं खरं सांग, कांहीं भलता सलता प्रकार तर नाहीं झाला?

**आनं०**—छे: भलता प्रकार कसला! पण दादा! ( हुंदके व रडें आवरण्याचा प्रयत्न करिते पण व्यर्थ होऊन ) आतां या पुढं जन्मवेरी मी अशी कुमारिकाच राहणार, हा मात्र माझा पुरा निश्चय झाला!

**को०**—ह्मणजे! याचा अर्थ काय? पद्मनाभ, काय ह्मणते आहे ही?

**आनं०**—पद्मनाभ! ( रडत असतानांच त्यास 'सांगूं नको' ह्मणून खूण करिते )

**को०**—बोल, बोल पद्मनाभ, काय असेल तें स्पष्ट बोल. माझ्यापासून कां चोरून ठेवतोस? अशानं मला मात्र तुह्मीं उगीच संशयांत पाडता!

**प०**—( आनंदवल्लरीकडे पाहून ) काय सांगूं दादा!

**आनं०**—पद्मनाभ! सांग सांग. आतां चोरून ठेऊन काय होतं? या माझ्या डोळ्यांनीं त्याला तें केंव्हांच सांगूनहि टाकलं असेल! आणि मग आपण चोरून ठेवून काय होणार? तूं कशाला, मीच सांगतें! दादा, तूं इथून गेलास मात्र, अन् बाई तिकडची वृत्ती एकदम कशी अगदीं पार बदलून गेली! चेहऱ्यांत किती विलक्षण अंतर पडलं! रहा रहा ह्मणुन कित्ती तऱ्हेनं मी आग्रह केला, शपथ दिखील घातली, पण ज्याचं नांव तें! बरोबरीच्या मंडळीसह एकदम निघून जायचं!

**प०**—आणिं त्यांच्यांत हा फरक इतका कांहीं जलद आणि विलक्षण रीतीनं झाला कीं ज्याचं नांव तें!

**को०**—शाबास, शाबास ह्मणावं (प्रियाळास उद्देशून) भल्या माणसा!—पण जाऊंदे, आतां नको हें! ताई, तूं हें आपलं रडं आवर अगोदर. ही अशी स्थिती फार वेळ राहील, असं नाहीं वाटत मला. पण तूं हें सारं दुःख अगोदर गिळून टाक पाहूं कसं. जिकड तिकड महाराज येणार ह्मणून सगळ्यांना अगदीं ताकीद देऊन ठेविली आहे. (एक दूत येतो)

**दे०**—सरकार, महाराजांची स्वारी येऊन थडकली आहे.

**को०**—(चुटकी वाजवून) हं चला, निघा तुह्मी इथून! ताई, तुला आतां आपली ही सारी वृत्ती पार बदलून एकदम आनंदी वृत्ती धरली पाहिजे! आणि खुद्द तुझ्याकडून महाराजांचा योग्य पाहुणचार झाला पाहिजे! (विचार करून) अथवा मी हाक मारी-पर्यंत तूं त्यांच्या दृष्टीसच पडूं नकोस. समजलीस? जा तर तूं आंत. पद्मनाभ, चल तूं ये मजबरोबर. (जातात.)

**आनं०**—मंजुळे! चल गडे. मला कांहीं हें सुधं दिसत नाहीं. पण कायग तो मोहन काय ह्मणत होता?

**मं०**—चला ताईसाहेब. आंतच जाऊं. तिथंच सांगते मी तुह्मांला सगळं. (जातात.)

[ अंक २ रा समाप्त. ]

---

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ:—दयाळजीचे** घरांतील एक खोली.

[ दयाळजी खोलींत व राणूजी खोलीचे बाहेर बाहेरचे बाजूनें कडीलाऊन दरवाजाशीं उभा आहे. ]

**दयाळजी**—राणूजी ! राणूजी ! अरे राणू ! राण्या ! राण्या ! काय रे, अजून कडीलाऊन झाली कीं नाहीं तुझी ?

**राणूजी**॰—कवाच लावलीया ती धनीसाव !

**द॰**—तर मग इकडं ये कीं !

**रा॰**—हकडं ये कीं ! तकड कसा यऊ धनीसाव, कडी हायना ? ह्ये भिताड अन् कवाड पाडूनशनी यऊ व्हय ?

**द॰**—(साश्चर्य) ह्मणजे ! राण्या, तूं काय बाहेरून कडी लाऊन घेतलीस कीं काय ? वा: रे वा: मूर्खा ! अरे, आंत ये, आणि आंतून कडी लाऊन घे नीट. ( एकीकडे ) काय विचित्र प्राणी आहे हा !

**रा॰**—( आंत येऊन कडी लाऊन ) मग असं अदुगरच धनीसाव सांगत्याती तर !

**द॰**—राण्या ! एक काम सांगून ध्यायला किती तोंड बाजवितोस तूं ?

रा०–त्वोंड वाजवतो! त्वांड वाजवाया माज्या तोंडा मदी पिपानी है, का कर्नो है, का मोरशिंग है, का है तरी काय?

द०–तोंड वाजवायला तोंडांत पिपाणी, कर्णा, आणि मोरशिंग असावं लागतं का राण्या? राण्या, तूं मोठा बहुभाषी आहेस.

रा०–धन्या सारक्या मोट मोठ्या सरदाराजवळ ऱ्हाइ- ल्यानं, ह्या रान्याला मायंदाळ भाशा येत्याती धनीसाब! माज्या जल्माच्या चौकटीमंदी बिरसपती व्हता म्हून माजा बा सांगत व्हता धनीसाब!

द०–अस्सं! एकून तुझ्या जन्मस्थानीं बृहस्पती–गुरू होता तर?

रा०–व्हय धनीसाब.

द०–( हंसून ) मग तुला कोण कोणत्या भाषा येतात!

रा०–मराटी, गुजराती, मारवाडी, बंगाली, हिंदु- स्तानी,–( एकदम हिंदुस्थानींत बोलतो ) मै आपका बंदा नोकर हूं! स्वामीजीकी आज्ञा मेरेकू सर प्रमान हैं!—( ऐटीनें डोकें नम्र करून उजव्या हातानें प्रणाम करितो. )

द०–( हंसून ) वाः रे वाः! हा तुझ्या हिंदुस्थानी भाषेचा मासला वाटतं! वाः वाः वाः!

रा०–जी धनीसाब.

द०–तर मग तूं भाट होण्याच्याहि लायखीचा आहेस!

रा०—काई बी ह्मनावं धनीसायबानीं.

द०—पण कायरे, आमच्या सारखं शुद्ध मराठींत देखील येईल तुला बोलायला?

रा०—त्ये तर हातच्या मळावानी धनीसाब!

द०—अस्सं! तर हें पहा राणूजी, तुला एका गुप्त गोष्टी संबंधानं मला कांहीं विचारायचं आहे. (घाबरून) पण कायरे, कोणी आल्याची तुला चाहूल नाहीं. ऐकूं आली?

रा०—छत् मुळीच न्हे धनीसाब! ह्येच गुपित का काय धनीसाब?

द०—अरे, हें गुपित कसं असेल? हें पहा,—माझ्या संबंधानं पद्मनगरामध्यें लोक काय ह्मणतात रे?

रा०—ह्ये मी कसं सांगावं धनीसाब?

द०—हेंच तें. मी होऊन विचारल्यावर तें सांगायला काय हरकत आहे? शिवाय प्रत्येक सरदारानं,—लोक आपल्या संबंधानं काय ह्मणतात तें समजून घेऊन, त्या प्रमाणं वागलं पाहिजे. ह्मणून ह्मणतो तुझ्या जें कांहीं कानावर आलं असेल तें माझ्याकडे तूं अगदीं मोकळ्या मनानं सांग. माझ्यापासून तें चोरून ठेवण्याचं कारण नाहीं. भिऊं नकोस. तुला कोणाच्या बापालाहि भिण्याचं कारण नाहीं!

रा०—पण धनीसायबास्नी—

द०—मला भिण्याचं? तें तर मुळींच नाहीं.

रा०—तसं न्हव धनीसाब. मी ह्ये माज्या तोंडून सांगनं ह्मंजे धन्याचा द्रोव-द्रोव व्हईल धनीसाब!

द०-( घाबरून ) ह्मणजे ! तुझ्यासुद्धां कानावर मला कोणी राजद्रोही ह्मटल्याचं आलं कीं काय ?

रा०—कुनाच्या ? माज्या ! न्है धनीसाब. ( कानावर हात ठेवतो ).

द०—हं आतां असं कानावर हात ठेऊन चालायचं नाहीं. राणूजी बुवा ! तुमच्या जें कांहीं कानावर आलं असेल तें अगदीं स्पष्ट सांगा. तेवढ्या करितां तर तुह्मांला आंतून कडी लाऊन घ्यायला सांगितली.

रा०—ह्येच गुपित का काय तर धनीसाब ? (हळूच ) अन् ह्मनून मला रान्याचा रानूजी बुवा क्येलं !

द०—हो, हो. हेंच गुपित. मी कोणाच्या बापालाहि भीत नाहीं ह्मणा! पण दिवस मोठे वाईट आले आहेत. कोणच्या वेळीं कसा प्रसंग येईल याचा कांहीं नियम नाहीं. ह्मणून ह्मणतो आपलं हत्यार आपल्या जवळ तयार असलं पाहिजे. काय ह्मणतो मी राणूजी बुवा ?

रा०-( दचकून ) व्हय, असलं पायजे धनीसाब. मग आनू का जाऊनशानी आपलं हत्यार ? तरवार अन् बंदूक दोनीबी ?

द०—( हंसून ) अरे हीं हत्यारं काय कामाची ह्याला ?

रा०—तर धनीसाब ?

द०—अरे, हें पहा—मला एक दगलबाज, राजद्रोही, मनुष्य समजून पकडलं—

रा०—छत् ! असं कसं व्हईल सरकार ? ( गालांवर

हात मारून घेऊन ) रामा, शिवा, गोविंदा! अशी वंगाळ ग्वाष्ट काय काडता धनीसाब!

द०—अरे, तसं नव्हेरे. असं समजून मला पकडलं, तर त्यांच्या वांकड्या तिकड्या जावानां मला उत्तरं देतां यावींत, एवढ्या करितां—

रा०—असा वंगाळ—लई वंगाळ वखत—यऊ देच नग रे माज्या जेजूरीच्या खंडबा!

द०—लेका, तुझ्या खंडोबाला राजद्रोही मनुष्याचं संरक्षण करण्याशिवाय दुसरीं कांहीं कामंच नाहींत वाटतं? अरे, पुढें मागं जर असा प्रसंग आला तर आपली तयारी असावी ह्मणून मुद्दाम आज तुला इथं बोलिवलं आहे.

रा०—पन् असा परसंग-काय आलाया काय धन्या-वरता? अन् तो येन्याचं कारन तरी काय?

द०—हं असं विचार कांहीं. अरे, महाराजांचा खून करण्यासंबंधानं—

रा० ( साश्चर्य ) काय? ह्माराजांचा खून!

द०—हो महाराजांचा खून. राण्या! मी सांगतो तें सगळं अगोदर ऐकून घे. मध्यें एक अक्षर देखील बोलूं नकोस. समजलं? ऐक, नीट ऐकः—महाराजांचा खून करण्यासंधधानं एका मोठ्या वजनदार मनुष्यानं कांहीं कारस्थान रचलं होतं. आणि त्या वजनदार मनुष्याच्या स्नेहितां पैकीं आणि इमानदार सरदारांपैकीं मीहि एक असल्यामुळें, त्या कटांत साहजिकपणेंच मींहि ओढला गेलों.आतां ही गोष्ट अगदीं उघड उघड दिसणारी

असल्यामुळें मला ती नाकरितां येणंहि शक्य नाहीं. आणि ह्मणून मलाच पहिल्यानं ती आपण होऊन सांगून ठेवणं भाग आहे.

रा०—पन्—

द०—हं चप्प! मध्यें एक अक्षरहि बोलूं नकोस.—आतां हें जरी माझ्या खुषी विरुद्ध होतं—तरी ज्या अर्थीं सध्यां त्या कटांत माझं अंग आहे, त्या अर्थीं तें माझ्या खुषी विरुद्ध असलं काय अथवा खुषीनं असलं काय दोहींचीहि किंमत वस्तुतः एकच. कारण अशा धामधुमीच्या वेळीं खुषी नाखुषीची कोण विचारपूस करितो? ह्मणून ह्मणतों राणूजी बुवा! माझ्यावर येऊं नये असा प्रसंग येऊन, मला दरबारांत न्यायासना समोर जाऊन उभं राहण्याचा प्रसंग आला तर तिथं माझ्या हातून कितपत टिकाव धरवेल तें मला अजमासून ठेवायचं आहे. तेवढ्याच करितां आज तुह्मांला मुद्दाम इथं बोलिवलं.

रा०—मग ह्येच्यामंदीं मी काय करनार धनीसाब?

द०—( वेडावून ) मी काय करनार धनीसाब! असं वेड्यासारखं ह्मणूं नकोस. तुझ्या जन्मस्थानीं गुरु आहे ना? मग तुला काय अशक्य आहे? भिऊं नकोस. मी सांगतो अशी कल्पना कर;—हीं उच्चासनं, हे मंच; आणि हीं सुखासनं, हेच मोठ मोठे न्यायाधीश आहेत! ( राणू हंसतो त्यास ) हं असा हंसू नकोस. आणि ह्या न्यायमूर्ती समोर मला पकडून आणून उभं केलं आहे.

आणि माझ्या राजद्रोहाबद्दल मला सुळीं द्यावं असं घाटत आहे. महाराजांच्या आणि राज्याच्या तर्फे माझ्यावर राजद्रोहाचा आरोप करण्याची कामगिरी तुझ्यावर सोंपविली आहे. मग बोल, तूं मला कसकसे प्रश्न विचारशील?

रा०—धनीसाब! माज्या सारक्या धड ना लंगटी ना कांबरून अशा मुरदाड मानसानं धनीसायबासारक्या मोठ्या सरदारावरत अन् असं बेगुमान तुफान! अन् त्ये कशापाई सरकार?

द०—कशापाई? अरे ही सारी कल्पना करायचीं ह्मणून सांगितलं ना तुला राण्या?

रा०—कलपना! व्हय, व्हय, कलपना! इचीभन त्येचा मला अगदीच इसर पडला व्हता धनीसाब! हो, पन् धनीसाब काय झंगालं? धनीसायबास्नी न्यावाच्या दरबारामंदी धरूनशनी आनून उबं केलया म्हून् न्हवका? पन् धनीसायबास्नी दरबारामंदी आनूनशनी असं किती वाटकूळ उबं करनार? मंगळाईच्या पूजाऱ्यावानी धनीसायबानीं बेगुमान मांडीवरत मांडी चडवूनशनी बसावं. मंग काय करतुया दरबार अन् फिरबार?

द०—अरे, काय फत्तर आहेस रे तूं! राण्या! मी सांगतो अशी जर तूं कल्पना केली नाहींस तर तुझी पाठ लाल होऊन मग तुला जल्पना करावी लागेल! राणूजी बुवा! मी सांगतो त्या प्रमाणं तुह्मीं नुसती

कल्पना करा, ह्मणजे तुह्मांस कसे प्रश्न विचारायचे काय विचारायचे तें आपोंआप सुचेल. तुमच्या जन्मस्थानीं गुरू आहे. ह्मणून ह्मणतों–तुह्मीं आपल्या ह्या चलाख मगजांतून जी असेल नसेल ती सगळी अक्कल अगदीं खरवडून काढा. जशी कांहीं तुह्मांला आपोआपच स्फूर्ती होते आहे. आणि या आमच्यावर दणकून दोषारोप स्थापित करून. हे पहा मी दयाळजी सरदारानां न्यायासना समोर पुकारतो. (एकदम लांब जाऊन पुकारतो) दयाळजीऽऽ! दयाळजी हजर हैऽऽऽ? दयाळजी!! (नम्रपणें हात जोडून राणूजींचे पुढें येऊन) हा इथं हजर आहे दयाळजी! हं चलाव, चलाव! अबी देर नही चलेगा! राण्या, पण थांब. आपण एकमेकांचे पोषाखच बदलून टाकूं. ह्मणजे तुझ्या मेंदूला मग फारशी कल्पना करण्याचं कारणच पडणार नाहीं. (पोषाख बदलतात.)

रा०–(हंसून) ह्ये काय धनीसाब! धन्याचं वाटकूळ तुकड मोडीत बसनाऱ्या राऱ्याला ह्ये सोबनार बी न्है धनीसाब!

द०–(वेडावून) 'सोबनार बी न्है धनीसाब'! राण्या! या पुढं मी तुझा चाकर नाहीं अन्–

रा०–आपून चाकूर! छे: छे: छे: छे:! असं कसं व्हईल धनीसाब? ह्यो चाकूर है धनीसायबांचा.

द०–तसं नव्हेरे, हें बघ–यापुढं तूं माझा चाकर नव्हेस आणि मी तुझा धनी नव्हे.

रा०—मग झोरला समदाच कारबार आटपलाच ह्मनायचा की धनीसाब!

द०—तसं नव्हे रे. अशी तूं नुसती कल्पना करायची. आणि या पुढं मला 'धनीसाब,' 'सरकार' असं ह्मणायचं सोडून दे. समजलं? अरे हें सगळं माझ्या बचावा करितां आणि हिता करितां आहे, असं नव्हे का? बोल, तुझ्या धन्यावर तुझं प्रेम आहे कीं नाहीं?

रा०—ह्ये काय सांगाया व्होतं का काय धनीसाब?

द०—तर मग कर सुरुवात आतां राण्या. हं. मी तुझा धनी आहे हें आतां मनांत सुद्धां आणूं नकोस. आणि एकदम माझ्यावर दणकून दोषारोप कर. हं चालूं दे.

रा०—करूच तर धनीसाब? पन् धनीसाब—

द०—(वेडावून) पन् धनीसाब! धनीसाब बिनीसाब ह्मणण्याचं कारण नाहीं आतां मूर्खा!

रा०—वर पन् धनीसाब, आपून या न्यावाधिशांच्या झोरं, अन् भर दरबारामंदी, मूर्का म्हनूनशनी ह्या रानूजीरावांचा पानउतारा कशापाई करता अदूगर?

द०—हं, असा कांहीं ताळ्यावर ये, अन् तुला बोलायचं तें एखाद्या वकीलासारखं चांगलं शुद्ध बोल.

रा०—सुद्द बोलूं? ठीक हाये धनीसाब!

द०—आतां धनीसाब ह्मणायचं अज्जीबात विसरून जा. आतां तूं राणूजीराव वकील अन् मी दयाळजी!

रा०—कसं कसं ह्मंगालात धनीसाब? रानूजी अन्

दयाळजी! दयाळजी अन् रानूजी!! अश्शी खाशी जोडी! तुमी रानूजीराव वकील अन् मी दयाळजी!

द०—मूर्खा! तसं नव्हे. तूं राणूजीराव वकील, आणि मी दयाळजी. हं, आतां उशीर नको; दणकाव.

रा०-मी रानूजीराव वकील! (स्वगत) मी शुद्ध भाषा बोलूं लागलों ह्मणजे हा एकदम चकित होऊन जाईल. होऊं दे. (उघड मोठ्यानें) दयाळजी! तुझंच नांव का दयाळजी?

द०-हो मीच तो, मलाच दयाळजी ह्मणतात.

रा०-तूंच दयाळजी? तूंच दयाळजी कशावरून? तुला दयाळजी ह्मणायला तुझ्याजवळ काय पुरावा आहे?

द०—न्यायमूर्तीपुढं मी हें शपथेवर सांगायला तयार आहे.

रा०—ठीक आहे. तूं जर दयाळजी आहेस तर तुझा राणोजी नांवाचा तो गडी कुठं आहे? (थांबून) हं असं गोंधळूं नकोस. मोठ्यांची ओळख पटवायला प्यादा फर्जीचीच जामिनकी लागते! त्याशिवाय त्यानां कोण विचारतो?

द०-अस्सं! तर आमचा राणूजी गडी सध्यां गुंतला आहे एका मोठ्या वकीलातीवर. हं चालूं दे, पुढें चालूं दे.

रा०-वकीलातीवर गुंतला आहे! ठीक आहे.— आतां पुढें चालू—तूं जर दयाळजी आहेस तर आज दरबारांतून तुझ्यावर राजद्रोहाचा एक मोठा आरोप केला जात आहे. त्यांतून तूं आपला बचाव कसा करणार?

काय आहे तुझ्या जवळ पुरावा? चल, बोल. तूं अपराधी आहेस, का निरपराधी आहेस? अपराधी असल्यास तर आपला उजवा हात वर कर!

द०—होय सरकार. ( दोन्ही हात वर करितो. )

रा०-होय सरकार नाहीं आणि नाहीं सरकार नाहीं. हे असे दोन्ही हात एकदम वर करून चालायचं नाहीं. ही अशी लटपट नाहीं चालायची आतां इथं. बोल, तूं अपराधी आहेस कीं नाहींस?

द०—अपराधी?

रा०—हें पहा, न्यायमूर्ती हो! हें पहाः—अपराधी असल्याचं हा आपल्या तोंडानं कबूल करीत आहे.

द०—मी नाहीं सरकार,

रा०—'मी नाहीं सरकार'! तूं तर माझ्या पुढं प्रत्यक्ष उभा आहेस. आणि 'मी नाहीं सरकार' ह्मणून खोटं कसं सांगतोस?

द०—तसं नव्हे सरकार, मी अपराधी नाहीं सरकार.

रा०हं, प्रत्येकआरोपी असाच नाकबूल जात असतो. शपथेवर नाकबूल जात असतो! तेव्हां तुला हें असंच ह्मटलं पाहिजे! (बदलून) आतां धनीसाब असा तरक करा, कीं हा राण्या न्यांवाधीशावानी कायद्या कानूमंदी अक्शी तरब्येज झालाया. अन् बोलनारावी ब्रिसपतीवानी लई फर्डा झालाया. अन् फिरूनशनी धन्यावरतं दोपाचं रोप करतुया!

प०—हं राण्या! हें काय? दरबारी भाषा सोडून पुन्हा तूं आपल्या पहिल्या वळणावर आलास!



**राणूजी**—लुच्च्या ! हरामखोर ! बस्स, खबरदार मध्यें बोलशील तर ! अशानें न्यायासनाचा अपमान होतो, समजलाम ?
[ पृष्ठ१०५ अंक ३ रा, प्रवेश १ ला. ]

The Manoranjan Press, Bombay.

रा०—हं खबरदार! ह्या दरबारचा अपमान होतो आहे. आह्मीं वाटेल त्या भाषेंत बोलूं. अमुकच भाषेंत बोलायला दरबार कांहीं बांधलं गेलं नाहीं! दयाळजी—उठून उभे रहा. दरबारांत असं मध्येंच बसायचं नाहीं. हा दरबाचा अपमान होतो! हें पहा दयाळजी, मी अपराध केला नाहीं असं ह्मणून तुह्मीं जर नाकबूल होऊं पाहाल, तर तुह्मीं आपल्या कंठप्रदेशांतून अनृत भाषणास वमन करीत आहां असं आह्मांला स्पष्टपणें सूक्त करावं लागेल! आणि हें आह्मीं सिद्ध देखील करून देऊं! (उच्चासनांस उद्देशून) हे सभ्य, समंजस, चाणाक्ष, न्यायी, पवित्र, सत्यवादी, आणि निःपक्षपाती न्यायमूर्ती हो! माझ्या बोलण्याकडे आपलं नीट लक्ष असूं द्या. नीट जागे व्हा, असे निजूं नका. (उच्चासनांस हालवितो) मी आज जी वकीली पत्करली आहे ती आमच्या महाराजांच्या आणि देशाच्या वतींनं ह्या प्रख्यात लबाड, फसव्या, दुष्ट, उद्धट, हरामखोर, विश्वासघातक्या-वर राजद्रोहाचा आरोप प्रस्थापित करण्या करितां. ह्या नराधमानं इतके मोठे, इतके अघोर, आणि इतके भयंकर राजद्रोह केले आहेत, आणि ते करण्या करितां ह्याला इतकीं कांहीं अजब आणि भेसूर कारस्थानं, कट आणि गुप्त व्यूह करावे लागले आहेत, कीं ते सारे तुमच्या पुढं मांडणं केवळ अशक्य आहे! अशा तऱ्हेचीं कार-स्थानं आणि अशा तऱ्हेचे राजद्रोह कोणत्याहि काळांत घडून आल्याचं अथवा कोणत्याहि इतिहासांत वाचल्याचं

अथवा घोंकल्याचं मला तरी विस्मरत नाहीं! आपल्या पुढं हा जो आरोपी मनुष्य उभा आहे, ह्याच्या कुळासंबंधानं वगैरे इथं विचार न करावा हेंच प्रशस्त! कारण याचा बाप कोण होता याबद्दल ह्याचा ह्यालाच पत्ता नाहीं!

द०—वा: रे वा:! हा तोंडास येईल तें बडकूं लागला आहे!

रा०—(त्यास दरडावून) हं दरबारचं काम चाललं असतां मध्यें बोलायचं नाहीं. (न्यायमूर्तींस) हे न्यायमूर्ती हो! एका बड्या मनुष्याची लाळ घोंटून, त्याचा तोंडपुजेपणा करून, ह्यानं ही सध्याची सरदारी पटकाबली आहे. पांचहजारीच्या आशेनं हा चोर आपल्या सख्या बहिणीवर देखील पाणी सोडायला तयार झाला होता!

द०—अशा रीतीनं का? लुच्चा! हरामखोरा!

रा०—(एकदम दयाळजीवर उसळून जाऊन) लुच्चा! हरामखोर! बस्स, खबरदार मध्यें बोलशील तर! अशानं न्यायासनाचा अपमान होतो, समजलास? हे न्यायविशारदहो! प्रस्तुतच्या ह्याच्या ह्या उद्धट आणि गैरशिस्त वर्तनावरून हा मनुष्य किती फाजील धीट आणि साहसी आहे, हें तुमच्या केव्हांच संविधानकांत येऊन चुकलं असेल! ह्या हरामखोरानं महाराजांच्या 'हिर-

कणी ' नांवाच्या शिकारी घोडीला विषप्रयोग करण्या-करितां गुण्या मोतद्दाराला पांचशें मोहरा देऊं केल्याचा भक्कम पुरावा आहे! (कागदांचं पुडकं मेजावर ठेवून मूठ मेजावर हापटून) महाराजांच्या गीतेच्या पोथीलाहि यानं विषप्रयोग केल्याचं सर्व बाहेर आलं आहे! कारण महाराजांची पोथी ठार काळीनिळी पडली असल्याचा प्रत्यक्षच पुरावा आहे! ह्याला पकडण्यापूर्वीं सुमारें दोन तीन आठवडे, महाराजानां ठार करण्याकरितां हा खुद्द दरबारांत, राजवाड्यांत आणि विजयभुवनाच्या आस-पास आपल्या शेल्याच्या पदराखालीं जंबिया लपवून घेऊन एकसारख्या घिरट्या घालीत होता!

द०–( खालीं बसतो व स्वगत ) चालूं द्या, चालूं द्या आपलं पुराण!

रा०–द्याळजी! न्याय-दरबारांत असं बसणं हा दरबारचा अपमान आहे! ऊठ, एकदम ऊठ. उठून उभा रहा! (तो उभा राहतो.) न्यायमूर्तीहो! पाहिलंत? राजद्रोहाचा आरोप ऐकल्याबरोबर याच्या कंबरेचे ढाके कसे एकदम ढिले पडले ते! हा पुरावा देखील कांहीं लहान सहान नाहीं! याशिवाय आणखी एक गोष्ट आपल्या पुढं मांडली ह्मणजे तर न्यायमूर्तींची बालंबाल खात्रीच होऊन चुकेल! महाराजांनां ठार करण्याचा कट फारा दिवसांचा आहे. त्याची सारी वित्तंबातमी ह्याला असून ती ज्या अर्थी यानं महाराजांनां यत्किंचितहि कळविली नाहीं अथवा महाराजांचे प्राण वांचविण्या-

संबंधानेंहि कांहीं प्रयत्न केल्याचा पुरावा नाहीं, त्या अर्थीं यावरून काय निष्पन्न होतं? याची मनोरचना कळायला ही एकच गोष्ट पुरे नाहीं काय?

द०–महाराज! मी आपले अपराध कबूल करितों, पण—

रा०–हे न्यायविशारदहो! पहा, तुह्मींच पहा-हा आपल्या तोंडानं आपले अपराध कबूल करीत आहे. आणि यापुढंहि हा आपले झाडून सारे अपराध असेच कबूल करील! याच्या या कबूली जबाबापेक्षां आतां जास्त पुराव्याची कांहीं जरूर आहे, असं मला तरी वाटत नाहीं.

द०–महाराज, स्वतः संबंधानं एक दोन शब्द बोलण्याची मला परवानगी असावी.

रा०–नाहीं, नाहीं. राजद्रोही लोकांनां एक चकार शब्दहि बोलूं देतां उपयोगी नाहीं! त्यांनां अशी सवलत देणं ह्मणजे स्वतंत्र होऊं देण्यासारखंच आहे! शिवाय दोन शब्द बोलण्याची परवानगी मागायलाच यानं दहा शब्द वापरले आहेत! तेव्हां याला अशी परवानगी दिल्यास दरबारचा हा किती वेळ वेईल याचा कयासच करितां येणार नाहीं. तेव्हां—

द०–महाराज!

रा०–चुप्प! वकील बोलत असतांनां आरोपीनं मध्यें एक शब्दहि बोलतां कामा नये!

द०- महाराज, माझं नांव दयाळजी आहे, आणि माझ्या बापाचं नांव भोलानाथ आहे, ही एकच गोष्ट—

रा०- ही एकच गोष्ट कशी होईल? ह्या दोन निरनिराळ्या स्वतंत्र गोष्टी आहेत! हें कोणीहि सांगेल.

द०—तर ह्या दोन गोष्टींवरून ह्मणा,—फक्त आमच्या दोघांच्या नांवावरूनच, माझ्या निरपराधी आणि सालसपणाबद्दल दरबारची खात्री होईल.

रा०—आः! फार नामी बापलेक! बाप भोलानाथ! आणि मुलगा दयाळजी!! भोलानाथ दयाळजी! दयाळजी भोलानाथ!! नांव मवाळ आणि करणी जहाल!! खुद्द महाराजांचा खून! पद्मनगरीच्या अभिषिक्त महाराजांचा खून! ह्मणजे काय यःकश्चित् अपराध? याच्या ह्या घोर भयंकर राजहत्येच्या प्रयत्नाबद्दल याला केवळ सुळावर देऊन, अथवा हत्तींच्या पायीं बांधून ठार करणं योग्य होणार नाहीं! तर याचे भयंकर हाल केले पाहिजेत! चिंचेच्या फोंकांनीं, वाद्यांनीं, आणि कोरड्यांनीं याची पाट चांगली सडकली पाहिजे! खोड्यांत अडकावून याला विव्हळत टाकला पाहिजे! राखेच्या तोबऱ्यांनीं आणि मिरचांच्या धुरीनं याची धुंदी अगोदर उतरविली पाहिजे; आणि मग याच्या अंगाला सुया, दाभणं आणि खिळे टोंचून, याचे हाल हाल करून, याला ठार केला पाहिजे!! अशा तऱ्हेच्या राजद्रोही मनुष्याला मी ह्मणतों असं अघोर शासनच योग्य आहे, अशी दरबारचीहि

पण खात्री होईल! याच्या नांवाच्या संबंधानेंहि मला प्रथमच शंका आली होती! एकंदरीत मी न्यायमूर्तीपुढें मांडलेल्या पुराव्यावरून हा गुन्हेगार राजद्रोही असून अपराध्य ठरतो!

द०-आणि आपण वेडेपीर ठरतां! लेका राण्या!

रा०-( एकदम शुद्धीवर येऊन ) व्हय व्हय धनी-साब मी रान्या न्हवं का! ह्ये मा अक्शी अगदीं इसर-लोंच व्हतो धनीसाब! मी लई खुशालीमंदी व्हतो कीं मी रानूजीराव वकीलच! अन् धनीसाब, तुमीं बी या येड्य ला येड बी खूपच लाऊनशनी दिलं व्हतं!

द०-राण्या, तुझ्या, कल्पनेचे तारे बेसुमार तुटत होते!

रा०-त्यो ब्रिरसपतीचा परताप धनीसाब!

द०-ब्रिरस्पतीचा प्रताप काय? तुझ्या ह्या ब्रिरस्पतीला अन् तुला दोघांनांहि मरीआई का येत नाहीं लेका?

रा०-अन् त्येच्या बिगर मंग आपलं कसं व्हईल धनीसाब?

द०-ह्मणजे! मला मरीआई यावी ह्मणतोस?

रा०-तसं न्हवं धनीसाब! तिनं मला पकडलं ह्मंजे धन्यासनी अवगड न्है का वाटणार?

[इतक्यांत दारावर थाप बसते व "सरदार दयाळजी हैती का"? ह्मणून शब्द ऐकूं येतात.]

द०–(घाबरून) राण्या! मला वाटतं कोणी राजदूत तर नाहीं आले! जा जा, बाहेर जा आणि कोण आहे तें पहा. आणि त्यांना कांहीं तरी सांगून वाटेला लाव. जा! मी घरांत नाहीं ह्मणून सांग. राजदूत असतील तर मात्र आतां धडगत दिसत नाहीं! कंबख्तीची वेळ आली! (कोचाचे मागें लपतो.)

रा०–कोन है कोन? कवाड कोन खडखडतया? (दाराशीं जातो तो पिराजी एकदम दार लोटून आंत घुसतो.) कोन पिराजी बुआ?

पि०–व्हय मीच तो.

रा०–अन्, मग अस कवाड का खडखडत व्हता जी?

पि०–(जोरानें) अदूगर तुज सरदार कुट हैती त्ये बोल!

रा०–कोन? आमचं सरदार! आमचं धनीसाब?

पि०–व्हय व्हय तुमचं सरदार. तुमचं धनीसाब. अन् असं कवाड लाऊन शनी काय करीत व्हता आतमंदीं? बोला जी राव. असं घुटमळता कशा पायीं? मी होरलंय समदं.

द०–(भीतीनें) ह्यानं हेरलंय सगळं? अरे बाप रे!

रा०—कोन घुटमळतोया? अन् हेरलंत त्यें काय आपुन?

पि०—योकून योक समदी खबर है मला! आता ही अशी लपवालपव अन् छपवाछपव का? कवाडं लाऊन अशी छपवनूक का? बोला, तुमचं धनीसाब कुट हैती?

द०—( घाबरतो ) ह्याला हें सगळं कळलं तर! तर मग सारा घात झाला!

रा०-धनीसायबासंग काय है तुमचं काम?

पि०—सरदार ललितराजांनीं दिलया योक पत्तुर. अन् त्ये त्येसनीच गांठूनशनी द्यायचं है त्येंच्याच हातामंदीं!

रा०—पत्तुर द्यायचं हाये? मग या दावतों कुट हैती त्ये. ( त्यास बाहेर घेऊन जाऊं लागतो. )

द०—( पुढें येऊन ) पत्र आहे. तर मग आतां मी कोणाच्या बापालाहि भीत नाहीं!

पि०—( साश्चर्य राणूस ) अरच्या! रान्या, तुज धनीसाबबी हतच व्हतं का काय तर? ( दयाळजीस लऊन मुजरा करून ) खावंद, सरदारसाब! ललितराज म्हाराजांनीं ह्ये पत्तुर दिलंया. ( पत्र देतो व राणूजीशीं कुजबुजत उभा राहतो )

ह०—( पत्र घेऊन फोडून वाचतो व वाचून झाल्यावर पिराजीस ) ठीक आहे. जा तुह्मीं. ललितराजांनां सांगा कीं पत्राप्रमाणं सारी व्यवस्था करितों. या तुह्मीं.

पि०–( मुजरा करून ) येतों, धनीसाब. [ पिराजी जातो. ]

द०–( स्वगत ) चित्रवीर्य महाराज मेले अशी कंडी पिकवायची, ह्मणजे थोडं थोडकं धोक्याचं आहे कां? एकून आजच कांहीं तरी दगा फटका करायचा यांचा विचार दिसतो!

रा०–( आड येऊन ऐकत असलेला आपल्याशीं ) दगाफटका कसला?

द०–( पत्र वाचीत ) "आजच्या रात्रींच्या रात्रीं हा सगळा बार उडाला पाहिजे. मात्र मोठ्या दक्षतेनं आणि सावधपणानं." असं हे लिहितात. तेव्हां यांचा एकदम कांहीं तरी बेत झाल्यासारखा दिसतो. ( पुन्हा पत्राकडे पाहून) "आनंदघनांच्या नांवानं हलकेच खडे फोडायला आरंभ करा." पण असं करायला आनंदघनांनीं माझं काय वांकडं केलं आहे?

रा०–(एकीकडे) हा बार कसला, आणि दगाफटका कसला? आणखी आनंदघनासंबंधानं काय भानगड आहे ही?

द०–( पत्रांतील शब्द वाचतो ) "चार लोकां-प्रमाणें तुह्मींहि भीतीनं गांगरून गेला आहां असं दाखवा." दाखवा! दाखवा कशाला? हें पत्र वाचीत असतांच माझी काय स्थिती होते आहे ती माझी मलाच ठाऊक! पण हें पत्र ठेवून उपयोग नाहीं. मुद्देमाल

अगोदर नाहींसा केला पाहिजे! (पत्र फाडून चुरळून टाकून देतो ) आतां माझ्या जिवांत जीव आला! आतां मी कोणाच्या बापालाहि भीत नाहीं! महाराज मेले अशी कंडी पिकवायची! ठीक आहे. कटवाल्यांनीं महाराजांच्या बरोबर मलाहि कंठस्नान घातलं असं उठवून दिलं म्हणजे झालं, मग मला गांगरण्याचं काय कारण? बस्स हीच युक्ती! ही युक्ती जर का साधली तर मग मला कोणाच्याहि बापाला भिण्याचं कारण उरणार नाहीं!

रा०–( पत्राचे तुकडे गोळा करून ) हा मुद्देमाल आपल्याला जतन करून ठेवला पाहिजे!

द०–( स्वगत ) तर आपल्याला आतां पासूनच या कामाला लागलं पाहिजे. पण यांत मीच जर सांपडला गेलों तर? तें कांहीं नाहीं. मी मेल्याची कंडी राण्याकडूनच पिकवून द्यावी! तो ही कामगिरी अगदीं बेमालुमपणें पार पाडील. ( मोठ्यानें ) राण्या, राण्या!

रा०–( पुढें येऊन ) जी धनीसाब?

द०–काय करतोस? चल, इकडे ये. मला तुला कांहीं सांगायचं आहे. [ दोघेहि जातात. ]

## प्रवेश २ रा.

**स्थळ—कोपनशीलाचा वाडा.**

[ पद्मनाभ व आनंदवल्ली बोलत आहेत. ]

**आनंदवल्ली**–पद्मनाभ! दादा ह्मटल्याप्रमाणं तर नाहींना करणार महाराजांचा शेवट? अगबाई! पण हा आलाच कीं परत, हातांत उपसलेला जंबिया घेऊन! (इतक्यांत कोपनशील येतो.) पद्मनाभ! ही पाहिलींस याची मुद्रा किती क्रूर आणि भयंकर दिसते आहे ही!

**कोपनशील**–हें पहा ताई तूं आतां निजूं नकोस; अथवा निजलीस-तरी हरकत नाहीं. तुझ्या मदती-शिवायच मी तें सर्व सहज उरकूं शकेन! जा, तूं स्वस्थ विश्रांति घे जा. झोंपच येत नसली तर हें सर्व निर्विघ्नपणं पार पडावं ह्मणून तूं परमेश्वराची प्रार्थना करीत बैस जा. तें पहा काळदूत, हातांत पाश आणि आंकड्या घेऊन त्याच्या भोंवतीं कसे घिरट्या घालीत आहेत! आतां थोडक्याच अवकाशांत तो नरकलोकची वाट धरणार!

**आ०**–( साश्चर्य ) ह्मणजे?

**को०**—ह्मणजे काय? ह्मणजे इतकंच, कीं तो आडवा झाला न झाला तोंच त्याला ह्या जंबियानं भोसकून त्याचा सगळा बिछाना लालभडक करून सोडणार!

**आ०**—छेः दादा, कांहीं तरीच बोलतो आहेस तूं हें. तुझ्या हातून खचित नाहीं असं होणार!

**को०**—हंः माझं मन कांहीं तुझ्या मनासारखं लवचिक आणि मवाळ नाहीं.

**वा०**—नाहीं पण, दादा! तुझ्या हातून हें अघोर आणि साहसाचं कृत्य खचित नाहीं व्हायचं.

**को०**—पहा, प्रत्यक्षच पहा तर! त्याच्या नशीबांत जें काय लिहिलं आहे, तें ह्या जंबियानं—त्याच्या अगदीं चिंधड्या चिंधड्या करून—प्रत्यक्षच मांडतों तुझ्या पुढं सारं! मग तर होईल तुझी खात्री?

**आ०**—ह्मणजे! तर मग तूं त्यांना ठार करणार कीं काय?

**प०**—आणि तें इथं?

**को०**—इथं नाहीं. आपल्या आगमनानं त्यानं जो महाल पावन केला आहे त्या महालांत!

**आ०**—आणि अशा रीतीनं राजद्रोह आणि राजहत्या करून, आपल्या कुळाला कधीं नाहीं तो कलंक लावून घेणारा कुलांगार आणि दिवटा हा कोपनशील—असंच

कीं नाहीं मग सगळ्या जगाकडून ह्मणवून घ्यायचं? आणि मग हा डंका जगाच्या अंतापर्यंत गाजत राहील!

प०–आणि तेंहि महाराज आपल्या निमंत्रणावरून आपल्या इथं आले असतां?

को०–होय, होय! निमंत्रणावरून! आणि हें निमंत्रण त्यांच्या उद्दीप्त कामाग्नीच्या उठावणीवरून!

आ०–दादा! राज्याभिषेकाचे वेळीं, ज्या हातानं तूं त्यांच्या डोक्यावर राजमुगूट चढविलास, त्याच हातानं त्यांच्या उरांत शस्त्र भोंसकून तूं आपली कीर्ती एकून, अशी अजरामर करून घेणार?

को०–हो, हो, कीर्ती! कीर्ती! आणि ती अजरामर करून घेणार! समजलीस? ताई! हा दुष्ट नराधम–प्रत्यक्ष माझ्या वहिणीशीं जारकर्म करून तिचं विमल कौमार्य भ्रष्ट करण्याकरितां इथं आला होता, हें लोकांना कळलं, ह्मणजे मग ते मला माझ्या या अघोर कृत्याबद्दल खचित कधींहि दोष देणार नाहींत!

आ०–दादा केवळ तारुण्याचा मद, अविचार आणि जवळ असणाऱ्या तोंडपुजा लोकांचा वाईट सल्ला यामुळं कदाचित् अशा गोष्टीला ते प्रवृत्त झाले असतील; ह्मणून ह्मणतें याबद्दल त्यांना क्षमा करून, उलट उपदेश

करून ताळ्यावर आणलं पाहिजे -इतकंहि करून—

**को०**—हा तारुण्याचा पडदा मोठा नामी आहे, त्याला लपायाला! ठीक आहे. तोच—तोच त्याचा बचाव करील आतां—

**आनं०**—ह्मणजे माझ्या ह्मणण्याचा भलताच अर्थ नको करूंस. आतां माझं ह्मणणं इतकंच, कीं ते या पद्मनगरीचे अभिषिक्त महाराज आहेत, आणि आपण या गादीचे पिढीजाद सरदार आहोंत; आणि एवढ्याच करितां तुझ्या अंत:करणांत त्यांच्यासंबंधानं थोडी तरी कींव, आणि दया हीं निपजली पाहिजे!

**को०**—कींव आणि दया! ती आतां ह्या जंबियाला आणि समशेरीलाच!

**आनं०**—एकून तुझं ठरलंच तर हें? दादा! पण तूं जर त्यांचा असा घात केलास, तर तुझ्या ह्या क्रूर, भयंकर आणि राक्षसी कृत्याबद्दल सारी दिनदुनिया तुझा तिरस्कार आणि धि:कारच करीत राहील! आणि तूं अघोर राजहत्या करणारा खुनी मनुष्य आहेस, असं ह्मणून, तुला ते आजन्म शापतील! आणि मग,—अगबाई नेको, नकोच ती कल्पना!

**को०**—आधींच माझं रक्त खवळून गेलं आहे. त्यांत क्रोधाग्नीचा हा भयंकर भडका! यापुढं तुझ्या या उपदेशाची मातब्बरी कितीशी चालणार! छे: उपदेशाची आणि विचाराची वेळ केव्हांच पार निघून गेली!

आनं०-असं ह्मणू नकोस. वेळ गेली असं तुला वाटत असेल तर मी एकवेळ प्रयत्न करून बघतें.

को०-( संशयानें ) तूं प्रयत्न करून बघणार? वा: मग छान! ठीक आहे! तुलाच जर त्याच्याबरोबर सुखविलास भोगण्याची आणि मजा मारण्याची इच्छा झाली असेल, तर तूं तसं खुशाल कर, जा! जा, त्याला आपल्या अंतरंगात हवा तसा धुडगूस घालूं दे! हा वेळपर्यंत तरी मी तुला पावित्र्याची आणि सद्गुणाची मूर्ति समजत होतों! पण जाऊं दे. त्याचं आतां काय? त्याला ठार करण्याचा माझा तर ठाम निश्चय झाला आहे! आणि हें करायला आतां मी बिलकुल मागं पुढं पाहणार नाहीं! आतां तुह्मी दोघं जर ह्या माझ्या निश्चयाच्या आड आलांत, आणि ही रात्र उलटून उद्यांचा सूर्योदय पाहण्याला हा नराधम जर जिवंत राहिला, तर मात्र हा आमची सगळी पाळं मुळं खणून काढायला कधींहि कमी करणार नाहीं, ही गोष्ट मात्र तुह्मी पक्की लक्षांत ठेवा!

आनं०--दादा! माझ्याबद्दल आणि भलतीच शंका? अरे, तूं ह्मणतोस ह्या सर्व गोष्टींचा मी चांगला नीट विचार केला आहे. आपलं मन जर पाक, निर्धूत आणि खंबीर आहे तर आपल्याला कसली आली आहे मग कुणाची भीती?

को०-हं हं! आनंदवल्लरी!

**आनं०**—दादा! हें बघ, मीं काय योजलं आहे आणि काय करणार आहें तें मात्र तूं मला विचारूं नकोस. मात्र आपल्या मनाशीं एवढी खूण गांठ घालून ठेव, कीं माझ्या निर्मल कौमार्याला अथवा अब्रूला कोणत्याहि रीतीनं डाग अथवा कलंक लागेल अशा तऱ्हेचं निंद्य वर्तन, माझ्या हातून कधींहि होणार नाहीं! इतकंच काय पण कोणत्याहि तऱ्हेचे पापी मनोविकार मला शिवणार दिखील नाहींत.

**को०**—तर मग त्याच्यावर तूं आपला इतका भरंवसा टाकणार एकून?

**आनं०**—आपल्या कुळाची अब्रू, तुझा लौकिक, आणि महाराजांचे प्राण, हे राखण्यकारितां याहून देखील जास्त ठेवीन! मात्र माझ्यासंबंधानं तूं आपल्या मनांत यत्किंचितहि संशय येऊं देऊं नकोस. आणि इतकंहि करून त्यांचा भलताच जर कांहीं रंग दिसला, तर मग घेतोसच आहेस तूं आपला हवा तसा सूड उगवून!

**को०**—ताई! प्रत्यक्ष सीता देवीसारख्या महा पतिव्रतेला त्या रावणानं संन्याशाचा वेष घेऊन फसविलिन, तशीच, त्या अहिल्येला इंद्रानं फसाविलन्, हें सगळं तुला ठाऊक असून देखील जर तूं हें असलं भलतंच साहस करायला उद्युक्त होते आहेस, तर तुला काय ह्मणावं?

**आनं**—दादा, दादा! माझ्यासंबंधानं, तूं एक काडीभरदिखील काळजी करूं नकोस, कीं एकादाहि

वेडावांकडा विचार, आपल्या डोक्यांत येऊं देऊं नकोस! असल्या दुष्ट आणि पापी विकारांना मी आपल्या डोक्यांत नुसता थारा देखील देणार नाहीं! स्वतः पापकर्म करून स्वर्गांतील सगळ्या पवित्र आणि सच्छील कुमारींनां खालीं पहायाला लावण्याजोगं नीच कृत्य करायला मी प्रवृत्त होईन असं कां वाटतं तुला? दादा! जा, जा तर तूं आतां. माझं सत्व मी ढळूं देणार नाहीं ही तुझी पक्की खात्री असूं दे. तूं अगदीं निर्धास्तपणें ही कामगिरी माझ्यावर सोंपीव.

को०—ह्मणजे त्या कामांधाला इकडे पाठवून देऊं—असंच कीं नाहीं?

प०-दादा! एकून ताईच्या बोलण्यावर तुझा विश्वास बसत नाहीं? पण हिच्याबद्दल शंका घेण्याचं तुला आतां बिलकूल कारण नाहीं.

को०—असं का? ठीक आहे. जातों तर मी. आणि देतों त्याला इकडं पाठवून. पण हें पहा पद्मनाभ, तूं मात्र बाहेरच्या बाजूला अगदीं तयारीनं ऐस. [पडदा पडतो व कोपनशील पडद्याचे बाहेर येऊन] ज्याचा त्याला योग्य न्याय देण्यांत अशी चालढकल करणं कांहीं इष्ट नव्हे! ताई त्याला कंठस्नान घालील ह्मणावं, तर तेंहि संभवत नाहीं! कारण जें घोर कृत्य, माझ्या हातून घडूं नये, ह्मणून जी मला विनंति करते, तेंच घोर कृत्य आपण स्वतः करायला ती प्रवृत्त होईल, ही कल्पना तरी कशी करायची? (विचार) छेः तें कांहीं

नाहीं. ती करायाला जाईल एक पण उलट त्या विषय-लंपटाच्याच जाळ्यांत मात्र अडकेल! मला तरी असं होण्याचाच जास्त संभव दिसतो! (ओंठ चाऊन) झालंच असं, तर काय? तर काय करायचं तें ही समशेर पुरं जाणून आहे! (जातो.)

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—(कोपनशीलाच्या वाड्यांतील एक महाल.)

[पद्मनाभ व आनंदवल्लरी कांहीं कुजबुजत आहेत.]

**प०**—(मोठ्यानें) काय माझा जंबिया पाहिजे ह्मणतेस?

**आ०**—पद्मनाभ, तूं माझ्यासंबंधानं एवढीशी देखील शंका घेऊं नकोस. हा जंबिया, उगीच एखाद्याच्या रक्तानं लाल करण्याचा माझा दुष्ट हेतु आहे, असं तूं अगदीं मनांत सुद्धां आणूं नकोस.

**प०**—चल तर घे हा. (जंबिया देतो) तूं शेवट-पर्यंत अशीच पवित्र आणि शुद्ध राहशील, अशी माझी पूर्ण खात्री आहे, तुझ्या हेतूबद्दल शंका काढणं, हाच अगोदर अधमपणा—

**आ०**—हं, तर ये तूं आतां—

**प०**—तुझ्या कौमार्याचं रक्षण करण्याकरितां ते बघ अंतरिक्षांतून देवदूत फिरत आहेत.

आ०–हं, चल हो चालता. आलेच ते.

[पद्मनाभ पुतळ्याचे आड जातो, कोपनशील व चित्रवीर्य येतात.]

को०–हं आटपा आतां, ( चुटकी वाजवून ) ती पहा, आनंदवल्लरी तिथं उभी आहे. मी येतों आतां.

चित्रवीर्य:–आनंदवल्लरी, तू खरोखरी माझ्या आनंदाची वल्लरी आहेस.

को०–(स्वगत )आतां आपण असं आड उभं रहावं. ( आड जातो तों पद्मनाभ त्याच्या दृष्टीस पडतो त्यास ) पद्मनाभ, तूं असा त्या तिथं उभा रहा. ( तसें करितात. )

चित्र०–आनंदवल्लरी ! मी कोण आहे आणि माझा दर्जा काय हें तुला ठाऊकच आहे–

आनं०–होय महाराज.

चि०–( साश्चर्य ) महाराज ! होय तूं माझ्या दृष्टीस पडेपर्यंत मी महाराज होतों ! पण तें पद तुझ्या सौंदर्यानं मला जिंकून आपला गुलाम करून टाकल्यापासून मीं अजीबात सोडून दिलं आहे. हा पद्मपुरीचा चित्रवीर्य आतां महाराज नव्हें. हा तुझा दास आहे. तुझा बंदा गुलाम आहे.

आनं०–छेः, हें असं कसं ह्मणायचं महाराज? आपल्याला महाराजच ह्मणवून घेणं योग्य. आपण आपल्या दर्शनानं या पद्मनगरींतल्या नागरिकांना

विनम्र व्हायला लावून त्यांच्याकडून (खालीं वांकून नमस्कार करावयास लागते.) अशा रीतीनंच अत्यादरास पात्र व्हा, तें टाकून हें काय?

चि०–ऊठ, ऊठ, आनंदवल्लरी ऊठ, मी या पद्म-पुरीचा महाराज आहे असं तूंच ह्मणतेसना? मग कां बरें तूं माझा हुकूम मानीत नाहींस?

आनं०–काय? मी आणि महाराजांचा हुकूम मानीत नाहीं? (उठते.) असं कसं होईल महाराज?

चि०–एकंदरींतं तुझा भाऊ मोठा दिलदार आणि थोर मनाचा. अगदीं माझ्या इच्छेनरूप वागत गेला. माझं तुझ्यावर किती आणि कसं प्रेम जडलं आहे, याबद्दलची सर्व हकीगत त्याच्याकडून तुला यापूर्वींच समजली असेल. अहाहा! ही तुझी नम्रता आणि विनयसंपन्नता पाहून तर तुझ्यावर माझं प्रेम अधिकच जडतं. आनंदवल्लरी! खचित, तुझ्या जन्मस्थानीं कांहीं तरी अशुभ ग्रह पडले असले पाहिजेत! त्याशिवाय हें असलं सौंदर्य राजकुल सोडून दुसरीकडं जन्मास कसं यावं? तूं जरी राजकन्या नाहींस तरी राजकन्येहून देखील तूं मला अधिक प्रिय वाटतेस! लोक ह्मणतात कीं—मदनाची रति फार सुरेख होती. पण तुला पाहून मला असं वाटतं कीं फार झालं तर ती तुझी दुसरी प्रतिमा असेल. यापेक्षां तिच्यांत अधिक सौंदर्य तें काय असणार? अथवा या चित्रवीर्याच्या जन्माचा शेवट गोड करण्याकरितां, ती रतीच पुन्हा निर्माण झाली

नाहीं म्हणून तरी कशावरून? मी या डोळ्यांकडे, आणि मुखचंद्राकडे पहात वर्षेंचीं वर्षे असाच उभा राहीन! जसा कांहीं मी चंद्रलोकांत असून, यथेच्छ हें सुधापान करीत आहे! (तिला स्पर्श करूं पाहतो तों ती दूर होते.)

आ०–(रागावून) म्हणजे! हें काय महाराज? याचा काय अर्थ?

चि०–याचा काय अर्थ! बरा, वेळींच प्रश्न केलास म्हणायचा हा–नाहीं तर मी असाच भकत गेलों असतों; आणि जो हेतू मनांत धरून इथं आलों, तो हेतू देखील कदाचित् विसरून गेलों असतों! आणि या मुखचंद्राकडं, एकसारखं टकमक पाहण्यापलीकडे जगांत कांहीं जास्त सुखानंद आहे, याची मला मग कल्पनाहि पण उरतीना! आनंदवल्लरी! तुझ्या नेत्र-कटाक्षांत दुसऱ्यांनां बद्ध करून त्यांनां कैद्याप्रमाणं आपल्यामागून हवं तसं जगभर नाचविण्याची अजब शक्ति आहे! तुझ्या ह्या कोमल हातांच्या बेड्या घालून मिरविण्यांत कोणाला भूषण आणि गौरव वाटणार नाहीं? (तो अधिक लगट करूं लागतो.) हं, अशी लांब लांब कां होतेस? चल, आपल्या अभिनव स्पर्श-सुखानं, मला अमर करून टाक! इंद्राजवळ म्हणे, तिलोत्तमा, मेनका, ऊर्वशी यांच्यासारख्या दिव्य अप्सरा आहेत! पण त्याला म्हणावं, त्या तुझ्या सगळ्या अप्सरांचं सौंदर्य एकीकडं केलं, तरी ह्या

सौंदर्याची त्या सौंदर्यानं कधींहि बरोबरी करवणार नाहीं! (स्वगत) खरोखर! ही प्रत्यक्ष त्या मनोहर रतीची मूर्ती, स्वर्गीय सौंदर्याची मुर्तिमंत पुतळी, अथवा विधात्याच्या कारागिरीचा उत्कृष्ट नमुना ह्मणून करून ठेवलेली दिव्य प्रतिमा आहे!

**आ०**—महाराज, आपण प्रतिमा, मूर्ती आणि पुतळे, यासंबंधानं कांहीं ह्मणत होता, नव्हे? त्यांनीं आपल्याला अगदीं गर्क करून वेडावून टाकल्यासारखं दिसतं.

**चि०**—होय. एकवटलेल्या सौंदर्याची अशी तेजस्वी पुतळी कोणाला गर्क करून वेड लावणार नाहीं?

**आ०**—तर मग महाराज! उत्कृष्ट.कारागिरीचं आपल्याला प्रेम आणि कौतुक वाटतं नव्हे?

**चि०**—हो, तें किती ह्मणून सांगूं!

**आ०**—(एका पुतळ्यावरील सरपोस दूर करून) तर महाराज! हा पुतळा पहा, उत्कृष्ट कारागिरीचा हा एक उत्तम मासला आहे!

**चि०**—(पुतळा निरखून आनंदवल्लरीकडे पाहून) हे मनमोहने, आनंदवल्लरी! तूं माझा हा विनोद तर नाहीं चालविलास?

**आनं०**—छे: महाराज, विनोदाचं काय कारण? आमच्या कुळांत ज्यांनीं उत्तम नांवलौकिक संपादला, अशा एका पुण्यशील पुरुषाचा हा पुतळा आहे. हा आमच्या नामांकित घराण्याचा मूळ पुरुष.. याचं नांव

रुद्रसेन. यांच्या हातांतल्या ढालीवर सूर्य आहे. तो त्यांच्या तेजाचं दैदीप्यमान चिन्ह आहे. ह्यांची मुद्रा किती गंभीर आणि डोळे किती तेजस्वी! निर्मल पावित्र्य यांच्या या प्रतिमेवरून कसं अगदीं ओसरतं आहे! आपल्या कुळाचं पावित्र्य-आपल्या कुळांत जन्म घेणारा कोणी मळवील कीं काय, ह्मणून जणूं काय ते आपल्या क्रुद्ध मुद्रेनं, विचारीत आहेतसं दिसतं!

चि०—वाः फारच नामी! खरंच, कारागिरीची इथं कमाल आहे! त्या क्रुद्ध मुद्रेचं मला वाटतं प्रत्येक पिढींत थोडं थोडं रूपांतर होतां होतां, तुझ्या पिढींत तर मधुर स्मित होऊन गेलं आहे!

आ०—तसंच महाराज, हा दुसरा पुतळा पहा. ( सरपोस काढते. )

चि०— हे कोण?

आ०—हे माझे पणजे.

चि०-यांचं नांव?

आनं०—यांचं नांव मानसिंह. लोक यांनां “ खुनी मानसिंह ” ह्मणत.

चि०-खुनी?

आनं०—हो खुनीच!

चि०—तुमच्या कुळांत खून करणारा—कोणी कुल-कलंक—पापी पुरुष निपजला असेल अशी मला कल्पना नव्हती!

**आ०**—कुलकलंक, पापी! त्यांना कुलकलंक आणि पापी ह्मणणार कोण? उलट ते कुलदीपक पुण्यात्मे! ज्या वेळीं आमच्या मानदुर्गाला म्लेंछांचा वेढा पडला, आणि ते दिन् दिन् करीत वेशींतून किल्ल्यांत घुसले आणि त्यानीं एकच धुमश्चक्री सुरू केली, त्या प्रसंगीं शत्रूपुढं आपला निभाव लागत नाहीं, असं पाहून—त्यांनीं त्यांना असलेल्या एकुलत्या एक मुलीची अब्रू बचावण्याकारितां अगोदर तिला कंठस्नान घालून मागून आपल्या उरांत खंजीर खुपसून घेतला! त्यांचा हा पुतळा! सांगा, महाराज, आतां सांगा पाहूं—त्यांना कुलकलंक ह्मणायचं, कां कुलदीपक ह्मणायचं? ते पापी कां पुण्यवान?

**चि०**—आनंदवल्लरी, तूं मला हे पुतळे दाखवून आणखी असा किती वेळ काढणार? मला अशा मागच्या भेसूर कृत्यांची स्मृति देऊन, विस्मयांत पाडून उगीच नादावूं कां पहातेस अशी? या तुझ्या भेसूर कल्पना आतां बस्स झाल्या!

**आ०**—महाराज! काय हें? मला वाटतं तुमच्या मनांत कांहीं तरी पापबुद्धी आली आहे!

**चि०**—ह्मणजे! मी इथं कशाला आलों आहें ह्मणून समजतेस तर तूं?

**आ०**—मला काय ठाऊक?

**चि०**—तर मग मी इथें कां आलों, आणि कशाला येणार होतों, यांपैकीं, तुला कांहींच ठाऊक नाहीं?

प्रत्यक्ष तुझ्या भावाच्या बोलावण्यावरून मी इथं आलों असून—

**आ०**—असं असून—मी आपल्या मर्जीनुरुप वागत नाहीं, हेंच कीं नाहीं आपलं ह्मणणं?

**चि०**-अलबत, मी जो इथं आलों तो कशाकरितां? आणि तुझ्या भावानं तुला जी इथं माझी वाट पहायला सांगितली, ती तरी काय ह्मणून?

**आ०**—आपल्या अंगीं सद्गुणाचा आणि पुण्याचा पूर्ण लोप झाला आहे हें माझ्याकडून आपल्याला सांगावं ह्मणून!

**चि०**-वा: एकून ओढून तर खूपच आणलं आहेस ह्मणायचं! (बदलून) पण हें पहा आनंदलतिके, या वेळीं हा माझा दिल् तुझ्या दिलाशीं मिळून, अगदीं एक होऊन गेला आहे!

**आ०**—आपण ह्मणतां तसं आपल्यासंबंधानं झालं असेल. पण तुमच्या दिलासंबंधानं माझ्या दिलाची मात्र तशी नीच स्थिति झाली नाहीं! अरे! अरे! काय ही दैवाची विपरीत करणी! महाराज! आपण कोण, आपली योग्यता केवढी, याचा कांहीं विचार! अहो, तुमचा जन्म ह्या उत्तम राजकुलांत झाला आहेना? तर मग तुमच्यांत थोडा तरी विष्णूचा अंश आहेच! असं असून, तुह्मांला ही विपरीत बुद्धी कां होत आहे? महाराज! नका, नका, अशा पापमार्गाचा स्वीकार करूं नका!

चि०—हे तुझे शब्द तुझ्या भ्रात्राच्या कानीं पडते, तर बरं होतं! आनंदवल्लरी, माझा तर पक्का निश्चय झाला आहे, कीं आज तुझ्या ह्या अधरोष्ठाचं यथेच्छ—अगदीं मनमुराद असं पानं करायचं. (लगट करूं लागतो.)

आ०—महाराज! जरा शुद्धीवर या. हा आणखी एकच पुतळा दाखवायचा राहिला आहे. हा एवढा पहा ह्मणजे झालं. (पुतळ्यावरील सरपोस दूर करिते.) इथं तर शिल्पकलेचा कळसच झालेला तुह्मांला दिसेल! हा पुतळा कोणाचा आहे? ओळखलंत कां महाराज आपण?

चि०—हो. न ओळखायला काय झालं? हा तर तुझ्या बाबांचा. सत्यपालांचा आहे हा!

आ०—(सानंद व विलक्षण उत्सुकतेनें.) हो, बरोब्बर ओळखलंत. हा माझ्या बाबांचा—बाबांचाच आहे हा! यांची मुद्रा किती गंभीर, उदार आणि सात्विक दिसत आहे! यांच्या चेहऱ्यावरील हें स्वर्गीय तेज पहा, कसं नुसतं चमकतं आहे! ह्यांची कन्या आहें मी. माझे बाबा—कसे होते महाराज? सांगा, सांगा—

चि०—ते अत्यंत सद्गुणसंपन्न, करारी, धीराचे आणि तसेच खंदे लढवय्ये होते.

आ०—एवढंच स्मरतं आपल्याला? थांबा तर, मी तुह्मांला आठवण देते. तुमच्या वडिलांनीं, थोरल्या महाराजांनीं, सत्यपालांचीच निवड, मुद्दाम तुह्मांला

शिक्षण देण्याकरितां केली होती. ते तुमचे गुरु होते. त्यांनीं आपलं सर्व आयुष्य तुह्मांला शिक्षण देण्यांत वेंचलं. आणि त्यांना मृत्यूहि पण तुमच्याच सेवेंत आला! मणिपूरच्या मैदानावरील प्रचंड रणसंग्रामांत, तुमच्या छातींत शत्रू तरवार भोंसकीत असतांना, मध्यें पडून ज्यांनीं ती आपल्या छातीवर घेतली आणि तुह्मांला वांचविलं, आणि तुमच्या पायाजवळ आपले प्राण सोडले त्यांचा पुतळा हा– ( धांवून बापाचे पुतळ्याशीं जाते ) बाबा! आतां तुमचे श्वास चालत नाहींत, तुमची छाती उडत नाहीं, किंवा तुमच्या शिरांतून रक्तहि वाहत नाहीं. असा जरी हा तुमचा पुतळा आहे, तरी ही आनंदवल्लरी तुमचा आश्रय करिते आहे. हिला आपल्या पोटाशीं धरा. आपले पवित्र हात हिच्या अंगावर फिरूं देत. ( पुतळ्याचे कंठास मिठी मारते. ) महाराज! या, तुमच्यांत हिम्मत असेल तर ह्या माझ्या बाबांच्या मूर्तीपासून, मला दूर करा! ह्या पवित्र करपाशांतून, मला आपल्या पापी हातांनीं ओढून काढा! आणिं आपल्या कामाग्नीला, या आनंदवल्लरीच्या–या सत्यपालांच्या कन्येच्या–कौमार्याची आहुती देऊन, माझ्या बाबांनीं तुमचे प्राण वांचविण्याकरितां जें आपलं पवित्र रक्त शिंपडलं, त्याबद्दल अशा पापी मार्गाचं अवलंबन करून, त्यांच्या ऋणांतून मुक्त व्हा!

चि०–आनंदवल्लरी! हे तुझे शब्द माझ्या अंतःकरणांत, हा वेळपर्यंत मला ठाऊक नसणारे चमत्कारिक

भाव आणि मनोवृत्ति उत्पन्न करीत आहेत! पण कोपनशीलानं, माझ्या विनंतीला मान देऊन, तुझ्या भेटीचा हा योग जमवून आणला, या एकाच गोष्टीच्या स्मृतीनं ते भाव आणि त्या मनोवृत्ती एकदम मावळूं लागतात. तुझ्याबद्दलच्या माझ्या प्रेमाला पुन्हा पाझर फुटूं लागतो. ह्मणून ह्मणतों, आनंदवल्लरी, त्या पुतळ्यावर तो सरोस टाक, आणि मला एकदां कडकडून--( भेटूं पाहतो. )

**आ०**—(जंबिया उपसून) हं खबरदार, पुढं याल तर!

**चि०**–( साश्चर्य व भीतीनें ) एकून आपण आतां चंडीदेवीचं ऊग्र स्वरूप घेतलंत तर!

**आ०**—महाराज! थोडा विचार करा, आपण स्वतः एक सद्गुणापासून ढळतां आहांत, ह्मणून सारी दुनिया तशीच झाली आहे, असं कां आपण समजतां? महाराज! तुमच्या या पापी, आणि दुष्ट विचाराबद्दल तुमच्याविषयीं मला अत्यंत तिटकारा येतो! ( तो अधिक जवळ येऊं लागतो. ) नका नका, असे पुढं येऊं नका. माझ्या निरपराधी हातांनां आपल्या या पापी हातांनीं, स्पर्श करूं लागाल, तर सांगून ठेवतें,–इथं मोठा अनर्थ गुदरेल! आणि मग हें असं साहस केल्याचा तुह्मांला फार पश्चात्ताप होईल!

**चि०**–काय अनर्थ! अन् त्याचा मला पश्चात्ताप? काय, तर मग तूं माझा खून करणार? छेः! हें तर मुळींच संभवत नाहीं. कारण माझा खून झाल्यावर, पश्चात्ताप व्हायला, मी जगणार कसा?

आ०–आपण ह्मणतां, तसा माझ्याकडून आपला जरी खून झाला नाहीं, तरी माझ्या जीवाचं काय वाटेल तें करून घ्यायला माझी मी मुखत्यारीण आहें कीं नाहीं?

चि०–ह्मणजे! तर मग तूं आपल्या स्वतःच्या जिवाला कांहीं अपाय करून घेणार ह्मणतेस?

आ०–तुमच्या या पापी हातांनीं, माझ्या कौमार्याचा, भंग- ह्मणजे खून-खूनच तो!–तो करून घेण्यापेक्षां, आत्महत्या करून घेणं किती तरी उत्तम!

चि०–खरोखर, तूं खचित इतकी निर्दय नाहींस! कौमार्याचा भंग होऊं देण्यापेक्षां, आत्महत्येंत अधिक पाप! आनंदवल्लरी, हा चित्रवीर्य सर्वस्वीं तुझा आहे. टाक, टाक तर तें दुष्ट शस्त्र. आपलं आतां युद्ध ह्मटलं, ह्मणजे या मृदु गात्रांचं आलिंगन; आणि एकमेकांवर वार ह्मटले, ह्मणजे मधुर सुहास्याचे आणि नेत्रकटाक्षांचे! तर कां, उशीर कां आतां उगीच?

आ०–(जंबिया दाखवून) एक पाऊल पुढं टाका कीं या शस्त्रानं आपलं काम केलंच ह्मणून समजा!

चि०–मला कशाला उगीच हा नसता धाक दाखवितेस? पुरे--पुरे आतां हें सारं खोटं अवसान!

आ०–काय मी नसता धाक आणि खोटं अवसान दाखवितें?

चि०--आनंदवल्लरी, तूं माझा आतां किती अंत पाहणार!

आ०—नाहीं महाराज, आतां तुह्मींच माझा अंत पाहणार, हेंच खचित! माझा नसता धाक कीं खोटं अवसान, तें तुह्मीं आतां प्रत्यक्षच पहा! (हातांत जंबिया खुपसते व रक्तप्रवाह येतो.) अजूनहि जर आपली खात्री होत नसेल, तर माझ्या कौमार्याचं रक्षण करणाऱ्या ह्या पवित्र जंबियाकडून मी आपलं सगळं काळीजच काळीज बाहेर काढवितें; मग तर होईल आपली खात्री?

चि०—हां हां, आनंदवल्लरी! एवढं साहस मात्र करूं नकोस. काय हें अघोर कर्म! कर, बंद कर तें रक्त अगोदर!

आ०—छे: ही गोष्ट तर आतां कधीं होणार नाहीं. महाराज! हें रक्त अस्सं अस्सं वाहत राहील! आणि इथून रक्त येण्याचं बंद झालं, तर दुसरी शीर तोडीन! आणि तिचीही अशीच दशा झाली, तर तिसरी! तीहि बंद झाली, ह्मणजे चवथी. अशा रीतीनं, माझ्या अंगांतली प्रत्येक शीर तुटून माझ्या अंगांतील रक्ताचा शेवटला थेंब गळून पडेपर्यंत, हें असंच चालूं राहील—आणि इतकंहि करून, जर माझ्या निश्चयासंबंधानं आपली खात्री होत नसेल, तर यांतच मी आपला अंत करून घेईन! यायोगानं जर आपल्या अंगांतील रक्त—जें पापी विचारांनीं दूषित झालं आहे—तें निवळून जाऊन, अगदीं निर्दोष होईल, तर महाराज, मला माझं रक्त गेल्याचं, यत्किंचित् दुःख वाटणार नाहीं. उलटा आनंदच होईल.

मग माझं रक्त हवं तितकं जाओ! त्याची मी मुळीं दिखील पर्वा करणार नाहीं.

**चि०**–[ घाबरून ] छेः ! छेः ! छेः ! काय रक्तपात हा ! ! आनंदवल्लरी ! इतका वेळ यांतून थोडं का रक्त गेलं आहे ? नको, नको; थांबीव, थांबीव हें ! हें असं साहस करूं नकोस. रक्ताच्या ह्या चिळकांड्या पाहून माझ्या सर्वांगाला हा पहा कसा भयंकर कंप सुटत आहे ! आनंदवल्लरी, आनंदवल्लरी ! पहा ! पहा ! आपल्या जिवाकडे तरी कांहीं पहा.

**आ०**–नाहीं. मनांत पापी इच्छा धरल्याबद्दल आपल्याला पश्चात्ताप झाल्याचं मला दिसून आल्याशिवाय यांतून रक्त वाहण्याचं बिल्कुल थांबणार नाहीं ! हं:– यांतून रक्त येण्याचं थांबलं. ठीक आहे. आतां ही दुसरी शीर--! (जंबिया खुपसून घेऊं पहाते.)

**चि०**–(जंबिया काढून घेऊं पाहतो.) आनंदवल्लरी! हा तुझा जंबिया माझ्या काळजाला जाऊन भिडत आहे ! सोड, सोड ! नको, असा अविचार नको करूंस. माझ्या राक्षसी वर्तनाबद्दल मला क्षमा कर. हा पहा, कृतकर्माबद्दल मला आतां पुरा पश्चात्ताप होत आहे !

**आ०**-महाराज ! आपण आतां उच्चारलेल्या आपल्या शब्दावर, मी विश्वास ठेवावा कां ?

**चि०**-ह्मणजे ! हे सद्गुणशीले आनंदवल्लरी ! अजून सुद्धां माझ्याबद्दल तुला अविश्वासच कां ? तर मग माझं

दुर्दैवच ह्मणायचं! दुसरं काय? (बदलून) आनंद-वल्लरी! तुझ्या सद्गुणाच्या या दिव्य आदर्शांत, मी अत्यंत हिडिस, आणि कुरूप असल्याचं मला स्पष्ट दिसत आहे! अहा रे नीचा, पापकर्म्या, चित्रवीर्या! अशा पवित्र आणि निर्मल कुमारीसंबंधानं तूं केवढी भयंकर पापवासना धरलीस! त्यापेक्षां अशी पापी कल्पना येतांच तूं जळून खाक कां नाहीं झालास? आनंदवल्लरी! ह्मण, मला क्षमा केली आहे असं ह्मण! अथवा माझ्यासारख्या पाप्याला कोण क्षमा करणार! आणि ती तूं का करावीस? ठीक आहे तर मग आतां— हे क्षमाशील शस्त्रा!-(शस्त्र खुपसून घेऊं लागतो.)

आ०—छे: छे:! छे: छे:! हें काय महाराज! क्षमा आहे क्षमा! टाका, टाका तें शस्त्र. एकूण महाराज! तुमच्यांत माणुसकी आणि उदात्त मनोवृत्ति अजून जीव धरून आहेत? सगळीच कांहीं पशुवृत्ति बनली नाहीं! (कोपनशील पुढें व मागोमाग पद्मनाभ हे पुतळ्यामागून एकदम घाईघाईनें येतात व आनंदवल्लरीस कडकडून भेटतात व कुरवाळितात.)

कोप०—ताई! ताई! आनंदवल्लरी! तूं खरोखरी आनंदाची वल्लरी आहेस! तुझ्या या स्पर्शानं मी आज अत्यंत धन्य होत आहें! अहाहा! तुझ्या या निष्पाप आणि पवित्र आचरणाबद्दल, तुझी किती ह्मणून तारीफ करूं? तुझा हा निर्धार, तुझा आत्मविश्वास, तुझें शील, आणि तुझे सद्गुण, हे पाहून असं वाटतं,—कीं तुझा एक

प्रचंड पुतळा उभारावा. इतका उंच कीं अंतराळांत किरणांच्या ढगांनां भेदून त्यानं पार वर जावं, आणि चंद्राला देखील दिपवून टाकावं! सगळया जगांतील लोंकांनां तो पाहून असा मोह उत्पन्न व्हावा, कीं दिव्य-लोकीं जाण्याचा सोपानच हा आहे! (बदलून) ताई! या वेळीं तुला कुठं ठेवूं आणि कुठं नको असं मला होऊन गेलं आहे! [ हें सर्व बोलत असतां आपला शेला तिच्या हातास बांधून रक्त येण्याचें बंद करतो. ] छेः अशानं हें बंद होणार नाहीं. पद्मनाभ, हिला आंत घेऊन जा. आणि हिचं हें सारं रक्त पुसून हिची ही जखम अगोदर बांधून टाक. जा, मीहि येतोंच इतक्यांत. [ पद्मनाभ व आनंदवल्लरी गेल्यावर चित्रवीर्यास ] आणि हें पहा, महाराज! मी तुह्मांला आतां प्रणाम करितों. आज आमच्या आनंदवल्लरीनं--आमचे महाराज आह्मांला पुन्हा मिळवून दिले!

चि०-(सद्गदित होऊन) कोपनशील! आतां मात्र मी तुमचा महाराज खरा! विषयांध बनून तुमच्या बहिणीचा, तुमचा आणि तुमच्या साऱ्या कुळाचा दुर्लौकिक करण्याकरितां मी इथं आलों होतों. पण या आनंदवल्लरीनं- सद्गुणाच्या या मूर्तिमंत देवीनं, मला त्या भयंकर पापकर्मापासून मागं ओढून सन्मार्गावर आणून सोडलं! कोपनशील! यापुढं तुमच्या आणि या पद्मनगरींतील प्रजाजनांच्या प्रेमाला आणि आदराला पात्र होण्याचा मी अटोकाट प्रयत्न करीन! आज माझा

पुनर्जन्म झाला असंच मी समजतों! कारण ह्या दिवसापासून माझ्या नव्या आयुष्यक्रमाला सुरुवात होणार!

**कोप०**—आणि असं झालं ह्मणजे आपला कीर्तिदुंदुभी सर्वत्र दुमदुमून राहील महाराज! आपल्या वृत्तींत इतका फरक पडला, हें पाहून मला अत्यंत समाधान, आणि आनंद होत आहे.

**चि०**—कोपनशील! झाल्या गोष्टीबद्दल तुह्मीं सर्वांनीं मला क्षमा करावी.

**कोप०**—महाराज! पश्चात्ताप झाल्यावर मग आणखी क्षमेचं तें काय उरलं?

**चि०**—( एकदम विचार बदलून ) हो. पण कोपनशील! ते ललितराज कुठं आहेत?

**कोप०**—कोण ललितराज! मला वाटतं त्यांचा गीतापाठ अजून पुरा नसेल झाला!

**चि०**-काय ह्मटलंत?

**को०**—तें कांहीं मला बरोबर सांगतां येत नाहीं ह्मणा कदाचित् त्यांचा पाठबीठहि नसेल!

**चि०**—ह्मणजे! हें असं काय ह्मणतां तुह्मी?

**को०**—महाराज! आपला पुनर्जन्म होऊन, आपण आतां पूर्वीचं जर सारं विसरून गेलां आहां, तर या ललितराजाला देखील आपल्याला आतां पार विसरूनच गेलं पाहिजे! कारण आपल्यासंबंधानं त्यांचं अंतःकरण बिलकुल शुद्ध नाहीं, हें मी आपल्याला निश्चयपूर्वक

सांगून ठेवतों. आणि त्याच्यासंबंधानंच तर मला फार भीती वाटते!

**चि॰**—काय? त्याच्यासंबंधानं भीती वाटते तुह्मांला?

**को॰**—होय, त्याच्याचसंबंधानं! अगदीं उघडच करून सांगायला पाहिजे असेल, तर ऐका! महाराज! तुमच्या वृत्तींत दुष्ट आणि पापी मनोविकार वाढीस लावणारा हाच चांडाळ दुरात्मा! आणि ह्मणूनच जोंपर्यंत हा तुमच्याजवळ आहे, तोंपर्यंत तुमचं जीवित कधींहि निर्धास्त होणार नाहीं!

**चि॰**—छेः! छेः! कोपनशील! त्याचं माझ्यावर अकृत्रिम प्रेम आहे. त्याचा आपण असा उगीच मत्सर करूं नका.

**कोप॰**—काय त्याचा मत्सर! छेः तर मग आपल्याला सगळं उघड सांगणंच भाग आहे. महाराज! हा ललितराज पक्का दगलबाज आणि राजद्रोही मनुष्य आहे! मला जें कांहीं थोडंबहूत समजलं आहे, त्यावरून मी इतकं खात्रीनं सांगतों कीं, त्याचे आपल्याला कंठस्नान घालण्याविषयीं कट आणि गुप्त मसलती चालल्या आहेत!

**चि॰**—काय? मला कंठस्नान घालण्याकरितां त्याच्या गुप्त मसलती आणि कट! आणि ते कोणाशीं?

**कोप॰**—कोणाशीं! (छातीस हात लावून) माझ्याशीं महाराज! आज आपण जर असे शुद्धीवर न येतां, तर आजच्याच रात्रीं या कोपनशीलाचे हातून आपला खून

पडता! ललितराज आपल्या [illegible] बातमी ऐकायला, मोठ्या उत्सुकतेनं अगदीं टपून बसला असेल! आणि याबद्दल महाराजांची मी खात्री करून देतों पाहिजे तर! आमच्या अब्रूवर जी भयंकर आग पाखडायला आपण आज तयार झाला होता त्या आगींतच आपल्याला होरपळून टाकावं, हा त्याचा विचार! परंतु आनंदवल्लरीच्या निश्चयी वर्तनानं, आपण निवळून जाऊन, आपली वृत्ति पालटली, ह्मणूनच तुह्मांला कंठस्नान घालण्याच्या निश्चयापासून मी ढळलों; आणि तुमच्यासंबंधानं माझ्या ठिकाणीं पूज्यबुद्धी उत्पन्न झाली! (इतक्यांत पद्मनाभ येतो.)

**चि०**–काय, ललितराजाच्या अन् अशा खटपटी? मला तरी सर्वथैव अशक्य वाटतं हें!

**कोप०**–महाराज! फार लांब कशाला, याबद्दल आपली इथल्या इथंच खात्री करून दिली, ह्मणजे झालं कीं नाहीं? पद्मनाभ! जा, आणि ललितराजांना ह्मणावं मेहेरबानी करून इथवर येऊन जा. (पद्मनाभ जातो.) (चित्रवीर्याप्रत) महाराज, किंचित् या पडद्याचे आड व्हा. ह्मणजे मग तुमचं तुह्मांलाच कळून येईल, कीं तो पक्का दगलबाज आणि राजद्रोही आहे! तुमचा खून केल्याचं मी त्याला सांगत असतां त्याच्या चेहेऱ्यावर आनंदवृत्तीमुळें कसकसा फरक होईल तें नीट लक्ष लावून पहा. तसंच मला पद्मनगरीचे सेनापति ह्मणून तो माझी पाठ कशी थोपटील, "पद्मनगरींतील लोकांच्या

भायाबहिणींनां, तूं या कामांधाच्या जाचांतून पूर्णपणं मुक्त केलंस, " ह्मणून तो माझा किती गौरव करील, आणि मला कसकसा चढवून देईल, हें सारं आपण नीट लक्षपूर्वक पहा; मग मात्र हा कोपनशील जें काय सांगत आहे, त्याबद्दल आपली पुरी खात्री होईल! हं आलाच तो! तर व्हा, आड व्हा (चित्रवीर्य आड होतो व ललितराज येतो.)

**ललितराज**—(आपल्याशीं संशयित असा) हा आतां कोणाशीं बरं बोलत होता इतक्यांत? (उघड) हँ: कसं काय कोपनशील?

**कोप०**—कसं काय असायचं? तें उरकून मी केव्हांच मोकळा झालों!

**ललित०**—काय, तें उरकून मोकळे झाला? तें काय?

**कोप०**—तें काय! अहो? आपलं ठरल्याप्रमाणं त्या चांडाळ चित्रवीर्याला या जगांतून पार नाहींसा केला! ह्या ह्या हातानं मी त्याच्या प्राणांना त्याच्या देहांतून बाहेर पडायला वाट करून दिली!

**ललित०**—छत्, असं कसं होईल? खचित, त्या कृपासागर परमेश्वराचा पद्मनगरीच्या नागरिकांवर इतका कोप कधींहि होणार नाहीं! भगवन्! हे सर्व शक्तिमान् प्रभो! काय? महाराजांचा खून! आणि तो कोपनशीलासारख्या थोर, कुलीन, आणि पिढीजात इमानी सरदाराच्या हातून! छे:! हे माझे कान माझ्याकडून हें भलतंच कांहीं तरी ऐकवीत आहेत, हेंच खरं!

**कोप०**–(साश्चर्य) काय? तर मग आपण दोघांनीं मिळून महाराजांना ठार मारण्याचा कट नाहीं केला?

**ललित०**–काय आपण दोघांनीं? आणि महाराजांना ठार करण्याचा कट! अहो, कोपनशील! जरा शुद्धीवर या. खचित, तुह्मीं कांहीं तरी बरळतां आहां हें? तुमची ही अशी दशा व्हायला–काय, असं कारण तरी काय झालं? चित्रवीर्य महाराज कुठं आहेत? त्यांच्या भोंवतीं जगद्रक्षक परमेश्वराचा खडा पहारा असतां, या पद्मनगरींत त्यांना कंठस्नान घालण्याची कोणाची छाती आहे?

**कोप०**–वा: ही कोल्हेगिरी मात्र फार नामी! (आपल्याशीं) छत्. पहिल्यापासून याचं यांत अंग असून ज्या अर्थीं हा आतां आपलं अंग अज्जीबात काढून घेतो आहे, त्या अर्थीं हा पक्काच बिलंदर आणि दगलबाज! (उघड) ललितराज, आपण सध्यां अगदीं एकटे आहोंत. इथं कोणी दुसरं चिटपांखरू देखील नाहीं! अन् मग हे इतके आढेवेढे कां? अगदीं तुमच्या सांगण्याप्रमाणं मीं केलं आहे हें! आणि मग आतां कां असं?

**ललित०**–काय? मी! आणि तुमच्या या अशा कटांत? तर मग ही पृथ्वी दुभंगून, तिच्यांतून या जगांतील सगळ्या मनुष्यांना खाऊन टाकण्याकरितां मी एक मोठा राक्षसच जन्माला आलों आहें ह्मणायचा! बः कोपनशील! खाशी! लोकांच्या गळ्यांत पडण्याची

खाशी युक्ति ही! (बदलून मोठ्यानें) महाराज! तुह्मीं किती तरी हो माझ्यावर प्रेम करीत होता? तुह्मीं आणि मी एका रक्ताचे आणि हाडामासाचे ना? नीचा! हरामखोरा! तुझ्या राक्षसी हाताचे तुकडे तुकडे कां नाहीं होऊन जात! धांवा हो धांवा! खून, खून!! महाराजांचा खून!!!

**काप०**—अस्सं काय? इतक्या थरावर गोष्ट आणलीस एकून! ठीक. तर आतां ही समशेरच तुझ्या काळजाचा ठाव काढून तुझ्याकडून खरी साक्ष देववील! (तरवारी उपसतात इतक्यांत चित्रवीर्य घाईनें पडद्याचे पुढें येऊन दोघांस आंवरतो.)

**चित्र०**—हं आटपा, आटपा! आपापले हात मागं घ्या.

**ललित०**—(आनंदानें) छत्! महाराज! सोडा, सोडा त्यानां, त्यानां खुशाल येऊं द्या आतां माझ्यावर चाल करून! आतां यानीं मला ठार करून जरी माझे तुकडे तुकडे केले तरी त्याची देखील मला आतां मुळींच पर्वा नाहीं! महाराजानां जिवंत पाहिल्यानं—ह्या घटकेला जो कांहीं मला आनंद होत आहे, त्यापेक्षां जास्त आनंद आणि सुख भोगण्याची आतां माझी बिलकूल इच्छा नाहीं! आतां या घटकेला मी मेलों तरी देखील बेहेत्तर!

**चि०**—**कोपनशील!** काय हें? बस्स ह्मणून सांगतोंना मी?

**कोप०**—महाराज! याच्या गालावर पसरणारं हें प्रत्येक

हंसं, ह्यांत देखील राजद्रोह तुडुंब भरून राहिल्याचं मला स्पष्ट दिसत आहे!

चि०—कोपनशील! जरा शांत व्हा. तुह्मीं फार—फार तापट आहां! तुमचा ललितराजाविषयीं पुरा गैरसमज झालेला दिसतो!

ललित०—मी तर यांना अजूनहि थोर समजतों. मला वाटतं यांनीं माझ्या राजभक्तीची मुद्दाम ही परीक्षा केली, हेंच खरं. आणि ह्मणूनच यांच्यासंबंधानं माझ्या मनांत कांहीं एक काळं बेरं नाहीं. माझा दिल् साफ आहे.

चि०—असं असेल तर भेटा पाहूं तुह्मीं एकमेकानां अगदीं निर्मळ अंतःकरणानें. बरं, पण हे कोण येताहेत इतक्या घाईनं?

[क्रांतिवर्म व आनंदघन घाईघाईनें येतात व दयाळजीस धरून आणतात.]

आनंदघन०—(क्रांतिवर्म्यास) महाराज तर इथं आहेत. (महाराजांस) महाराजांचा विजय असो.

चि०—कोण आनंदघन? काय—कसली गर्दी आहे?

आ०—कोतवाल, खेंचा त्याला. (दयाळजीस कोतवाल खेंचतो) महाराज! या पद्मनगरांतल्या लोकांनीं आपल्या मृत्यूची दुष्ट बातमी सर्व नगरभर पसरून एकच गर्दी उसळून दिली आहे! कांहीं लोक तर भयंकर शस्त्रं घेऊन बंड उभारून, वाड्याभोंवतीं एकसारखे घिरट्या घालीत आहेत. त्यापैकीं दयाळजी हा एक पुढारी आहे, असं वाटल्यावरून त्याला कैद करून महाराजांपुढें आणला आहे.

चि०–काय! माझ्या मृत्यूची बातमी! आणि माझ्याविरुद्ध बंड!

ललित०– ( हंसून ) कार्तिवर्म, त्या दयाळजीला अगोदर खुला करा. (महाराजांस) महाराज! श्रीनगराहून बंडाची बातमी आल्यादिवसापासून महाराजांच्या विरूद्ध–खरोखरीच कट अथवा खटपटी चालल्या आहेत कीं काय, हें काढण्याकरितां मी सर्व शहरभर गुप्त हेर ठेविले आहेत. आणि हे दयाळजीहि त्यांपैकींच एक प्रमुख हेर आहेत–( कोतवाल त्यास खुला करितो. ) दयाळजी! हा प्रकार कसा झाला?

द०–महाराज! कोतवाल साहेबानां अगोदर त्या आनंदघनालाच पकडायला सांगा. तोच, बंडवाल्यांचा मुख्य पुढारी आहे!

ल०–महाराज, तो पहा एकदम पळून चालला! कोतवाल, धरा, पकडा त्याला, बघता काय? कार्तिकशंभूचा आणि याचा पत्रव्यवहार असण्याचं हेंच–हेंच कारण. माझे आणि कार्तिकशंभूचे महाराजांविरुद्ध कट चालत असल्याचं काहूर यानंच पूर्वीं उठविलं होतं. पण महाराजानां आतां आला कीं नाहीं मी ह्मणत होतों त्याचा पुरा अनुभव!

चि०–त्याच वेळीं मला संशय आला होता! पण तो नुसता संशय होता! आतां आधीं मला याची चौकशी केली पाहिजे. चला, त्याला वाड्यांत घेऊन चला!

कांति०—महाराज! हें काय?

चि०—या वेळीं मी कोणाचीहि तरफदारी ऐकणार नाहीं. आतां सर्व चौकशी वाड्यांत, आणि तुह्मां सर्वांनां तिथं हजर राहिलं पाहिजे. (सर्व जातात.) चला, कोपनशील, आजपासून तुह्मीं माझे भाऊ, आणि आनंदवल्लरी माझी बहीण! [जातात.]

[अंक ३ रा समाप्त.]

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**–पद्मनगरींतील एक आड रस्ता.

[ प्रवेश—पुरभय्याचे वेषांत असलेला रणधीरराव येतो. ]

रणधीरराव०—काय दैवाचे खेळ आहेत! परवां महाराजानां पश्चात्ताप होऊन ते ताळ्यावर आल्याचं जेव्हां मीं ऐकलं, तेव्हां आपण उजळ माथ्यानं प्रगट व्हावं असं एकदां माझ्या मनांत आलं. पण सरदार आनंदवनांची धरपकड, आणि दारूच्या प्रत्येक घोटाबरोबर पिराजीच्या तोंडून सहज स्फोट होऊन बाहेर पडणारे ललितराजाचे पुढचे बेत ह्यांनीं मला सावध केलं. ( फाटकीं वस्त्रें धारण केलेली भ्रमिष्ट गिरिजा येते तिला पाहून ) अरे! पण, ही कोण वरं इकडं येत आहे? ही तर गिरिजा. भ्रमिष्ट झालेली गिरिजा ही! पहिल्या पहिल्यानं महाराजांच्या नांवानं ही खडे फोडी, आणि झाडून साऱ्या सरदारानां अन् मानकऱ्यानां शिव्या देत सुटे; त्यावेळीं ही वेडी आणि भ्रमिष्ट आहे अशा बतावणीवर मीं हिचा बचाव केला. नाहींतर ललितराजानीं हिला केव्हांच तुरुंग दाखविला असता! पण आतां पहावं तर ही खरोखरांच भ्रमिष्ट झालेली दिसते! अरेरे! काय ही हिची दशा! तेव्हां आतां

हिचं हें वेड आणि भ्रम नाहींसा करायला हीच युक्ति केली पाहिजे. ( पुढें जाऊन ) माताजी !

गिरिजा०—मेल्या, तूं रे कोण मला माताजी ह्मणणारा? माझा पळून गेलेला मुलगा रामसिंग तर नाहींस तूं? पण छेः! हें कसं घडून यावं? ( बदलून ) तें कांहीं नाहीं. असंच, अगदीं असंच. सगळ्या पुरुषानीं आपली लाज लज्जा, अब्रू आणि लौकिक हीं ढुंगणाची सोडून डोक्याला गुंडाळलीं आहेत! मग यांतून तूंच कसा सुटणार!

रण०—( गिरिजेचे पाय धरून ) नहि माताजी. मै तुह्मारा संतान—हूं. मेरा नाम रामसिंग.

गि०—( साश्चर्य ) रामसिंग! तेरा नाम रामसिंग? सच कहते हो? ( बदलून ) अरे! रामानं रावणाला मारून सीता देवीची लाज राखिली.

रण०—तुह्मारा पुत्र होकर मैभी तुह्मारी लाज रखूंगा. इधर तो सबहि भ्रष्ट हो रहे है. इधर नहि रहेना. माताजी! कृपा कर मेरे साथ चलो. ए भ्रष्टकारसे तुह्मारा मस्तक भडक गये है. तुमकू मै मेरा मातृस्थान समजता हूं. तूं शांत होकर मेरे घरमे चल. तेरे पवित्र चरणोंके प्रतापसे मेरा घर मातृतीर्थ बन जायगे, और तुम् अपना सबहि दुःख भूल जाय गे, इसी तऱ्होंसे मै तेरी सेवा करूंगा.

गि०—चल, चल; माझे पाय सोड.

**रण०**—माताजी! मेरा घर मातृतीर्थ करनेका जबतक बचन नहिं मिलेंगा, तबतक मय तुह्मारा पवित्र पाव कभी नहि छोडेगा! मेरे शिरपर लत्ताप्रहार करो, मै उसकू गंगाजन्ना माताका तीर्थ प्रसाद, या जलतुशार समजेगा! तुमारें पेटमे दो तीन दिन कुच अन्न भी नहि गया ऐसा दिखता है! तुमारे झोले जाते है! तुमारा कपडाभी फट गया है! पेननेकू कुच टूमदार लत्ता कपडा पेनले, डाळरोटीका एक दो तीन ग्रास लेकर आत्मशांति तो कर दे, या मेरा घर पावन कर ले! माताजी—

**गि०**—माताजी! देवा! मला माताजी ह्मणून ह्मणणारा हा कोण बरं असावा? अथवा असं तर नसेल कीं त्या देवी सीतेचं आणि द्रौपदीचं दुःख हरण करणारा तो श्यामसुंदर, दयाघन, दाशरथी श्रीरामचंद्र, नाहीं तर द्वारकाधीश श्रीकृष्णच तर नसेल धांवून आला माझा धांवा ऐकून? पण हें कसं होणार! इतकी कुठली असणार माझी पुण्याई! (रणधीररावास) बाबा! सोड, सोड माझे पाय. मीच तुझे पाय धरिते. कारण माझा धांवा ऐकून तूं धांवून आला आहेस. (त्याचे पाया पडूं लागते.)

**रण०**—माताजी! प्रणाम करनेका मेरा अधिकार है; और लेनेका अधिकार तेरा है. मेरेकू तूं प्रणाम मत करो. चलो मेरे सात. तुमकू मै दवापानी, अन्न

देऊंगा, उसका सेवन करो, मै खुद आपने हातसे तेरी सेवा करूंगा.

**गि०**–चल, चल बाबा, तुझ्याच मर्जीप्रमाणं होऊं दे. देवा!! तूं अनाथानां-संकटांत सांपडलेल्यानां-कोणच्या रूपानं आपलं दर्शन देऊन सहाय्य करशील हें आह्मा अल्पबुद्धी मनुष्यानां कसं कळणार? चल, ऊठ ऊठ.

**रण०**–चलो माताजी! मेरा हात पकडो. मै तुमकू घरकू ले जाता हूं. ( गिरिजेचा हात धरून जातां जातां स्वगत ) इथपर्यंत तर आपला कार्यभाग चांगला उरकला. आतां पुढचं पुढं. हिला एकदां माझ्या बायकामुलांत नेऊन टाकली ह्मणजे मग हिला ताळ्यावर आणायला किती उशीर?

[ जातो. ]

---

## प्रवेश २ रा.

**स्थलः**–ललितराजाचे वाड्यांतील एक महाल.

**प्रवेश**–ललितराज एकटा येतो.

**ललितराज**–काय करावं? अजूनपर्यंत माझे बेत नीटसे यशस्वी होत नाहींत. ते ज्या तऱ्हेनं रंगारूपाला यायला पाहिजेत तसे येत नाहींत. माझे साथीदार

अगदीं आयत्या वेळीं माझ्यावरच उलटून, माझ्याशीं दगलबाजी करून, मलाच संकटांत घालतात. असा हा अनुभव आज मला हा दुसऱ्यानं येत आहे. एकून या जगांत इमानी आणि विश्वासूक असे लुच्चे आणि नीच लोक उरलेच नाहींत काय? सगळेच धर्मशील आणि सत्वस्थ बनले! ह्या ललिताला धड मनुष्यानीं नाहीं, पण हिडिस् भुताखेतांनीं सुद्धां मदत करूं नये! तर मग आतां यापुढं मी केवळ दैवावर हवाला टाकून अगदीं स्वस्थ बसावं आणिं जें जें होईल तें तें खुशाल होऊं द्यावं! त्या कोपनशीलानं मला अगदीं खड्डयांत गाडून टाकण्याची वेळ आणली होती! पण माझ्यावर पाहरा करणाऱ्या धूर्त रक्षक देवतांनीं त्यांतून माझा बचाव केला! तशीच त्या कोपनशीलाची बहीण ती आनंदवल्लरी! तिनं तर त्या चित्रवीर्याला आपल्या कौमार्याच्या दिमाखानं अगदीं दिपवून सोडलं आहे! तर आतां सिधे मार्ग उपयोगी नाहींत. यापुढं नवीन यंत्र सुरू करून, या स्वारीला पुन्हा चांगला गोत्यांत आणला पाहिजे! असा—कीं ह्याला पाहतांच सगळ्यानीं ह्याचा तिरस्कार आणि द्वेषच करावा! हा आपला डाव एकदां साधला, कीं बस्स! या स्वारीला या जगांतून अज्जीबात उडवून देऊन मी आपला सुरेख सूड उगवून घेतो! बस्स, ठरलंच! अगदीं असंच करायचं!

[ इतक्यांत् एक चाकर येतो. ]

**चाकर०**-सरकार, भाईर कोपनशील म्हाराज

आल्याती, त्ये-खुद्द धनीसायबासंगं काईबी ब्वालायचं हाये म्हून म्हंग त्याती !

**ल०**–कोण कोपनशील ?

**चा०**–व्हय धनीसाब.

**ल०**–तर असा इकड ये. (त्याच्या कानांत कांहीं पुटपुटतो ) समजलं ? जा, पाठऊन दे त्यानां आंत. ( चाकर जातो व कोपनशील येतो. ) यावं कोपनशील, अलीकडं आपण कुठं अगदीं भेटला नाहीं ?

**कोप०**–आणि या पुढंहि भेटण्याची इच्छा नाहीं !

**ल०**–हँ ! आपण अगदीं कपाळाला आठ्याबिठ्या घालून अन् मार भिवया चढवूनसे आलांत ? मलाहि पण तशा घालतां येतील. काय, आहे काय आपलं ह्मणणं ?

**कोप०**–ह्मणणं ? आपण माझी अगदीं नाचक्की करून सोडली आहे !

**ल०**–आणि आपण माझा सर्वस्वी घात करून सोडला आहे !

**कोप०**–घात ! आणि तो कसा !

**ल०**–कसा ? कसा ह्मणजे–त्या चित्रवीर्याजवळ नीचपणानं आपला कट फोडून !

**कोप०**–पण तुह्मीं राजद्रोही आसल्याचं तिथं नाकबूल केलंत कीं नाहींत ?

**ल०**–हो, केलं ह्मणजे ? अलबत केलं. आपण होऊन कुऱ्हाडीच्या धारेवर आपली मान ठेवण्या इतका

मी मूर्ख नाहीं! आणि अशा रीतीनं माझ्यावर राजद्रोह स्थापून आपण राजभक्तीचा टेंभा मिरविणार होता नाहीं कां? असा वखत जर पुन्हा आला—

**कोप०**—तूं फार नीच आहेस. आणि ही गोष्ट तुझ्याच हातानं लिहून घेऊन, ती चित्रवीर्य महाराजांनां दाखवावी, एवढ्याच करितां मी इथं आलों आहे!

**ल०**—आपण जें सध्यां ह्मणत आहां त्याच्या अगदीं उलट आपल्याकडून मी वदवीन; इतकंच नव्हे तर मी अत्यंत इमानी आहें असं आपल्याला ह्मणावं लागून, उलट आपल्यालाच माझी क्षमा मागावी लागेल! हें पहा, या तुमच्या समशेरीसारखी माझ्या जवळहि एक जाज्वल्य समशेर आहे! तुमच्या दंडाप्रमाणें माझेहि दंड चांगले कसलेले असून, तुमच्या छातीसारखीच माझी छातीहि निधडी आहे! शिवाय तुमच्यापेक्षां मला हिंमत कमी आहे असंहि कांहीं नाहीं. मात्र तुह्मीं आहांत जरा घोड्यावर. तुह्मांला आपल्या सामर्थ्याची घमेंड आहे आणि त्याचा तुह्मीं उपयोग करणार! मला तसं कर्तव्य नाहीं. असं जरी आहे तरी मी तुह्मांला हतवीर्य करून सोडणार हें खास! आणि तें हे--केवळ मी आपल्या निरपराधीपणानं!

**कोप०**--निरपराधीपणानं अँ! प्रत्यक्ष इंद्राच्या वज्राला देखील आपण भिणार नाहीं तर! अरे नराधमा! मी जर तुझे तोडून तोडून राई राई येवढे तुकडे केले तर सगळ्या जगावर महत् उपकार केलेसें होतील!

अथवा तुझे असे तुकडे तुकडे केले तरी जरासंधाप्रमाणें ते पुन्हां एकाला एक येऊन चिकटणार नाहींत ह्मणून तरी कशावरून! सारीं भुतं, खेतं, समंध, आणि प्रत्यक्ष त्यांचा राजा वेताळ ह्यानां देखील कबूल करावं लागेल कीं,—तुझ्या सारखीं नीच, दुष्ट, व घाणेर्डी कृत्यं करणारा या साऱ्या दुनियेंत एक तूंच! तुझ्या तोडीचा एक देखील दुसरा प्राणी नाहीं! नीचा! बोल, महाराजांना ठार करण्याच्या कटांत तूं नव्हतास?

ल०—हो! मग ही गोष्ट कोण नाकबूल करतो? एवढचं नव्हे पण हेंहि मी कबूल करितों कीं इतकंच करून मी थांबलों नाहीं, तर—त्याला ठार करण्याकरितां—त्याचा खून पाडण्याकरितां—तुला चढीलाहि पण मीच दिल्हा! पण कोपनशील! मनुष्यानं एखादं पापकर्म केलं—भयंकर पापकर्म केलं—तर त्याबद्दल त्याला पश्चात्ताप होऊन, त्या पापाचं त्याच्या हातून कधीच क्षालन होऊं नये काय? मला वाटतं पश्चातापानं हें अगदीं शक्य आहे.

को०—तर मग आपल्याला कृतकर्माचा पश्चात्ताप होत आहे?

ल०-ह्मणजे! हें काय विचारतां? पुरा पश्चात्ताप.

को०—तर मग प्रत्यक्ष खवीसच दत्ताचे भजन करूं लागला ह्मणायचा! अशा रीतीनं आपला नीचपणा जास्त भेसूर करूं नकोस.

ल०—हें पहा, ज्या वेळीं महाराज विषयासक्त आणि जुलमी दिसले, त्या वेळीं अर्थातच त्यांच्याशीं मी उत्र-

पणानं वागलों. पण त्यांची वृत्ती पालटून ते जेव्हां निघळले तेव्हां त्यानीं चिरायु व्हावं ह्मणून मी परमेश्वरापाशी करुणा भाकूं लागलों आणि त्यांचे हुकूम पाळायला मी एका पायावर तयार झालों!

**को०**–ही आपली सगळी लुच्चेगिरी आणि दगलबाजी आहे! ही सारी बतावणी केवळ आपले प्राण बचावण्याकरितां आहे!

**ल०**–काय, प्राण बचावण्याकरितां?–कोण आहे, तिथं आंत?–किसन! [ चारीकडून चार पांच हत्यारी जवान येतात. ]

**प० जवान**–सरकार.

**दु० ज०**–खावंद! काय हुकूम आहे बंद्याला?

**इतर ज०**–काय आज्ञा आहे धनीसाहेबांची? ह्या नंग्या समशेरी धन्याच्या आज्ञेची वाट पहात आहेत!

**को०**–यांच्याशीं आपलं कांहीं काम आहे वाटतं? हं! तुमच्या ह्या अशा भेडसावणीला कोपनशील भिईल असं तुह्मांला वाटलं? याद राखून असा–असले पांच नाहीं पण आणखी पंचवीस जवान जरी आले, तरी हा कोपनशील कोणालाहि दाद देणार नाहीं! एक मारील किंवा मरेल! ( तरवार उपसतो. )

**ल०**–मराल, हेंच खरं! पण कोपनशील, असे हातघाईवर येऊं नका. ह्यानां नुसती इशारत मिळण्याचा अवकाश कीं यांच्या तलवारींचीं टोंकं तुमच्या छातीशीं येऊन भिडलींच ह्मणून समजा! पण तसं करण्याचा

माझा बिलकुल इरादा नाहीं. ( जवानास ) हरकिसन तुमची सर्वांची माझ्यावर इतकी भक्ती आहे आणि वक्तावर तुह्मीं हजर राहता हें पाहून माझा दिल् फार खूष होत आहे. पण जा आतां तुह्मीं. सध्यां तुमचं कांहीं काम नाहीं.

**सर्व जवान०**—जी हुकूम. ( जातात )

**कोप०**— ( साश्चर्य आपल्याशीं. ) हे गेले. चालते झाले कीं हे मुकाट्यान! नाहीं,--पण इथ कांहीं दिलदार-पणा आणि थोर मन असल्याचं स्पष्ट दिसून येतं!

**ल०**—कां? आतां तरी झाली का आपली खात्री कीं आपल्या समशेरीला अथवा आपल्या पराक्रमाला नाहक भिणारा हा ललितराज नव्हे ह्मणूनी? तुमच्या ह्या अवि-चाराच्या हूडपणाला मीं केव्हांच मात्रा पोंचिवली असती, पण असं केल्यानं व्यर्थ हत्या घडेल या भीतीनं मी तुह्माला आज जीवदान देत आहे!

**कोप०**-( स्वगत) ह्मणजे? मी आतां स्वप्नांत आहे कीं जागा आहे? याचं मन खरोखरीच इतकं मोठं आहे काय?

**ल०**-हं चालूंदे. माझ्या हातून लज्जास्पद अथवा निंदास्पद असे घडलेले प्रकार मी आतां अगदीं शांत पणानं ऐकून घेणार.

**कोप०**—काय, हें सगळं खरं का? कीं ललितराज सद्गुणमंडित झाल्याचा हा निव्वळ बहाणा करीत आहे? हा बहाणा—बहाणाच खरा! कारण ह्याला पश्चाताप व्हावा हें संभवत सुद्धां नाहीं! अगदींच अशक्य हें !

ल०–अशक्य! कां बरं? हें पहा. कोपनर्शील! तुह्मीं अगदीं खचवून गेलां अहांत. जरा शांत व्हा आणि मग बोलूं आपण दोन शद्ब. हें पहा–महाराजांना ठार करण्या संबधानं आपण सुद्धां नव्हता का पहिल्यानं कृत-निश्चय केलात?

कोप०-होय मग मी कुठं हें नाकबूल करितों?

ल०–मग आपण ह्या पासून पराङ्मुख कां बरं झालांत? एकदम जाऊन त्याला आपल्या समशेरीच्या टोंकानं भोंसकून कां नाहीं टाकलंत?

को०–कां ह्मणजे? त्यांची वृत्ती पालटून ते सन्मार्गाला लागले,--ह्मणून.

ल०-हं! ठीक आहे! आणि ह्मणूनच तुह्मांला त्यांची दया निपजली. आणि अर्थातच अगोदर केलेल्या बेताबद्दल तुह्मांला पश्चातापहि झालाच असला पाहिजे, नाहीं?

कोप०–अर्थात्. हें अगदीं सरळ आणि उघड आहे.

लॉल०–ठीक. तर मग आतां तुह्मींच सांगा कीं–हीच महाराजांची वृत्ती पालटल्यामुळं माझ्याहि चित्त-वृत्तींत आपल्या प्रमाणेंच कां बरं फरक पडूं नये? आणि महाराजांच्या संबंधानं माझ्या मनांत निश्चल प्रेम निपजून मी जें साहस करणार होतों त्या बद्दल मला खेद आणि विषाद कां बरं वाटूं नये? हें पहा आतां मीच जर तुह्मांला, महाराजांच्या संबंधानं तुमच्या मनांत कपट असून तुह्मीं फक्त वरकांती मात्र इमान दाखवितां,

असं ह्मणून तुह्मांला जर अजूनहि दगलबाज, विश्वासघातकी, आणि राजद्रोही असंच समजत राहिलों, तर मी अत्यंत अनुदार आहे अशी आपल्या मनाशीं गांठ घालून तुह्मीं मला दूषण नाहीं कां देणार?

को०—( विचारांत निमग्न व स्वगत ) हो. हा ह्मणतो तें बरोबर आहे. याच्या बोलण्यांत खोडसाळपणाचा भाग कांहींच दिसत नाहीं. अथवा बरोबरच. आह्मीं दोघंहि माणसंच. दोघंहि सारखीच चुकीला पात्र!

ल०—कां? आतां असे स्वस्थ का? कसल्या गहन विचारांत पडला आहांत? अहो, मी कांहीं अगदींच माणसांतून उठलों नाहीं! देवा धर्माची आणि खऱ्याखोट्याची मला कांहीं भीती आहे! चित्रवीर्य महाराजांविषयीं माझी पूर्ण पूज्यबुद्धि आहे. आणि इतकं असूनहि—याउप्पर माझ्या संबंधानं आपली जर खात्रीच होत नसेल, तर—माझा नाइलाज आहे.

को०—हें पहा, ललितराज! आपण ह्मणतां यांत कांहीं लबाडी अथवा कपट असेल असं मला आतां मुळींच वाटत नाहीं.

ल०—कोपनशील! आपण दोघेहि जरा अविचारीच ह्मटलं असतां चालेल! हें पहा, इतका वेळ माझ्या तोंडून येऊं नयेत असे जर कांहीं शब्द आले असतील तर त्याबद्दल मला माफी असावी. खरोखर—आतांपर्यंत तुमच्याशीं मी फार कठोरपणानं वागलों. पण या पुढं मी तुह्मांला माझ्यावर प्रेमच करायला लावीन! मला

आपला स्नेही आणि दोस्त होण्याचा मान मिळाला, ह्मणजे मी आपल्याला मोठा धन्य समजेन!

को०—ललित—ललित! आपल्यां संबंधानं माझं मन आतां अगदीं पाक झालं. एवढासा देखील अंदेशा अथवा किंतू कसा तो उरला नाहीं.

ल०—( पिराजी येतो त्यास पाहून स्वगत ) ठीक. हा ठरल्याप्रमाणं वेळेवर आला! ( पिराजीस उघड ) हं काय आहे रे?

पि०—हें पत्तुर दिलंया धनी सायबानीं. ( पत्र पुढें करितो. )

ल०—काय पत्र? ( पत्र घेऊन वांचू लागतो. )

को०—( स्वगत ) हा प्रियाळाकडे असतो नव्हे! तर ह्यालाच विचारावं प्रियाळांची तब्येत कशी काय आहे ह्मणून! कारण ते मला बरेच दिवसांत भेटले नाहींत, ह्मणजे—( विचार युक्त )ते बेशुद्ध होऊन आजारी पडल्यापासून ह्मटलं तरी चालेल. हा अनायासें इथं आला आहे.तेव्हां याला विचारायला काय हरकत आहे?

ललित०—( मोठ्यानें ) प्रियाळांचें मदनिकेशीं लग्न! छत् या पत्रांत हे कांहींतरी मोठी चूक करीत आहेत. कायरे पिराजी, प्रियाळरावांच लग्न कोणाशीं ठरलं आहे? ह्या आमच्या कोपनशीलांच्या बहिणीशीं आनंदवल्लरीशीं ना?

पि०—न्है धनीसाब. त्ये कवाच फिसकाटलं की! अन् ती जरखड—थेरडी औरत—म्हावका न्है का—तिच्या,

आपल्या पोरीसंग त्येनी लगीन लावावं म्हूनशनी कवा पासून तरी मायंदाळ खटपटी चाललया हैती!

ल०—(पुढें येऊन मोठ्यानं.) कोपनशील! प्रियाळ त्या गब्बर थेरडीची पोरगी—ती मदनिका—तिच्याशीं लग्न करणार आहेत हें खरं का?

को०—हां! (दांत ओठ चावतो.)

ल०—आमचा आजपर्यंत असा समज होता कीं आपली बहीण त्यानां नेमस्त केली आहे ह्मणून. मग हें जुळलेलं मोडलं कीं काय?

को०—कायरे ए गद्या तूं प्रियाळांच्या कडेच असतोस ना?

पि०—व्हय धनीसाब.

को०—आणि असं असून तू बेधडक त्यांचं मदनिकेशीं लग्न होणार ह्मणून ह्मणतोस, हें कसं?

पि०—त्येंच्या पत्तरामधीं हाये त्येच मी म्हंगतो. अन् जें ठरलया त्येच पत्तरामदी लिवलया!

को०—(पिराजीस ठोसे मारून) गद्धया हे घे. आणि आजपासून खरं कसं बोलायचं तें शीक अगोदर! समजलास?

ल०—(हलकेच) ह्या ठोशानीं त्याचे प्राणच निघून जायचे! (मोठ्यानें) हें पहा कोपनशील! हें असं होईल हें कांहीं संभवत नाहीं. निदान तुमच्याशीं तरी इतकं धाडसाचं आणि बेमुर्वतीचं वर्तन त्यांच्या हातून करवणार नाहीं. आणि दुसरं असं कीं एकदां ठरून

चुकलेलं लग्न ते मोडणार तरी कसं? सगळं जग थुंकेल कीं त्यांच्या तोंडावर अशानं! आणि त्यांतून आनंदवल्लरीसारख्या सद्गुणी कुमारीशीं जमलेलं लग्न तो मोडील! छत् घरंदाजांना आणि कुलीनांना हें शोभण्यासारखंच नाहीं. अशा तऱ्हेनं ठरलेलं लग्न त्यांनीं कां मोडावं, यावर आपली तरी नाहीं कांहीं कल्पना चालत! कायरे, पिराजी! हें लग्न मोडायला काय— असं झालं तरी काय?

पि०—धनी सायबानीं असं वंगाळ काम कशापायीं क्येलं त्ये ह्या पिराजीला तरी न्हे काईबी ठावं! त्येंचा मान अन् खांदा त्येंचा त्येस्नींच ठावा. मी ग्येलो खरं सांगाया तर मला मिळनुया पलागनीचा मार! तवा खऱ्याची दुनिया न्हे, असं न्हवका धनीसाव? पन् खरं त्ये कवाबी खरंच. माज धनीसाव शाप म्हंगत्याती कीं आपनास्नी काई आनंदवल्लरी संग शाप लगीन करायचं न्हे! तिनं त्ये व्होवं त्येच्याशीं करावं; त्येला आपली काईबी हरकत न्हे! अन् आपुन नमद्या पदमपुरीभर ह्ये असंच सांगत सुटनार असं धनीसाव म्हंगत्याती!

ल०—काय? आनंदवल्लरीसारख्या कुलीन आणि गुणवती कुमारीशीं ठरलेलं लग्न हा मोडून टाकतो?

को०—( पिराजीस. ) गद्धा, पाजी, बेवकूब, नाहींतर!

ल०—कंपनशील, व्यर्थ त्याच्यावर रागावण्यांत काय अर्थ? यांत त्याचा थोडाच अपराध आहे त्याचा धनी

जें काय भकला आणि बरळला असल तेंच तो सांगतो आहे.

पि० अन् खरं सांगन्या पाई माज्या हातूनशनी जर कां धन्याची काईबी चूक झाली असेल, तर ती दुरुस्त कराय मुकत्यारच हैती कीं धनी! मी काय–सांगितल्या कामाचा नोकर!

का०–(स्वगत) काय! तर मग हा ह्मणतो हें ऐकून एक खरं असेल?

ल० खुद्द आपल्याला हें यापूर्वी ठाऊक नसावं ह्मणजे मोठंच चमत्कारिक!

को०–चमत्कारिक! नाहीं, पण याची आणखी एकदां फर तपासणी केली पाहिजे!

ल०–कापनशील, जरा शांत व्हा. असे खवळून नका जाऊं. त्या बिचाऱ्या गड्यावर कां उगीच राग? जरा शांत व्हा म्हणतोमना.

को०–शांत व्हा! हा शांतपणा त्या किचकट पोरांनां आणि पढत मूर्खांनां, शिकवा मला नको. (संतापून क्रोधानं) अरे! अरे!! अरे!!! या कापनशीलाचे ते लांडगे आणि कोल्हे येऊन कां नाहीं तटात्तट फाडफाडून तुकडे करून टाकीत! तर मग एकून आतां या उप्पर मला जें या जगांत जीव धरून रहायचं तें केवळ दुःख आणि शोक करण्याकरितां, असंच कीं नाहीं? त्या प्रियालान जर खरोखरीच ताईशीं लग्न करण्याचं मोडून टाकून दुसऱ्या एखाद्या स्त्रीशीं लग्न करण्याचं

ठरविलं असेल तर तें अत्यंत लज्जास्पद आणि शरमेचं! कारण याभुळं लोक साहजिकच प्रश्न करतील कीं,– त्या प्रियाळांचं आणि आनंदवल्लरीचं लग्न व्हायचं ठाम ठरलं असतां प्रियाळ असे एकदम बदलले कां? नाहक दुर्लौकिक आणि नामुष्की व्हायला एवढंच बस्स आहे! (कपाळास आठ्या घालतो.) नाहीं, पण, याला हेंच औषध! या शिवाय मार्गच नाहीं दुसरा! ह्या अशा हरामखोराला या उप्पर या जगांत उजळ माथ्यानं वावरूं देणें हेंच पाप! नाहीं, यापुढं दुसरी गोष्ट नाहीं. त्या अधमाला आत्तांच्या आत्तां त्या यमपुरीचीच वाट दाखवितों! थांब ह्मणावं, तुझं आतां आनंदवल्लरीशीं तर नाहींच–पण तें ह्या समशेरीशीं लग्न लावून हिनंच तुझीं वस्त्रें लालभडक करून सोडतों! आतां तुझा रंगमहाल ह्मटला ह्मणजे भूतं, खेतं, पिशाचं, समंध आणि सैतान धुडगुस घालणारी ती ओसाड आणि भयाण स्मशानभूमी! [जातो.]

ल०–(आपल्याशीं.) हं रागाव! रागाव! हवा-तितका रागाव! जगांत जितका ह्मणून क्रोध आणि संताप असेल तितका ह्याला करकरा खाऊन सोडूं दे! आणि मग या तुझ्या क्रोधाग्नीला प्रियाळ जरी बळी पडला तरी त्याच्या मरणाला मी कारण झालों असा कोणाला संशय सुद्धां यायचा नाहीं! ज्याला थोडीशी अक्कल आहे, थोडासा मेंदू आहे त्याची खुबी तर हीच कीं, जहर तर पाजायचं पण त्याचा काळेनिळेपणा मात्र

बिलकुल कुठं दिसूं द्यायचा नाहीं; आंतल्या आंत काळ-जाला भोंसकायचं अनू पण त्याचे घाव मात्र बाहेर दिसूं द्यायचे नाहींत ! पण बैलोबा ! हें तुला कसं आणि कुठून कळणार ! जा, जा. असाच जा फणफणत ! तूं जरी असा रागावलास तरी शेवटीं याचा परिणाम काय होणार ? फार झालं तर घेशील आपल्याच डोक्यांत ययेच्छ राख घालून ! त्या प्रियाळाला मार, तूं मर, अथवा दोघेहि एकमेकांच्या तरवारीनां बळी पडा. यानं माझा रस्ता बहुतेक खुला होणार ! ( पिराजीस. ) पिराजी बोवा, तुह्मीं मात्र आपली कामगिरी सांगितल्याप्रमाणं अगदीं चोख रीतीनं बजावलीत, हें माझ्या पुरं लक्षांत आहे, समजलांत ?

पि०—जी सरकार. यापुन या पिराजीला काय व्होवं ? येतोतर धनीसाब.

ल०—ये. पण या पुढं काय होतं काय नाहीं त्याची मला वेळो वेळीं खबर देत जा, समजलास.

पि०-अक्शी धन्याच्या हुकमा परमानं. (पिराजी जातो )

ल०—ठीक आहे जा ( स्वत:शीं ) आपल्याला आतां या दोघांच्याहि पाळतीवर लोक ठेवले पाहिजेत. आणिं ह्या कोपनशीलानं प्रियाळाचा खून पाडल्या बरोब्बर त्याला अगोदर कैद केलं पाहिजे ! ह्मणजे पुढचा भाग सुयंत्रितपणें उरकतां येईल ! ( इतक्यांत पिराजी पुन्हां येतो.) कांरे, परत आलास ?

पि०—सरकार, ह्मराजांची स्वारी आलीया.

ल०-काय महाराजांची ? ( इतक्यांत चित्रवीर्य येतो असें पाहून लगबगीनें उठून सामोरा जाऊन. ) महाराजांचा विजय असो.

चि०-कसं काय ललितराज, कसल्या गर्दींत कसल्या आहांत? आनदवल्लरीच्या लग्नाला जायच्या तयारींत आहांत वाटतं? ·

ल०-काय ? आनंदवल्लरीच्या ! तिचं कोणाशीं लग्न ? त्याचं तर या पुढं नांवच काढूं नका.

चि०-नांवच काढूं नका? ह्मणजे ! ते कां? तिनं तर परवा आमच्यावर मोठे उपकार केले आहेत.

ल०-उपकार ! उपकार नव्हेत पण अपकार केले आहेत महाराज !

चि०-अपकार ! असं कसं तुह्मीं ह्मणतां ! ती जर जन्माला आली नसती तर जगाचं मोठं नुकसान होतं !

ल० मी ह्मणतों, ती जर जन्मालाच आली नसती, किंवा जन्मल्याबरोबर मरून जाती, तरी बरं होतं !

चि०-छत्, काय बोलतां हें ? अशानं मोठं पाप झालं असतं !

ल०-पाप? आणि तिच्या मरणानं ? भलतंच ! मला तर असं वाटतं कीं ती जर मेली असती तर जगांतला एक मोठा कांटा निघाला असता !

चि०-काय, कांटा निघाला असतां! छत्, मी ह्मणतों अशानं जगाचा मोठा तोटा झाला असता. तिनं आपल्या सद्गुणानं सगळ्या जगाला शुद्ध

कौमार्य आणि स्त्रीजातीचं पावित्र्य ह्मणजे काय, याचा जो उत्तम धडा घालून दिलेला आहे तो तिला मग कधींच घालून देतां आला नसता.

ल०—महाराज ह्मणतात असं एक मुहूर्त मात्र ह्मणतां येईल कदाचित्! परंतु एवढ्यावरून ह्मणजे तिच्या वृत्तींत पुढं मागं केव्हांच फरक पडणार नाहीं असं मात्र नाहीं ह्मणतां येणार!

चि०–ललित, नीट विचार करून बोल. काय बोलतो आहेस तूं हें?

ल०—नीट विचार करूनच बोलतो आहे मी हें महाराज. महाराज! आपण पडलांत भोळे आणि मवाळ अंत:करणाचे. तिनं आपल्या हातांत जंबिया भोंसकून थोडंसं रक्त काढल्याबरोब्बर आपली वृत्ती पालटली आणि दुसरं काय? कां मी ह्मणतो असंच कीं नाहीं?

चि०—ललित! मीच काय, पण माझ्या जागीं अत्यंत कठोर आणि उलट्या काळजाचा मनुष्य जरी असता, तरी त्या वेळचं तिचं तें अद्भुत साहसाचं वर्तन पाहून त्याची वृत्तीहि माझ्या सारखीच एकदम पालटली असती! आणि असं न होतं तर मग तो मनुष्य तरी कसला? मग पशूच तो!

ल०—आपण ह्मणतां तसंहि असेल. मीहि अशा पुष्कळ गोष्टी वाचल्या आहेत, आणि ऐकल्या आहेत; पण हिच्या संबंधानं ही गोष्ट शक्य आहे कीं नाहीं

याची मात्र मला शंका आहे. फार लांब कशाला—साध्वी साध्वी ह्मणून गाजलेल्या द्रौपदीसंबंधानं आपलं काय ह्मणणं आहे?

चि०—अरे, ती तर साध्वी--पंचकांतली दुसरी आहे. आणि तिच्या संबंधानं तुला कांहीं भलतंच वाटतं?

ल०—हो, हो, तिच्या संबंधानं! काय पहा, जग तरी किती आंधळं आहे! त्या द्रौपदीला एक नाहीं दोन नाहीं तर पांच पती होते, आणि तेहि भीमार्जुनासारखे एका पेक्षां एक वीर महावीर. असं असून देखील त्या कर्णाला पाहून त्या द्रौपदीचा कामानल पेट घेतो! तर मग आतां या जगांत पातिव्रत्य तें उरलं कुठं? साध्वीवृंदातल्या दुसऱ्या पतिव्रतेची ही वाट! पहिली पतिव्रता अहिल्या, तिच्या संबंधानं तर बोलायलाच नको! तिसरी सीता. ती तर सहा महिने रावणाच्या अशोक वनांत! चवथी तारा. तिनं कसे कसे तारे तोडलेन ते तर महशूरच आहे! पांचवी मंदोदरी. ती तर निर्लज्जपणें कट्ट्या—शत्रूला शरण जा ह्मणून आपल्या नवऱ्याला उपदेश करिते! पातिव्रत्याच्या ह्या मूर्तिमंत पुतळ्या. यांच्या संबंधानं जर ही अशी दशा तर मग या यःकश्चित् आनंदवल्लरींची काय कथा? पहिल्या पहिल्यांदा आंगील जरासं ओढून आणि दुसरं काय?

चि०—ललितराज! काय बोलतो आहेस तूं हें? तुझ्या जिभेला हाड नाहीं हेंच खरं! आनंदवल्लरी

संबंधानं तरी खास चुकतो आहेस तूं. अरे प्रत्यक्ष मूर्तिमंत मदन जरी तिच्या कौमार्याचा भंग करीन ह्मणून प्रतिज्ञा करून आला असता, तरी त्याला देखील आपण भलतेंच साहस करायला उद्युक्त झालों ह्मणून पस्तवावं लागलं असतं! ललित, केवळ तुझ्या सांगण्यावरून मी असा व्यर्थ नादीं लागलों!

ल०—हं हें असलं मात्र नाहीं उपयोगी. कारण अगोदरच त्या दिवशींचा प्रकार महाराजांच्या नालस्तीला आणि दुर्लौकिकाला कारण झाला आहे. ( त्याच्या कानांत कांहीं सांगतो ) ती आणि तिचा भाऊ ह्या कृत्याला पुरी राजी होतीं, असंच आतां सर्वत्र झालं पाहिजे. अशा वेळीं जर आपण असे हात पाय गाळूं लागाल तर माझा नाइलाज आहे. कारण आनंदवल्लरी इतकी हातांत आली असतां गमावणं ह्मणजे—

चि०—( आशायुक्त ) काय? तर ती इतकी हातांत आली आहे ह्मणतोस? ( पुन्हा बदलून ) छेः पण ललित, तिच्या संबंधानं माझ्या डोक्यांत कांहीं कल्पना येत नाहींत हेंच बरं आहे!

ल० असं असेल तर बोलणंच खुंटलं! पण एकच गोष्ट सांगतो —यापुढं खुद्द कोपनशील आपण होऊन आनंदवल्लरीला महाराजांच्या महालांत घेऊन येईल! महाराजांकडून नुसतं एक मधाचं बोट लागलं कीं पुरे, कोपनशील हुरळलाच!

चि०—( आशायुक्त आपल्याशीं ) हा ह्मणतो हें जर खरं असेल तर, ( विचार एकदम बदलून ) पण छेः त्या साध्वी संबंधानं असले कुविचार येऊंच द्यायचे नाहींत.

ल०--का? विचार कसला चालला आहे महाराज? नुसतं होय ह्मणा कीं झालं. या घटके पासून आनंद-वल्लरी तुमची झाली ह्मणून समजा !

चि०—पुन्हा तेच शब्द! स्वर्गांतून नरकलोकाला नेण्याचे हे विचार आहेत! ( हंसून विनोद पूर्वक ) पण काय रे—काय ह्मटलंस,—आनंदवल्लरी माझी झाली? केव्हांपासून ती माझी झाली ह्मटलंस?

ल०—महाराज म्हणतील त्या वेळेपासून.

चि०—आजपासून?

ल०—हो, हो. आजपासून.

चि०—आजपासून? हें तर मुळींच शक्य नाहीं. कारण ज्या घटकेला तिनं आपल्या हाताची शीर तोडली त्या घटकेपासून ती माझी बहीण झाली आणि मीं तिचा भाऊ झालों!

ल०—असं असेल तर मोठी अजब गोष्ट आहे! ( स्वगत ) पण हें यांचं खूळ मला अज्जीबात काढून टाकलं पाहिजे. ( उघड ) पण महाराज, आपल्याशीं विलाससुख भोगण्याच्या इच्छेनं ती होऊन जर नटून-शृंगारून आली आणि आपले कोमल हात जर तिनं आपल्या कंठभागीं टाकले, तर?

**चि०**—तर! तर एक कल्पनाबाह्य गोष्टी घडून आली असं होईल!

**ल०**—तर मग यापुढं कल्पनाबाह्य गोष्टच घडून येणार! चला, इकडं या महाराज. तुह्मांला आतां ह्या सृष्टींतून कल्पना सृष्टींत घेऊन जातो!

[चित्रवीर्याचा हात धरून त्याला घेऊन जातो.]

---

## प्रवेश ३ रा.

**स्थल:**—कोपनशीलाचे वाड्या पुढील रस्ता.

[**प्रवेश**-प्रियाळ आपल्या **आनंदघन**, **कांतिवर्म**, आदि-करून मित्रांसह थाटानें निघाला आहे.]

**कांतिवर्म**—नका हो, चला. असा भलताच आग्रह धरूं नका, निदान इथून तरी लौकर पाऊल उचला.

**प्रियाळ**—छत्. **को**पनशीलाच्या वाड्या पुढून तर अस्संच वाजत गाजत आणि धिमे धिमे पावलं टाकीतच गेलं पाहिजे! माझं प्रत्येक पाऊल—त्यांचा कुर्रा आणि मानीपणा—हा अस्सा तुडवून—पार मातीला मिळवून देणार! (इतक्यांत **आ**नंदवल्लरी धावऱ्या धावऱ्या बाईनें प्रवेश करिते. तिला पाहून) पण ही ब्याद कशाला इथं आली!

**कां०**—पहा, मी ह्मणत होतों तशी दीन स्थिति झाली आहे कीं नाहीं तिची?

आनंदवल्लरी०—( पुढें येऊन ) अहो! माझ्याकरितां नव्हे पण आपल्या जिवाकरितां तरी इथून मागं परता! अथवा एकदम दुसऱ्या कुठल्या तरी रस्त्यानं जा! नाहीं तर इथं खून-खून पडतील हो! दादा-कोपनशील—

त्रि०—काय? ह्मणतेस काय तूं आपल्या दादा-संबंधानं?

आनं०—जाणून बुजून आपली आणि आपल्या कुळाची बेअब्रू आणि अपमान केला, या कल्पनेनं दादा कोपनशील क्रोधानं अगदीं खवळून जाऊन ह्या मान-भंगाबद्दल आपल्याला कंठस्नान घालण्याची घनघोर प्रतिज्ञा करून, हातांत नंगी समशेर घेऊन ती परजत परजत इकडं येत आहे! लग्नमंडपांत तुह्मां दोघानां मिळून जें मंगलस्नान घालायचं तें तुमच्या रक्ताच्या सड्यानं घालावं असा त्यानं निर्धार केला आहे. इतक्यांत तो इथं येऊन पोंचेल. ह्मणून ह्मणतें, चला, आटपा, वळा, वळा त्या रस्त्यानं माझ्याकरितां नको, पण निदान आपले प्राण वांचविण्याकरितां ह्मणून तरी जा त्या रस्त्यानं! तुह्मांला हें जें मी सांगते आहे. तें कांहीं कुणीं माझ्यावर पुन्हा पहिल्या सारखं प्रेम करावं, अथवा कुणाला माझी दया निपजावी, ह्मणून नव्हे! या पुढं इकडून माझ्यावर कधींहि प्रेम होणार नाहीं, हें मी केव्हांच समजून चुकलें आहे. तरी पण ज्या कुमारीशीं इकडचं हें लग्नाचं जुळलं आहे त्याला व्यत्यय यावा अशी माझी इच्छा नाहीं तसंच एकवार माझ्या-

कडे पाहून कुणीं स्मितमुख करावं, अथवा प्रेमानं एक वेळ मला भेटावं, या पैकीं कोणत्याच हेतूनं मी इथं आलें नाहीं! माझ्याकडे नुसते किलकिले डोळे करून दिखील बघूं नये पाहिजे तरी! माझी इतकीच विनंती आहे कीं इथून एकदम निघून जावं आणि कसंहि करून आपले प्राण वांचवावे! मला ही एवढी भीक घाला! मग या मुळं मला मृत्यू आला तरी हरकत नाहीं! मृत्यूला मी आतां मुळींच भीत नाहीं!

आनंदघन०—ही ह्मणते अशा प्रकारचं कांहीं संकट जर ओढवणार असलं तर त्याबद्दल अगोदरच सावध असलेलं बरं.

प्रि०—कांतिवर्म! तुह्मीं ह्मणत होता तसाच कांहीं—अंशीं हा प्रकार दिसतो. अरेरे! काय हिची ही दशा! मला वाटतं ही तरी वेड्यासारखी कांहीं बरळते आहे!

आनंदव० जा, जा. इथं आतां एक पळभरहि राहूं नका. काय सांगते मी?

प्रि० आनंदवल्लरी! हा प्रियाळ जर इथून आतां परत फिरेल तर मदनिकेवर त्याची प्रीति नाहीं असंच लोक समजतील! ही प्रीति त्याला पुढंच नेईल. कांतिवर्म, आनंदघन! चला. इथं असं थांबण्यांत काय अर्थ? आनंदवल्लरी, तूं अशी घाबरतेस कां! कोपनशील तुला आतां कांहीं फार दिवस नाहीं अशी अविवाहित ठेवणार!

**आनंदव०**—एकून मी सांगते इकडं नाहींचना लक्ष द्यायचं? अहो! तुह्मीं तरी कोपी यांचं मन वळवा कींहो! तुह्मीं यांचे स्नेही, जिवाचें कलिजे ना? तुह्मीं तरी यानां परतवा इथून. नाहीं तर आत्तांच्या आतां इथल्या इथंच यांची खांडोळी पडलेलीं पाहून, तुह्मांला आणि मला--दोघानांहि रडत बसण्याची पाळी येईल!

**प्रि०**—हं:! माझ्या करितां तूं रडणार? ह्मणजे कोण निर्लज्जपणा! चल, चालती हो इथून. माझ्या डोळ्यापुढं एक क्षणभरहि उभी राहूं नकोस!

**आनंदव०**—झालं. आटपलं माझं! ही चालले मी. पण माझ्यावर कां हा आपला इतका राग? आपण मला कितीहि झिडकारलीत तरी मी आपलं कल्याणंच चिंतणार! आपल्यावरची सारी इडापीडा टळो, असंच रात्रंदिवस मी देवाजवळ मागणार! आणि मदनिकेशीं आपलं लग्न अगदीं निर्विघ्नपणानं पार पडावं हींच मी इच्छा करणार! असं करण्यांत मला वाटतं माझ्या हातून खचित कोणाचा कांहीं अपराध अथवा पाप नाहीं व्हायचं. देवाजवळ सदोदित मी आपलं हितच चिंतीन. ह्या पापिणीला जर आपलं सगळं औक्ष इकडं देतां आलं असतं तर तसं करून देखील मी केव्हांच वर देवलोकीं गेले असते! (दु:खावेगानें) पण हेंच जर सारं उलट होतं तर ह्याच मुहूर्तावर आज माझं लग्न व्हायचं! (स्फुंदून रडते)

**प्रि०**—चलाहो, उगीच काय लागतां तिच्या नादीं?

**आनंदव०** नकाहो नका. असं नका ह्मणूं! एका-एकाच गोष्टीची मला आतां परवानगी पाहिजे आहे. ज्या अर्थी हें आतां इतक्या थराला येऊन पोंचलं आहे, त्या अर्थी मला आतां हवा त्याच्याशीं गांधर्व विवाह लावण्याची मोकळीक आहे ना?

**प्रि०**—अलबत, सगळं जग आतां तुला खुलं आहे!

**आनंदव०**—असं का! तर मग आपणां सर्वांनां माझी शेवटची एक विनंती आहे कीं,--तुमचा हा एवढा लग्न सोहळा आटपला ह्मणजे मग तुह्मीं सर्वांनीं अगदीं अगत्यपूर्वक माझ्याहि लग्नाला आलं पाहिजे! कारण माझं लग्नहि बहुतेक ठरून चुकलं आहे!

**प्रि०**—ठरून चुकलं आहे? कोणाशीं?

**आनंदव०**-कोणाशीं? ज्यांच्याशीं मी लग्न करणार, त्यांचा लौकिक सगळ्या जगभर गाजून राहिला आहे! आपल्या वाडवडिलांचा आणि त्यांचा फार ऋणानुबंध! त्यांचा स्वभाव इतका गोड आणि प्रेमळ आहे कीं, माझ्याशीं प्रतारणा करून दुसऱ्या कोणावर ते कधीं प्रीती करितील याची मला शंका दिखील कशीं ती बाळगायला नको! आणि हें त्यांचं प्रेम माझ्यावर अक्षय्य कायम राहणार! ज्यांचे पाश पाहून इतरांनां भयंकर कांपरं भरतं, त्यांच्या करपाशांत--मला किती तरी पण बाई आनंद आाणि सुख होईल ह्मणून सांगू! त्यांच्या करपाशांतून मी तरी मग कध्धीं कध्धीं ह्मणून दूर होणार नाहीं! काय ह्मटलंत,—त्यांचं नांव सांगू? त्यांचं नांव सांगू

तुह्मांला? छेः तें ऐकून तुह्मीं दचकाल आणि गर्भगळित व्हाल! पण ऐक त्र. त्यांचं नांत्र काळ-कृतांत काळ!

( इतक्यांत तरवार उपसून कोपनशील येतो. )

को०—ही कोण—ताई आनंदवल्लरी! तूं कां इथे? तूं कोपनशीलाची बहीण ना? इथं येणं तुझ्या कुलाला आणि शीलाला शोभतं का? ह्या कोपनशीलाच्या बहिणीच्या ठिकाणीं किती तरी मानधनपणा आणि ताठा असायला पाहिजे होता! त्याचा तुझ्यांत एक लक्षांशसुद्धां दिसत नाहीं! ही मानहानी तुझ्या हातून कशी सहन करवते? चल, निघ. चालती हो इथून—( प्रियाळास ) अहो तुह्मीं गळेकापू! कान फुटले आहेत वाटतं?

प्रि०–काय? आपलं काय ह्मणणं आहे?

को०—ह्मणणं? दुसरं तिसरं काय असणार? आपल्याला आतां तयार झालं पाहिजे! ह्या समशेरीचं आणि आपलं आतां मी लग्न लावणार! नीच, दगलबाज, माणूस नाहींतर! लग्न ह्मणजे काय तुला पोरखेळ वाटलं! आज वर्ष झालं, तुझ आणि आनंदवल्लरीचं लग्न ठरलं असतां तें मोडून एकदम दुसरीशीं? बेशरम! तुला आपल्या अब्रूची, लौकिकाची आणि मानाची चाड आणि किंमत नाहीं ह्मणून दुसऱ्यालाहि ती तशीच नसेल असं का तूं समजतोस? असं जर तूं समजत असशील तर ही तुझी मोठी चुक—नव्हे मोठा अपराध आहे. आणि या अपराधाचं प्रायःश्चित्त ह्मटलं ह्मणजे ह्या समशेरी

The Manoranjan Press, Bombay.



**आनंदवल्लरी**—दादा, दादा ! नको नको, भलतंच साहस नको करूंस ! मला एवढी भीक घाल. [ पृष्ठ १७९. ]

पुढं तुला मुकाट्यानं आपली मान वांकिवली पाहिजे! माझा, माझ्या बहिणीचा आणि माझ्या कुळाचा तूं मोठा अपराध केला आहेस! या तुझ्या अपराधाबद्दल तुला या समशेरीला बळी देऊन, आनंदवल्लरीच्या अश्रूंत तुझें रक्त मिसळून देऊन तुझ्यावर मी आपला पुरा--पुरा सूड उगवून घेणार!

प्रि०-[ धिमेपणानें तिरस्कार दाखवून ). हः हा प्रियाळ तुझ्या समशेरीला भिईल असं का वाटतं तुला? पण नको, ही वेळ नव्हे तुझ्याशीं हुरमत आणि वितंड-वाद घालीत बसण्याची. क्रांतिवर्म, आनंदघन चला या. अशा मंगळ प्रसंगीं या माथेफिरूच्या नादीं लाग ण्यांत अर्थ नाहीं. चला, आपण जाऊं इथून. याचं मस्तक फिरलेलं आहे!

को०-फिरलेलं आहे! अरे चोरा, हरामखोरा.

आनंदव०-दादा, दादा,! नको, नको, भलतंच साहस नको करूंस! मला एवढी भीक घाल. त्यांनीं माझा असा कोणता अपराध केला आहे, कीं त्यांच्यावर तूं अशा भयंकर रीतीनं आपला सूड उगवायला तयार व्हावंस! खाचित, तूं कांहींतरी घोर आणि भयंकर कृत्य करणार आहेस, असं ही तुझी मुद्राच सांगते! यांनीं असं असं केलं ह्मणून तुझ्याजवळ शपथेला तरी कधीं मी आपली जीभ विटाळली होती का? कां तुझ्याजवळ येऊन कधीं एखादा हुंदका टाकला, कां डोळ्यांतून कधीं एखादं टिपूस गाळलं? सांग, दादा तूंच सांग. ( सद्गदित

कंठानें) काय? असा काय बघतो आहेस माझ्या तोंडाकड ? अथवा--बघ, नीट न्याहाळून बघ माझ्या तोंडाकडे ! दादा ! माझ्या तोंडावर तुला दुःखाचं एक--एकतरी चिन्ह दिसतं आहे कां ? नाहीं, रडत नाहीं मी ! मला तें आतां यायचंच नाहीं ! पहा पाहिजे तर,--ही आनंदवल्लरी उलट कशी हंसते आहेती ! (रडें दाबण्याचा व कृत्रिम हंसण्याचा प्रयत्न करिते. ) हंः हंः हंः हंः

**को०**--ताई ! रडतेस--होय ? रड ! रड ! ह्या तूझ्या अश्रूंच्या प्रवाहांत, या मांगाच्या रक्ताचे पाट वाहायाला लावतों ! अथवा छेः असं नाहीं उपयोगी. तूं जाच कशी निघून इथून. यापुढचं तुला पाहणार नाहीं ! ( रागानें ) जा एकदम चालती हो! कां ? जातेस की नाहींस ? (ती स्फुंदत स्फुंदत जाते व प्रियाळास.) निघालास कुठं ? अजुनहि जर तुला कृतकर्माचा पश्चाताप आणि खेद होत असेल तर अजून देखील तुला जिवंत राहतां येईल !

**प्रि०**--काय? खेद आणि पश्चाताप! तर मग आपण चुकतां इथं ! वाटेल तसलीं पापी कृत्यं पडद्या आड अगदीं गुप्तपणानं करितां यावींत एढ्याच करितां माझ्याशीं लग्न लावण्याचा जर हेतू असेल, तर तो सफळ झाला नाहीं हें चांगलं नाही कां झालं?

**को०**--बोल, तुझ्याच तोंडानं येऊंदे! हें खरं का--कीं तूं आनंदवल्लरीला सोडून दिलीस ?

**प्रि०**--होय! महाराजांनीं धरली तशी मी सोडली!

को०-( न ऐकतां. ) बस्स. एकच प्रश्न! तिच्याशीं तूं लग्न लावणार कीं नाहीं?

प्रि०-कोणाशीं? महाराजांच्य अन् साऱ्या पद्मपुरीच्या रखेलीशीं!

को०-रखेलीशीं! माझी बहीण-रखेली, रखेली आँ? घे, घे तर याचं प्रायश्चित्त! ( तरवार खुपसतो. )

प्रि०-अरे, मेलों! मेलों!! [ प्रियाळ पडतो ] आनंदघन व कांतिवर्म-अहो खून! खून!! धांवा, धांवा!

प्रि०-( कण्हत ) अरे घातक्या-नराधमा-कोपनशीला! [ धडपडून मरतो. ]

[ इतक्यांत ललितराज हत्यारी लोकांसह प्रवेश करितो.]

ललि०-'खून खून' म्हणून कोण ओरडलं? काय प्रकार आहे? काय? भर रस्त्यांत खून! धरा, एकदम धरा त्याला-आणि टाका खेंचून.

को०-या, सगळे या एकदम! आतां तुम्हीं जरी मला धरलंत तरी त्याची मला बिलकुल भीती नाहीं वाटत. कारण मला जो सूड उगवून घ्यायचा होता तो मीं केव्हांच घेऊन चुकलों आहे! आणि तोहि अगदीं माझ्या मनाप्रमाणं! ह्या तलवारीनं मी तुमच्या अंगांतून रक्ताचे पाट वाहायला लावले असते, पण नको-मी तुम्हांला जीवदान देतों. व्यर्थ साहस करून एक पाऊल पुढं टाकाल, तर मात्र—

ललि०-हं खबरदार! ह्याला ठार न करितां जिवंत धरा! याच्या एका केंसाला देखील धक्का लागतां कामा

नये. याच्या ह्या क्रूर कृत्याबद्दल याची चौकशी होऊन ह्याला योग्य ती शिक्षा मिळाली पाहिजे!

**को०**–खरं ह्मणाल तर तुमच्या तावडींतून सुटून मी केव्हांच पार झालों आहे! कारण आमच्या दुर्लौकिकाला कारण होणाऱ्या अधमाच्या छातींत ही तरवार खुपसून त्याला योग्य शिक्षा मी केव्हांच दिली आहे! पण तो अजून जिवंत आहे कीं मेला, हें सांगा पाहूं अगोदर! मला कोणी साऱ्या पृथ्वीचं राज्य देऊं केलं असतं तरी देखील ह्याला जिवंत सोडून, मी आपल्या कुळाला कधींहि काळिमा लाऊन घेतला नसता!

**ललि०**–( हत्याऱ्यांस ) पहाता काय? त्याला अगोदर निःशस्त्र करा! ( इतर मंडळींस ) जा, तुह्मीं सर्व जण हें प्रियाळांचें प्रेत राजवाड्याकडे घेऊन जा आणि पुढील व्यवस्थेला लागा. इकडं मी कोपनशील माझ्या हातून सुटून न जातील अशी व्यवस्था करितो.

[ हत्यारी लोक कचरत आपल्या तरवारींचीं टोंकें कोपनशीला पुढें धरितात. ]

**को०**–अरे! हीं तरवारींचीं टोंकं कशाला माझ्या पुढं करिता? इतक्या जवानांपैकीं–माझ्यावर एखादा निसटता वार करण्याची–एकाचीहि छाती नाहीं? नादान, बेहिमती! अशा नामर्दांवर कोण हत्यार चालवतो! चला, घ्या. घ्या ही माझी समशेर. हिची कामगिरी संपली. ( तरवार फेंकून देतो. )

**ललि०**–तुह्मीं आतां माझे कैदी आहांत!

**को०**—होय आहे. मग?

**ललि०**-मग! मग कांहीं नाहीं. कांहीं भिण्याचं कारण नाहीं. तुमच्यावर मेहेरबानीच होईल.

**को०**—काय, मेहेरबानी!

**ललि०**—( हत्यारी शिपायांस ) तुह्मीं तसे तिकडे जरा लांब जाऊन उभे रहा. ( कोपनशीलास ) कोपनशील, तुमच्यावर हा असा चमत्कारिक प्रसंग यावा, याबद्दल मी फार दिलगीर आहे! मला केवळ ताबेदारीमुळं—आपल्याशीं इतरांच्या देखत जरा कठोरपणानं वागणं भाग पडलं! तरी पण माझ्याकडून तुह्मांला जी कांहीं थोडी-बहुत मदत होण्यासारखी असेल ती करायला मी अगदीं एका पायावर तयार आहे! या एका गोष्टीवरूनच माझं तुमच्यावर किती प्रेम आहें हें तुह्मांला कळून चुकेल. माझं इमान इतबार मी कधींहि सोडणार नाहीं!

**को०**—हं: प्रेम! इमान! इतबार!! सारीच बहार!!!

**ललि०**—प्रेम, इमान आणि इतबार हीं कसाला लागण्याच्या वेळा अगदीं निराळया असतात! त्यांची अगदीं आटोकाट कसोटी ह्मणजे अशा कठिण प्रसंगींच! खुनाला शिक्षा, ह्मणजे देहांत--शासनाचीच! हें जसं तुह्मांला—तसं मलाहि पण कळतंच आहे. तर बोला—बोला—काय करूं मी तुमच्या करितां? तुमच्या करितां मी स्वत:चे प्राण देखील धोक्यांत घालीन! पहा, ह्या ललिताच्या स्नेहाची परीक्षाच पहा!

**को०**—हं, ललितराज, असे उतावीळ नका होऊं!

तुमच्या विषयीं हा वेळपर्यंत माझा अगदीं गैरसमज झाला होता; याबद्दल मला मोठी दिलगिरी वाटते! तसंच हेंहि पण मला उघड उघड कबूल केलं पाहिजे कीं आपल्या अंगीं असणारं अलौकिक औदार्य आणि ही विलक्षण शालीनता यांचा माझ्या ठिकाणीं पूर्ण अभाव आहे!

ल०–( विचारयुक्त स्वगत ) आतां असंच! (उघड) तीं आहेत कीं नाहींत हें एक माझ्या मनाला ठाऊक! कोपनशील! तुह्मीं पिढीजात, कुलीन आणि थोर सरदार आहां; पण आपल्या वाईटावरहि कांहीं मंडळी आहेत. प्रियाळानां आपण ठार केलंत ही एकच गोष्ट त्यानां आपल्यावर वाटेल तें किटाळ आणायला बस्स होईल! शिवाय महाराजांचं प्रियाळांवर किती प्रेम होतं हेंहि तुह्मांला ठाऊकच आहे. असं जरी आहे तरी यांतून देखील आपले प्राण वांचविण्याकरितां, हा ललित–

को०–बस्स, बस्स ललित! माझ्याकरितां दुसऱ्यानीं नाहक संकटांत पडावं हें मला बिलकूल पसंत नाहीं. मृत्यूची जर ह्मणाल तर मला यत्किंचितहि भीती वाटत नाहीं. त्याची कोण तमा करितो! मूर्तिमंत मृत्यू जरी माझ्यापुढें येऊन उभा राहिला तरी त्याच्याशीं देखील झुंजायला मी तयार आहे! प्रियाळाला मी कंठस्नान घातलं ह्मणून जर मला देहान्तशासनाची शिक्षा होणार असेल, तर धिःकार–धिःकार असो त्या तुमच्या कायद्यानां आणि त्या आंधळ्या न्यायदेवतेला! याच मुळं जर माझा शिरच्छेद व्हायचा असेल तर तो खुशाल

होऊं द्या! वाग्निश्चय झाला असतांहि वचनभंग करून ज्यानं माझ्या आणि माझ्या बहिणीच्या तोंडाला काळं फासण्याचा, आणि स्वर्गांतील आमच्या बेचाळीसच्या बेचाळीस पिढ्यानां आज रौरव नरकांत लोटण्याचा, घाट घातला होता, त्याचा योग्य सूड घेऊन मी आतां अगदीं निश्चिंत झालों आहे! "कोपनशीलानं प्रियाळाला केलेलं शासन अगदीं यथायोग्य असून, त्याचा शिरच्छेद करण्यांत मात्र अन्याय आणि अधर्म झाला," असं ह्मणून एखादा सत्याचा भक्त, अथवा एखादा सच्चा दिलाचा—सहृदय मनुष्य, माझ्याकरितां आपल्या डोळ्यांतून एखादं जरी टिपूस टाकील तरी देखील त्यामुळं -मी मग कुठंहि असलों तरी— मला अत्यंत समाधान आणि आनंदच होईल! आणि ह्या एवढ्याच संबंधानं जरी या पुढं माझं केव्हांहि नांव निघालं तरी बस्स झालं! यापेक्षां जास्त मला कांहींहि नको! यापुढं आनंदवल्लरी संबंधानं काळजी करण्याचं प्रयोजनच नाहीं. आपलं सत्व संभाळायला तिची ती खंबीर आहे! येऊन जाऊन पद्मनाभ काय तो लहान आहे. पण तोहि माझ्या इतकाच मानी आणि मर्द आहे. तेव्हां मला आतां कोणचीच काळजी उरली नाहीं.

ल०—कोपनशील! तुह्मी अशी निरवानिरव कां करितां? कायद्याच्या तडाक्यांतून तुह्मांला वांचविण्या संबंधानं मी एक शक्कल योजिली आहे. मात्र त्याप्रमाणं वागण्याची आपली तयारी पाहिजे. बोला, आहां कबूल?

को०—माझ्या अब्रूला आणि लौकिकाला त्यापासून

जर यत्किंचितहि धक्का लागत नसेल तर माझ्याकडून बिलकूल हरकत नाहीं.

ल०–भियाळ गेलेच, तेव्हां आतां तसं होण्याचा बिलकूल संभव नाहीं. (एकीकडे) ह्याच्याशीं आतां हें असं मोघमच बोललं पाहिजे!

को०–ह्मणजे?

ल०–ह्मणजे काय? महाराजांचं आपल्या बहिणी-वर–आनंदवल्लरीवर–एक वेळ अत्यंत प्रेम असल्याचं आपण जाणतच आहां.

को०–हो. मग त्याचं–आतां काय?

ल०–त्यानं आतां पुन्हा उसळी मारली आहे, असा माझा अजमास आहे.कारण तिची ती तेजस्विता आणि तो निर्धार हीं पाहिल्या दिवसापासून, ते नेहेमीं तिच्याच चिंतनांत गुंग असतात!

को०–(दांत ओठ खाऊन) अस्सं?

ल०–ह्मणून ह्मणतो,–खुद्द आनंदवल्लरीनं महारा-जानां भेटून विनंती करावी.

को०–(क्रोधानें) काय आनंदवल्लरीनं?–आणि त्या कामांधाला विनंती!

ल०–छत् असा भलतासलता अनुदार विचार तुह्मीं मनांत देखील आणूं नका. तिच्या संबंधानं महाराजांचं मन कसं अगदीं सुरतपाक आहे! तिनं तुमचे प्राण वांचविण्या संबंधानं नुसती विनंति करण्याचा अवकाश, कीं तुह्मांला क्षमा केल्याचा हुकूम सुटलाच ह्मणून समजा!

इतकंच नव्हे, पण पुढं मागं मग असंहि होण्याचा संभव आहे कीं या पद्मनगरीच्या राज्याचे आणि वैभवाचे खरे मालक काय ते एक तुह्मीं आणि दुसरी आनंदवल्लरी!

को०—(क्रोधानें) ललितराज! एकून तुह्मीं असल्या नीच आणि पापी मार्गाचा अवलंब करायला मला सांगता?

ल०—(आश्चर्य दर्शवून) पापी आणि नीच मार्गाचा! हा नीच आणि पापी मार्ग?

को०—तुमच्या या गूढ आणि संदिग्ध बोलण्याचा मला कांहींच उमज पडत नाहीं.

ल०—यांत गूढ आणि संदिग्ध असं काय आहे? महाराज जर अहोरात्र आनंदवल्लरीच्याच चिंतनांत असतात तर कोणची गोष्ट अशक्य आहे!

को०—ह्या बोलण्यानं तुह्मीं मला अधिकच गूढांत आणि संशयांत पाडता!

ल०—आनंदवल्लरी महाराजांनां भेटून आली ह्मणजे हा आपला संशय फिटेल.

को०—ललित! तुह्मीं काय बोलतां हें?

ल०—मला जें स्पष्ट दिसत आहे, तेंच बोलतों.

को०—स्पष्ट दिसतं! काय स्पष्ट दिसतं? बोला, बोला—

ल०—प्रियाळांच्या मागं आनंदवल्लरीला वाटेल त्याशीं लग्न करण्याची मोकळीक आहे कीं नाहीं?

को०— बरं मग, त्याचं काय?

ल०–दुसरं काय असायचं? असं नसेल तर खुद्द महाराजानां तिचं पाणिग्रहण करायला कोणती हरकत आहे?

को०–कोणती हरकत आहे? राणीसाहेब जिवंत असतां? आणि महाराजांनीं आनंदवल्लरीला—

ल०–राणीसाहेब जिवंत असल्या, ह्मणून कुठं बिनसतं आहे? त्यानां दिली एखादी नेमणूक करून, आणि दिल्या कूठं तरी दूर ठेऊन, ह्मणजे झालं! आणि इतक्यानं नाहींच भागलं तर त्रैलोक्य-चिंतामणीची मात्रा आहेच कीं! तिचे दोन वळसे दिले ह्मणजे झालं, रस्ता अगदीं साफ!

को०–(विचारांत निमग्न असतां स्वगत) कोण भयंकर पापी विचार हे! (उघड) पण ललित, महाराजांनीं आनंदवल्लरीला त्या दिवसापासून आपली बहीण–गुरुबहीण–ह्मणवलं आहे, हें तुह्मीं विसरलांत वाटतं?

ल०–(हंसून) मग बहीणीशीं लग्न करूं नये असं कुठं काय आहे?

को०–(रागानें) शाबास! शाबास!! इतका वेळ तुला मी मोठा कुलीन, नेकीचा, आणि आपल्या इमान इतबाराला जागणारा असशील असं समजत होतों. पण व्यर्थ! तुझ्या ह्या आतांच्या सैतानी उद्गारांनीं तुझ्या राक्षसी काळजाची पुरी साक्ष पटविली! काय? जिला आपली बहीण ह्मणवली तिच्याशीं लग्न! खास, यांत तुझे अथवा त्याचे–अथवा दोघांचेहि–कांहीं तरी डाव आहेत! त्या शिवाय तिला महाराजांकडे पाठविण्याविषयीं तूं सल्ला कसा देशील? एकून माझे प्राण

वांचविण्याची हीच तुझी शक्कल? मांगा! अशा रीतीनं माझ्या बहिणीला बाजारबसवी करून मी आपले प्राण वांचवू? नराधमा! इतका वेळ मी तुला बोलूं दिलें याचाच आतां मला पश्चात्ताप होत आहे. माझ्या हातून आणखी असले हजारों खून पडते, तरी देखील मला इतका पश्चात्ताप झाला नसता! या वेळीं मी जरी निःशस्त्र आहे तरी मला असं झालं आहे कीं—तूं रक्तबंबाळ होऊन तुझ्या चिंधड्या-चिंधड्या उडालेल्या केव्हां पाहीन! नीचा! क्रोधामुळं माझ्या डोळ्यांतून पडणाऱ्या ठिणग्यानीं तुला भाजून काढूं, कां ह्या ज्वालामुखींतून बाहेर पडणाऱ्या ज्वालानीं जाळून तुला जागच्याजागीं खाक करून सोडूं, कां त्यांतून वाहणाऱ्या उष्ण धातूंच्या रसाखालीं तुला गाडून टाकूं, कां एका लत्ताप्रहारासरशी ही पृथ्वी दुभंगून टाकून तिच्या भेगेंत तुला सबंधच्या सबंध चिणून सोडूं, कां त्या गिधाडांच्या राजाला सांगून, त्याच्या तैनातींतल्या एखाद्या खादाड गिधाडाकडून तुझी मानगुटी धरवून तुला उंच आकाशांत घेऊन जाऊन, तेथून मोठ्या जोरासरशीं खालील दऱ्याखोऱ्यांत भिरकाऊन द्यायला सांगूं! काय, करूं तरी काय? अरे हरामखोरा, मानभाव्या, मांगा! एकून तुझं हेंच औदार्य, हाच स्नेह, हेंच प्रेम, आणि हेंच इमानइतबार काय?

ल०—कोपनशील! तुम्हीं जर अर्थाचा अनर्थ करून आपला असा संताप करून घेऊं लागलात तर त्याला

माझा नाइलाज आहे! अहो, लग्नापूर्वी सगळ्याच जणी बहिणी असतात!

को०—तुमच्या निखालस काळ्या कभिन्न काळजावर ज्या प्रमाणें तुमच्या ह्या पांढऱ्या फिटिक चामडीचा पेहराव चढविला आहे, त्याप्रमाणेंच आपल्या पापी आणि कृष्ण कृत्यावर तुह्मीं सफेतीचा हात मोठ्या सफाईनें देता आहां! पण याद राखून असा, तुमच्या या डावांनीं हा कोपनशील आतां फसणार नाहीं, अथवा प्राणाच्या आशेनं हुरळूनहि पण जाणार नाहीं! पद्मनगरीचा कायदा आणि न्याय मला जी शिक्षा फर्मावील ती भोगायला मी तयार आहे! वाङ्निश्चय होऊन ज्याच्याशीं सुपारी झाली त्याहून अन्य पुरुषाला वरायला कोणचीहि अस्सल क्षत्रिय वंशातली स्त्री कधींहि तयार होणार नाहीं, हें पक्कं समजून असा! ललित्या! तुला मी आतां पुरं ओळखलं. तूं त्या नरकलोकांतील मूर्तिमंत नरकासुर आहेस!

ल०—( रागाचा आवेश आणून ) बस्स, बस्स झालं! तुझ्याशीं आतां माझं कर्तव्य ह्मणून कांहीं उरलं नाहीं! मरणास तयार असल्याच्या तुझ्या ह्या कट्टया निश्चयाबद्दल मी तारीफच करितो उलटी तुझी! ठीक आहे. तर आतां आपण अखंड, अक्षय्य, आणि चिरकाल असं तें अमरत्व भोगण्याकरितां माझ्याच नरकपुरीला चला. कारण तुमच्या या तापट, उच्छृंखल, आणि कडव्या मनोवृत्तीनां तिथलीच हवा चांगली मानवेल! (एकीकडे)

आतां असंच. ( उघड ) आणि कोपनशील, तिथून पुन्हां मृत्युलोकीं जेव्हां तूं परत येशील, तेव्हां-तिथं तुला कसकशी मजा मारायला सांपडली आणि कस-कसा सुखानंद अनुभवायला मिळाला, तें सारं मग आह्मांला येऊन सांग ! अरे, शीघ्रकोपिष्टा ! तूं काय समजला आहेस ? तूं आपल्या मनाशीं ही खूणगांठ घालून ठेव कीं,—तुला भडाग्नी मिळून, तुझी पुरती राख सुद्धां झाली नाहीं, तुझ्या अस्थी आणि तुझ्या मस्तकाची कवची हीं फुटून तुझा कपाळमोक्ष सुद्धां झाला नाहीं, आणि तुझ्या आनंदवल्लरीच्या रड्याला खळ पडून तिच्या सुजलेल्या डोळ्यांची फुगवटी देखील पुरतीशी उतरली नाहीं, तोंच चित्रवीर्य तिला भररस्त्यांतून फराफर ओढीत नेऊन, तिच्या कौमार्याचा भंग करून, तिला नासून टाकीत असल्याचं, अंतरिक्षांत घोंटाळत आणि हिसके खात फिरणाऱ्या तुझ्या आत्म्याला मोठ्या आनंदानं पहायला सांपडेल ! ( उपहासपूर्वक ) मग हा तुझा क्रोधावेश, तुझा अस्सल क्षत्रिय वंश आणि तें तुझं कुलीन घराणं, यांची वाट काय ?

**को०**—हो. हो ! हें नव्हतं आलं इतका वेळ माझ्या लक्षांत. एकून तो तिला नासून टाकणार ! आणि तेंहि मी मेल्यावर तिच्यावर बलात्कार करून ! असंच—असंच नाहींकां आपण ह्मटलंत ? ( वृत्ती पालटल्याचें दाखवून ) छेः माझ्या ह्या अंतःकरणांत कोण कल्लोळ आणि धडपड माजून राहिलीं आहेत ! ( पडक्या व खोल आवाजांत )

हा माझा अंतरात्मा–आंतल्याआंत–स्फुंदून स्फुंदून रडत आहे! त्याच्या डोळ्यांतून खळखळ वाहत असणाऱ्या अश्रूंच्या पाटांनीं माझ्या हृदयाला भिजवून सोडून, खचित त्याला थोडीशी नरमाई आणली आहे! अहो, ललितराज! क्रोधावेशाचा मला एका क्षणापूर्वीं जो कड आला होता, त्याबद्दल मला आतां पश्चात्ताप होत आहे! ( स्वगत ) ह्याच्याशीं आतां असंच वागलं पाहिजे! नाहीं तर हा मांग बोलतो तसं करायला कधींहि कमी करणार नाहीं!

**ल०**–हें पहा, माझ्या बुद्धीला जो आपला एक मार्ग तुह्मांला सुचवावा सारखा वाटला तो मी सुचिवला!

**को०**–( औपचारिक ) याबद्दल मी आपला फारफार आभारी आहे! यत्पूर्वीच माझे डोळे उघडायला पाहिजे होते! आपण ते उघडत असतांहि मी ते आपल्याला उघडूं दिले नाहींत, याबद्दल मला फार खेद होतो! एकून माझा मीच स्वतःचा गैरसमज करून घेतला तर! चित्रवीर्य महाराजांचं आनंदवल्लरीवर अद्याप प्रेम आहे, आणि ते तिचं पाणिग्रहण करायलाहि उत्सुक आहेत, असं कायससं आपण ह्मणालात ना? ( एकीकडे ) या चोराला आतां असाच डाव टाकून फशिवलं पाहिजे!

**ल०**–तें तर तुह्मांला पहिल्यानंच मी अगदीं स्पष्ट सांगितलं होतं. पण तुह्मीं त्याचा विपरीत अर्थ केलात!

**को०**–एकून महाराज तिचं पाणिग्रहण करायला तयार आहेत तर?

**ल०**–अर्थात्.

**को०**—यांत बिलकुल अंदेशा नाहीं ?

**ल०**—बिलकुल नाहीं. ( एकीकडे ) मला वाटतं आतां स्वारी चांगलीच नरमली !

**को०**—असं जर आहे, तर आत्तांपासून ती त्यांची झाली ह्मणून समजा. तुमच्या सांगण्याप्रमाणं मी तिला महाराजांकडे पाठवितो, यांत एक काडीचं देखील अंतर पडणार नाहीं. माझ्यावर तिचं निःसीम प्रेम आहे. माझा शब्द ती मोडणार नाहीं. तर आतां महाराजांच्या जवळ या संबंधानं तुह्मींच परस्पर गोष्ट काढा, आणि तिला त्यांच्या दर्शनाचा लाभ लौकर मिळेल असं करा. ह्मणजे माझ्या संबंधानं तीच त्यानां विनंति करील.

**ल०**—अहो, इतकं तुह्मी ऐकल्यावर आणखी काय पाहिजे ? उगीच एखाद्या हुर्रीसरशी डोक्यांत एकदम राख घालून घ्यायला तयार होणं कांहीं शहाणपणाचं नव्हे.

**को०** माझ्या गैरसमजामुळं तशी चूक झाली खरी. पण आतां काय त्याचं ? मी या पुढं तुमच्या सल्ल्या-प्रमाणं चालणार. मग तर झालं !

**ल०**—मग ठीक, मग कांहीं हरकत नाहीं. आतां या पुढं तुह्मी आपला सारा जन्म सुखांत आणि आनंदांत काढा ! आतां हे हत्यारी जवान शिरस्त्यावरहुकूम तुह्मांला घेऊन जातील. पण खरोखर या कैदेंतून तुमची मुक्तता याच घटकेपासून झाली आहे असं समजा !

**कोपन०**—( कृत्रिम आनंद दर्शवून ) महाराजांना माझे

अत्यंत नम्रतापूर्वक प्रणाम सांगा. आणि त्यानां कळवा कीं, मी कांहीं आपल्या इच्छेच्या बाहेर नाहीं. आनंदवल्लरी केव्हांहि आपलीच आहे!

**ललित०**–ठीक आहे. घेतो तर मी आपली आतां रजा. ( हत्यान्यांस ) आपल्या कैद्याला मोठ्या हुशारीनं घेऊन जा. समजलं?

**हत्यारीः**–जी आज्ञा धनीसाहेब.

**ललित०**–( जातां जातां आपल्याशीं ) मोठाच चमत्कारिक माणूस! एकाच घटकेपूर्वी स्वारी आपल्या डोक्यांत अगदीं राख घालून घ्यायला तयार झाली होती; पण बरीच लौकर ताळ्यावर आली म्हणायची! पण हा जर पुन्हा फिरला तर काय घ्या. अथवा छेः आतां काय बदलतो हा? मनुष्याला आपल्या प्राणापेक्षां जास्त प्यार असं काय आहे? ( हंसून ) शिवाय, महाराज आनंदवल्लरीचं खरोखरीच पाणिग्रहण करणार, आणि आपल्या हातीं राज्याच्या सर्व किल्ल्या येणार, या कल्पनेनं तो हुरळून गेला आहे! तेव्हां आतां भलतीच शंका कशाला? पण या पुढं पद्मपुरीचा महाराज कोण–याची ह्याला काय कल्पना आहे? पण तें जाऊं द्या–आतां अगोदर थेट चित्रवीर्याला जाऊन गांठतो. आणि त्याला आपल्या कह्यांत आणून कसं घेरून टाकायचं तें बघतों! राजवाड्याकडेच जावं तर. [ जातो. ]

**कोपन०**–तांडेलानें केवळ आपले प्राण वांचवण्याकरितां किनारा चुकवून जसं सगळं तारूच्यातारू

एखाद्या खडकावर नेऊन आदळावं तसं होत आहें हें. ललित्या, तूं काय समजला आहेस? ह्या वेळीं तुझ्या-सारख्या हरामखोराशीं मी हें असं मानभावीपणाचं वर्तन केलं, ह्मणूनच उत्तम झालं! माझ्यासंबंधानं आतां ह्याला स्वप्नांत देखील कसा तो संशय ह्मणून येणार नाहीं! अरे चोरा, नराधमा, काळसर्पा! या तुझ्या नीच कृत्या-बद्दल आणि विषारी फूत्कारांबद्दल, मी तुझा पुरा सूड घेणार! (विचार बदलून) पण नको, नको! हे असले विचार बाहेर निघायलाच नकोत! ते काळसर्पाच्या जिव्हेप्रमाणें-दंश करायची संधी येईपर्यंत-आंतल्या आंतच दडून राहिले पाहिजेत! (हत्याऱ्यांस) चला रे बाबानों, तुह्मीं न्याल तिकडं यायला मी तयार आहे.

[ हत्यारीलोक त्यास घेऊन जातात. ]

(अंक ४ था, समाप्त.)

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—दयाळजींचें घर.

[ प्रवेशः—राणोजी व गिरिजा बोलत आहेत. ]

**गिरिजा०**—( पायावर डोकें टेकलेल्या राणूजीस. ) रणधीरराव, उठा उठा. क्षमा आहे तुह्मांला. पण यांत क्षमा ती कसली बाई करायची ? तुह्मीं कांहीं वाईट हेतूनं तें लिहिलं नव्हतं. तो जर तुह्मां सगळ्या सरदारांच्या आया-बहिणींच्या आणि बायका मुलींच्या नालस्त्या करीत वाटेल तें भकत सुटला होता, तर तुह्मीं केलंत तें एका परीनं रास्तच झालं नाहीं का ? या तुमच्या पत्रानं त्याचं अंतरंग तरी कसाला लागलं !

**राणू०**—तर मग माझ्यासंबंधानं आतां तुमचा कांहीं वेडावांकडा ग्रह नाहीं ना ?

**गिरि०**—छेः मुळींच नाहीं. तुह्मीं तर मला बहिणी प्रमाणं मानून आपल्या मुलाबाळांत नेऊन सोडलीत; आणि औषध पाणी देऊन, माझी शुश्रूषा करून, मला बरी केलीत. असं असतां तुमच्याबद्दल माझा गैरसमज आणि भलता ग्रह, होईल कसा ?

**राणू०**—नसला ह्मणजे झालं, मला तेंच पाहिजे आहे. पण या बाबतींत माझंच मन मला खातं, त्याला काय माझा इलाज !

**गिरि०**–पण रणधीरराव, मी जर आतां चांगली बरी झालें आहे, तर आतां कां बरं तुह्मांला असं वाटावं?

**राणू०**–वाटूं नये, पण हें पहा, तुह्मीं तशाच श्रमिष्ट राहता–तर?

**गिरि०**–तर मात्र मग ती गोष्ट अंमळ वेगळी होती. पण आतां तर नाहींना तसं कांहीं? अहो मनुष्य आहे, चुकतं असं एखाद वेळ. माझंच पहाना. त्या कोपनशीलांच्या संबंधानं माझा कसा झाला होता बरं एकदां ग्रह?

**राणू०**–पण आतां तो पार बदलला कीं नाहीं?

**गिरि०**–हो, अगदीं पार बदलला! आपल्या बहिणीकरितां त्यांनीं इतकं केलं असं कळल्यावर कसा बरं नाहीं तो बदलणार? पण काय हो, रणधीरराव! तुह्मीं ह्मणालात कीं त्या ललितांनीं कोपनशीलांचा शिरच्छेद करण्यापर्यंत मजल आणून पोंचिवली आहे ह्मणून, तें खरं का?

**राणू०**–खरं का? खरं का–ह्मणून काय विचारतां? या मुळं तीं तिघंहि सध्यां फार फिकीरींत आहेत!

**गिरि०**–एकंदरींत आज काल कांहीं भल्याची दुनिया नाहीं तर?

**राणू०**–ती केव्हांच नसते.

**गिरि०**–हो. तेंहि खरंच. रणधीरराव, मला आतां त्या आनंदवल्लरीकड केव्हां जाईन असं झालं आहे. खरंच त्या बहीणभावंडांचा मी मोठा अपराध केला आहे!

तुह्मीं तिच्याकडे पोंचिवणार होता ना मला? मग इथं कशाला बरं आणलीत मला?

**राणू०**–तुह्मांला इथं आणून अगोदर दयाळजींचे एकदां चांगले कान उपटावेत, आणि मग तुह्मांला आनंदवल्लरीकडे पोंचती करावी, असा माझा बेत होता. आणि ह्मणूनच–( इतक्यांत दयाळजी येतो. ) पण हे आपले बंधूच आले.

**दया०**–( त्याला पाहून ) राण्या चोरा! दोन दिवस कुठं फरारी झाला होतास? आणि माझे सारे कागदपत्र कोणी लांबविले, बोल? आणि ही कोण? ( आश्चर्यानें ) अरे ही तर ताई! ही कशी इथं?

**राणु०**–ह्मसनी उमगून काडन्या पाई तर हा रान्या ग्येला व्हता धनीसाब.

**दया०**–अस्सं! बरा सांपडलास तर आतां. आतां मी कोणाच्या बापालाहि भीत नाहीं! बोल, माझे कागदपत्र कुठं आहेत? चोरा! माझ्याशीं अशी दगलबाजी? ( त्याला धरूं लागतो. )

**गिरि०**–रणधीरराव!

**दया०**–( साश्चर्य ) रणधीरराव! कार्तिकशंभूचे साथीदार!

**राणू०**–होय, तोच मी.

**दया०**–( दचकून ) अरे बापरे! ( बोबडी वळते. )

**राणू०**–असे भिऊं नका. असं दचकण्याचं काय कारण? पकडा, मला पकडा आणि गुदरा नेऊन

राजवाड्यांत ह्मणजे बक्षीस मिळेल! घाबरतां कां असे? उगीच भिण्याचं काय कारण? चित्रवीर्य महाराजांना ठार करण्यासंबंधाचं सगळं कारस्थान केव्हांच कळून चुकलं आहे मला. आणि त्यासंबंधाचा सगळा पुरावा—आपल्या जवळच्या सर्व कागदपत्रांसह—आज क्रांतिवर्म, आनंदघन आणि इतर सरदार यांच्या ताब्यांत गेला आहे. आतां तुह्मांला आणि ललितराजांना—दोघानांहि—यांतून निसटून जातां येणं शक्य नाहीं!

**दया०**—( तोंडास फेंस येऊन, फिक्का पडून चक्कर येऊन पडतो. ) सगळं फुटलं तर!

**गिरिजा०**—अग बाई! याला चक्कर आली वाटतं. थांबा, मी पाणी घेऊन येते. ( आंत जाऊन पाणी आणते. )

**राणू०**—( त्याचे तोंडांत पाणी घालून व डोळ्यांस लावून त्याला शुद्धीवर आणतो. ) अहो, दयाळजी! असे घाबरतां काय? नीट शुद्धीवर या. ( हालवून ) सावध झालांत कीं नाहीं?

**दया०**—( चमत्कारिक डोळे करून ) अरे बापरे! ते पहा मांग! मला फांसावर चढवायला आले आहेत! हे पहा—हे माझ्या दंडाला करकचून काढण्या बांधूं लागले! अरे! मला असे जखडूं नका! मी सर्व अपराध कबूल करितों. हा तुमचा फांस पाहून माझ्या सर्वांगाला कसं कांपरं भरलं आहे! पांच हजारीच्या मोहानं मी आपल्या बहिणीच्या विमल पातिव्रत्यावर जळजळीत निखारे ठेवा-

यला तयार झालों, हें मी कबूल करितों, पण हा फांस नको !

**राणू०**—असे घाबरूं नका, शुद्धीवर या. इथं फांस बीस कांहींएक नाहीं. तुमच्या भीतीमुळें तुह्मांला हा नुसता भास होतो आहे. तुह्मीं जर आपला अपराध कबूल कराल—आणि तो आतां तुह्मांला कबूल करण्याशिवाय गत्यंतरच नाहीं—आणि ललितराजाविरुद्ध अगदीं खरी खरी साक्ष द्याल, तर तुह्मांला यांतून बचावण्याचं काम माझं, ती सगळी जबाबदारी मी मग आपल्या शिरावर घेतों. तुह्मांला भिण्याचं बिलकूल कारण नाहीं.

**दया०**—रणधीरराव ! खरंच कांहो तुह्मीं माझे प्राण वांचवाल ? मी तुह्मांला आपला नोकर समजून—

**राणू०**—त्याचा संबंध आतां काय उरला आहे ? तें विसरून जा आतां सगळं.

**दया०**—नाहीं, पण माझ्यावर तुह्मीं कां ह्मणून दया करावी.

**राणू०**-तें केवळ ह्या तुमच्या माउली—गिरिजा-ताईंच्या कारितां. त्यानां मी माझी बहीण मानलं आहे.

**दया०**-तुह्मीं बहीण मानलीत ! आणि मी ? मी हिचा सख्खा भाऊ असून—(गिरिजेस) ताई, मी तुझा फार—नव्हे सर्वस्वी—अपराधी आहे !

**गिरि०**—अरे, त्या मानी कोपनशीलांचा बाणा पहा. आणि ह्या रणधीररावानीं मला आपली बहीण समजून कशी वागविली, तेंहि पहा. नाहीं तर तूं ! स्वार्थामुळं

आणि लोभामुळं तूं आंधळा झालास आणि लौकिकाची आणि आपलेपणाची देखील तुला चाड वाटेनाशी झाली !

**दया०**—ताई, खरोखर मी आंधळाच झालों होतों ! ह्या रणधीररावानीं आतां माझे डोळे चांगले उघडले. रणधीरराव ! या पुढं मी आतां तुमच्या सांगण्याप्रमाणं वागेन. ( इतक्यांत पिराजी येतो. त्यास पाहून ) बरं पण हा कोण येतो आहे ? ( निरखून ) हा तर पिराजी.

**राणू०**—( त्यास पाहून व ओळखून ) हो, तो पिराजीच इकडे येतो आहे, तर आपण आतां इथून आंतल्या खोलींत जाऊं. चला, या पुढं आतां कसं वागायचं तें मी तुह्मांला तिथंच सांगतो. गिरिजाताई ! तुम्हींहि या. यांना मी हें सगळं तुमच्या देखतच सांगणार आहे.

[ तिघेहि जातात, व पिराजी येतो. ]

**पिराजी**:—धनीसायबानी सरदार दयाळजीस्नी हटकाया म्हून मला धाडूनशनी दिलं, पन् हत तर कुनीबी न्हैं कीं. ( मोठ्यानें ) रान्या ! अरे रान्या ! अव रानूजी ! रानूजी बुवा ! ( हलके ) हत रानूजी बुवा न्है अन् कानूजी बुवाबी न्है !

[ इतक्यांत मंजुळा येते. ]

पन् ह्ये कोन पाकरू येतया हकडं ! ( तिला पाहून ) अरच्या ! ही तर त्या झोनाची मजुळा दिसतीया !

**मंजु०**—कोण आहे तिथं ?

**पिरा०**—कोन व्होवं तुला ?

**मंजु०**—मी गिरिजाताईंनां बोलवायला आलें आहे.

पिरा०—गिरिजाताईस्नीं हटकाया?

मंजु०—होय.

पिरा०—मग हतं कशा पाई?

मंजु०—इथं नाहीं तर कुठं पाह्यचं त्यांना?

पिरा०—जा, गह्नया कुच्या धुंड जा जाऊन शनी! येड्या मानसास्नी धुंडाया थतच जायला व्होवं. तिला गाठुन शनी तिचं येडबीड ध्येनाचा तुजा मनसुबा हाये व्हय? बरं पन चल, माझ्या संग चल. म्हंजे मी दावतो तुला ती येडी! पन मंजुळ! येक अट है म्हला अट.

मंजु०—अट आहे? कसली बाबा अट?

पिरा०—ह्ये पग-तूं त्या म्होनाचा नाद यापुन अक्शी सोडून शनी दिला पायजेस! तुज्या म्हे।नाच ते पिरयाळ रात्र ग्येल; आतां त्या त्येकाला पोसनार है कोन? त्येला ना खायाला अन्न, ना न्हायाला खोरट बी. ललितराज म्हाराज—

मंजु०—ललितराज—महाराज कां? ते कधीपासून महाराज झाले?

पिरा०-व्हय, व्हय. म्हाराजच न्हैत तर काय त्ये? संमदा अदिकारच हायकी त्येंच्या हातामंदी. त्ये ह्या पिराजीला शिलदारी द्येनार हैती-शिलदारी! तवा म्हंगतो मंजुळ! ( तिचा हात धरूं पाहतो ) ह्ये बग-तूं आतां त्या म्होनाचा नाद टाकून शनी, माजी घरधनीन-अन् शिलदारीन हो! ( तिचं मनगट धरितो )

मंजु०—( हात सोडवून घेऊं लागते ) चल मेल्या!

सोड माझा हात. धटिंगण मेला! ( मोठ्यानें ) कोण आहे घरांत? माई! गिरिजाताई! धांवा हो धांवा कुणी तरी. हा मांग--( इतक्यांत दयाळजी व गिरिजा एकदम बाहेर येतात व पिराजी तिचा हात सोडून दूर होतो.)

**गिरि०**–कोण–ओरडलं कोण? आणि माझ्या नांवा नं कुणी हांक मारली?

**मंजु०**-( जवळ येऊन ) मी ती मंजुळा.

**गिरि०**–कोण मंजुळा? आणि तूं ग केव्हां आलीस? कां आली होतीस? आणि ओरडलीस कां अशी?

**मंजु०**–मी ताईसाहेबांना बोलवायला ह्मणून इथं आलें, तों या मेल्या धटिंगणानं—

**दया०**-कोण पिराजी! ( पिराजीस ) पिराजीबुवा! तुह्मीं कां आलात?

**पिरा०**–धनीसायबांनीं हटकल्या सरदारास्नी!!

**दया०**:–अस्सं!

**गिरि०**–( मंजुळेस ) काय केलंन ग यानं?

**मंजु०**-( पिराजीकडे डोळे वटारून ) यानं एकदम माझं मनगट घट्ट धरलंन, आणि मेला मला भलभलतं बोलूं लागला.

**दया०**–अस्सं?

**गिरि०**–चोरां!

**पिरा०**–न्हे धनीसाब, ही तर मला माज्या भैनीवानी! भईन, माजी भईन ही धनीसाब!

**मंजु०**किती निलाजरा मांग आहे मेला! अशा

निसवलेल्या चांडाळाकडून बहीण ह्मणवून घेणं दिखील पाप आहे पाप!

**गिरि०**–काय लोंचट आहे मेला आणखी! मेल्या, बायकांची अब्रू आणि इज्जत घेतोस अशी? अथवा तुला तरी दोष लाऊन काय उपयोग? (दयाळजीकडे पहात) जसे सरदार तसे चाकर!

**दया०**–(आपली दृष्टी फिरवून स्वगत) हिच्याकडे वर डोळा करून पाहण्याची देखील मला लाज वाटते! (पिराजीस रागानें) पिराजी!—

**पिरा०**–(ओशाळून) न्हे धनीसाब!

**दया०**–न्हे धनीसाब! काय नाहीं धनीसाब? माझ्या वाड्यांत आणि हा असला वारगळपणा? जा, चालते व्हा इथून–ललितराजांना सांगा कीं, मी फुरसतीनं येऊन भेटेन केव्हां तरी. जा, एकदम निघून जा.

**पिरा०**–जी धनीसाब. (जातां जातां) ह्ये तर समदंच घोंगडं गळ्यामंदीं आल्यावानीच झालंया! आतां ह्मला युगत? हतून मुकाट्या निगून शनी जाव, त्येच्या बिगर काय युगत? (जातो.)

**दया०**–ताई, चल. रणधीरराव आंत बसले आहेत तिकडं जाऊंया आतां आपण. (जातात.)

## प्रवेश २ रा.

स्थळ—कोपनशीलाचे वाड्यांतील एक खोली.

प्रवेश—[ आनंदवल्लरी स्वतःशींच विचारांत निमग्न आहे. ]

आनंदवल्लरीः—आनंदवल्लरी! छेः तूं आनंदवल्लरी कसली? शोकवल्लरीच तूं! आतां तुला कशाला जगायचं? प्रत्यक्ष तुझ्या भावाच्या हातून तुझ्या भावी पतीचा खून व्हावा, या पेक्षां आनंदवल्लरी! तुझ्या दुर्दैवाची दुसरी साक्ष ती कोणती? दादानं वाट करून दिलेल्या रक्ताच्या पाटाबरोबर त्यांचे प्राण गेले, त्याप्रमाणंच माझ्या प्राणानांहि बाहेर पडायला तो वाट करून देता तर आज मलाहि पतिसुख लाभून मी कित्ती आनंदांत असते! पण माझं एवढं भाग्य कुठं आहे? ( रडते ) केवढी अभागी—दुर्दैवी—दुर्दैवी मी!! ह्या अश्रूंच्या बरोबर माझे प्राण ओसरून जाते तर किती बरं होतं? पण ह्या दुर्बल अश्रूंत इतकी शक्ती कुठून असणार! माझ्या प्राणानां शरीरांतून हुसकून लावायला ह्या माझ्या काळजाच्या रक्ताचे जोरदार पाटच फोडले पाहिजेत! अथवा आनंदवल्लरी! असं नव्हे कां? कीं इतकं—उत्कट तुझं प्रेमच नाहीं! ( कांहीं ऐकल्यासारखें करून ) प्रेमच नाहीं! कोण बोललं हें? माझं प्रेम—पण हो, तें तितकं उत्कट नाहीं हेंच खरं! कारण तें तितकं उत्कट असतं तर माझ्या दुःखाच्या कढाबरोबर, ह्या अश्रूंच्या ऐवजीं माझं रक्तच माझ्या हृदयाचे आणि शरीराचे तट फोडून वेगानं

बाहेर पडायला पाहिजे होतं! म्हणजे त्या रक्ताच्या लोंढ्याबरोबर माझ्या प्राणानांहि बाहेर पडायला आपोआप वाट मिळाली असती!

[ कोपनशील एका बाजूनें येतो. ]

**कोपनशील**–( स्वतःशीं ) त्याचे—रखेली हे शब्द माझ्या काळजाला कसे शल्यासारखें टोंचून राहिले आहेत. आणि त्याच्या करितां हिचं हें रडं! ह्याला अजूनहि खळ नाहीं! ( पुढें येऊन ) ताई! प्रियाळा करितां आतांपर्यंत तूं जितकं रडलीस तितकं बस्स नाहीं का झालं?

**आनंदवल्लरी**–( रडतच ) दादा! त्यांच्या करितां मी कितीहि रडले तरी तें पुरं कसं पडणार? ( हुंदके )

**कोपन॰**–ताई! नको—अशीं रडूं नकोस. आतां पर्यंत तुझ्या डोळयांतून अश्रूंचे पूरचे पूर वाहून गेले आहेत! त्यांच्यांत ही आणखी भर कशाला? ठेव, शिल्लक ठेव थोडं रडं. या पुढं ह्या कोपनशीलाकरितां तुला रडलं पाहिजे!

**आनंद॰**–दादा! काय बोलतो आहेस तूं हें?

**कोपन॰**–काय बोलतो आहे? प्रियाळाचा मी खून केला–तुझी बेअब्रू करणारे शब्द त्यानं उच्चारले न म्हणून मी त्याचा खून केला! आणि त्याकरितां मला शिरच्छेदाची शिक्षा फर्मावली आहे! आतां लौकरच त्या मांगांच्या तरवारी माझ्या गळ्यावर पडतील! आणि मग–

आनंद०( रडत ) एकून ह्या कपाळकरंच्या बहिणी-कारितां तुझा शिरच्छेद !

कोपन०—ताई! नको—इतक्यांतच अशी रडूं नकोस.

आनंद०—( रडतच ) डोळ्यांनों! तुह्मीं आपल्या ह्या अश्रूंच्या पुरांतच माझ्या ह्या दादाला असं अगदीं पार बुडवून टाका कीं हा इथं आहे कीं नाहीं हें सुद्धां त्या मांगानां दिसूं नये!

कोपन०—ताई! काय वेड्यासारखं बरळते आहेस तूं हें?

आनंद०—काय? मी बरळते आहे?

कोपन०—हो बरळतेच आहेस! अगं, नसेल तिथं अपराध चिकटविणाऱ्यानां प्रत्यक्ष खुनी मनुष्य दिसणार नाहीं काय? त्याला ते कुठूनहि हुडकून काढतील. आणि हेंहि पण तूं लक्ष्यांत ठेव कीं, सरकारी कायदा खुनाला खूनच घेत असतो!

आनंद०—काय? खुनाला खून?

कोपन०—हो खुनाला खून!

आनंद०—एवढंच ना? तर मी ह्मणते,—त्यांच्या खुनाबद्दल ते माझा शिरच्छेद करूं देत.

कोपन०—तुझा शिरच्छेद?

आनंद०—हो माझा. दादा! ही आनंदवल्लरी मोठ्या आनंदानं—डोळ्यांतून एक दिखील टिपूस न येऊं देतां—त्या मांगांच्या तलवारीपुढं आपली मान अशी लववील! ( मान वांकवून मोठ्या धीटपणानें उमी राहते )

**कोपन०**–अरे, अरे, अरे! कोपनशीला! तुझे कान आणि डोळे काय ऐकताहेत आणि पाहताहेत हें! हिला अशी उभी राहिलेली पाहून–दीन होऊन खाटकापुढं मान टाकणाऱ्या गाईची मला आठवण होते! ताई, आनंदवल्लरी! या तुझ्या उद्गारानीं माझ्या काळजांत कशी कालवाकालव होते आहे ती पहा! प्रियाळाचा खून जर मी केला आहे, तर त्याबद्दलचं शासनहि मलाच झालं पाहिजे. आणि तें भोगायला मी तयार आहे!

**आनंद०**–तुलाच झालं पाहिजे?

**कोपन०**–हो मलाच.

**आनंद०**–तें का? तूं–कां खून केलास?

**कोपन०**–कां खून केला?

**आनंद०**–हो, का खून केलास?

**कोपन०**–ताई, ताई! तुझ्या नालस्तीचे आणि बेइज्जतीचे शब्द त्यानं उच्चारले—

**आनंद०**–ह्मणून; असंच ना? एकून माझ्याकरितां तूं खून केलास. तर मग याबद्दल शासनहि मलाच झालं पाहिजे! असं नव्हे का?

**कोपन०**–( कंठ दाटून ) ताई! ताई! काय बोलते आहेस तूं हें?

**आनंद०**–काय बोलते मी? सांग, तूंच सांग दादा! मी बोललें यांत वावगं काय आहे?

**कोपन०**–( सगद्गद ) वावगं काय आहे! मी खून करून, तुझा शिरच्छेद?

**आनंद०**–तर माझ्याकरितां खून करून, तुझा शिरच्छेद ! दादा—

**कोपन०**–ताई !

**आनंद०**–बोल, मी नसते तर हा खून तुझ्या हातून होता काय ?

**कोपन०**( स्वगत, कपाळावर हात मारून ) हिला आतां मी काय उत्तर देऊं ?

**आनंद०**–बोल, आतां असा स्तब्ध कां ?

**कोपन०**–ताई ! तुझ्याकरितां जरी मी खून केला, तरी तो माझ्या हातून झाला आहे. आणि ह्मणूनच त्याबद्दलचं शासनहि मलाच होणं रास्त आहे.

**आनंद०**–तें कांहीं एक मी ऐकायची नाहीं ! मी याच पावलीं महाराजांच्याकडे जाते. ते ममाचे मवाळ कनवाळू आहेत. ते या बाबतींत मला खचित न्याय देतील. तुझ्या शिरच्छेदाऐवजीं माझा शिरच्छेद केल्यानं त्यानां खुनास खून मिळतोच आहे कीं ! मग यांत त्यांना कठिण तें काय आहे ?

**कोपन०**–कठिण काय आहे ! ( स्वगत ) माझा शिरच्छेद करण्यांत त्यांचे डाव काय आहेत ते हिला कसं कळणार ! ( उघड ) ताई ! कायदा एका गुन्हेगारा ऐवजीं दुसऱ्याचा बळी घेत नसतो.

**आनंद०**–महाराजानां मी हें सारं समजावून सांगेन, आणि त्यांची दया भाकीन ! झालेल्या खुनाला सर्वतो परी मीच कारण आहे असं त्यानां सांगितलं, ह्मणजे ते

माझी विनंति ऐकणार नाहींत कां? या बाबतींत मी तुझं कांहींएक ऐकणार नाहीं.

**कोपन०** तर महाराजांच्याकडे जाऊन त्यानां तूं विनंति करणार?

**आनंद०**—हो.

**कोपन०**—एकंदरींत त्यांच्यावर तुझा इतका विश्वास आहे?

**आनंद०**—हो आहेच आहे. त्यांची मनोवृत्ति पालटून, त्यानीं मला आपली बहीण—गुरुबहीण—म्हणून म्हटलं नाहीं कां?

**कोपन०**—( ओंठ चावून ) हो. हें मी अगदींच विसरलों होतों! तूंच विनंति करायला गेल्यावर तुला आणि मला दोघानांहि कदाचित् ते क्षमा करितील!

**आनंद०**—मग असं झालं तर त्यांत वाईट तें काय?

**कोपन०**—कोण म्हणतो वाईट म्हणून? पण ताई! त्या चंचल चित्रवीर्यांची मनोवृत्ती पुनः पालटली, आणि त्यानं भलतीच कांहीं अट घातली तर?

**आनंद०**—दादा! काय हा तुझा संशय?

**कोपन०**—संशय! संशय नव्हे. ते ललितराज असंच कायससं म्हणत होते.

**आनंद०**—काय म्हणत होते!

**कोपन०**—कीं महाराजांचं तुझ्यावर अत्यंत प्रेम आहे. आणि ते नेहमी तुझ्याच चिंतनांत गुंग असतात!

**आनंद०**—( दचकून ) काय? माझ्या चिंतनांत

गुंग? दादा! तूं काय बोलतो आहेस हें? शुद्धीवर आहेस कां तूं?

कोपन०—मी चांगला शुद्धीवर आहे. तूं दचकूं नकोस अशी.

आनंद०—मला नाहीं वाटत तूं शुद्धीवर आहेससा. नाहीं तर माझ्या काळजाला चरचर चिरीत जाणारे हे शब्द उच्चारून तूं पापाची जोड कां करितास? अरे! मागं तूं माझी परीक्षा पाहिलीस त्या दिवसापासून आत्ता पर्यंतच्या माझ्या वर्तनांत शंका घेण्या जोगं जर तुला कांहीं आढळलं असेल,—

कोपन०—तुझ्याबद्दल आणि शंका? ताई! ती मला स्वप्नांतहि येणार नाहीं.

आनंद०—तर मग हें असं काय बोलतोस?

कोपन०—काय बोलतो? महाराजांचं तुझ्यावर एक वेळ अत्यंत प्रेम होतं, ही गोष्ट तुला ठाऊक आहेना?

आनंद०—हो ठाऊक आहे. पण त्याचं आतां काय? तें त्यांचं पापी प्रेम माझ्या रक्तानं शुद्ध झालं नाहीं का?

कोप०—हो तूं ह्मणतोस तसंच, तसंच! तें पापी प्रेम आतां शुद्ध—प्रेम झालं आहे! आणि प्रियाळांच्या मागं आतां ते तुझ्यावर मागणी घालून तुझं पाणिग्रहण करूं इच्छिताहेत!

आनं०—दादा! दादा! दादा! काय बोलतो आहेस तूं हें! जिला आपली बहीण—गुरुबहीण ह्मणवली,

तिच्यावर मागणी आणि तिचं पाणिग्रहण! म्हणजे कोण पापी वासना ही!

**कोपन॰**—पापी वासना? शुद्ध प्रेम असणं ही पापी वासना? ताई! लग्नापूर्वी सगळ्याच जणी बहिणी असतात, हें तुला माहित नाहीं काय?

**आनंद॰**—दादा! सत्यपालांचा पुत्र कोपनशीलच हें बोलत आहे काय?

**कोपन॰**—ताई! आतां भिवाळाच्या मागं—शुद्ध प्रेमानं मागणी घालून, महाराज तुझं पाणिग्रहण करण्यास तयार असल्यावर, तुला आपला हात पुढें करायला काय हरकत आहे?

**आनंद॰**—काय हरकत आहे? एक वेळ वाङ्निश्चय होऊन ज्यांच्याशीं सुपारी झाली त्यांच्याहून अन्य पुरुषाला वरायला कोणची अस्सल क्षत्रिय वंशांतली कुमारी तयार होईल? दादा! तूं हें पक्कं लक्षांत ठेव कीं कुलवान कुमारींचीं मनं अद्याप इतकीं भ्रष्ट झालेली नाहींत.

**कोपन॰**— अग वेडे! या लग्नाच्या बाबतींत जग आज किती पुढं गेलं आहे तें पहा.

**आनंद॰**—केवळ वासनेचे गुलाम होऊन नरकांत पचणाऱ्या जगाशीं मला कांहीं एक कर्तव्य नाहीं!

**कोपन॰** ( एकीकडे ) अहाहा! किती हे पवित्र विचार! अशा पवित्र विचारांच्या वहिणी लाभणाऱ्यांचं केवढं भाग्य! पण जगाला चांगली वस्तू फार काळ लाभत नसते! मीच काय पण सारं जग--जन्मोजन्मीं

अशाच बहिणी मिळाव्यात ह्मणून इच्छा करील! आणि लोकांच्या या सदिच्छेबद्दल--देव आकाशांतून टाळ्या पिटून त्यांच्या कडकडाटानं आपली संमति दर्शवितील! (उघड) तर ताई! या गोष्टीला तूं तयार नाहींस?

**आनंद**०--नाहीं. अगदीं तयार नाहीं.

**कोपन**०- अगदीं-साफ तयार नाहींस?

**आनंद**०-हो साफ तयार नाहीं.

**को**०-ठीक आहे तर मग. एकून आनंदवल्लरीचं तिच्या भावावर प्रेम नाहीं!

**आ**०-प्रेम नाहीं! असं कसं ह्मणतोस तूं? अथवा तसंहि ह्मण पाहिजे तर.

**को**०--ह्मणायला कशाला पाहिजे? हें स्पष्टच नाहीं का? अग, प्रत्यक्ष तुझ्या भावाला शिरच्छेदाची शिक्षा ठाम ठरली असतानां देखील तूं महाराजांच्या ह्मणण्याला रुकार द्यायला तयार होत नाहींस, तेव्हां माझ्यावर तुझं प्रेम किती आहे हें उघडच दिसतं, नाहीं का?

**आ**०-दादा! तूं ह्मणतोस अशा रीतीनं वागण्यापेक्षां मरणं बरं! असं असतां तुला शिरच्छेदाचं इतकं भय कां वाटतं?

**को**०-( स्वगत ) शिरच्छेदाचं भय कुणाला वाटतं आहे? पण माझ्या शिरच्छेदानंतर त्या मांगाकडून होणाऱ्या हिच्या विटंबनेचं मला भय वाटतं आहे! पण हें हिला सांगून काय उपयोग ( उघड ) ताई!

आ०-बोल, बोल दादा. तुझा शिरच्छेद होणार ह्मणून का तुला ही धडकी भरली आहे ?

को०-( स्वगत ) आतां हिला काय उत्तर देऊं ? ( उघड ) हो, हो. त्यामुळंच मला शहारं भरून, ही भयंकर धडकी भरली आहे ! ज्याच्यावर प्रसंग ओढवतो त्यालाच त्या यातनांची बरोब्बर कल्पना होते. इतरानां ती व्हावी कशी ?

आ०-तर मग पुरुषासारखा पुरुष होऊन तूं मरणाला असा भितोस ?

को०-ताई ! मी मरणाला भीत नाहीं ! पण केवळ तुझ्याकरितां आणि पद्मनाभाकरितां ह्मणूनच मी जरा कचरतो.

आ०-दादा ! माझ्याकरितां तुला असं कचरण्याचं मुळीं दिखील कारण नाहीं ! पण हो, पद्मनाभ आहे हें मी कसं अगदींच विसरलें होतें !

को०-बोल ताई, बोल. माझ्यावर तुझं प्रेम आहे कीं नाहीं ? तुझ्या भावानं यापुढं कांहीं काळ जगावं असं तुला वाटतं कीं नाहीं ?

आनंद०-दादा ! तुझ्या सारख्याची ही अशी केविलवाणी आणि दीन स्थिति झालेली पाहून मला जितकं दुःख होतं, तितकीच तुझी कींवहि पण येते ! आणि असं वाटूं लागतं कीं असल्या गोष्टींत मी तुझं ऐकण्यापेक्षां तूंच माझं ऐकावंस, हेंच उत्तम ! दादा ! आतां तुला मी एकच निक्षून सांगते कीं या आनंदवल्लरीला

आपली अब्रू आणि लौकिक याहून दुसऱ्या कश्शाचीहि पर्वा नाहीं! मग या पायांत तुझा शिरच्छेद होवो, नाहीं तर माझा होवो; अथवा दोघांचाहि होवो!

कोपन०–ताई! ताई!! ताई!!! अगं, अशी निर्दय कां होतेस? तुझ्या नालस्तीचे शब्द उच्चारले एवढ्या करितांच प्रियाळा सारख्याचा खून पाहून मी आपल्यावर शिरच्छेदाची शिक्षा ओढवून घेतली ना? इतकं तुझ्यावर माझं प्रेम–अलोट प्रेम–असतां तूं माझ्याशीं इतकी निर्दय आणि कठोर होतेस?

आ०–माझी अब्रू आणि लौकिक हीं संभाळण्या-करितां मला याहून जरी निर्दय आणि कठोर व्हावं लागलं तरी मी होईन. अब्रूपुढं मी सर्व कांहीं तृणप्राय लेखते!

को०–( स्वगत ) अहाहा! काय हिचा हा निर्धार! ( उघड ) तृणप्राय लेखतेस?

आ०–हो तृणप्राय लेखते.

को०–तर मग तुझ्या भावावर तुझं प्रेम नाहीं?

आ०–हो नाहीं; नाहींच.

कोपन०–एकून तूं इतकी निर्दय आणि कठोर आहेस तर?

आनंद०–हो. त्याला माझा नाइलाज आहे.

कोपन०–( अंतःकरणाची कालवाकालव व विचारांचे द्वंद्व ) एकून मी सध्यां कोणत्या तऱ्हेच्या पेंचांत सांपडलों आहे याची तुला कल्पनाच नाहीं, हेच खरं! ती

यत्किंचित्‌हि असती तर बंधुप्रेमामुळं तुझ्या अंतः-करणाला दयेचे पाझरच फुटले असते ! पण जाऊंदे. तूं जर इतकी निर्दय आणि कठोर होते आहेस, तर हा तुझा निर्दयपणा मलाहिं तुझ्या इतकंच निर्दय आणि कठोर बनवीत आहे ! तुझ्या या निर्दयतेला आणि कठोर-पणाला आतां हीच शिक्षा योग्य ! ( जंबिया काढतो. )

**आनंद०**—दादा ! तूं भानावर आहेस का ?

**कोपन०**—हो. मी चांगला भानावर आहे. ( जंबिया हातांतून सुटूं लागतो )

**आनंद०**—चांगला भानावर आहेस ? मग असा कचरतोस कां ?

**कोपन०**—कोण कचरतो ? ( जंबिया सरसावून ) चल, तयार हो.

**आनंद०**—काय—तर मग तूं माझा खून करणार ?

**कोपन०**—( पुनः कचरून उसन्या अवसानानें ) हो खून ! खूनच. ज्या मनुष्यांत दयेचा एक लवलेशहि नाहीं त्याचा खून करायला कोणती हरकत ?

**आनंद०**—दयेचा एक लवलेशहि नाहीं ?

**कोपन०**—कां—आतां अशी कांपतेस का ? कापूं नकोस अशी.

**आनंद०**—दादा ! तुझ्या कट्यारीच्या चकचकाटाला ही आनंदवल्लरी भिते आहे असं का तूं समजतोस ? अरे ! मला जो हा कंप सुटला आहे तो ह्या कट्यारीच्या भीतीमुळं नव्हे. तर आपली कट्यार माझ्या पोटांत

खुपसून तूं शुद्धीवर आलास, ह्मणजे या भयंकर कृत्या-बद्दल तुला धडकी भरून, तुझी जी कांहीं विलक्षण स्थिति होऊन जाईल, त्या स्थितीच्या कल्पनेनंच मला हा कंप सुटत आहे! मला वाटतं तुझा चढलेला खून अद्याप उतरला नाहीं! आणि त्या मुळंच तूं आपल्या निरपराधी बहिणीची हत्या करून आपलं नांव जास्त भेसूर करून घेतो आहेस!

**कोपन०**–हो, माझी सारी धडपड नांवा करितांच आहे. या पुढं माझं नांव जास्त भेसूरच झालं पाहिजे!

**आनंद०**–अरे कृतांता! आपल्या कुळाची आणि लौकिकाची तरी कांहीं तुला चाड आहे कीं नाहीं?

**कोपन०**–( कान झांकून घेऊन ) कोपनशीलाच्या दोन्हीहि कानांत आतां जबरदस्त दट्टे बसले आहेत! या उप्पर त्याला कांहींएक ऐकूं येत नाहीं! ह्या जंबियाला तुला बळी हें पडलंच पाहिजे. आणि तेंहि याच घटकेला!

**आनंद०**–तर मग मरणाशिवाय दुसरी गतीच नाहीं मला! आणि तेंहि प्रत्यक्ष तुझ्या हातून!

**कोपन०**–हो माझ्या हातून!

**आनंद०**–नको, नको. तें तुझ्या हातून नको. दे तें तुझं हत्यार इकडं. तें मी आपल्या हातानंच स्वतःवर चालिवते!

**कोपन०**--काय, हें तूं स्वतःवर चालिवणार? छेः छेः ही गोष्ट मात्र होणं नाहीं. तुझ्यासारख्या निष्पाप कुमारीला हा आत्महत्येचा डाग नको! हें काम मलाच–या खुनी हातांनीं–उरकलं पाहिजे!

आनंद०--ठीक आहे तर दादा. ही मी तयार आहे. मात्र तुला एकच गोष्ट मला सांगायची आहे. ती हीच कीं यां पुढं मी तुझी बहीण नव्हे आणि तूं माझा भाऊ नव्हेस! तुझ्याकडून स्वतःला **माझी बहीण** असं ह्मणवून घेण्याची, अथवा तुला आपला भाऊ ह्मणण्याची मला इच्छाच नाहीं! आतां आपल्याला हीं एकमेकांचीं नातीं पार विसरून गेलीं पाहिजेत! ह्मणजेच भगिनी-हत्येसारख्या घोर पातकापासून तुला अलिप्त राहतां येईल! तो एक डाग तरी तुला नको! हे पहा— मी आपले सर्व मायापाश आणि बंधनं तोडून टाकलीं! यांच्या बरोबरच तूंहि आतां आपल्या ह्या शस्त्रानं माझ्या प्राणाचं आणि शरीराचं बंधन तोडून टाक! पण थांब, जरा थांब; मला तुला एक अखेरची विनंति करूं दे. जें तुझं शस्त्र त्यांचं रक्त प्यालं आहे तेंच शस्त्र माझ्यावरहि चालीव. ह्मणजे आमचीं दोघांचीं रक्तं एकजीव होऊन मला तिकडचं अंतर पडणार नाहीं! तुझ्या ह्या शस्त्राच्या चकचकाटांत प्रत्यक्ष जगदंबेची मूर्ती प्रकट झाल्याचं मला दिसत आहे. तर तिला शरण जाऊन तिचीच मला अखेरची प्रार्थना करूं दे.

कोपन०--कर, कर; खुशाल कर!

आ०--( डोळे झांकून ध्यान करिते ) आई जगदंबे! तूं सर्वसाक्षी, सर्वांच्या अंतर्यामीं फिरणारी देवता आहेस. तूं जाणतेच आहेस, कीं माझ्या मनाला ह्या वेळपर्यंत कोणत्याहि पापी अथवा दुष्ट वासनेनं कसा तो स्पर्शहि केला नाहीं.

कोपन०–( एकीकडे ) केला नाहीं–अशाच मनाच्या पवित्र स्थितींत जर तुझ्यावर मी हें हत्यार चालिवलं तर निःसंशय तुला उत्तम लोकाचीच प्राप्ती होईल! ताई, आनंदवल्लरी! कोण तुझा निर्धार हा! भगिनी-हत्त्येचा डाग मला लागूं नये ह्मणून तूं आपलीं बंधनं तोडलीस! पण तीं तोडून टाकणं माझ्या शक्तीच्या बाहेरचं आहे! त्या पवित्र बंधनानीं मला जखडून टाकलं असल्यामुळंच मी ह्या भयंकर साहसाला उद्युक्त झालों आहे. ताई! तुला माझी बहीण ह्मणवण्यांत मला किती आनंद, किती अभिमान, आणि किती भूषण वाटतं! ( विचार आठवून ) हो पण तिची अखेरची विनंति काय होती! "जें तुझं शस्त्र त्यांचं रक्त प्यालं आहे, तेंच शस्त्र माझ्यावर चालीव!" हेच, हेच तिचे शब्द होते! त्याच्यावर तिची ही केवढी अढळ निष्ठा! ताई, आनंदवल्लरी! तेंच-तेंच शस्त्र मी तुझ्यावर चालिवतो, आणि एका खुनाला दुसऱ्या खुनाची जोड देतो! पण तुझ्या ह्या खुनाला मी कां प्रवृत्त होत आहे हें त्या परमेश्वरालाच एक ठाऊक! कोपनशीला! आतां तूं असा कचरतोस कां? या वेळीं तुला आपलं अंतःकरण दगडाहून देखील घट्ट केलं पाहिजे! चल ताई, आटपलं तुझं ध्यान?

आनंद०—हे जगज्जननी माते! अंबाबाई! या क्षणभंगुर देहाची अथवा प्राणाची माझ्या अब्रूपुढं मला यत्किंचित् देखील पर्वा वाटत नाहीं, तर आई जगदंबे! तूं या आपल्या निष्पाप लेकीला एकदम आपल्या पदरांत घे!

**कोपन०**–घे, घेच पदरांत! [ जंबिया खुपसतो व ती खालीं पडत असतां तो तिला सांवरतो ] ताई!

**आनंद०**–दादा! हा वार तुझ्याच हातून झाला ह्मणून बरं झालं. दुसऱ्या तिसऱ्याच्या हातून हा होता तर मात्र त्यापासून मला फार दुःख होतं! ह्या वारानं मला तूं सर्वतोपरी सुखांतच लोटलं आहेस. आतां हें भयंकर साहस केल्याबद्दल तुझ्या मनाला जर कधींकाळीं डांचू लागेल तर त्याबद्दल तूं त्या परमेश्वराची क्षमा माग.

**कोपन०**–( सद्गदित कंठानें ) परमेश्वराची क्षमा असूं दे. पण ताई! आतां तूंच मला अगोदर क्षमा कर. आणि मग परमेश्वरानं मला क्षमा करावी ह्मणून त्याला अनन्य भावानं शरण जा! ताई! तुझ्या उरांत मी जो हा जंबिया खुपसायला तयार झालों तो केवळ भयंकर मनोविकारांच्या तावडींत सांपडून! त्या नीच नराधम चित्रवीर्याच्या बुद्धीला पुन्हा विपर्यास पडून, स्वतःच्या कामवासनेला तुझा बळी देण्याकरितां तो टपून बसला आहे! तो आणि तो ललित दोघेहि केवळ माझ्या शिरच्छेदाची वाट पहात आहेत! माझ्या मानेवर त्या मांगांचे सुरे पडायचा अवकाश, कीं तुझ्यावर बलात्कार करून ते तुला नासून टाकणार! आणि ह्मणूनच ह्या कोपनशीलानं–धर्माच्या, कुळाच्या, आणि लौकिकाच्या अभिमानाला पेटून, तुझ्या विमल कौमार्याला यत्किंचितहि डाग न लागतां तें अगदीं निष्कलंक रहावं अशा बळकट इच्छेनं, तुला अक्षय्य शांतीच्या

ठिकाणीं पाठविण्याकरितां तुझ्या उरांत हा जंबिया भोंसकला !

**आनंद०**—आणि त्यानं माझ्या पुढं दिव्य लोकाचीं दारं उघडलीं ! तिथं मला आतां शाश्वतची शांती मिळेल !

**कोपन०**—हो शांतीच, शांतीच ! ( एकदम रडें येतें ) अश्रूनों ! तुह्मीं मला असे आंधळे करून कां सोडता ? काय ह्मटलंत ?—' या मूर्तिमंत कौमार्यदेवतेच्या उग्र तेजाकडे पाहण्याची माझी पुण्याई नाहीं ! ' नाहीं ! नाहींच ! उघडच आहे-एकच नव्हे, तर जाणूनबुजून दोन खून करणाऱ्या अधमाजवळ इतकी पुण्याई कोठून असणार ! ताई ! मी हे खून करायला प्रवृत्त झालों तें केवळ आपल्या कीर्तीला आणि नांवालौकिकाला बट्टा लागूं नये, आणि परमेश्वराच्या घरीं तरी सत्याचा विजय व्हावा एवढ्याच हेतूनं ! ह्मणून ह्मणतो ताई ! माझ्या या अपराधाबद्दल मला आतां तूंच क्षमा कर.

**आनंद०**-दादा ! तुला क्षमा मागण्याचं काय कारण ? यानं तुझेच माझ्यावर उपकार झाले आहेत. क्षमाच मागायची, तर आपण दोघंहि मिळून त्या जगदंबेची करुणा भाकूं. हे जगदंबे ! आमच्या हातून जाणून बुजून अथवा चुकीनं जर कांहीं पातक घडलीं असतील, तर त्याबद्दल तूं आह्मांला क्षमा कर ! ( कोपनशीलहि तिच्याच बरोबर करुणा भाकतो ) येते, येते मी आतां. ( मान टाकते. )

**कोपन०**—काय ! इहलोकची संसार-यात्रा आटपून

चालवीस तर तूं एकून? ताई, आनंदवल्लरी! थांब, थांब. तुझ्याशीं मला आणखी एक–एकच शब्द–बोलूं दे. अरे, ही तर कांहींच बोलत नाहीं. ताई, आनंदवल्लरी! आनंदवल्लरी! माझ्या हांका सुद्धां तुला ऐकूं येईनाशा झाल्या काय? ( इतक्यांत पद्मनाभ येतो त्यास पाहून ) कोण पद्मनाभ?

**पद्मनाभ**–हो तोच मी. पण ही ताई का अशी इथं पडली आहे?

**कोपन०**–ती बेशुद्ध होऊन पडली आहे.

**पद्मनाभ०**–ताई! ताई!

**कोपन०**–पद्मनाभ! तिच्या कानाशीं लाग आणि यांहिपेक्षां जरा मोठ्यानं हाक मार. तिचे प्राण जर अजून पर्यंत निघून गेले नसतील, तर या पुढं मी त्यानां इतक्यांतच जाऊं देणार नाहीं. मी त्यानां अस्सें आडवून धरीन! ( तिचे तोंडाकडे हात नेतो तोंच तिचे चाललेले श्वास पाहून ) हा पहा–हिचा श्वास पुन्हा चालू लागला. ताई! हा पहा पद्मनाभ तुझी अखेरची भेट घेण्याकरितां आला आहे. बोल, बोल. ह्याच्याशीं तरी एखाद दुसरा शब्द बोल.

**पद्मनाभ**–ताई! अग ताई! ( जखम पाहून ) पण ही जखम कशी झाली तुला?

**आनंद०**–( तुटक शब्दानीं खोल आवाजांत ) जंबिया खुपसून मीच ती आपल्याला करून घेतली!

**कोपन०**–( भडभडून येते ) काय! तूंच करून घेतलीस?

**आनंद०**—पद्मनाभ! दादाचं माझ्यावर किती प्रेम ह्मणून सांगू? तें एक त्या परमेश्वरालाच ठाऊक! पापी चित्रवीर्य आतां कधींहि माझा पिच्छा पुरविणार नाहीं! ( कांहीं वेळ थांबून ) माझं तुह्मांला एकच शेवटचं सांगणं आहे—आतां प्रमाणंच सत्याला जागा आणि परमेश्वरावर पूर्ण निष्ठा ठवून वागा. मी स्वर्गांत गेल्यावर दिखील तुमचं अभिष्टच चिंतीन आणि जन्मोजन्मीं कोपनशीलासारखे आणि तुझ्या सारखे भाऊ मिळावेत ह्मणून देवा जवळ प्रार्थना करीन!

**पद्मनाभ**—ताई! ताई! हें काय असं? (तिला मांडी देऊन कुरवाळूं लागतो. )

**आनंद०**—मला असं कुरवाळून उगीच जास्त मोह-पाशांत कां अडकविता? अशानं माझे प्राण मात्र घोटाळ-तात, लौकर निघून जात नाहींत! नको—नकोच तर आतां. येते-येतेच तर! रा—म रा—म राऽऽऽम (प्राण सोडते )

**पद्मनाभ**—ताई! ताई! ( डोकें टेकतो. )

**कोपन**—( कांहीं वेळ स्तब्ध राहून, एकदम कांहीं ऐकल्या सारखें करून पद्मनाभास संभ्रमानें ) पद्मनाभ! "
"आनंदवल्लरी! आनंदवल्लरी!" ह्मणून आत्तां इतक्यांत कोणी हांका मारीत होतं तें नाहीं तुला ऐकूं आलं?

**पद्मनाभ**—नाहीं.

**कोपन०**—नाहीं? पण तें पाहिलंस विमान आणि ते शिवदूत! त्यांच्याच त्या हांका! पण पद्मनाभ! हिच्याशीं मला अजून दोन शब्द बोलायचे आहेत. ताई, आनंद-

वल्लरी! ( तिच्या अंगाला हात लावून ) इथं काय उरलं आहे आतां? हिचं अंग काला सारखं गार पडलं आहे अगदीं! मला वाटतं ही हें जग सोडून पार गेली! पण छेः इतक्यांत कशी ही जाणार! हिचा आत्मा इथल्या इथंच कुठं तरी अंतरिक्षांत घिरट्या घालीत फिरत असला पाहिजे! तर त्याच्याशींच मला दोन शब्द बोलूं दे. हे जगदीशाच्या मनोरम चिदंशा! हे वायुरूपी आनंदवल्लरीच्या आत्म्या! थांब, थांब. तूं जिथं घिरट्या घालीत आहेस, तिथंच जरासा थांब!

**पद्मनाभ**—दादा! असा भ्रम झाल्या सारखा काय करतो आहेस तूं हें?

**कोपन०**—काय मला भ्रम झाला? आणि तूं तेवढा शुद्धीवर! ( तिचें प्रेत पाहून ) अथवा हो भ्रमच! भ्रमच हा! पद्मनाभ, हिच्यांत आतां काय उरलं आहे? हिला आतां अग्निसातच केली पाहिजे!

**पद्मनाभ**—हिला सोडून मी इथून उठणार नाहीं!

**कोपन०**—नको, नकोच उठूंस! अशा सद्गुण-मंजिरीला चितेवर ठेवून, जाळून खाक करून टाक-ण्याची कल्पना कुणाला रुचेल? पद्मनाभ! आपण हिला अशीच इथं जतन करून ठेऊं. हिचं अंग पुसून त्याला दुर्गंधी येऊं नये ह्मणून आपल्या अश्रुपातांच्या तिलां-जलींनीं हिला मिठवणी देऊं! अरे! पण आपल्या दोघांच्या अश्रूंची मिठवणी कितीशी पुरी पडणार! पण आहे, यालाहि एक उपाय आहे. हिच्या तोंडीच्या

हजारों कुमारींनीं दररोज इथं येऊन हिला आपल्या अश्रूंचं स्नान घालावं, ह्मणून त्यानां आपण विनंति करूं! पण अशा पवित्र कुमारिका तरी किती सांपडणार! ( कांहीं वेळ स्तब्ध राहून दीर्घ उसासा टाकून ) पद्मनाभ! चल ऊठ, माझ्या मागोमाग ये. ह्मणजे हा सगळा प्रकार कसा घडून आला तें मी तुला सगळं सांगतो. ह्मणजे या पुढं कसं वागायचं तें आपल्याला ठरवितां येईल. एकच गोष्ट तुला सांगतो—ज्यानां अब्रूची आणि लौकिकाची चाड आहे त्यानीं ह्या जगांत फार दिवस राहतां कामा नये. [ जातात ].

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**—ललितराजाचा वाडा.

[ **प्रवेशः**—ललितराज व पिराजी बोलत आहेत व राणोजी आड उभा राहून ऐकत आहे. ]

**ल०**—पिराजी! एकून दयाळजी कुठं फरारी झाला तर?

**पि०**—व्हय धनीसाब, त्येंचा चाकुरमान्या तो रान्याच सांगत व्हता.

**ल०**—ही केव्हांची गोष्ट?

**पि०**—इक्त्यामंदीच धनीसाब.

**ल०**—अस्सं? पण काय रे, तूं तरी माझा इमानदार नोकर आहेस कीं नाहींस?

पि०—जी, अक्शी बंदा धनीसाब. मी तर धनीसाबांच्या भाकरीवरता वाडलो अन् ह्ये दीस पगितले.

ल०—तर तूं इमानाचा पुरा शाबूत आहेस ?

पि०—ह्ये काय इचारनं धनीसाब ?

ल०—अगदीं शाबूत ? कध्धीं बदलायचा नाहींस ?

पि०—कदीबी न्हे धनीसाब. ज्येनी जिवदान दिलं त्येंच्यावर कोनचा हरामखोर उलटल धनीसाब ?

ल०—ठीक आहे. तूं जर आपल्या इमानाला जागलास तर त्याबद्दल तुला योग्य इनाम मिळेल. उद्याच्या उद्यां देखील मिळेल ! कारण उद्यां माझा आणि सूर्याचा उदय एकाच वेळीं होणार ! मला पद्मपुरीचा राजा ह्मणून पहिल्यानं तूं मुजरा ठोकला पाहिजेस.

पि०—धन्याच्या परतापी सूर्याची किरनं आभाळामदल्या सूर्याच्या किरनावानी फाकतीला ! अन् भगवानाजवळबी मी ह्येच मागूनशनी घेईन !

ल०—दरबारांतल्या मोठमोठ्या सरदारानां आणि मानकऱ्यानां शोभेल असाच हा तुझा तोंडपुजेपणा आहे ! खचित, तूं चांगल्या पैकीं सरदार होशील !

पिरा०—ह्यो तोंडपुजपना न्हय धनीसाब-मी धनीसायबांच्या भाकरीचा अक्शी मिंदा हैं मिंदा धनीसाब. ( दांत विचकतो )

ल०—तूं तोंडपूजा नसलास तर फाजील लघाळ आणि बेअक्कल तरी असला पाहिजेस ! कारण तोंडपुजेपणाचं बोलणं कानाला मधुर, आणि गायनापेक्षांहि गोड

लागत असतं. तुझ्या बोलण्यांत निराळेच सूर मिसळलेले दिसतात! तरी पण मोठ्या आणि कर्तबगारीच्या कामगिरीवर तुझ्या सारख्या इमानाच्या धड माणसाचीच योजना केली पाहिजे! ठीक आहे. असा इकडे ये. मात्र खरं बोल. माझ्या पासून कांहीं चोरून ठेवूं नकोस. हे पहा-आजपर्यंत तुझ्या हातून किती खून झाले आहेत रे?

पि०-( घाबरून ) खून! अन् माज्या हातूनशनी? धनीसाब!

ल०-हो हो, तुझ्याच हातून. असं भिण्याचं कारण नाहीं. खरं बोल. एक-दोन-तीन!

पि०-छत्. ( तोंडांत मारून घेऊन ) दो-तीन कुटलं? योक-योकच धनीसाब!

ल०—बस्स एकच?

पि०-व्हय योकच धनीसाब-अन् त्येच्या मदून धनीसायबानींच मला जीवदान देऊनशनी वाचिवलया!

ल०-तर मग तूं कांहीं ह्या धंद्यांत चांगला कसलेला आणि वाकबगार असा खुनी नाहींस? ठीक आहे. तरी देखील कांहीं हरकत नाहीं. कारण विश्वासांतला एक मनुष्य दहा मारेकऱ्यांचं काम करूं शकतो! हे बघ तुला एखादा चांगलासा जोडीदार दिला ह्मणजे मग कचरणार नाहींस ना तूं बिलकूल?

पि०-न्है, योक रेसभर बी न्है कचरनार धनीसाब.

ल०-तर हें पहा पिराजीबुवा, तुह्मीं आतां असं

करा. मी सांगितल्या प्रमाणं तुह्मीं अगदीं जय्यत तयारीनं असा. वेळ आली ह्मणजे मी तुह्मांला इशारत देईन. त्या वेळीं मात्र नका पाहूं मग मागं पुढं. एक घाव आणि दोन तुकडे! आणि मग—तुह्मीं सरदार फांकडे!

पि०—( हंसून ) जी धनीसाब.

ल०—संभाळा. नाहीं तर आयत्या वेळीं कचराल!

पि०—त्येची नग फिकीर धनीसायब्रास्नी.

ल०—जा तर, आणि आपली तलवार बिरवार नीट चांगली घासून पुसून साफ करून ठेवा.

पि०—जी सरकार. [ जातो. ]

ल०-( स्वगत ) हा पिराजी मोठा लुक्का माणूस आहे! ( विचारांत निमग्न ) काय? हा बदलेल! छेः हें मनांतसुद्धा नको आणायला. आणि बदललाच तर याला जागच्या जागीं केव्हांच चिरडून टाकतां येईल! ( डोक्यांत प्रश्न ) पण चिरडायचाऽऽ! बस्स, त्याला हीच युक्ति! जाऊं दे. आतां पहिल्यांदा त्या चित्रवीर्याला उखडायच्या तयारीला लागलं पाहिजे! त्याशिवाय ही पद्मनगरी मला माळ कशी घालणार! पद्मनगरीनं मला माळ घातली, ह्मणजे मग आनंदवल्लरी आपण होऊन मला माळ घालील! तिनं आपण होऊन जर असं केलं नाहीं तर तिच्यावर मी मागणी घालीन. आणि इतकंहि करून जर तिनं मला झिडकारलं तर मग जें करायला पाहिजे तेंच करीन! बस्स हीच युक्ति! पण हा पिराजी कां परत आला? कांरे, तू कां परत आलास?

पि०--मी व्हय धनीसाब ! भाईऽऽर--सरदार पद्मनाभ आल्याती. अन् त्ये धनीसायबांच्या संगं काई बोलायच है म्हंगत्यात.

ल०--जा, दे त्यानां इकडं पाठवून.

पि०--जी सरकार. [ जातो. ]

ल०--( आपल्याशीं ) हं. कोपनशीलाला माझा निरोप पोंचून हा बहुधा त्याच संबंधानं आला असला पाहिजे ! ( विचार करून पद्मनाभ येतो त्यास ) यावं, कसं काय--कोपनशीलांची कशी काय आहे तबियत ?

प०--ठीक आहे. त्यांनीं आपल्याला--अत्यंत नम्रता-पूर्वक-फार फार नमस्कार सांगून, मलाऽऽ--अशाकरितां पाठवून दिलं आहे कीं--

ल०--आपण आनंदवल्लरीला--बरोबर घेऊन आलांत कीं काय तर मग ?

प०--छेः छेः तिला नाहीं आणली; पण तिचं मन मात्र वाळिवलं आहे. आणि तें वळवायला इतके कांहीं प्रयास पडले कीं ज्याचं नांव तें ! झालेली शिक्षा रद्द झाल्याचा--महाराजांच्या शिक्क्या मोर्तबानिशीं--आपल्याला ताबडतोब हुकूम मिळावा अशी दादांची विनंति आहे आपल्याला.

ल०--अं: त्याला कितीसा वेळ पाहिजे हो ?

प०--आणखी--ताईचीहि पण एक विनंती आहे आपल्याला.

ल०—काय–मला? आणि आपल्या ताईंची विनंती? बोला–बोला काय आहे ती

प०–विनंति एवढीच–कीं ती इथं आल्याची गोष्ट ह्या कानाची त्या कानाला सुद्धां कळतां कामा नये. आणि एवढ्याच करितां तिनं मलाच इथली सगळी व्यवस्था बघायला सांगितलं आहे. आपल्या वाड्यांतल्या चाकर-माणसांच्या दृष्टोत्पत्तीला हें यावं हें तिला बिलकूल पसंत नाहीं. कारण–लाज! शिवाय दुसरं असं कीं हलक्या लोकांच्या डोळ्यांनीं पाहिलेली गोष्ट त्यांच्या लवलव करणाऱ्या जिभल्यांतून तेव्हांच बाहेर पडत असते.

ल०—ती आल्याचं मी स्वतः सुद्धां बघणार नाहीं; मग तर झालं कीं नाहीं? आणि माझ्या वाड्यांत–महा-राजांच्या करितां तयार केलेल्या महालांत–तिला गुप्त-पणानं ने आण करण्याची व्यवस्था आपण आपल्या इच्छेप्रमाणं हवी तशी ठेवा. माझी कांहींएक हरकत नाहीं. आपल्याला इथं पूर्ण मुभा आहे.

प०—याबद्दल आमच्यावर आपले फार फार उप-कार आहेत!

ल०—छे: यांत उपकार ते कसले? (उठून) चला, असे माझ्या मागोमाग या; मी तुह्मांला ती जागा दाखवितो. मागच्या चौकांत या पुढं कोणी फिरकूं नये ह्मणून मी सक्त ताकीद देऊन ठेवितो. समजलं? तुह्मीं मात्र अगदीं जलद आटपा सगळं. [ दोघेहि जातात. ]

( पिराजी व राणूजी पान करीत येतात. )

रा०—योकून पिराजीबुवा! तुमी उद्या सरदार व्हनार सरदार! पन् मग या रान्याची वळक पाळक धराल कां राव काई? कां जाल इचिभन पार इसरूनशनी?

पि०—तुज्यासारक्या दोस्तास्नी कोन इसरल?

रा०—पन् कायव ह्या पद्मनाभाचं भाऊ त्ये कोपन-शील कस जालं इक्त राजी?

पि०—त्येचीच तर लई तारीफ करन्यासारकी है तारीफ! उद्या ह्येच कोपनशील माज्या धन्यासंग आपल्या भइनीचं लगीन लाऊनशनी देत्याल, अन् हा सरदार पिराजी त्येंच्या इतल्या—त्या मंजुळला—आपली घरधनीन करनार!

रा०—तर पिराजीबुवा हा तुमचा बी लई न्याराच कावा है!

पि०—हः हः हः हः! ( त्याचे कानांत कांहीं सांगतो ) अन् त्येच्या पाई तर ह्ये हत्यार नीट घासून पुसूनशनी साफ कराया व्होव अद्दुगर. ह्येच्यावर तर आमची झोरली समदी सरदारी. (तलवार काढूं लागतो).

रा०—बऽऽरं. मग आतां पुना कवा जाफत?

पि०—सरदारीन घरामंदी आल्यादिशीं अगदीं पयल्या राती.

रा०-हः हः हः हः! येतो तर, सरदारसायब!

पि०-सरदार सायब! रानवा, सरदार सायब-म्हूनशनी इक्त्या मंदीच काय झंगताजी मला?

रा०-इक्त्यामंदी? (हंसून) इक्त्यामंदी कसलं? तुमी आतां सरदार व्हनारच व्हनार! बरं बसा. (जातानां स्वगत) ही सगळी वर्दी, प्रेमसागर, कांति-वर्म, आनंदघन, आदीकरून सगळ्या सरदारांनां अगोदर दिली पाहिजे. नाहीं तर खास आज कांहीं तरी भलता प्रकार ओढवेल!

[ दोघे दोन बाजूनीं जातात. ]

---

## प्रवेश ४ था.

**स्थळ**-ललितराजाचे वाड्यांतील मागच्या चौकांतील विलासमंदिर.

**प्रवेश**-[ एका मंचकावर आनंदवल्लरीचें प्रेत ठेविलें आहे; व मंचकाजवळ पद्मनाभ, गिरिजा व मंजुळा बोलत आहेत. ]

**गिरिजा०**-पद्मनाभ! मी सांगतें असंच झालं पाहिजे.

**पद्मनाभ**-तुमच्या बाहेर मी नाहीं. पण या पुढं फार वेळ आपल्याला इथं राहतां येत नाहीं! इतक्यांत महाराज येतील! मी मघा दाखवून ठेवलेल्या ठिकाणीं तुम्ही जा. तिथं दादा आहेच.

**गि०**-ठीक आहे. मंजुळे! मी सांगितल्याप्रमाणं करायचं. त्यांत एक काडीभरदिखील अंतर पडूं द्यायचं

नाहीं. समजलीस ? ( तिच्या कानांत कांहीं हळू सांगते. )

मं०—अगदीं तुह्मीं सांगितल्यासारखं वागेन. त्याची नको तुह्मांला काळजी.

गि०—येते तर मी. ( आनंदवल्लरींच्या प्रेतावर शेला टाकते ) मंजुळे! तूं अशी बैस. ( तिला नीट बसविते ) मोठ्या सावधपणानं आणि हुशारीनं हां; नाहीं तर आयत्या वेळीं गांगरून जाशील!

प०—( गिरिजेस ) हं तुह्मीं जाच आतां. हें पहा, ते आल्याचीच ही चाहूल! तुह्मीं तिकडं जा आणि मी दाराशीं जातो. ( मंजुळेस ) हुशारीनं हां.

मं०—त्याची नको काळजी. [ गिरिजा जाते व पद्मनाभ दाराशीं येतो. ]

[ पडदा पडतो. ]

( चित्रवीर्य व ललित बोलत आहेत. )

ल०—महाराज! येतो आतां. इकडं मी देखील फिरकणार नाहीं ह्मणून त्यानां मी वचन देऊन चुकलों आहे तर सरकार—राजेसाहेवांनीं एकटंच जावं आतां.

चि०—महाराज, सरकार, राजेसाहेब, हे तुझे शब्द माझ्या कानाला कसेसेच लागतात. ललित! तूं मला आपला दोस्त, प्यारा दोस्त, नाहीं तर कलिजा,—असंच ह्मटलं पाहिजेस! महाराज, सरकार ह्मणवून घेण्याचा मान त्या गादीचा, माझा नव्हे. ललित! मी आपला तुझा दोस्त—नुसता चित्रवीर्य!

ल०—जशी महाराजांची इच्छा ! मी येतो आतां. ते पहा पद्मनाभ.

चि०—( हंसत ) पुन्हा महाराज ! ललित ! या पुढं नाहीं मी हें ऐकून घेणार. ( आंत जाऊं लागतो. )

ल०—(जातां जातां) ठीक आहे. तर हें आतां शेवटचंच असं समजा. [ जातो. ]

प०—( पुढें येऊन ) सिद्धता आहे महाराज सगळी.

चि०—( पद्मनाभास पाहून ) कोण ? पद्मनाभ !

प०—( हात जोडून ) होय. तोच मी महाराज. काय आहे बंद्याला हुकूम ?

चि०—काय ? तुह्मीं माझे बंदे ! छत्, तुह्मीं आमचे पंचीप्यार—कलिजे आहांत.

प०—काय महाराज ह्मणतील—तें खरं ! आंत चलावं महाराजानीं. माझी हद्द इथपर्यंतच. इथूनच मला आज्ञा घेतली पाहिजे सरकारची.

चि०—ठीक आहे या. पण या पुढं तुह्मीं आमचे खासगी कारभारी !

प०—( हंसरें तोंड करून मुजरा करितो व जातां जातां आपल्याशीं ) खासगी कारभारी ! कारभार करायला या पुढं जिवंत राहशील तेव्हां ना ! विषयांधा ! सांगा ! याचा तुला मागून पश्चात्ताप होईल. इतकंच नव्हे पण ह्या नीच कृत्यानं तुझ्या तोंडाला फांसली जाणारी काळोखी, तूं कितीहि धडपड केलीस, तरी धुतली ह्मणून जाणार नाहीं ! हो, पण मलाहि आतां

देर करून उपयोग नाहीं. दादांना गांठून पुढच्या तयारीला लागलं पाहिजे. [ जातो. ]

चि०–( किंचित् पुढें जाऊन ) अरे, ही तर इथं माझी वाट पहात बसली आहे ! मी इतका भाग्यशाली असेन अशी मला कल्पनाहि नव्हती ! त्या दिवशींच्या हिच्या उग्र स्वरूपाला पाहून माझी अगदीं गाळण उडून गेली होती. पण आज ही आपण होऊन शृंगारून इथं येऊन बसली आहे. केवढं माझं भाग्य ! आनंदवल्लुरीची प्राप्ती होणं यासारखा सुखानंद, खचित या जगांत तरी दुसरा नाहीं ! काय-जगांत ? जगांत ह्मटलं मी ? छेः जगांतच काय, पण खुद्द स्वर्गलोकीं देखील तो नसेल ! ( जवळ जाऊन ) हे सुंदरी, आनंदकालिके ! आनंदवल्लुरी !

मं०–हं तिथून–तिथूनच. खबरदार पुढें याल तर !

चि०–( साश्चर्य व भीतियुक्त ) ह्मणजे ! तूं आनंदवल्लुरी नव्हेस तर ? ( निरखून पाहून ) खास, ही आनंदवल्लुरी नव्हे. ही कोणी तरी दुसरी स्त्री आहे. हें ललिताचं तर कांहीं कपट नसेल ?

मं०–त्यांचा काय यांत संबंध ?

चि०–तर तूं कोण ? आणि आनंदवल्लुरी कुठं आहे ?

मं०–मी त्यांची दासी. आणि त्या–इथं निजल्या आहेत.

चि०–कोण आनंदवल्लुरी ?

मं०–हो त्याच.

चि०-ती निजली आहे इथं? कुठं आहे? (पुढें जाऊं लागतो).

मं०-हं. जरा लांबच उभे रहा! गुरुबहीण मानणाऱ्याच्या पापी हातांचा आपल्यालाच काय, पण आपल्या प्रेताला दिखील विटाळ होऊं नये, अशी त्यांची इच्छा होती!

चि०-प्रेताला! ह्मणजे?

मं०-ह्मणजे काय? प्रेतालाच! प्रेतालाच! प्रेताशिवाय दुसरं काय उरलं आहे आतां त्यांच्यांत?

चि०—ह्मणजे! काय ह्मणतेस तूं?

मं०—काय ह्मणते मी? (आनंदवल्लरीच्या अंगावरील शेला काढून) मी काय ह्मणते, तें प्रत्यक्षच पहा!

चि०-(दचकून) अरे! अरे! ही तर सारी रक्तबंबाळ झालेली दिसते आहे! ललितराज, ललितराज! अहो ललितराज! धांवा हो धांवा. खून, खून! इथं आनंदवल्लरीचा कोणी दुष्टानं खून केलेला दिसतो! खून! खून! धांवा, धांवा, कोणी तरी!

[इतक्यांत चोरवाटेनें ललितराज व पिराजी येतात.]

ल०-(पिराजीस हलकेच) जा, एकदम ते दिवे मालवून टाक (पिराजी दिवे मालवितो).

चि०-दिवे कोणी मालविले? खास इथं कोणी तरी मारेकरी आहेत! ललित! ललित! धांवा, धांवा. खून! खुन!

ल०—हा आलों. खून खून ह्मणून कोण ओरडलं? (अंधेरांतच चित्रवीर्यावर वार करून) जा, जा पाहूं

आतां कसा पळून जातोस तो! खून करून, दिवे मालवून, निसटूं पहातोस? चोरा–( दुसरा वार करितो.)

चि०–ललित! ललित! दोस्त ललित! मी मारेकरी नव्हे. मी चित्रवर्य आहे.

ल०-काय? चित्रवीर्य! चोरा! चित्रवीर्य महाराजां सारखा आवाज काढून मला फसवूं पहातोस? (लाथ मारून) हरामखोरा!

चि०–अरे, अरे, अरे! काय हा घोंटाळा! ललित, मी मारेकरी नव्हे, मी चित्रवीर्य आहे.

ल०–हो चित्रवीर्यच! चित्रवीर्यच कां–तूं विचित्र-वीर्य आहेस! आनंदवल्लरीला भ्रष्ट करूं पाहणारा तूंच नीच, पापी, चांडाळ! तुला राजा ह्मणणं ह्मणजे भयंकर पाप! तुझ्या सारख्या पातक्याला ह्या पुढं जगूं देण्यांत अर्थ नाहीं. तुझ्या पापाला हेंच प्रायश्चित्त! (पुन्हा वार करितो).

चि०–अरे, अरे! हा वार फार जोराने बसला! एकून माझा खून ललिताच्या हातून होत आहे! स्वर्ग-लोकीं जर ललितानं माझा खून केला ह्मणून मी सांगितलं तर तिथं देखील माझ्या शब्दावर कोणी विश्वास ठेवणार नाहीं.

ल०–काय पद्मपुरीच्या महाराजांच्या शब्दावर यम-पुरींतले लोक विश्वास ठेवणार नाहींत? ठीक आहे, तर त्यांनीं तुझ्या शब्दावर अगदीं डोळे झांकून विश्वास ठेवावा, अशीच तजवीज करितो. मग तर झालं कीं

नाहीं? हा घे माझ्या नांवचा जंबिया तुझ्या छातींत खुपसून ठेवतों! स्वर्गांत तुझ्या बोलण्याचा जर कोणाला अविश्वास वाटेल, तर त्याला आपल्या छातींतून हा काढून दाखीव! समजलास? (जंबिया खुपसतो.)

चि०-अरे, अरे, अरे! कोण भयंकर घाव हा! आनंदवल्लरी! हा चित्रवीर्य तुझी क्षमा भाकायला तुझ्या मागोमाग स्वर्गांतच येत आहे. अरे हरामखोरा! ललित्या! चांडाळा! मांऽऽऽगा!—(त्याचें प्राणोत्क्रमण होतें).

ल०—(चित्रवीर्य प्राण टाकतो तें पाहून) इतका वेळ ह्या काजव्याच्या मिणमिण चमकण्यामुळें दिव्याच्या अस्तित्वाचा भास होत होता! पण आतां काळाकभिन्न अंधेर झाला! अंधारी रात्र झाली! पण ही अशी रात्र या पुढं किती वेळ टिकणार? या सूर्याचा एकदा उदय झाला कीं ती अजीबात नाहींशी झालीच! या पुढं रात्रहि नाहीं, आणि असल्या काजव्यांची चमकहि नाहीं! (पिराजीस) पिराजी! ह्याच्या बरोबर आलेले चपराशी वगैरे गेले कीं नाहीं सारे परत?

पि०—गेले, कवाच गेले ते निगूनशानी परत?

ल०-ठीक. तर आतां अगोदर याच पावलीं तूं कोपनशीलाकडे पळत जा आणि त्यानां ह्मणावं मी तुमच्या भेटीची अगदीं वाट पहात बसलों आहे. असं सांगून त्यांना इथवर तावडतोब घेऊन ये.

पि०—जी धनीसाब. [ जातो.

ल०—( आपल्याशीं ) आतां ह्मणावं तुला असा फांसांत अडकवितो कीं ज्याचं नांव तें. ( पिराजी परत येतो त्यास पाहून ) कारे,—परत कां आलास?

पि०—मी हटकाया जान्याच्या अदूगरच कोपनशील पद्मनाभासंग हंत आल होत. ह्ये आलच त्ये.

ल०—अस्सं! ठीक आहे तर. तूं जा आणि बाहेर उभा रहा जरा.

पि०—जी हुकूम. [ जातो.

ल०—( इतक्यांत कोपनशील व पद्मनाभ येतात त्यांस ) ओहो! या, या. तुह्मीं अगदीं वेळेवर आलांत! या कोपनशील, या. मला एकदां भेटा पाहूं कडकडून. वाः पद्मनाभ! छान! ही सारी तुमची व्यवस्था वाटतं? आपल्या दोघांच्या मनौदार्याबद्दल आपली तारीफ करावी तेवढी थोडी! आपल्या ह्या करारी स्वभावाबद्दल मला फार पूज्यबुद्धि आणि आदर वाटतो.

को०—अस्सं! पण तुमचे ते महाराज कुठं आहेत?

ल०—ते या वेळीं अगदीं गाढ निद्रेंत आहेत.

को०—गाढ निद्रेंत?

ल०—हो गाढ निद्रेंतच! पण कोपनशील, अगोदर हें सांगा कीं—आनंदवल्लरीला पूर्वींच ठार करून, मगच तुह्मीं तिला इथं आणून ठेविलीत कीं नाहीं?

को०—ठार करून नाहीं; अमर करून!

ल०—शाबास! धन्य आहे तुमची! केवढी छाती!

को०—पण तो पद्मपुरीचा रंगेल भुजंग कुठं आहे?

छ०—मी सांगतोना कीं त्याला गाढ झोंप लागली आहे ह्मणून !

को०—त्या झोपेंतून त्यानं या पुढं कधींहि जागं होऊं नये, अशी कायमची झोंप घ्यायला लावतो मी त्याला आतां ! दाखवा कुठं आहे तो.

छ०—त्याचं कांहीं कारणच उरलं नाहीं आतां; ( चित्रवीर्याचे प्रेताकडे बोट दाखवून ) पहा पाहिजे तर. तो कांहीं आतां तुमच्या हातून जागा नाहीं व्हायचा !

को०—जागा नाहीं व्हायचा ! ह्मणजे ? तर मग आपण त्याला ठार केलात कीं काय ?

छ०—छत्. ठार नाहीं केला; मी त्याला अमर केला !

को०—अमर केलात ?

छ०—हो. त्याच्या ह्या अमरत्वाच्या अंतकालांतच आपला दोघांचा भाग्योदयकाल सुरू झाला ! आतां—पद्मपुरीच्या नागरिकानां चांगले दिवस आले ह्मणून आनंदच मानला पाहिजे ! कारण ह्या चित्रवीर्य जिवंत असेपर्यंत ह्याच्या कामाग्नींत कित्येक कुलीन नागरिकांच्या लौकिकाची आणि अब्रूची राखरांगोळी होऊन गेली आहे !

को०—तर मग आपण—त्याला ठार करण्याचे माझे श्रम वांचिवलेत ह्मणायचे एकून ?

छ०—कोपनशील ! प्रियाळांच्या खुनाबद्दल तुह्मांला ठरलेली देहान्त प्रायश्चिताची शिक्षा रद्द करून त्याबद्दल मी तुह्मांला क्षमा करितो. ( आनंदवल्लरीकडे बोट करून ) आणि हें तुमचं नुकसान अंशतः तरी भरून

काढावं एवढ्याकरितां मी या पद्मपुरीचा सगळा राज्य-कारभार तुमच्यावर सोंपवितों. मी फक्त नामधारी राजा; सत्ता सगळी तुमच्या हातांत!

को०—वाः कल्पना तर फारच उमदी आहे! पण प्रत्यक्ष चित्रवीर्य महाराजांचा धडधडीत असा खून झालेला असतां हे नागरिक लोक स्वस्थ बसतील असं कसं वाटतं तुह्मांला?

ल०—हो. तुह्मीं ह्मणतां तेंहि बरोबरच आहे; पण याच्यावर देखील मी एक शक्कल काढून ठेविली आहे.

को०—पण ती लोकांच्या खवळलेल्या डोक्यावर कितपत लागू पडेल याची मात्र शंका आहे.

ल०—शंका नकोच, आपण असंच उठवूं कीं महा-राजानींच आनंदवल्लरीचा खून केला.

को०—खाशी! शक्कल पण शक्कल! अज्जब शक्कल काढलीत!

ल०—बलात्कार करून ती वश होत नाहीं असं पाहून महाराज तिच्या खुनाला प्रवृत्त झाले, असं उठि-वलं—ह्मणजे झालं! मग कोणाला येणार शंका? आतां लोकांनां हें खरं वाटावं ह्मणून असं करूं कीं महाराजांचा जंबिया तिच्या छातींत झालेल्या जखमेंत खुपसून ठेवूं. आणि तिच्या गळ्यांतले मोत्यांचे हार तोडून इथं सर्वत्र पसरून देऊं ह्मणजे चित्रवीर्यानीं हिच्यावर बळ-जबरी केल्याचं स्पष्ट होऊन, त्यानींच हिचा खून केला, अशी सगळ्या जगाची खात्री होईल! आणि ही एवढी

खात्री झाली ह्मणजे मग अर्थातच महाराजानां कोणी मारलं हा प्रश्नच मुळीं पुढं येणार नाहीं; आणि तो आलाच पुढं, तर त्याला ह्मणजे आपल्या जवळ उत्तर नाहीं असंहि नाहीं.

को०—हां. हेंच, हेंच उत्तर कीं नाहीं? कीं—मी खवळून जाऊन, माझ्या बहिणीचा सूड घेण्याकरितां ह्यांचा खून पाडला! आणि ही गोष्ट लोकांनांहि तेव्हांच पटेल, आणि याबद्दल ते माझी कींवच करतील! असंच कीं नाहीं? असं करण्यांत मी ह्मणजे मोठा अपराध केला अथवा एखादं घोर कृत्य केलं ह्मणून ते माझी निंदा अथवा निर्भर्त्सना करतील अशांतलाहि कांहीं भाग नाहीं. उलट याबद्दल ते माझी तारीफच करितील! शिवाय या खुनाबद्दल क्षमा करायची ती देखील आपल्याच हातांत! मग काय?

ल०—अँ:, त्याबद्दल कसली आली आहे काळजी? तें तर केव्हांच ठरून चुकलं आहे. आतां या पुढं सगळ्या गोष्टी तुमच्या आमच्या विचारानं चालायच्या. दोघांत ताटातूट आणि फाटाफूट कशी ती बिलकूल होऊं द्यायची नाहीं. दोघेजण कसं अगदीं सख्या भावाप्रमाणं राहूं. मग आपल्यापुढं कोणाचं काय चालणार?

को०—(खोंचून) काय आपण दोघे जण सख्ख्या भावाप्रमाणं वागायचं ह्मणतां? ठीक आहे. तुमच्या ह्मणण्याला माझा पूर्ण रुकार आहे. तुमच्यामध्यें आणि माझ्यामध्यें या पुढं ताटातूट आणि फाटाफूट ही काल-

नयींहि व्हायची नाहीं; आणि हें घडवून आणण्यासंबंधानं मी कांही निराळाच विचार मनांत योजिला आहे. हें पहा,—या उप्पर ह्या निःसार जगांत कांहीं दिवस कंठावेत, अशी मला बिलकूल इच्छा उरली नाहीं ! तेव्हां अर्थात् आपल्यालाहि पण या जगांत मला सोडून या पुढं राहतांच कामा नये ! आपली ताटातूट व्हावी ह्मणून जर तूं कांहीं गडबड अथवा धडपड केलीस, तर इथल्या इथं ( तलवार उपसून ) ही समशेर तुझ्या मानेवर बसलीच ह्मणून समज !

लo—अरेरे ! दगा, विश्वासघात केला यानं !

कोo—( त्वेषानें व तिरस्कारपूर्वक ) विश्वासघात ! दगा ! ऑं ? या समशेरीला तुझा बळी दिल्याशिवाय ही तरवार हा कोपनशील आज म्यानबंद करणार नाहीं; हींच माझी प्रतिज्ञा ! पद्मनाभ ! तूं तिथं एका बाजूला उभा राहून आमचं द्वंद्व पहा. तुला मध्यें पडण्याचं बिल्कूल कारण नाहीं. ( ललितास ) चल, द्वंद्वाला उभा रहा.

लo—खचित. हें मात्र खऱ्या थोरपणाचं लक्षण आहे. ओः हो ! केवढा दिलदारपणा हा !

कोo—माझ्या दिलदारपणाची तारीफ नको. हा वेळपर्यंत जर कोणाच्याहि रक्तानें त्याचे हात विटाळले नाहींत, तर त्यानं ते या पुढं तरी मुद्दाम होऊन कां विटाळून घ्यावेत ? ( पद्मनाभास ) पद्मनाभ ! तूं आहेस तिथंच उभा रहा. तिथून एक पाऊलभरहि हालूं नकोस.

माझा हात चालेनासा झाला, आणि या नराधमाच्या समशेरीला बळी पडण्याचा माझ्यावर जर दुर्दैवानं प्रसंग आला, तर मात्र मग तूं ही आपली समशेर याच्यावर उचल; एरवीं नको. ( ललितास ) चल ये. ( कांहीं वेळ दोघांचें द्वंद्व होतें. )

ल०—चल् हा घे वार ! ( वार करितो. )

को०—घे, घे, तुलाहि घे ! ( वार करितो. )

ल०—अरे, अरे, अरे ! हा वार फार वर्मी लागला ! अरे, कोणीच कां नाहीं इथं माझ्या मदतीला ? धांवा, धांवा कोणी तरी ! पिराजी ! अरे पिराजी !

[ इतक्यांत पिराजी एकदम आंत येतो. ]

पि०—काय हुकूम हाय धनीसाब ?

ल०—हुकूम ! गद्धया ! (वार दाखवून) हें पहा काय तें ! जा, मोठ्यानं गिल्ला कर एकदम. तोंडाच्या सगळ्या शिरा ताणून—दगा, खून, राजद्रोह, विश्वासघात ! असं ह्मणून—एकच कल्लोळ कर. आणि पुढल्या चौकांतल्या साऱ्या जवानानां इकडं घेऊन ये !

पि०—दगा ! खून ! राजद्रूह ! इस्वासघात ! अव रानबा ! रानूजीबुवा ! धांवा, धांवा ! ( असें ओरडून एकदम बाहेर पडूं लागतो. )

रणधीरराव—( एकदम येऊन पिराजीचा हात धरून ) हो, हो ! दगा, खून, राजद्रोह आणि विश्वासघात ! आणि ते करणाऱ्याचा साथीदार तूं ! चोरा !

चाललास कुठं? पिऱ्या! तूं समजतोस तसा मी ह्या नराधमाचा हेर नव्हे. मी रणधीरराव आहे! (प्रकट होतो.)

पि०--( कांपू लागतो ) अरे बापरे! त-त-त-त--

रण०—पिऱ्या! कां, कांपतोस कां आतां असा? ( ललितास ) ललितराज! पद्मपुरीचे भावी महाराज! दगा, खून, राजद्रोह आणि विश्वासघात, कोणी केला तें ह्या पिराजीनं--मी तुमचाच एक हस्तक आहे असं समजून--माझ्या जवळ सगळं इत्थंभूत कबूल केलं आहे.

ल०--काय! तर मग तुह्मीं फरारी झालेले रणधीरराव!

रण०—हो, हो! तोच रणधीरराव मी!

[ इतक्यांत कांतिवर्म—प्रेमसागर, आनंदघन वगैरे सरदार, दयाळजी, गिरिजा व मंजुळा—यांसह येतात. ]

ल०—( सरदारांस ) हे सरदार हो! ह्या दगलबाज राजद्रोही कोपनशीलानं माझ्यावर वार करून आपल्या महाराजांचा आपल्या हातानं तिथं खून पाडला आहे तो पहा! आणि हे रणधीरराव याचे साथीदार!

रण०—असं! महाराजांचा खून कोणी केला तें हा पिराजी सांगेल. आणि राजद्रोही कोण याची—हे दयाळजी, हे कागदपत्र, आणि यांचा हा सारा पत्रव्यवहार, ( खिशांतून कागदपत्र काढून कांतिवर्मा-कडे देतो ) साक्ष देतील. दयाळजांनीं आपला सर्व गुन्हा कबूल केलाच आहे.

ल०—( स्वगत ) काय—तर एकून साराच डाव फसला! आणिं इथं हे माझ्या पापकृत्याचे साथीदार!

छे छे: ! हें माझं अघोर पापच मनुष्यरूपानं माझ्या पुढं मूर्तिमंत उभं राहून, मला भेडसावीत आहे ! पण आतां डगमगून काय उपयोग ? ( उघड ) हा सारा प्रकार ह्या जारिणीच्या पायांत—

**को०**–( त्वेषानें ) जारिणीच्या पायांत ! जारिणी जारिणी काय ती ? नराधमा ! तूं मात्र चित्रवीर्याची कुंटणगिरी पत्करून त्या वाघीणीच्या वाटेला गेलास ! नीचा ! ह्या पापी शब्दांबद्दल हेंच प्रायश्चित ! [ भोंसकतो ] एवढ्यानं बस्स होणार नाहीं, तुझं डोकं तुझ्या धडापासून वेगळं केलं पाहिजे ! अथवा असं नाहीं उपयोगी; असे पापी शब्द उच्चारणारी तुझी जीभ छाटून-तुला यातना भोगत–कुचंबतच मरायला लावलं पाहिजे ! नाहींतर तूं एकदम सुटशील ! ( छातीवर पाय देतो ) तडफड, तडफड ! असाच शेवटपर्यंत तडफडत पड !

**रण०**—हा पिराजी, ह्या गिरजाबाई, ही मंजुळा, आणि हे दयाळजी, आनंदवल्लरीच्या निर्मल कौमार्या-बद्दल साक्ष देतील. कोपनशीलांकडून प्रियाळाचा आणि महाराजांचा खून करवून, आपल्य राज्यप्राप्तीच्या आड येणारे कांटे उपटून टाकून, मग आनंदवल्लरी आपल्यास प्राप्त करून घ्यावी, हा त्या नराधमाचा डाव. त्याला राज्य आणि आनंदवल्लरी पाहिजे होती. आणि त्याकरितांच ह्याचं हें अघोर कारस्थान ! महाराजांचा खून ह्याच नीचानं अत्यंत अधमपणानं केला आहे.

कसा तो हा पिराजी सांगेल. ह्यानं आणि ह्या मंजुळेनं तो सर्व प्रकार प्रत्यक्ष पाहिला आहे.

**को०**–( जास्त त्वेषानें ) आणि त्याच्या या कारस्थानाबद्दल याला हें कंठस्नान !

**कां०**–यानां खून चढलासा दिसतो. यानां अगोदर निःशस्त्र करा.

**प०**–दादाला निःशस्त्र करणार? जो पुढें येईल त्याच्यावर हें शस्त्र चालेल.

**को०**–आह्मांला निःशस्त्र करायला तुह्मीं कशाला? पद्मनाभ ! ते तुझ्या हत्याराला भिताहेत. तें एकदम म्यानबंद कर. ( आपली तरवार फेंकून देऊन ) हें पहा मी देखील आपलं हत्यार टाकलं. हा ठार झाला तेव्हांच ह्याचं काम संपलं. या, धरा आतां. खुशाल धरा आह्मांला. आह्मीं तुमचे कैदी आहोंत. पण थांबा, जरा थांबा,–मला पद्मनाभाशीं दोन शब्द बोलूं दे.

**कां०**- बोला, खुशाल बोला. [ सर्व सरदार एका बाजूस होतात व रणधीरराव, दयाळजी व पिराजीकडून सर्व कबूल करवितात. ]

**कोपन**—पद्मनाभ !

**पद्मनाभ**-दादा ! त्या नीचाचा वार फार जोरानं बसला काय?

**कोपन०**-( चमत्कारिक हंसून ) जोरानं ह्मणून काय विचारतोस? त्यानं आपल्या समशेरीचं टोंक मोठ्या त्वेषानं खुपसलंन. ही जखम बरी होईल ह्मणा. पण

तिच्या अब्रूवर गदा आणून मला यानं जी भयंकर जखम केली आहे, ती कशी बरी होणार ? ती अगदीं थेट काळजापर्यंत जाऊन पोंचली आहे ! तिची केवळ अब्रू बचावण्याकरितां मी आपल्या हातानं तिचा अंत केला. तिच्या मागं मला आतां कशाकरितां जगायचं ? तिची अब्रू तिचं कौमार्य—हीं रक्षण करण्याकरितां मला आतां तिच्या बरोबरच गेलं पाहिजे. पद्मनाभ ! तूं मागं राहून आपल्या कुळाची अब्रू राख. आह्मांला घोटभर पाणी आणि चिमुटभर तीळ द्यायला कुणी तरी मागं पाहिजेच. एवढ्याकरितां तरी तुला जगलं हें पाहिजेच !


**पद्मनाभ**—असं ? तर दादा ! ताईबरोबर मीच जातो. आणि तिची अब्रू आणि तिचं कौमार्य यांचं रक्षण करतो. ( तरवार उपसतो व ती कोपनशील धरतो ) सोडा, माझी तलवार सोडा.

**को०**--छेः ! पद्मनाभ, हें नाहीं उपयोगी. तिच्या बरोबर मलाच गेलं पाहिजे. तूंहि ये पाहिजे तर.–पण नको. तूं अद्याप लहान आहेस. तूं जगाचं कांहींएक सुख पाहिलं नाहींस !

**प०**—दादा ! माझी समशेर तर सोडा अगोदर ( सोडवून घेऊं पाहतो. )

**को०**—छेः छेः तुझ्या मनांत कांहीं तरी भलतंच साहस करायचं आल्याचं दिसतं, हेंच खचित. नको–नको. साहस नको करूंस असं. तुला माझ्या गळ्याची—

The Manoranjan Press, Bombay.



**कोपनशील**—तुला ‘ माझी बहीण ’ ह्मणविण्यांत मला किती भूषण वाटे ! तुझ्यासारखी बहीण यापुढें होणें नाहीं. [ पृष्ठ २४९. ]

प०—हं तेवढी शपथ बरीक नको !

को०—शपथ आहे—असं कांहीं साहस करशील तर ! ( त्याची समशेर सोडून ) जा. ही पहा तुझी समशेर सोडली. तुला आपल्या अब्रूची आणि लौकिकाची कांहीं चाड असेल तर कोणचंहि साहस तूं खचित करणार नाहींस ! आतां मी अगोदर आनंदवल्लरीची ह्या मृत्युलोकची शेवटची भेट घेतो. आणि मग पुढं काय करायचं तें आपण ठरवूं. [ आनंदवल्लरीचे प्रेताजवळ एकदम धांवत जातो. ] आनंदवल्लरी ! या पुढं तूं आतां मला दिसणार नाहींस. इथलं हें तुझं शेवटचं दर्शन ! किती—किती ह्मणून पाहून घेऊं तुला ? तुला सांठवायला हे दोन डोळे पुरे नाहींत. मला सर्व शरीरभर डोळे असते तर त्यानीं तुला मी सांठिवली असती ! तुझ्या सारखी निश्चयी, करारी, खऱ्या दिलाची, सत्यव्रत साध्वी आणि प्रेमळ कुमारी तूंच ! तुला ' माझी बहीण ' ह्मणविण्यांत मला किती भूषण वाटे ! तुझ्या सारखी बहीण या पुढं होणं नाहीं. माझं नशीब मोठं ह्मणून तूं मला लाभली होतीस. पण प्रसंगच चमत्कारिक आला त्याला मी तरी काय करूं !

कांतिवर्म—कां—झालं कीं नाहीं भेटून ?

कोपन०—हो झालंच. अहो कांतिवर्म ! आनंदघन ! ही पहा महा सद्गुणसंपन्न माझी बहीण आनंदवल्लरी ! हिची एवढी भेट घेतो कीं झालंच. प्रियाळानां गैरसमजानं ठार करून—ह्या अधमाधम कोपनशीलानं हिच्यावर

पहिला वार केला आणि फिरून जेव्हां त्या मांगानं मला फांसावर चढवून लगेच हिच्या कौमार्यव्रताचा भंग करण्याचा घाट घातला तेव्हां–हिच्या सद्गुणाची पूर्ण परीक्षा करून, हिच्या अब्रूला यत्किंचितहि डाग लागूं नये ह्मणून–आपल्या छातीशीं छपवून ठेवलेल्या–ह्या–ह्याच जंबियानं तिला अशी भोंसकून तिचा असा अंत केला !

[ जंबिया भोंसकून घेतो. ]

**पद्मनाभ**–( भावाजवळ जाऊन ) दादा ! दादा ! काय करून घेतलंस हें ! मला तरी कशाकरितां जगायचं आतां ! [ भावाचे छातींतील जंबिया काढून घेऊन ] अहारे, पवित्र जंबिया ! एकाच जंबियानं तीघांचाहि अंत ! या जगांत एक अब्रू कीं लौकिक !

[ सर्व कावरेबावरे व स्तिमित होतात. ]

( पडदा पडतो. )

---

**अंक पांचवा समाप्त.**

समाप्त.

हें पुस्तक बेळगांव येथें ‘ श्रीशांतादुर्गा प्रकाश ’
छापखान्यांत रा. रा. बळवंत रामचंद्र सोहनी
यांनीं छापिलें,
व
रा. रा. सदाशिव लक्ष्मण सोमण, बी. ए.
एल्. एल्. बी. वकील, बेळगांव-
यांनीं प्रसिद्ध केलें.